

श्री गुरुदेव रानडे



व त्यांची

# पारमार्थिक शिकवण

-काकासाहेब तुळपुळे



ॲकॅडेमी ऑफ कंपरेटिव्ह फिलॉसफी ॲण्ड रिलिजन, बेळगांव

श्रीगुरुदेव

डॉ. रा. द. रानडे,

एम्. ए., डी. लिट्

यांचे

# संक्षिप्त चरित्र

व त्यांची

# पारमार्थिक शिकवण

लेखक :

ग. वि. तथा काकासाहेब तुळपुळे, एम्. ए.

( रिटायर्ड डेप्युटी पोस्टमास्तर जनरल, मुंबई )

प्रकाशक :

अॅकॅडेमी ऑफ कंपॅरोटिव्ह फिलॉसफी अँड रिलिजन,

बेळगांव.

प्रकाशक :

श्री. जिवाजी मध्वराव कुलकर्णी,

सेक्रेटरी, अ‍ॅकॅडेमी ऑफ कंपॅरेटिव्ह फिलॉसफी अँड रिलिजन,

श्रीगुरुदेव मंदिर

हिंदवाडी बेळगांव–५९० ०११.

ISBN 81 – 85 994 – 01 – 3.

© १९७७ अ‍ॅकॅडेमी ऑफ कंपॅरेटिव्ह फिलॉसफी
अँड रिलिजन, बेळगांव.

प्रथम आवृत्ति १९७७

व्दितीय आवृत्ति : १९९३

मूल्य : रु. ५५/–

( सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन )

मुद्रक :

श्री. राजाभाऊ देशपांडे,

स्वस्तिक प्रिंटिंग प्रेस,

हंस टॉकीज रोड,

बेळगांव-५९० ००२.

# प्रकाशकाचें निवेदन

श्री गुरुदेव रा. द. रानडे यांचे तत्त्वज्ञान व "पारमार्थिक शिकवण" या विषयावर ग्रंथ लिहिणेकरितां श्री काकासाहेब तुळपुळेंचे इतका सत्त्वशील आणि अधिकारी पुरुष मिळणे कठीण. श्रीगुरुदेवांचे तत्त्वज्ञानाचा त्यानीं सखोल अभ्यास केला होता आणि आपले स्वतःचे आयुष्याची वाटचाल श्रीगुरुदेवांचे साक्षात्कार मार्गानेच केली. या ग्रंथाची पहिली आवृती संपलेमुळें, ही दुसरी आवृती प्रसिद्ध करणेंत येत आहे. परमार्थमार्गाकडे लोकांची प्रवृती वाढत आहे. अशा लोकांना खरा परमार्थ मार्ग जाणून घेणेकरतां, या ग्रंथाचा अतिशय उपयोग होईल.

जिवाजी मध्वराव कुलकर्णी,<br>
सेक्रेटरी<br>
ॲकॅडेमी ऑफ कंपॅरेटिव्ह<br>
फिलॉसॉफी ॲंड रिलिजन

# पुरस्कार

"गुरुदेव रानडे व त्यांची पारमार्थिक शिकवण" हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यास आम्हांला आनंद होत आहे. श्रीगुरुदेव रानडे यांनी बेळगांव येथे 'अॅकॅडमी ऑफ कंपॅरेटिव्ह फिलॉसफी अँड रिलिजन' या नांवें हा पब्लिक ट्रस्ट नोंदविला. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार करणे हे या संस्थेचे एक कार्य आहे. या ग्रंथाचे लेखक श्री. काकासाहेब तुळपुळे यांनी श्रीगुरुदेवांच्या ग्रंथांचा व तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला आहे. तसेच, त्यांना श्रीगुरुदेवांचे सान्निध्य दीर्घकाल लाभले होते, व त्यांनी त्यांचे पारमार्थिक व ऐहिक जीवनहि जवळून पाहिले आहे. श्री तुळपुळे व श्रीगुरुदेव यांचा संबंध १९०८ इ मध्ये आला आणि त्यावेळेपासून आजपर्यंत ते परमार्थाची वाटचाल करीत आहेत.

येथे श्री. तुळपुळे यांच्या ग्रंथलेखनासंबधी चार शब्द लिहिणे योग्य होईल. श्री. तुळपुळे यांनी ग्रंथलेखनास सुरुवात सेवानिवृत्त झाल्यानंतर केली आणि गेल्या तीस वर्षांत वीस-बावीस ग्रंथ लिहिले. या सर्व ग्रंथांतून गुरुदेव रानडे यांच्या साक्षात्काराच्या तत्त्वज्ञानाचे मुख्य सूत्र अनुस्यूत आहे. त्यांना गुरुदेव रानडे यांच्या तत्त्वज्ञानाचा भाष्यकार म्हणता येईल. गुरुदेव रानडे यांनीं सूत्ररूपाने सांगितलेले सिद्धांत त्यांनीं साध्या सोप्या भाषेंत विशद केले आहेत. त्यांनी लिहिलेल्या 'गुरुदेव रानडे : साक्षात्काराचे तत्त्वज्ञान व सोपान" या ग्रंथाला १९६२ सालच्या महाराष्ट्र-राज्य ग्रंथ स्पर्धेतील तत्त्वज्ञानविषयक दूसरे बक्षीस मिळाले; आणि "ज्ञानेश्वरी : आत्मानंदाचे तत्त्वज्ञान" याला त्या वर्षाचा उत्कृष्ट मराठी ग्रंथ म्हणून १९६७ चे केळकर पारितोषिक देण्यांत आले. त्यांच्या आणखी दोन तीन ग्रंथांसंबंधी मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. "साधक-बोध" हे कै. ना द. हरिदास यांच्या सहकार्यानें लिहिलेले पुस्तक म्हणजे, श्रीभाऊसाहेब महाराज उमदीकर यांच्या पत्रातील तत्त्वज्ञानावर केलेले भाष्यच होय. "डोळस नामसाधन अर्थात् आत्मनंदाचा शोध" यांत लेखकाने आपल्या गुरुबंधूना लिहिलेल्या पारमार्थिक पत्रांचा संग्रह आहे अशी सुमारे सहाशे पत्रे अभ्यासून व त्यांचे विषयानुसार वर्गीकरण करून, श्री. य. श्री. ताम्हणकर यांनी ती या पुस्तकाच्या रूपाने संपदित केली. त्याची रचना अभिनव असून, त्यांतून लेखकाचे नामस्मरणविषयक व इतरहि पारमार्थिक विचार सहजपणे व्यक्त झाले आहेत.

हा पत्रात्मक प्रबंध मराठीत तरी अपूर्व आहे. ‘**नामसाधनाचे मानस–शास्त्र**’ हा त्यांचा ग्रंथहि महत्त्वाचा आहे. त्यांत केलेली नामस्मरणाच्या प्रक्रियेची मानसशास्त्रीय मीमांसा सर्वस्वी नवीन असून, नामस्मरणाचे रहस्य उकलून दाखविणारी आहे. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें श्री. काकासाहेबांचा हा उत्कृष्ट ग्रंथ म्हणण्यास हरकत नाही. ‘**साधकांची आत्मकथा**’ हे त्यांचे आत्मचरित्र मोलाचे वाटते. हे खरे आत्म–चरित्र म्हणजे त्यांच्या आत्म्याची कथा आहे. त्यांत लौकिक जीवनापेक्षा त्यांच्या पारमार्थिक जीवनाचे दर्शन अधिक होते. दुसरा विशेष म्हणजे, ही ‘**साधकाची**’ आत्मकथा आहे. त्यामुळे ती सर्व साधकांना रुचते व पटते. या कथेंत विषयाच्या अनुषंगाने गुरुदेव रानडे त्यांचे सद्‌गुरु व गुरुबंधु यांची व्यक्तिचित्रेंहि न कळत आलीं आहेत. मराठीत तरी अशा प्रकारचे प्रांजल पण सात्विक आत्मचरित्र दुर्मिळच आहे. आपल्या लेखना–संबंधी श्री. तुळपुळे लिहितात, “माझ्या बुद्धीपुढील कांहीं प्रश्न सोडविण्याला या कार्याचा उपयोग होईल, त्यासाठी होणारे वाचन, चिंतन उद्‌बोधक ठरेल, अशी माझी अपेक्षा होती व ती खरी ठरली,.... माझी आजच्या श्रद्धेची व मनोवृत्तीची घडण त्यांतून झालेली आहे. ...... “स्वात्मनो मोक्षार्थम्” हा या कार्याचा मुख्य हेतु होय. त्याचाच आपल्यासारख्या मुमुक्षुसाधकांना उपयोग होणे शक्य आहे. म्हणून संतांचे विचार त्यांच्यापुढे मांडणे हा दुसरा हेतु होय.” (साधकाची आत्मकथा पृ. १५४, १७७)

श्रीगुरुदेव रानडे यांचे निर्याण १९५७ साली झाले. त्यानंतर बेळगांव येथील डिस्ट्रिक्ट जज्जांनीं या संस्थेकरता १९६२ साली आक्टोबरमध्ये पांच जणांची ट्रस्टी म्हणून नेमणूक केली. या ट्रस्टीनी श्रीगुरुदेवांचे स्मारक म्हणून येथे “**श्रीगुरुदेव मंदिर**” बांधणेचे ठरविले आणि एप्रिल १९९४ मध्ये त्यावेळीचे कर्नाटक राज्याचे अर्थमंत्री आणि आज भारताचे हंगामी राष्ट्रपती असलेले श्री. बी. डी. जत्ती यांचे हस्ते त्या इमारतीचा पाया घालण्यांत आला. दि. ८–१२–१९६६ रोजी त्यावेळचे भारताचे राष्ट्रपति डॉ. एस्. राधाकृष्णन् यांच्या हस्ते या इमारतीचे उद्‌घाटन झाले. या इमारतीमध्ये साधकांना साधन करण्यासाठी राहण्याची सोय केली आहे. श्रीगुरुदेवानींच या संस्थेचे उद्देश ठरवून दिले होते आणि त्या उद्देशानुरुपच या सस्थेचे कार्य चालू आहे.

श्रीगुरुदेवांच्या परमार्थमार्गाचा आपणास किती उपयोग झाला आणि आपल्या मनास कशी शांती मिळाली, हे कर्नाटक केसरी देशभक्त के. गंगाधर–रावजी देशपांडे यांनी आपल्या एका भाषणांत स्पष्ट केले आहे. त्या भाषणाचा

गोषवारा या ग्रंथांत परिशिष्ट म्हणून (पृ. २१७ वर) छापला आहे श्रीनिंबर्गीमहाराजांच्या समाधीजवळच्या श्रीगुरुदेवांच्या समवेत घेतलेल्या साधक–जनांच्या छायाचित्रांत श्री. गंगाधररावजीचे छायाचित्र दिसत आहे. श्री. काकासाहेब तुळपुळे यांनीं लिहिलेला हा ग्रंथ वाचून आणि मनन करून जिज्ञासु मुमुक्षुसाधकजनांना श्री. गंगाधररावजीप्रमाणेंच आपल्या मानसहि शांति मिळविता येईल अशी आशा आहे.

श्री. काकासाहेब तुळपुळे हे या संस्थेचे ट्रस्टी व चेअरमन् म्हणून प्रथम-पासून म्हणजे १९६३ सालपासून काम पाहात होते आणि निस्पृहपणे व निःस्वार्थपणे मार्गदर्शन करीत होते. प्रदीर्घ आजारामुळें त्यांनीं त्या पदाचा नुकताच राजीनामा दिला आहे. या ग्रंथाबद्दल त्यांनी आर्थिक मोबदला कांहींहि घेतलेला नाही. या संस्थेवर त्यांचे किती प्रेम आहे हे यावरून कळून येईल. त्यांचे औपचारिक आभार मानण्याच्या भानगडींत आम्ही पडत नाही श्रीगुरुदेवांचे हे पवित्र स्थान, त्यांचे मोक्षदायी तत्वज्ञान, व त्यावर श्री. काकासाहेब तुळपुळे यांच्यासारख्या परमार्थी साधकांचे लेखन, असा हा त्रिवेणी संगम श्रीगुरुदेवांच्या कृपेनेच झाला आहे.

श्रीगुरुदेव मंदिर,
टिळकवाडी-बेळगांव
श्रीरामनवमी
चैत्र शुद्ध ९, शके १८९९
२९–३–१९७७

के. डी. संगोराम,
ट्रस्टी
ॲकॅडेमी ऑफ कंपॅरेटिव्ह फिलॉसफी
ॲंड रिलिजन, बेळगांव

# प्रास्ताविक

'गुरुदेव रानडे यांची पारमार्थिक शिकवण', या विषयावर मराठी, इंग्रजी कन्नड व हिंदी या प्रत्येक भाषेत एक एक सुमारे २०० पानांचे पुस्तक प्रसिद्ध करावे, अशी बेळगांव येथील गुरुदेव रानडे यांच्या "अॅकॅडमी ऑफ कंपॅरेटिव्ह फिलॉसफी अॅड रिलीजन," या संस्थेची योजना आहे. या विषयावर, 'गुरुदेव रानडे : साक्षात्काराचे तत्त्वज्ञान व सोपान' हे पुस्तक मी १९६२ साली प्रसिद्ध केले होते ता सर्व आवृत्ति सात वर्षापूर्वीच खपून गेली. तेव्हां त्या पुस्तकाची एक संक्षिप्त आवृत्ति मी लिहावी, अशी सूचना अॅकॅडमीच्या विश्वस्तांनीं मला केली. त्या सूचनेनुसार प्रस्तुत पुस्तक मी लिहिले. या दोन पुस्तकांत सुमारे चौदा वर्षाचे अंतर असल्याने नवीन पुस्तकांत थोडे अधिक विवरण व स्पष्टीकरण, त्याचप्रमाणे मांडणींत थोडा फरक साहजिकच आलेला आहे. तरी मुख्यत्वेकरुन ती पूर्वीच्या पुस्तकाची संक्षिप्त आवृत्तिच आहे. त्या पुस्तकाला त्यावेळचे राजस्थान विश्वविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. वि. ह. दाते, एम्. ए., पीएच्. डी. यांनीं विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे व मीहि अर्थात् निवेदन जोडले आहे. या दोन्हींतील महत्वाचे भाग खाली उध्दृत करीत आहे. यापेक्षा प्रास्ताविक म्हणून प्रस्तुत पुस्तकाविषयी विशेष अधिक कांही लिहिण्याचे कारण नाही.

## प्रा. डॉ. वि. ह. दाते यांच्या १९६२ सालच्या निवेदनांतील उतारे :–

प्रो. रामभाऊ रानडे यांच्यविषयी प्रथम थोडे लिहावयाचे म्हणजे भारतीयांच्या आध्यात्मिक कीर्तीस कारणीभूत झालेले याज्ञवल्क्यादि औपनिषदीय, ऋषी श्रीमच्छंकराचार्यादि भाष्यकार तत्त्वज्ञ, व ज्ञानेश्वरादि संत, यांच्या बरोबरीचे त्यांचे स्थान आहे, इतके लिहिले म्हणजे पुरे, तथापि आणखी एक महत्त्वाची गोष्ट त्यांचेसंबधी ध्यानांत ठेवली पाहिजे. ते पाश्चात्य व भारतीय तत्त्वज्ञानांचे गाढे पंडित असल्याने त्यांचेपुढे एक नवीनच समस्या उत्पन्न झाली होती. ती ही की, ईश्वराच्या अस्तित्वाविषयी, त्याच्या स्वरूपाविषयी व प्राप्तीविषयी जी इतकी चमत्कारिक व भिन्न–भिन्न मते त्यांना दिसत होती, त्यांचा जमल्यास समन्वय करणे, अगर त्यांतून कोणासही होता होईल तो न दुखवता, स्वतःकरिता व लोकांकरिता योग्य मार्ग शोधून काढणे व त्याचे अवलंबन करणे. आनंदाची व भाग्याची गोष्ट ही की, त्यांनीं ही समस्या पन्नास

पंचावन्न वर्षे अहोरात्र कष्ट करून, स्वानुभवाधिष्ठ होऊन सोडवून दाखविली. त्यासाठी त्यांनीं जवळ जवळ जन्मभर सोबती बनलेल्या स्वतःच्या शारीरिक व्यथेस जुमानले नाही, लोकलाज धरली नाही व अनेक दुःखे व संकटे यांची क्षिती बाळगली नाही; श्रीसमर्थ भाऊसाहेब उमदीकर यांचा आदर्श दृष्टीसमोर ठेवून व आमरणान्त साधन करून, त्यांनीं जगास दाखवून दिले आहे कीं, नैतिक आध्यात्मिक शक्ति अंगी बाणली म्हणजे मनुष्य लोकमान्य होऊन स्वदेशी व विदेशी प्रकाण्ड पंडित म्हणून प्रसिद्धीस पावतो; इतकेच नसून तो देवमान्य व देवसदृशहि होतो." ...

साक्षात्काराचे तत्त्वज्ञान व साक्षात्काराचे मानसशास्त्रदृष्टचा विश्लेषण अशी दोन शास्त्रे पाश्चात्यांच्या विचारानुसार अलिकडे पन्नास वर्षांत निर्माण झाली आहेत. एकांत साक्षात्काराच्या दृष्टीने तत्त्वज्ञानांत येणाऱ्या अनेक विषयांचा परस्परसंबंध काय असू शकेल याचे विवेचन असते; तर दुसऱ्यांत साक्षात्काराच्या प्रक्रियेत अनेक प्रकारच्या पद्धतशीर घटना का व कशा घडून येतात, याचे वर्णन असते. उदाहरणार्थ, ईश्वराचे सगुणनिर्गुणात्मक स्वरूप, त्यांच्या अस्तित्वाची कारणे, ईश्वर व भक्त यांचे अगर गुरु व शिष्य यांचे नाते, नीतिशास्त्र व साक्षात्कार यांचा संबंध, मोक्षांचे प्रकार व स्वरूप इत्यादि विषय साक्षात्काराच्या तत्त्वज्ञानांत येतील; तर साधकाची भूमिका, साधनाच्या सांगोपांग पद्धतीचा विचार, दुर्गुणांचा त्याग, सद्गुणांचा परिपोष, स्वानुभवाच्या प्रकारांचे वर्णन व वर्गवारी, साक्षात्कारामुळे होणारे शारीरिक, मानसिक व इतर परिणाम, साधकावस्थेतील अंधारी रात्र व अनुभवाची पहाट, वगैरे विषय मानसशास्त्रीय विश्लेषणांत येतात. ह्या दोनहि प्रकारच्या विषयांचा विचार प्रस्तुत पुस्तकांत 'तत्त्वज्ञान' व 'सोपान' या दोन भागांत झालेला आहे. ...... आम्ही येथे फक्त दोन–तीन महत्वाच्या मुद्यांचा उल्लेख करूं इच्छितो.''

औपनिषदीय तत्त्वज्ञानांप्रमाणे, आत्माच सर्व विश्वाचे कारण असून, तोच निसर्गांत व मानवी देहांत अंतर्बाह्य व्यापून राहिलेला आहे व तोच मानवी जीवनांतील मूल्यांचे अंतिम ध्येय असल्याने, त्याचे प्रातिभश्रवणादि अनेकविध अनुभव घेऊन, त्याच्याच सान्निध्यामुळे व अनुसंधानामुळे स्वतःच्या व समाजांतील इतर लोकांच्या जीवनांत परोपकारादि उत्कट गुणांची वाढ करून, सर्वत्र समाधान व शांति यांचे साम्राज्य करणे, हेच ह्या पुस्तकाचे अगर श्रीगुरुदेवांच्या शिकवणीचे सारसर्वस्व आहे. हे ध्येय गांठावयाचे झाले तर साहजिकच

इंद्रियजन्य क्षणभंगुर सुखांचा सतत पाठलाग करण्यांत आयुष्याचा क्षय न करता आत्म्याच्या श्रवणमननादि चिंतनाने व दर्शनस्पर्शनादि अनुभवाने उत्पन्न होणाऱ्या अतींद्रिय, शाश्वत व निर्मळ सुखाचा वरचेवर अगर सतत अनुभव घेणे व इतरास तदनुसार प्रवृत्त करणे, हे क्रमप्राप्तच आहे. शाश्वत सुख, मिळेल किंवा नाही कोण जाणे; क्षणभंगुर सुखे कां होईनात, तीहि शाश्वत सुख मिळेल ह्या मृगतृष्णेने हातची जावयाची, असा निराशात्मक युक्तिवाद करण्याचे प्रयोजन नाही. कारण आजपर्यंत शेकडों, हजारों वर्षांचा व अनेक देशांतील अनेक साधुसंतांचा, स्थल–काल–भाषा इत्यादी अनेक भेदनिपेक्ष असा एकच अनुभव आहे की, सद्वस्तु आनंदघन आहे. सर्वांघटीं व्यापून असलेल्या ह्या आनंदघनाच्या आश्रयानेच दुःखमय, शबल सुखांचा व तन्निमित होणाऱ्या सर्व दुष्ट प्रयत्नांचा व पापांचा संहार होईल, अन्यथा नव्हे. असे पापरहित, स्वानंदसमृद्ध आत्मानुभवी पुण्यपुरुष इतरांचाहि आत्मज्ञानाच्या दानाने उद्धार करीत आले आहेत, अशीहि साक्ष अव्याहतपणे जगांत सर्वत्र दिसून येते, तेव्हां स्वतःसहि आत्मानंद मिळावा व त्यामुळे क्षणभंगुर संसाराची ओढ कमी होत जावी, अशी ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं सद्गुरूंनीं प्रज्वलित करून दिलेल्या नामरूपी अग्नीची ज्योत स्मरणरूपी वायूची श्वासोच्छवासा–बरोबर एकसारखी फुंकर घालून अखंड वाढवीत ठेवावी; म्हणजे त्यायोगे वासनांची जळमटे व पातकांची अरण्ये जळून नाहीशी होतील व मग सद्गुणांची जोपासना होऊन, जिकडे तिकडे आत्मा व आत्मानंद यांचा अनुभव येऊं लागल्यावर, समाजांतील देशांतील व जगांतील मानवी व इतर प्राणी यांच्याविषयी प्रेम, आदर व दया उत्पन्न होऊन, त्यांच्यांहि सद्गुरूप्रमाणे शिष्यहि प्रयत्न करील; एवंच, भक्तिसुखासाठी हपापलेल्या साधकाचे पदरी आत्मसुख, समाजसेवा व विश्वबंधुत्व ही फुलें निश्चितपणे येतील, यांत तिळमात्र शंका नाही. असा ह्या ग्रंथाचा थोडक्यात सारांश आहे अर्थात याच्या वाचनामुळे, समाजवृक्षाच्या वाढीस व कल्याणार्थ शाखापल्लवीं पाणी घालण्यापेक्षा मुळासच आत्मानंदाचे पाणी घालणे योग्य आहे, असा बोध झाल्यास श्रीगुरुदेवांच्या तत्त्वज्ञानाचे, श्रीयुत काकासाहेब तुळपुळे यांच्या श्रमाचे, व माझ्या प्रस्तावनरूपी श्री गुरुंच्या सेवेचे फळ मिळाले असे होईल.

माझ्या १२ जून १९६२ सालच्या निवेदनांतील उतारा –

"गुरुदेव रानडे १९०८ मध्ये डेक्कन कॉलेजात फेलो होते व त्याच वर्षी त्या कॉलेजात मी प्रिव्हियसच्या वर्गांत प्रवेश केला होता. आमच्या वर्गाला 'जानकीहरण' हे संस्कृत काव्य ते शिकवीत असत. असा गुरु–शिष्य म्हणून

माझ्या भाग्याने आमचा प्रथम परिचय झाला. त्यावेळीच त्यांची अद्वितीय बुद्धिमत्ता, अत्यंत निरहंकार व नम्रता, साधेपणा, सौजन्य, प्रेमळ व सहानुभूतिपूर्ण वागणूक, यामुळे त्यांच्याविषयी फार प्रेमादर वाटूं लागला व तो वाढत जाऊन त्याची परिणति पारमार्थिक संबंधांत झाली. त्यांच्या प्रेरणेनेच, त्यांच्या इतर अनेक मित्राप्रमाणे, गुरुदेव रानडे यांचे सद्‌गुरु श्रीभाऊसाहेब उमदीकर यांचेकडून मी अनुग्रह घेतला व माझ्या पारमार्थिक जीवनाला थोडीशी सुरूवात झाली. गुरुदेवांच्या संगतीचा जो अनिर्वचनीय लाभ झाला. त्याचाच एक महत्वाचा पैलू म्हणजे त्यांच्या परमार्थाच्या तत्त्वज्ञानाचे परिशीलन होत गेले व त्यांचे ग्रंथ वाचून व त्याविषयी अनेक प्रसंगीं चर्चा ऐकून, त्यांत भर पडली. अशा तत्त्वज्ञानाचा उपयोग बुद्धिवादी जिज्ञासूंना विशेष होतो, असे गुरुदेवांनीं म्हटले आहे. माझी प्रकृति त्या प्रकारचीच असल्याने, त्यांच्या 'बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवादाचा' मला परमार्थाच्या दृष्टीने पुष्कळच फायदा झाला त्यामुळे ईश्वरसाक्षात्कार हे ध्येय बुद्धीसमोर स्पष्टपणे साकार होत गेले; त्यांच्या प्राप्तीचा मार्ग समजला; त्याचे साधन म्हणजे सबीज नाम, तेहि. सद्‌गुरुकृपेने हाती आले व आपल्या अल्प शक्ति–बुद्धीप्रमाणे परमार्थ–पथावर पाउले टाकण्याचा प्रयत्नहि होऊं लागला. ... गुरुदेवांचे तत्त्वज्ञान ही माझी जीवनश्रद्धा आहे; केवळ बौद्धिक ज्ञानांत टाकलेली, जीवनाशी प्रत्यक्ष संबंध नसलेली, भर नव्हे त्या तत्त्वज्ञानाच्या वाचन–चिंतन–मननाने अशाच समान–वृत्तीच्या जिज्ञासूनाहि असे लाभ होतील, या विचारानें, ते मराठी वाचकांना सादर करावे ही इच्छा बरीच वर्षे, विशेषतः १९५७ मध्ये गुरुदेवांचे निर्याण झाल्यापासून मनांत होती. ती या पुस्तकाच्या रूपाने पूर्ण झाली. हे पुस्तक आज वाचकांपुढे ठेवताना समाधान व त्याबरोबरच एवढे अवघड कार्य आपल्या हातून कितपत यशस्वीपणे पार पडले असेल, ही भीतीहि जागृत आहे. या प्रश्नचिन्हाचे उत्तर वाचकांनीच द्यावयाचे आहे."

गुरुदेव रानडे यांच्या चरित्रांत डॉ. शं. गो. तुळपुळे अगदी यथार्थतः म्हणतात, "(प्रो. रानडे) यांना परमार्थाचे पाणिनी ही पदवी शोभून दिसेल. पाणिनीपूर्वी भाषा होतीच. तिचे व्यवस्थापन करण्याचे महत्कार्य त्याने केले तसेच प्रो. रानडे यांच्यापूर्वीहि परमार्थ होताच. त्याचे तर्कशुद्ध व्यवस्थापन त्यांनीं करून दाखविले." हेच गुरुदेवांच्या तत्त्वज्ञानाचे वैशिष्ठ्य आहे. परमार्थाचे स्पष्टीकरण करून त्याचे बुद्धिनिष्ठत्व दाखविताना, साहजिकच त्या विषयांत कांही नवीन तात्त्विक सिद्धांतांची भर (Original Contribution) त्यांनीं घातली आहे. अशा कांही अभिनव विचाराचे

थोडें दिग्दर्शन करणे उद्बोधक होईल. त्यामुळे कांहीं संशयांचा निरास होऊन, कांहीं प्रश्न सुटतात, असे दिसून येईल.

१) ईश्वर हा इंद्रिये–मन–बुद्धि यांच्या अतीत आहे; मग त्याचे ज्ञान कसे होऊं शकेल ? या प्रश्नाचे उत्तर, 'प्रतिभा–शक्तीला (Intuition) त्याचे ज्ञान होऊं शकते,' या सिद्धांतांत सांपडते.

२) ईश्वर अज्ञेय आहे असे म्हणून, पुन्हां त्याचा साक्षात्कार करून घ्या, हे सांगणे परस्परविरोधी वाटते. त्याचा परिहार, ईश्वराच्या अज्ञेयत्वाचे स्वरूप काय हे स्पष्ट दाखवून गुरुदेवांनीं केला आहे. तो अज्ञेय आहे, म्हणजे त्याचे पूर्णत्वाने आणि वेगळेपणाने ज्ञान होऊं शकत नाही; त्याचप्रमाणें तो काय आहे हें कळत नाही; तो आहे असा मात्र निश्चित अनुभव येतो.

३) ब्रह्मसाक्षात्काराने ब्रह्मरूप झालेल्या पुरुषाच्या ठिकाणीं पराभक्ति कशी संभवते ? गुरुदेवांच्या, 'ऐक्याकडे अखंड वाटचाल (Approximation) या सिद्धान्ताने हे कोडें सुटते.

४) संत ज्यांना साक्षात्कार, आत्मदर्शने किंवा अनाहत नादाचे श्रवण, स्वरूपदर्शन म्हणतात, ते भ्रम कशावरून नाहीत ? ते ईश्वराचे सत्य अनुभव आहेत याला प्रमाण काय ? अनुभवाच्या सत्यतेची प्रमाणे, त्याचे निकष, सांगून व त्या निकषावर घांसून गुरुदेवांनी आत्मानुभवाची सत्यता सिद्ध केली आहे.

५) साधकाच्या दृष्टीसमोर देवाचे जें रूप अवरते, तो अवतार, हा विचार नाविन्यपूर्ण आहे.

६) साक्षात्काराच्या पांच पायऱ्या दाखवून द्वैत–विशिष्टाद्वैत–केवलाद्वैत या सिद्धांतांचा केलेला समन्वय चिंतनीय आहे.

७) अनुभव म्हटला की त्यांत द्वैत येणारच. आत्मानुभवाने तर द्वैताचा निरास होतो, असे सांगतात. पण ज्ञाता–ज्ञेय या द्वैतावांचून आत्म्याचा अनुभव तरी कसा येणार ? गुरुदेव सांगतात, "आत्मानुभवांत आत्माच ज्ञाता व आत्माच ज्ञेय असतो, म्हणून या अनुभवांत द्वैत नाही. स्वतःच ज्ञाता व ज्ञेय होण्याची ही अद्भुत शक्ति आत्म्यांमध्ये आहे."

अशी अनेक स्थले वाचकांच्या लक्षांत येतील. उदाहरणादाखल कांहीं वर दिली आहेत. अत्युच्च साक्षात्कार, गाढ विद्वत्ता, सखोल विचार, प्रभावी भाषाशैली, प्रत्ययकारी तर्कप्रणाली इत्यादी थोर गुणामुळे गुरुदेव रानडे यांचे ग्रंथ सर्व प्रकार अति उच्च दर्जाचे आहेत, हे विद्वानांनीं संतोषपूर्वक मान्य केले आहे. "उपनिषदरहस्य या ग्रंथाला उपनिषदावरील प्रमाणभूत ग्रंथांत अग्रस्थान लाभेल. "हा ग्रंथ म्हणजे लेखकाचे शाश्वत स्मारकच होय;" "मराठी तत्त्वज्ञांनी संतांवरील ग्रंथांत या संतांची शिकवण व परमार्थ–प्राप्ति यांचे उत्कृष्ट व विद्वत्तापूर्ण समीक्षण केलेले आहे. पुस्तकांत सर्वत्र अत्युच्च गुणवत्ता दृष्टीस पडते." असे अनेक गौरवपूर्ण अभिप्राय गुरुदेवांच्या ग्रंथावर विद्वान पंडितानी दिले आहेत. गुरुदेवांच्या अशा भव्योदात्त तत्त्वज्ञानावर पुस्तक लिहिण्याला अवश्य असलेली गुणसामग्री मजजवळ अल्पप्रमाणांतच आहे, याची पूर्ण जाणीव मला आहे; त्यामुळे वाचकांना एक नम्र विनंती करावयाची आहे. गुरुदेवांच्या तत्त्वज्ञानाचा सामान्य परिचय (General introduction) या स्वरुपाचे माझे हे पुस्तक आहे. त्यांच्या ग्रंथांतील विचार रुपांतर करून प्रस्तुत पुस्तकांत मी घेतले आहेत, त्यांचे भाषांतर केले नाही. अज्ञानाने किंवा नजरचुकीने रुपांतरांत दोष राहिले असतील. तेव्हां कांही ठिकाणी शंका आल्यास, शक्यतो वाचकांनी गुरुदेवांच्या मूळ ग्रंथांतून ते विचार पाहावे. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा खरा आस्वाद व मर्म मूळ ग्रंथ वाचल्यानेच लाभू शकेल, हे उघड आहे. परंतु इंग्रजी भाषेच्या अज्ञानामुळे हे ज्यांना शक्य नाही त्यांना प्रस्तुत पुस्तकापासून कांही फायदा होईल.

आगामी कालांत गुरुदेवांच्या तत्त्वज्ञानावर अनेक अधिकारी विद्वानांकडून अनेक भाषांत ग्रंथ लिहिले जातील यांत शंका नाही. असे अधिकारी तत्त्वज्ञ आजहि माझ्या दृष्टीसमोर आहेत. या पूर्वीहि, डॉ. शं. गो. तुळपुळे व श्री. मनोहरपंत देशपांडे यांनी मराठी व कन्नड भाषेत लिहिलेल्या गुरुदेवांच्या चरित्रांत त्यांच्या तत्त्वज्ञानाचे विस्तृत, पद्धतशीर विवेचन केले आहे. तरीहि, केवळ त्यांच्या तत्त्वज्ञानाला वाहिलेले असे हे पहिलेच पुस्तक आहे; "I begin, Let worthier follow," अशी याबद्दल माझी भावना आहे. भारतीय व पाश्चात्य तत्त्वज्ञानांत सिद्धप्रज्ञ अशा अधिकारी विद्वानांनी अनेक ग्रंथ लिहून गुरुदेवांच्या मंगलकारी तत्त्वज्ञानाचा संजीवनीमंत्र अधिक विस्ताराने मानवतेला द्यावा, अशी माझी अंतकरणपूर्वक इच्छा आहे.

प्रस्तुत पुस्तकाचे सर्व अधिकार ॲकॅडेमीला सुपूर्त केले आहेत.

**ऋणवाचन : ऋण :–** ॲकॅडेमीच्या विश्वस्त मंडळाने गुरुदेवांची सेवा करण्याची ही संधि देऊन मला उपकृत केले आहे. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी

आहे. माझे गुरुबंधु व सन्मित्र श्री बाबासाहेब संगोराम व श्री रामण्णा कुलकर्णी यांनीं हस्तलिखित काळजीपूर्वक वाचून महत्त्वाच्या सूचना केल्या. श्री. जगन्नाथ-राव परुळेकरांनीं अत्यंत आपुलकीने छपाईकडे लक्ष ठेवले. सद्‌गुरूंची सेवा म्हणून एका नामधारकानें मुद्रणे तपासली, सूची तयार केली. श्री. रा. गो. सहस्रबुद्धे व श्री. य. कृ. नाझरे यांनीं चरित्राची मुद्रणप्रत तयार केली याबद्दल मी सर्वांचा अत्यंत आभारी आहे. पुस्तकाला जोडलेल्या चरित्राचे श्रेय मुख्यत: माझे पुतणे चि. डॉ. शं. गो. तुळपुळे यांना आहे. माझी कन्या चि सौ. कुमुदिनी नगरकर हिने पुस्तकाची पहिली स्वच्छ प्रत लिहिली; माझी भाची चि. कु. नीता दातार हिने सुंदर मुद्रणप्रत तयार केली. या चिरंजीव मंडळींना मी प्रेमाने शुभाशीर्वाद देतो.

स्वस्तिक मुद्रणालयाचे मालक श्री. राजाभाऊ देशपांडे व त्यांचे सहकारी यांनी छपाईचे काम काळजीपूर्वक व विनाविलंब केले याबद्दल त्यांचे आभार मानणे अवश्य आहे.

गुरुदेव रानडे यांचे माझ्यावर अनंत उपकार झाले आहेत. कशा कशाचे म्हणून उपकार मानूं व कसे मानूं? मागील ग्रंथांच्या प्रस्तावनेतील खालील भाग उद्धृत करतो म्हणजे पुरे.

" सद्‌गुरूंच्या कार्याची सेवा म्हणजे सद्‌गुरूंची सेवा, " असे गुरुदेव नेहमी सांगत असत. तेव्हां हा ग्रंथ म्हणजे त्यांची सेवा, पूजाच आहे. त्यांचे त्यांचे — जवळचेच कांहीं साहित्य घेऊन ही पूजा केली आहे. ते साहित्यहि नीट वापरता आले नाही, हे मान्य आहे. पण अशी पूजा करण्यालाहि संतांची मान्यता आहे.

" तरि विश्वप्रगटितया गभस्तो ।  
हातिवेनि न कोजे आरतो ।  
कां चुळोदकें आपांपती ।  
अर्घ्यु नेदिजे ।। " (ज्ञानेश्वरी ९. १३)

गुरुदेवांच्या ज्ञानसागरांतीलच चुळकाभर पाणी घेऊन, त्यांना अर्घ्य प्रदान करतो त्यांच्या महान् उपकारांची मला जागृत जाणीव आहे, हे दाखविण्यासाठी दुसरे मी काय करूं शकणार ?

सांगली  
२–१०–१९७६ — ग. वि. तुळपुळे.  
विजयादशमी.

# अनुक्रमणिका


पुरस्कार i–iii

प्रास्ताविक iv–x

श्रीगुरुदेव डॉ. रा. द. रानडे, एम.ए.डी. लिट यांचे संक्षिप्त चरित्र १-३८

लौकिक चरित्र

जन्म १. शिक्षण २. आजार–शिक्षणात खंड–नोकरी–एम. ए. च्या परिक्षेंत अपूर्व यश ३. ॲकॅडेमी व तत्वज्ञान मासिक ५. अलाहाबाद–विश्व विद्यालय ६ ग्रंथ रचना ७. गुरुदेवांचे ग्रंथ प्रकाशित होण्यापूर्वीही त्यांच्या सिद्धप्रज्ञेचे मला झालेले प्राथमिक ओझरते दर्शन ९.

आध्यात्मिक चरित्र १८–३८

१) प्राथमिक साधकदशा १९ २) संकटपरंपरा–तीव्र मुमुक्षुता व उत्कट साधकदशा २० ३) परमार्थाचा उषःकाल व प्रभात–गुरुकृपेने अभ्युदय–निःश्रेयसाची प्राप्ति–गुरुपदाचा अधिकार, पण प्रकट कार्य नाही २५ ४) यारे यारे अवघे जन–पर्जन्यवृष्टीने नामदान ३० ५) अमृतमहोत्सव ३३ ६) निर्याण ३४.

## भाग पहिला : साक्षात्कार तत्त्वज्ञान ३९–९४

### प्रकरण १ ले – विषय प्रवेश ३९–५०

१) साक्षात्कार व समाज ३९ २) गुरुदेव रानडे यांच्या ग्रंथातील कांही महत्वाचे सिद्धांत ४० ३) साक्षात्कार म्हणजेच आत्मानंद ४१ ४) गुरुदेवांचा ग्रंथलेखनाचा हेतु ४४ ५) ग्रंथातील मुख्य शिकवण–साक्षात्कारवाद हा केंद्रीय सिद्धांत ४४ ६) ईश्वर-साक्षात्काराने जीवन-साफल्य ४५ ७) ग्रंथातील तत्वप्रणाली ४७ ८) आत्मानुभव आणि बौद्धिक ज्ञान ४९.

### प्रकरण २ रे : परतत्वज्ञान (Metaphysics) ५१–६५

१) आत्मानंद हेच सर्व दर्शनांचे लक्ष्य ५१ २) तत्वज्ञानाच्या विचारातील क्रम–परतत्वज्ञान–नीतिशास्त्र–साक्षात्कारवाद ५२ ३) समन्वयाचा दृष्टीकोन ५३ ४) परतत्वज्ञानातील मुख्य विषय ५३ ५) उपनिषदांचे आत्मकेंद्रित परतत्वज्ञान ५४ ६) ईश्वर, जीव व विश्व ५५ ७) व्यावहारिक सत्ता ५६ ८) मुक्तीचे स्वरुप ५७ ९) पूर्णत्वाकडे अखंड वाटचाल ५८ १०) ईश्वराच्या

लक्षणातील विरोधाभासाचा परिहार ५९ ११) वेदान्त सांप्रदायाचा समन्वय ६० १२) अवतार ६२ १३) ईश्वर हे परम आश्चर्य ६३ १४) स्वसंवित् ६४.

**प्रकरण ३ रे : नीतिशास्त्र [Ethics]** ६६–८९

१) तत्वज्ञानानंतर नीतिविचार क्रमप्राप्त ६६ २) परतत्वज्ञान–नीतिशास्त्र – साक्षात्कारवाद ६६ ३) नीतिची प्रमाणे ६७ ४) शरणागतीची तात्विक चर्चा ६८ ५) नैतिक ध्येये ६९ अ) निवृत्तीपर ध्येये ७० आ) प्रवृत्तिपर ध्येये ७१ ६) आत्मनंदवाद ७२ ७) आत्मसाक्षात्कारवाद ७३ ८) आत्मसाक्षात्काराच्या नैतिक व अनुभूतिपर बाजू ७४ ९) गीतेतील नैतिक ध्येय ७५ अ) ज्ञान–कर्म–समन्वय ७५ आ) नीतिवाद ७६ इ) अतिनीतिवाद ७९ ई) स्थितप्रज्ञता ८० उ) आत्मानंद ८० १०) आत्मानंदात सर्व सद्‌गुण ८१ ११) आत्मस्वातंत्र्य ८२ १२) पापपुण्यातीत कोण होतो? ८३

**प्रकरण ४ थे साक्षात्कारवाद (Mysticism)** ८३–९४

१) व्याख्या ८३ २) आत्मा अज्ञेय म्हणजे काय ? ८३ ३) प्रतिभाशक्ति ८५ ४) आत्मानुभवाच्या सत्यतेची प्रमाणे ८६ ५) साक्षात्कारशास्त्राच्या सत्यतेची प्रमाणे ८७ ६) साक्षात्काराचे भव्योदात्त परिणाम ८७ ७) साक्षात्कारविषयक कांही महत्वाचे मुद्दे ९० अ) ध्येये व तत्वज्ञान ९० आ) सद्‌गुरूंची आवश्यकता ९० इ) गाढ निराशेची रात्र ९२ ई) ईश्वराचे प्रेम व वैषयिक प्रेम ९२ ८) साक्षात्कारवाद हाच विश्वधर्म ९३

## भाग दुसरा : साक्षात्कार सोपान ९५–२०३

**प्रकरण ५ वे : परमार्थाची प्रवृत्ति, प्रगति आणि परिपूर्ति ९५–१०८**

१) प्रास्ताविक ९५ २) परमार्थ–प्रवृत्तीविषयी कांही सामान्य विचार ९६ ३) परमार्थ–प्रेरणेचा उगम ९७ ४) परमार्थ–प्रवृत्तीची कारणे ९८ अ) जरा–मृत्यु–दुःख ९८ आ) जीवनातील अस्थिरता व वंचना–जीवाचे अंधत्व १०० इ) अटळ प्रारब्ध १०० ई) पापांची जाणीव १०१ उ) विश्वाचे कोडे १०२ ऊ) जीवाचे मूळ ब्रह्मत्व व सताचे दिव्य भव्य जीवन १०३ ५) परमार्थ प्रवृत्तीच्या कारणांत जीवन साफल्याचा निर्देश १०४ ऐ) भक्ती करा हा संतांचा आदेश १०५ ओं) चिंता व नैराश्य १०७ औ) संपूर्ण आध्यात्मिक जीवनाचे संक्षिप्त दर्शन १०८.

**प्रकरण ६ वे : नैतिक सिद्धता–सद्‌गुणसंपादन (१०९–११६)**

१) नीति व साक्षात्कार यांचा संबंध १०९ २) दुर्गुणत्याग ११० ३) सद्‌गुण संपादन १११ ४) ज्ञान म्हणजे सद्‌गुण १११ ५) दैवीसंपत्ती ११२

६) हिंदी संतांच्या ग्रंथातील काही सद्‌गुण ११३ ७) त्रिगुण ११४ ८) दासबोधातील सद्‌गुण ११५ ९) सद्‌गुण – प्राप्तीचा उपाय ११६

**प्रकरण ७ वे : देवभक्तांचे नाते** ११७–१३१

१) देवभक्त-संबंध ११७ २) साक्षात्काराच्या दृष्टीने ईश्वराची लक्षणे ११८ ३) ईश्वराची भक्त–साक्षेप लक्षणे ११७ अ) भक्तप्रिय ११८ आ) भक्तिप्रिय ११८ इ) संकट–मोचना ११९ ई) यशदाता ११९ उ) भक्तांवर नितांत प्रेम ११९ ऊ) संकटे व माया तरुन जगण्याचा एकमेव उपाय म्हणजे ईश्वराचा आश्रय १२१ ४) देव– भक्तांचे ऐक्य १२१ ५) भक्ताचा देवाशी कलह १२३ ६) देव–भक्तांची अनेक नाती १२४ ७) भक्ताची लक्षणे: i) शारीरिक ii) मानसिक १२५–१२६ ८) आत्मस्वातंत्र्याविषयी एक महत्वाचा प्रश्न १२६ ९) भक्तांची विनवणी १२८ १०) सख्य–भक्ती किंवा शरणागति १३०. ११) आत्मनिवेदन किंवा अनन्यता १३१

**प्रकरण ८ वे : साधनमार्गाविषयी कांही सामान्य विचार** १३२–१४४

१) नामसाधनाविषयी तात्त्विक विचार १३२ २) गुप्तरूप म्हणजे गुरू १३५ ३) सद्‌गुरूंची लक्षणे १३५ ४) सद्‌गुरूंचे कार्य १३७ ५) सद्‌गुरू-प्रशस्ति १४० ६) सच्छिष्य–लक्षण १४० ७) सच्छिष्याचा आचार १४१ ८) नाम हे अमोघ साधन १४२– सबीजनाम १४३

**प्रकरण ९ वे : साधन–विचार** १४५–१६३

१) नामस्मरण हे मुख्य साधन १४५ २) साधक–लक्षणे १४६ ३) नामस्मरणाची प्रक्रिया १४६ ४) भक्ति १५० ४) चिंतनाने जीवनांत बदल १५१ ५) कल्पना कशी मोडावी १५३ ६) सत्संगति १५५ ७) उत्कट प्रेम १५८ ८) शरणागति आणि भाव १५८ ९) निराशेची अंधारी रात्र १५९ १०) मंगल प्रभात १६१ ११) ईशकृपा १६४

**प्रकरण १० वे : साक्षात्कार** १६४-१७९

१) परमार्थाचे शिखर : साक्षात्कार १६४ २) आत्मानुभवांचे प्रकार १६४ i) प्राथमिक अनुभव १६५ ii) एकत्रित किंवा संमिश्र अनुभव १७१ iii) दिव्य भव्योदात्त अनुभव १७४ ३) स्वरुप साक्षात्कार–१७६, ४) एकमेकाद्वितीय ब्रह्म १७९

**प्रकरण ११ वे. : साक्षात्काराचे परिणाम** १८०–१९५

१) साक्षात्काराने जीवनांत क्रांती १८०. २) आनंद व शांती १८०. ३) आत्मानंदाचे नैतिक–मानसिक परिणाम १८२. ४) आत्मानंदाचा किंवा ईश्वरदर्शनाचा उन्माद १८५. ५) निमित्तमात्रत्व १८६. ६) साक्षात्काराचे

तत्वज्ञानाच्या दृष्टीने परिणाम १८६. ७) केवलाद्वैत १८८ ८) सर्वात्मभाव १८८–१८९. ९) मुक्ति १८९ १०) संतांचे जीवन्मुक्तीचे अनुभव १९०. ११) साक्षात्काराचे सामाजिक परिणाम १९१. १२) संतसंघ १९४.

**प्रकरण १२ वे :– निष्कर्ष व उपसंहार** १९६–२०३

१) सिंहावलोकन १९६. २) साक्षात्काराने जीवनसाफल्य १९६. ३) कलात्मक अनुभूतीचे दोन प्रकार : सुंदर–साक्षात्कारांतील भव्योदात्त (Sublimity) १९८. ४) साक्षात्कारांतच जीवनमूल्यांचा समन्वय व त्यांचे सत्यदर्शन १९९. ५) आत्मानंदाचे सहजोद्गार २००. ६) विश्वकल्याणकारी पसायदान २०२.

**विषयसूची** २०३–२१६

**परिशिष्ट** २१७–२२४

पदटीपेंतील संदर्भग्रंथांचे स्पष्टीकरण –

१. उप :– "A Constructive Survey of Upanishadic Philosophy : being an introduction to the thought of the Upanishads." by Dr. R. D. Ranade. Second Edition 1968. (Bharatiya Vidya Bhavan, Bombay).

१. अ) उप. प्र. :– Preface to the First Edition reproduced in the above book.

२) म सा. :– "Indian Mysticism in Maharashtra" by Dr. R. D. Ranade in "History of Indian Philosophy" Vol. VII Edition 1933 (Aryabhusan Press, Poona).

२. अ) म. सा. प्र. :– Preface to the above book.

३) हिं. सा. :– "Pathway to God in Hindi Literature" by Dr. R. D. Ranade, First Edition 1959 (Bharatiya Vidya Bhavan, Bombay).

३ अ) हिं. सा. प्र. :– General introduction to the above book.

४ भ. गी. :– "The Bhagavadgita as a philosophy of God-realisation : being a clue through the labyrinth of modern interpretations," by Dr. R. D. Ranade, Edition 1959 (Nagpur University, Nagpur).

५. क.सा. :–"Pathway to God in Kannada Literature," by Dr. R.D.Ranade, Edition 1960 (Bharatiya Vidya Bhavan, Bombay).

६. प. व्या. :– "डॉ. रा. द. रानडे यांची परमार्थपर व्याख्यानें (भावार्थ व अनुवाद)," संग्राहक व अनुवादक ग. वि. तुळपुळे प्रथमावृत्ति १९५७,

** **

# शुद्धीपत्रक

| पृ. क्र. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | ४ | दत्तोपत | दत्तोपंत |
| २ | ११ | सस्थानचे | संस्थानचे |
| २ | शेवटची | थिऑसफि ट | थिऑसफिस्ट |
| ९ | १७ | गरुदेवांचे | गुरुदेवांचे |
| १६ | २६ | सवत्र | सर्वत्र |
| २५ | ६ | ओर | और |
| ३२ | १ | विश्वधर्भ | विश्वधर्म |
| ३६ | ८ | प्रो. रानड | प्रो. रानडे |
| ४७ | ४ | प्राप्त | प्राप्ति |
| ५७ | ४ | बाद | वाद |
| ६१ | ६ | द्रष्टच्य | द्रष्टव्य |
| ६५ | ५ | पातजल योगांतील | पातंजल योगांतील |
| ६५ | ८ | स्वसवित् | स्वसंवित्, |
| ६७ | १२ | नीतीची प्रमाण | नीतीची प्रमाणें |
| ६८ | १० | साक्षात्कार | साक्षात्कारो |
| ७० | ३ | ध्येय | ध्येये |
| ७० | ७ | भागांचा | भोगांचा |
| ७१ | पेजहेडिंग | शास्त्रनीति | नीतीशास्त्र |
| ७३ | २ | मोजाप | मोजमाप |
| ७३ | ८ | प्रसिद्ध | सिद्ध |
| ८१ | २ | आमानंदच | आत्मानंदच |
| ८९ | १७ | प्रतिदर्शन | प्रातिभ दर्शन |
| ८९ | २३ | सिद्धांत | सिद्धांत |
| ८९ | २४ | व्याख्येप्रमाण | व्याख्येप्रमाणे |
| ९० | १७ | पाहिजे | पाहिजे |
| ९९ | ८ | भक्ति | भक्ति |
| ९९ | २१ | मृत | मृत |
| १०३ | १२ | निर्दोष / है | निर्दोख / हं |

| पृ. क्र. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १०४ | १० | असा निश्चय | असा निसंदिग्ध निश्चय |
| ११५ | ९ | मुनेर्भाव | मुनेर्भाव : |
| १२८ | ७ | त्रिनवणी | बिनवणी |
| १३१ | पेजहेडिंग | देव भक्तां नाते " | देव भक्तांचे नाते" |
| १३१ | १ | प्रथय | प्रथम |
| १३१ | ९ | सिद्धांतन | सिद्धांतच |
| १३१ | २१ | आत्मनिवेदना | आत्मनिवेदनाच्या |
| १३३ | ४ | स्वभा | स्वभावे |
| १३७ | १५ | श्रीभाऊसाहेव महाराज | श्रीभाऊसाहेव महाराज |
| १४४ | ५ | समथ्य | सामर्थ्य |
| १५९ | शेवटची | "नाथ माला | "नायमाला |
| १६० | ३ | लोखंडीचे | लोखंडाचे |
| १६० | ६ | ईश्व प्राप्तीच्या | ईश्वर प्राप्तीच्या |
| १६५ | ४ | ( Spirition ) | ( Spiriton ) |
| १६७ | १७ | Ligth ) | light ) |
| १६८ | १ | प्रातिमदर्शनांना | प्रातिभ दर्शनांना |
| १७५ | ७ | (निरु–पाधी | (निरुपाधी |
| १८५ | पेज हेडिंग | साक्षात्कार– तत्त्वज्ञान | साक्षात्कार– सोपान |
| १८५ | २५ | राहृतो | राहतो |
| १९१ | पेज हेडिंग | साक्षात्कार– तत्त्वज्ञान | साक्षात्कार– सोपान |

## श्रीगुरुदेव



जन्म :
जमखंडी ३-७-१८८६

समाधि :
निंबाळ ६-६-१९५७
( ज्येष्ठ शु. १०, शके १८७९ )

**श्री गुरुदेव डॉ. रा. द. रानडे, M. A, D. Litt.**

**यांचे**

# संक्षिप्त चरित्र

**सुख-सागर आपण व्हावे ।**
**जग बोधे निववावें ॥**

(मुक्ताबाई)

प्रस्तुत पुस्तक हे माझ्या "गुरुदेव रानडे : साक्षात्काराचे तत्त्वज्ञान व सोपान" याची संक्षिप्त आवृत्ति आहे. मूळ पुस्तकांत चरित्राचा उल्लेख केलेला नाही. अॅकॅडेमीच्या विश्वस्तांची इच्छा आहे की, प्रस्तुत पुस्तकास यांचे संक्षिप्त चरित्र जोडावे, म्हणून लिहिले आहे. या चरित्राचे लौकिक जीवन व आध्यात्मिक जीवन असे दोन स्वतंत्र भाग करण्याचे योजले आहे. यांत थोडी पुनरुक्ति होईल. पण गुरुदेवांचे लौकिक चरित्र थोर असले तरी, अध्यात्म हें त्यांच्या जीवनाचे सार आहे. त्यांचे आध्यात्मिक जीवन महनीय, भव्योदात्त आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेहि तेच चिंतनीय आहे. त्याचा स्वतंत्र भागांत विचार केला म्हणजे त्यांच्या आध्यात्मिक जीवनाचा शिखरापर्यंत होणारा विकास समजणे सुकर होईल, म्हणून ही योजना केली आहे.

## लौकिक चरित्र

**जन्म** : रानडे घराणे हे मूळचे कोकणांतील जामसंडे या गांवचे असून, १७४० च्या सुमारास पेशव्यांचे वकील म्हणून त्या कुलांतील एक पुरुष रामदुर्ग व नरगुंद या भागांत आले. गुरुदेवांचे पणजे बापूजी हे रामदुर्गास कायमचे राहावयास गेले व त्यांनीच हे घराणे उदयाला आणले. गुर्लहोसूरच्या सुप्रसिद्ध चिदंबर दीक्षित यांचे बापूजी

शिष्य होते. दीक्षितांनी केलेल्या एका यज्ञांत बापूजींनी अत्यंत शरीरकष्ट केले. त्यांना संतती नव्हती. त्यांच्या शरीरकष्टाच्या या तपाने प्रसन्न होऊन दीक्षितांनीं त्यांच्यावर कृपा केली व त्यांच्या कुलाचा विस्तार केला. गुरुदेवांचे वडील दत्तोपंत हे कांही कारणानें रामदुर्ग सोडून जमखंडीस आले व तेथे मामलेदार, खाजगी कारभारी इत्यादि हुद्यावर त्यांचीं नेमणूक झाली. गुरुदेवांचा जन्म ३ जुलै १८८६ दिनो झाला. त्यांच्या जन्माची हकीकत वैशिष्ठ्यपूर्ण आहे. त्यांच्या मातुःश्री सौ. पार्वतीबाई, यांनीं पुत्र प्राप्तीसाठी सोमवारचे कडक व्रत व इतरहि अनेक व्रतवैकल्ये केली. त्यांना गुरुदेवांच्या जन्माच्यावेळी बराच त्रास झाला. तेव्हां, त्या वेळचे जमखंडी संस्थानचे अधिपति श्री. रामचंद्रराव यांनी आपल्या आराध्यदेवतेचे, रामेश्वराचे, तीर्थ त्यांना दिले व त्या सुखरूप प्रसूत झाल्या. त्यांच्या सोमवारच्या व्रतानेच जणु रामेश्वराच्या कृपेने गुरूदेव त्यांच्या उदरीं आले. यामुळे त्यांचे नांवहि रामचंद्र ठेवण्यात आले.

**शिक्षण** : गुरुदेवांचे कॉलेजपूर्व शिक्षण जमखंडीस झाले. त्यांच्या बुद्धिमत्तेची चमक इंग्रजी सहावीतच दिसून आली. सातवीचा संस्कृतचा पेपर सहावीतच सोडवून त्यांनीं सातवीच्या मुलांपेक्षा अधिक मार्क मिळविले. १९०२ मध्ये ते मॅट्रिक परीक्षेत पास झाले; त्यांना पहिली जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती मिळाली व सर्व विद्यार्थ्यांत त्यांचा क्रमांक दुसरा आला. त्यामुळे त्यांना पुण्याच्या सुप्रसिद्ध डेक्कन कॉलेजांत जातां आले; तेथील वातावरणाचा लाभ त्यांनीं आपल्या लौकिक व आध्यात्मिक उन्नतीसाठी करून घेतला. एक अभ्यासू, चौकसबुद्धीचा, स्वतंत्र विचाराचा, बुद्धिमान, तरीहि साधा व नम्र विद्यार्थी, असा त्यांचा सार्थ लौकिक होता. सर्व देशी व परदेशी प्राध्यापकांना त्यांच्याविषयी फार प्रेमादर होता. तरी प्रि. बेन व प्रो. वुडहाऊस या दोन प्राध्यापकांशी त्यांचा विशेष संबंध आला व यांच्या विचारांचा ठसा गुरुदेवांच्या मनावर उमटून गेला. वुडहाऊस थिऑसफिस्ट होते. गुरुदेवांनीं आपल्या पंथांत यावे असा त्यांनीं

परोपरीने प्रयत्न केला; पण गुरुदेवांची आपले सद्गुरु भाऊसाहेब-महाराज यांच्यावर दृढ निष्ठा असल्याने, ते दुसरा कोणताच मार्ग स्वीकारण्याची मुळीच शक्यता नव्हती. तरी, प्रा. वुडहाऊसचे व त्यांचे संबंध प्रेमादराचेच राहिले. गुरुदेव डेक्कन कॉलेजमध्ये विद्यार्थी, पुढे फेलो व क्यूरेटर असताना, त्यांच्या मनावर कोणाचा खरा ठसा उमटला असेल तर तो प्रि. बेनसाहेबांचा. त्यांच्याविषयी गुरुदेव लिहितात, " कोणत्याहि विषयाचा विशिष्ट दृष्टिकोनांतून अभ्यास कसा करावा. हे मी प्रि. बेनकडून शिकलो... आपल्या मनांत त्यांच्याबद्दल एक प्रकारचा विभूतिपूजेचा भाव निर्माण झाला होता.... तत्त्वज्ञानाचे व वाङमयाचे प्राध्यापक शिकवतील, त्यापेक्षा अधिक तत्त्वज्ञान व वाङमय प्रि. बेन या इतिहासाच्या प्राध्यापकांनीं आम्हांला शिकविले. " सारांश, प्रि. बेन यांना त्यांचे बौद्धिक क्षेत्रांतील गुरु म्हणतां येईल. १९०३ व १९०४ मध्ये ते प्रिव्हियस् व इंटरमीजिएट् या परीक्षा पहिल्या वर्गात पास झाले, त्यांना संस्कृतच्या शिष्यवृत्त्याहि मिळाल्या. १९०७ मध्ये गणित विषय घेऊन ते बी. ए. झाले, मात्र त्यांना दुसरा वर्ग मिळाला, संस्कृत पारितोषिक मिळालेच. १९०४ मध्ये त्यांचे वडील वारले. त्यामुळे गुरुदेवांचे आय. सी. एस. साठी जाण्याचे विचार त्यांना सोडावे लागले. कलेक्टर होण्यापेक्षा फार फार मोठे बौद्धिक व आध्यात्मिक कार्य त्यांच्याकडून व्हावयाचे होते. त्यामुळे ही घटना घडली असावी. १९०८ मध्ये ते फेलो झाले. त्यावर्षी प्रिव्हियसच्या विद्यार्थ्यांना ते " जानकीहरण " हे संस्कृत काव्य शिकवीत असत. त्यावेळी मी त्यांचा विद्यार्थी होतो. पुढे सुमारे ३० वर्षे प्राध्यापक म्हणून जे अलौकिक यश त्यांनी मिळविले, त्याची वानगी आम्हांला १९०८ मध्येच मिळाली. प्रि. बेनशिवाय कोणत्याहि प्राध्यापकाचे त्यांच्यासमोर तेज पडूं शकले नाही.

## आजार-शिक्षणांत खंड-नोकरी-एम.ए.च्या परीक्षेत अपूर्व यश

१९०९ मध्ये इंग्रजी व संस्कृत (वेदान्त) हे विषय घेऊन गुरुदेव एम्. ए. च्या परीक्षेला बसावयाचे, होते. परंतु त्यांच्या

उदयोन्मुख जीवनांत मोठे विघ्न आले. जानेवारी १९०९ मध्ये तेच मेंदूच्या क्षयाने आजारी पडले. कॉलेजमध्ये राहणे अशक्य झाल्याने ते गावांत राहण्यास गेले. तेथे मातोश्रींची शुश्रुषा व वैद्याचे औषध सुरू होते. पण प्रकृति सुधारण्याचे कांहीं चिन्ह दिसेना. या आजारांतून ते केवळ ईश्वरकृपेनेच वाचले. तो इतिहास पुढे त्यांच्या आध्यात्मिक चरित्रांत येईल. १९१० – ११ सालपर्यंत प्रकृति बरीच सुधारली व १९११ मध्ये इंग्रजीचे टच्यूटर म्हणून त्यांनीं फर्ग्युसन कॉलेजमध्ये नोकरी धरली. १९१३ मध्ये डेक्कन कॉलेजमध्ये संस्कृत हस्तलिखितांच्या ग्रंथालयाचे क्यूरेटर या पदावर त्यांची नेमणूक झाली. आपला एम्. ए चा अभ्यास त्यांनीं पुन्हा सुरू केला होता; १९१४ मध्ये तत्त्वज्ञान हा विषय घेऊन एम्. ए. ला बसण्याचा त्यांचा विचार होता. १९१४ मध्ये, एम्. ए. ची परीक्षा पास होण्याची अट न घालतां, आपल्या संस्थेचे आजीव सभासद होण्याची आग्रहाची विनंति डेक्कन एज्युकेशन सोसायटीने त्यांना केली. त्या विनंतीस मान देऊन १९१४ पासून ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून काम करूं लागले. त्याच वर्षी डिसेंबरमध्ये ते एम्. ए. परीक्षेत पहिल्या वर्गात पहिले आले आणि चॅन्सेलर्स मेडल् व तेलंग मेडल् ही सुवर्णपदके त्यांना मिळाली. या परीक्षेतील त्यांचे यश इतके उज्ज्वल होते की, त्यांची उत्तरे वाचून, "परीक्षकापेक्षा या विद्यार्थ्यालाच अधिक ज्ञान आहे" असे एका उदार मनाच्या परीक्षकाने आपल्या अहवालांत म्हटले होते.

१९२० सालपर्यंत ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकवीत होते पण त्यावर्षी त्यांची प्रकृति पुन्हा बिघडली व इंचगेरीस आपल्या सद्गुरुंच्या समाधीच्या स्थानी हवा पालटण्यासाठी ते गेले. या आजारांतून बरे होण्याची त्यांना मुळीच आशा वाटत नव्हती तरी, या वेळीहि केवळ ईश्वरकृपेनेच ते वांचले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे पूर्वीचा १९०९ चा व प्रस्तुतचा आजारहि त्यांच्या श्रेष्ठ पारमार्थिक उत्कर्षाला कारणीभूत झाला. ती सर्व हकीकत त्यांच्या

पारमार्थिक चरित्रांत येईलच. त्यांची प्रकृति सुधारली याचा अर्थ साधारण काम करण्याइतके ते सुधारले, येवढच. ते पुन्हा चांगले धट्टेकट्टे कधीच झाले नाहीत. साधारणपणें दर दहा वर्षांनी त्यांचा आजार वळावत असे. १९२०–१९३३ मध्ये ते फारच आजारी होते, त्या वेळी अन्न मुळीच जात नसे. ते नुसत्या चहावर जगत होते. कधी कधी चहाहि घेऊ शकत नव्हते. १९४१ साली पुन्हा आजार वाढला पण फार दिवस नाही. १९५० ते १९५२ मध्ये त्यांच्या शरिरात क्षयाचे जंतुहि असल्याचे दिसून आले. पण ते कधी निराश झाले नाहीत. नाम–औषध हेच त्यांचे औषध होते. असो, पुण्याची हवा मानवत नसल्याने, १९२२ मध्ये त्यांनी सांगलीस बदली करून घेतली. पण तेथेहि ते वरचेवर आजारी पडू लागले. म्हणून शेवटी १९२४ मध्ये त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीतील आपल्या जागेचा राजीनामा दिला.

त्या सोसायटीत त्यांनी १०–१२ वर्षे अध्यापन केले. त्या अवधीत त्यांच्याकडून शिक्षण घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांच्या मनावर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा ठसा कायमचा उमटला. दोघांची या संबंधी मते उधृत करतो. नागपूर विश्वविद्यालयाचे निवृत रजिस्टार डॉ. मोडक लिहितात: "रामभाऊ तत्त्वज्ञानाचे केवळ प्राध्यापक नसून तत्त्वज्ञानांत अवगाहन करणारे व सत्तत्त्वाच्या अनुभूतिप्रत मार्ग काढणारे एक थोर तत्त्वज्ञ आहेत, ही ओळख त्यांच्या विद्यार्थ्यांना तेव्हांच पटे." प्रा. दे. द. वाडेकर सांगतात, "त्यांची वर्गातील व्याख्याने अंत:स्फूर्तीने भरलेली व एखाद्या आत्मप्रत्ययी प्रेषिताप्रमाणे विद्यार्थ्यांना आत्मचिंतनाकडे प्रवृत्त करणारी असत."

### ॲकॅडेमी व तत्त्वज्ञान मासिक

या नंतर पुढे काय करावयाचे हा प्रश्न उभा राहिला, "ईश्वर विषयक प्रश्नांचे तात्त्विक दृष्टया संशोधन करण्याची ज्यांना आस्था आहे, अशा सर्वांना एकत्र आणणे," या उद्दिष्टाने एखादी संस्था

काढावी अशी कल्पना त्यांच्या मनांत पुष्कळ दिवस होती. परंतु आजार व कॉलेजांतील कामाचा व्याप यामुळे ती सुप्तच राहिली. आतां मोकळीक मिळाल्याने "अॅकॅडेमी ऑफ कंपॅरेटिव्ह फिलॉसफी अँड रिलिजन" ही संस्था त्यांनीं स्थापली. भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास सोळा खंडांत प्रसिद्ध करणें ही, या संस्थेपुढे गुरुदेवांनीच ठेवलेली योजना होती. परंतु आर्थिक साहाय्याच्या अभावी ती तो यशस्वी झाली नाहीं. त्या पैकी २–३ खंडच प्रसिद्ध झाले. तत्त्वज्ञान विषयक एक त्रैमासिकहि त्यांनी सुरू केले; पण तेही कांहीं वर्षांनी बंद पडले.

## अलाहाबाद विश्व–विद्यालयांत

१९२६ मध्ये गुरुदेवांचा "उपनिषद्‌रहस्य" हा इंग्रजी ग्रंथ प्रसिद्ध झाला आणि त्यामुळे इंग्रजी भाषा जाणणाऱ्या सर्व तत्त्वज्ञांत त्यांची कीर्ति पसरली. "हा ग्रंथ म्हणजे तुमचे चिरंतन स्मारकच होय," असा अभिप्राय जर्मन संस्कृत पंडित गार्बे यांनीं दिला. हा ग्रंथ वाचल्यावर, अलाहाबाद विश्वविद्यालयाचे त्या वेळचे उपकुलगुरु, सर गंगानाथ झा, यांनीं अति गौरवाने त्या विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून येण्याची त्यांना आग्रहाची विनंती केली आणि १–१२–१९२७ या दिवशी गुरुदेव तेथे प्राध्यापक म्हणून विराजमान झाले. तेथे त्यांनीं सुमारे वीस वर्षे काम केले. कांहीं वर्षे ते डीन होते व शेवटी १९४६ मध्ये अॅक्टिंग व्हाईस चान्सेलर हे पद भूषवून ते निवृत्त झाले. त्या नंतर तेथेच त्यांना "सन्मान प्राध्यापक" म्हणून नेमून त्या संस्थेने त्यांच्या संबंधीचा आदरभाव व्यक्त केला. या प्रदीर्घ कालांत, त्यांनी आपल्या व्यासंगाने, प्रतिभेने आणि सौजन्याने त्या विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाला एक निराळीच प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. १९४७ मध्ये डी. लिट्. ही उच्च सन्मानाची पदवी देऊन त्याच विश्वविद्यालयाने त्यांच्या विद्वत्तेचा गौरव केला. या नंतर त्यांचा विद्यापीठाशी संबंध संपला, पण गुरुदेवानी तेथे बंगला बांधला होता व तेथील थंडीतील हवा त्यांना मानवत असे, म्हणून

बहुधा दर वर्षी थंडीत ते अलाहाबादेस जात असत. सांगलीचे राजेसाहेब कै. श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब यांनी उदार देणगी देऊन परमार्थ प्रसारासाठी स्थापलेल्या अध्यात्म–विद्या–मंदिराची शाखाही गुरुदेवांनीं अलाहाबादेस उघडली होती. वरील संस्थेच्या विद्यमाने त्यांनी हिंदी संत व भगवद्गीता या विषयावर वरील व्याख्याने दिली. त्यांचा अनुक्रमें " हिंदी संताचा साक्षात्कारमार्ग " आणि " भगवद्गीता म्हणजे ईश्वरसाक्षात्काराचे तत्त्वज्ञान " या त्यांच्या इंग्रजी ग्रंथांत अंतर्भाव झाला आहे. असा अलाहाबादशी शेवटपर्यंत त्यांचा संबंध कायम राहिला.

## ग्रंथ रचना

गुरुदेवांचे सर्व महत्वाचे ग्रंथ साक्षात्कार या विषयावर लिहिलेले आहेत. त्यांत त्यांच्या बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवादाचे ( Rational Mysticism ) भव्योदात्त दर्शन घडते. स्वतःचे तत्त्वज्ञान सांगण्यासाठी त्यांनी एकही स्वतंत्र ग्रंथ लिहिलेला नाही. उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, भगवद्गीता आणि मराठी, हिंदी व कन्नड संत कवी. या ग्रंथांतील तत्त्वज्ञानाचे यथार्थ दर्शन घडविण्यासाठी त्यांनी आपले ग्रंथ लिहिले. पण त्यांत त्यांचे तत्त्वज्ञान प्रकट झाले आहे. त्यांनीं आपल्या " उपनिषद्रहस्य " या ग्रंथांत लिहिले आहे, " उपनिषदांत आलेल्या विषयासंबंधी माझे स्वतःचे विचार मी स्वतंत्रपणे सांगितलेले नाहींत. परंतु या ग्रंथातील विचारप्रणालीचा जो सूक्ष्म अभ्यास करील त्यास माझे तत्त्वज्ञान काय आहे हे कळून येईल. " हे विधान त्यांच्या सर्व ग्रंथांना लागू आहे. " माझे विचार मी दुसऱ्याकरवी वदवितो " (I make others speak for me) असे ते म्हणत. १९२६ मध्ये त्यांचा " उपनिषद्रहस्य " हा ग्रथ प्रसिद्ध झाला. १९३० मध्ये " मराठी संतांचा साक्षात्कार " (Mysticism in Maharashtra) हा ग्रंथ त्यांनीं प्रकाशित केला, या ग्रंथासाठी घेतलेली संतांची वचने, " वचनामृते " या नांवाने १९२६ मध्ये चार भागांत निर्माण झाली. प्रत्येक वचनामृताला

लहानच परंतु उद्बोधक प्रस्तावना त्यांनी जोडली आहे. "केवळ परमार्थासाठीच ज्यांना वाचन करावयाचे आहे, त्यांना ही चार वचनामृते पुरे आहेत." असे ते सांगत. १९२७ मध्ये त्यांनी व प्रा. बेलवलकर यांनी मिळून लिहिलेल्या "Creative Period" या ग्रंथातील उपनिषदावरील लिखाण गुरुदेवांचे आहे. या नंतर दीर्घ काल कोणतेच पुस्तक बाहेर आले नाही. १९५४ मध्ये "हिंदी संतांचा ईश्वरप्राप्तीचा मार्ग" (Pathway to God in Hindi Literature) आणि त्याला आधारभूत हिंदी संतांच्या वचनांचा संग्रह असलेला "परमार्थ-सोपान," हे दोन ग्रंथ प्रसिद्ध झाले. "परमार्थ-सोपाना" च्या शेवटी, 'भक्ती हा मूर्धन्य रस आहे,' हे दाखविणारे अलंकारशास्त्रावर लिहिलेले एक ३० पृष्ठांचे परिशिष्ट त्यांनी जोडले आहे. "भगवद्गीता म्हणजे साक्षात्काराचे तत्त्वज्ञान" (The Bhagavad Geeta as a Philosophy of God-Realisation) हा नागपूर विद्यापीठासाठी लिहिलेला ग्रंथ गुरुदेवांच्या हयातींत पूर्ण झाला होता; पण त्यांच्या निर्याणानंतर तो १९५९ मध्ये प्रकाशित झाला. हा ग्रंथ मौलिक असून, अनेक भाष्यकारानी भगवद्गीतेच्या तात्पर्यार्थाविषयी जो चक्रव्यूह निर्माण केला आहे. त्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे साक्षात्कारमार्ग आहे, हे त्यांत विशद केले आहे. हॉस्पेटच्या एका जुन्या मंदिराचा दृष्टांत त्याला गुरुदेवांनी दिला आहे. ते मंदिर ७-८ खांबावर उभारले आहे, हे खांब हाच त्याचा पाया आहे. त्याचप्रमाणें, गीतेत आलेल्या अनेक सिद्धांतांच्या पायावर भगवद्गीतेने साक्षात्काराच्या तत्त्वज्ञानाचे मंदिर उभारले आहे. त्यातील कोणताही सिद्धांत काढून टाकतां येणार नाही. पण सर्वांचा उपयोग साक्षात्काराचे तत्त्वज्ञान सांगणे हा आहे. कन्नड संतांवरील ग्रंथाची सूचना कर्नाटक विश्वविद्यापीठाकडून आली. १९५४ च्या सुमारास विद्यापीठाने गुरुदेवांना विनंती केली की त्यांनीं त्या संस्थेच्या विद्यमाने कन्नड संतांच्या तत्त्वज्ञानावर वीस व्याख्याने द्यावी आणि त्यांचा ग्रंथ तयार करावा, तो त्या विश्वविद्यालयातर्फे प्रकाशित होईल. गुरुदेवांनी ही विनंति मान्य

केली, परंतु त्यांतील १२-१३ व्याख्यानेच ते देऊ शकले. प्रत्येक व्याख्यान म्हणजे संकल्पित ग्रंथाचे एक प्रकरण असे. उरलेल्या सात-आठ व्याख्यानांची विस्तृत, तपशीलवार टिपणे त्यांनी तयार केलीच होती, त्यांच्या निर्याणानंतर, त्या टिपणावरुन त्यांच्या कांही शिष्यांनी उरलेली प्रकरणे लिहिली. अशारीतीने " कन्नड संतांचा ईश्वर प्राप्तीचा मार्ग " ( Pathway to God in Kannada Literature ) हा ग्रंथ तयार झाला. तो १९६० मध्ये प्रसिद्ध झाला. त्यांच्या निर्याणानंतर प्रकाशित झालेला त्यांचा शेवटचा महत्वाचा ग्रंथ म्हणजे " वेदांत म्हणजे भारतीय तत्त्वज्ञानाचे शिखर " ( Vedant : The Culmination of Indian Thought ). या ग्रंथाची विस्तृत व तपशीलवर टिपणे गुरुदेवांनी तयार केली होती. त्यावरून त्यांचे शिष्य डॉ. वि ह. दाते व प्रा. बी. आर्. कुलकर्णी यांनी अनुक्रमे दोन व आठ प्रकरणे लिहिली व हा दहा प्रकरणांचा ग्रंथ १९७० मध्ये भारतीय विद्या भवन या संस्थेने प्रसिद्ध केला. या ग्रंथांत गुरुदेवांची सर्व मूळ टिपणेहि छापली आहेत. हे त्याचे एक वैशिष्ठ्य आहे.

## गुरुदेवांचे ग्रंथ प्रकाशित होण्यापूर्वीहि त्यांच्या सिद्धप्रज्ञेचे मला झालेले प्राथमिक ओझरते दर्शन

गुरुदेव रानडे यांचा व माझा परिचय प्रथम १९०८ मध्ये मी डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश केला त्या वेळी झाला. पुढे डिसेंबर १९११ मध्ये, त्यांच्याच प्रेरणेने, सद्गुरु श्री भाऊसाहेबमहाराज यांच्याकडून मला नाम मिळाल्यावर, या परिचयाला पारमार्थिक स्वरूप साहजिकच आले. त्यानंतर वेळोवेळी त्यांच्याशी झालेल्या सुखसंवादाचा मला फार फायदा झाला. त्यांतील कांही प्रसंग त्या त्यावेळी फार परिणामकारक वाटले. मनावर त्यांच्या शब्दांचे खोल परिणाम झाले. परंतु त्यांचे मर्म मात्र पुढे अनेक वर्षांनी, त्यांच्याशी प्रदीर्घ, सहवास व त्यांच्या ग्रंथाचे अभ्यासपूर्वक वाचन झाल्यावर, कळूं लागले. त्यांत असे

दिसले की, त्यांनीं आपल्या ग्रंथात जे महत्त्वाचे सिद्धांत स्वानुभवाने मांडले आहेत, त्यांची बीजे वरील संभाषणांतील विचारांत निश्चित होती. त्यांतील कांही प्रसंग मुद्दाम खाली देत आहे. ते वाचकांना उद्‌बोधक वाटतील अशी आशा आहे. हे वाचीत असतांना गुरुदेवांचा जन्म ता. ३–७–१८८६ दिनी झाला व मी त्यांच्यापेक्षां साडेतीन वर्षांनीच लहान होतो हे लक्षांत घ्यावे . म्हणज, योगभ्रष्टाला पुढचा जन्म कशा प्रकारचा येतो. यासबंधी ज्ञानेश्वरीतील पुढील ओव्यांचे त्यांना स्मरण झाल्याशिवाय राहणार नाही.

**" तंशो दशेचो वाट न पाहतां। वयसेचियां गांवा न येतां ॥ बाळपणींच सर्वज्ञता वरी तयातें ॥ तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें. मनचि सारस्वतें दुभे। मग सकळ शास्त्रें स्वयंभें निघती मुखें ।**
(ज्ञा ४५३–५४) प्रत्येक प्रसंगाचे वर्षहि मी नमूद करीत आहे.

(अ) १९१३ मध्ये सहज बोलताना गुरुदेव म्हणाले, " ॲरिस्टॉटलने तीन प्रकारची मैत्री सांगितली आहे: १) तत्त्वासाठी २) सुखासाठी ३) लाभासाठी ( Friendship on principle, on pleasure, on and profit) यांतील पहिली उत्तम. तत्त्वासाठी समान ध्येयासाठी मैत्री असावी. " त्या वयांत " मैत्री " या शब्दाचा मला फार मोह असे. समान ध्येय नसेल तर ती मैत्री त्याज्य, या विचाराने त्या मोहामुळे मी थोडा अस्वस्थ झालो; पण गुरुदेवांचे सांगणेहि पटले. ते सत्यच होते तेव्हां तडजोड म्हणून मी म्हणालो " मैत्री तत्त्वासाठी असावी हे अगदी खरे व योग्य आहे. पण आपल्या पूर्वीच्या मित्रांचा आपल्या चांगुलपणावर हक्क आहे. ( They have claims on our goodness ) ". त्यांचे त्वरित उत्तर आले " होय, त्यांचा तसा हक्क आहे, आणि तसा सर्व जगाचा आपल्या चांगुलपणावर हक्क आहे ( Yes, they have claims on our goodness and so has the world) " हे वाक्य ऐकून मी थक्कच झालो. पण त्याचा पूर्ण अर्थ, मर्म मात्र मला त्या वेळी कळले नाही. या वाक्याचा मनावर खोल परिणाम झाला व ते स्मृतींत पक्के

वसले. १९५४ मध्ये त्यांचा हिंदी संतावरील ग्रथ प्रसिद्ध झाल्यावर, वरील विचारांत त्यांच्या परमार्थ विषयक दोन महत्त्वाच्या सिद्धांतांचे बीज आहे मला वाटले. हे सिद्धांत, व पुढील परिच्छेदांत येणारेहि, त्यांच्या बुद्धीसमोर १९१३ पूर्वीहि, व बीजरूपानेच नव्हे तर अधिक स्पष्ट रूपाने, असणे शक्य आहे. मी जे पहिले तेवढयाचाच उल्लेख करीत आहे. असो. पहिला सिद्धांत हा की संतांच्या संगतीशिवाय परमार्थांत प्रगति अशक्य आहे; या नियमाला अपवाद नाही. त्यासाठी अर्थात् ईश्वराला विन्मुख असलेल्या, ज्यांना ईश्वर प्रिय नाही अशा लोकांचो संगति कटाक्षाने टाळली पाहिजे. तत्त्वासाठी मैत्री श्रेष्ठ, ती ध्येयासाठी असावी हा विचार वर आला आहे. गुरुदेवांचे ध्येय साक्षात्कार हे होय. तेव्हां त्यासाठीच मैत्री करावयाची, सत्संगतीच धरली पाहिजे, हे उघड आहे. दुसरा सिद्धांत म्हणजे साधकाने सर्वाभूतीं, आपपर न मानतां दया, करुणा, परहित हे गुण संतांचा स्वभावच बनतो. " आपल्या चांगुलपणावर सर्व जगाचा हक्क आहे," याचा हाच अर्थ नव्हे कां ? करुणा, भूतदया, सर्वात्मता सर्वांसाठी, संगति मात्र केवळ सतांची, असा हा विवेक आहे. सिद्धांत सूत्ररूपाने देत आहे, त्यांचे अधिक स्पष्टीकरण करीत नाही. कारण प्रस्तुत पुस्तकांत त्यांचे विवेचन झालेच आहे.

(आ) १९१३ मध्ये मी गुरुदेवांना एकदा विचारले, " साक्षात्कार, आत्मानुभव येण्यासाठी नामस्मरण करायचे ते नीट होण्यासाठी सद्‌गुण वाढले पाहिजेत. ते वाढविण्यासाठी काय करावे, तुम्ही काय करता ? " त्यांनी उत्तर दिले., " सद्‌गुण वाढविण्यासाठी मी कांही करीत नाही. कांहीं काहीं करीत नाही. " या उत्तराने मी गोंधळलो. " मग सद्‌गुण कसे वाढणार ? " या माझ्या प्रश्नाला प्रसन्नपणे हंसून त्यांनी उत्तर दिले, " अहो, मग नामस्मरण कशासाठी करतो, नामस्मरणाने आत्मानुभव येतात. सद्‌गुणहि वाढतात ". या दृष्टीने मी पुढें विचार करूं लागलो, मलाहि ते पटले. हे सर्व सिद्धांत गुरुदेव रानडे यांनीं हिंदी संतावरील ग्रंथांत विस्ताराने मांडले आहेत.

त्यांच्या अन्य ग्रंथांतहि ते आहेतच. त्यांचा आशय हा की साधकाने आपले चारित्र्य पवित्र राखले पाहिजेच; त्याशिवाय परमार्थसाधन करणेच शक्य नाही. पण सद्गुण संपादनाचे कार्य येवढ्याने पूर्ण होऊं शकत नाही, ते भक्तियुक्त नामस्मरणानेच होते. भक्ति हा सर्व सद्गुणांचा मुकुटमणी आहे. इतर सद्गुण भक्तीचे परिणाम, अविष्कार किंवा साधने आहेत. साधकाचे अपूर्ण सद्गुण भक्तीला अत्यंत आवश्यक आहेत. पुढे नामस्मरणाने आत्मानुभव, त्यांचा आनंद, सद्गुणविकास या सर्व घटना परस्परोपकारितेच्या नियमाने घडतात. शेवटी अत्युच्च साक्षात्कारानंतर सर्व सद्गुण पूर्णतेला गेलेले दिसतात. या सिद्धांतांचा उगम मला वरील १९१३ च्या संभाषणांत दिसला.

(इ) १९१४ मध्ये मी एकदा गुरुदेवांच्याकडे गेलो होतो. त्यांना दहा मिनिटे बाहेर जायचे होते. म्हणून त्यांनी ज्ञानेश्वरी सहज उघडून माझ्या हातांत दिली व आपण परत येईपर्यंत ती वाचण्यास सांगितले. उघडलेल्या पानावर भगवद्गीता ९–२ मधील राजविद्या या पदावर ज्ञानेश्वरांचे भाष्य होते. त्यातील––

**" तेंविचि पैं गा सुखाचा पाउटीं। चढतां येइजे जयाचिया भेटी।**
**मग भेटल्या कीर मिठी। भोगणयाहि पडे ।। "** ज्ञा. ९–५०.

ही ओवी वाचल्यावर मला आनंद झाला. राजविद्या किंवा ज्ञान म्हणजे साक्षात्कार. साक्षात्कारमार्ग आक्रमित असतांनाहि आनंद असतो, हे वाचून दिलासा मिळाला. तोपर्यंत माझी कल्पना अशी होती की, ब्रह्मप्राप्तीपर्यंत त्याग, वैराग्य अशा वैराण प्रदेशांतून दीर्घ काल प्रवास करावयाचा; मग शेवटी परमानंदाचा लाभ होतो. या चुकीच्या कल्पनेमुळे हे दिव्य कसे करता येणार, अशी भीति वाटे. ती या वचनाने दूर झाली. इतक्यांत गुरुदेव आले. त्यांना मी उत्साहाने म्हटले, " रामभाऊ, हे पाहा ज्ञानेश्वर काय म्हणतात, साक्षात्काराकडे सुखाच्या पायऱ्यानी जायचे असते. या मार्गावरहि

सुखाचा लाभ होतो कां ?" त्यांनी उत्तर दिले, " अहो. होय. तसे नसेल तर हा खडतर दीर्घ प्रवास कसा करता येईल ? " त्यांच्या शब्दांत पराकाष्ठेचे मादव होते. यथाकाल त्यांच्या ग्रथांचे वाचन झाल्यावर दिसून आले कीं, आत्मानंद हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा कणा आहे. उपनिषदांत आत्मानदाचा महासागर भरलेला आहे, असे त्यांनीं म्हटले आहे. तसा तो ज्ञानेश्वरींत व गुरुदेवांच्या सर्व ग्रथांतहि पसरलेला दिसतो. आत्मसाक्षात्कार व आत्मानंद दोन्ही एकच; त्यांत भेद नाही. चिदानंद हे आत्म्याचे स्वरूप आहे. या सबंधी गुरुदेव सांगतात " साक्षात्कार–अर्थात् आत्मानंद देखील – हळूं हळूं प्रगत होणारी प्रवाही प्रक्रिया आहे; एका क्षणीं घडणारी घटना नाही. ( Illumination is a process, not an event. ) " नामस्मरणाने साक्षात्कार व आत्मानंद हळूं हळूं वाढत जाऊन शेवटी स्वरूपसाक्षात्काराच्या, उत्कटतेला पोहोंचलेल्या, आनंदात जीवाचा (मनाचा व प्राणाचा) लय होतो. जीव, ब्रह्म किंवा आनद–कांहींहि म्हणा–होतो. या प्रमाणे सुखाच्या पाउटीं, आनदाच्या पायऱ्याना, साधक स्वरूपाला भेटतो व शवटी त्याची आणि स्वरूपाची भेट झाल्यावर तो स्वरूप, आनंदच होतो. या भव्य उज्ज्वल सिद्धांताचे बीज आमच्या वरोल सभाषणांत मला दिसले.

(ई) आमच्या सांप्रदायाची " नित्यनेमावली " – दैनिक भजनाची पदे–गुरुदेवांनी त्यांचे (व माझेहि) सद्गुरु श्री. भाऊसाहेब-महाराज यांच्या आज्ञवरून १९१० साली केली; तिला त्यांनीं विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. परंतु त्यांचे नांव त्या पुस्तकांत कोठच नाही. १९११ मध्ये नाम घेतल्यावर मी साहजिकच नेमावलीचा उपयोग करीत असे; पण प्रस्तावना बरेच दिवस वाचली नव्हती. ती गुरुदेवांनीं लिहिली आहे हे कळल्यावर मी ती अनेकदा वाचली. त्यांतील कांही भाग कळला; बराच कळला नाही. कारण त्यांत नुसता वेदान्त नसून गुरुदेवांनीं पुढे अनेक ग्रंथांत मांडलेले साक्षात्कार–शास्त्रच सूत्ररूपाने सांगितले होते, हे त्यांचे ग्रंथ पाहिल्यावर लक्षांत

आले. शब्दज्ञान व आत्मज्ञान यांतील भेद, आत्मज्ञानच मोक्षदायी, ईश्वराचे अनुभव, साक्षात्कार म्हणजेच मोक्षदायी आत्मज्ञान, पूर्व-सूरींच्या अनुभवांची वचने हेच आत्मज्ञानाच्या सत्यतेचे निःसंदिग्ध प्रमाण, ईश्वरदर्शनाने ईश्वर झालेल्या सद्गुरूंकडून मिळालेल्या सबीज नामाच्या स्मरणाने साक्षात्कार होतो, शेवटी स्वरूपसाक्षात्काराने—हाच अत्युच्च साक्षात्कार—होणाऱ्या परमानदांत, पाण्यांत मीठ विरावे त्याप्रमाणे, जीव लय पावतो व ब्रह्मरूप होतो, अर्थात् जन्म—मरणाच्या चक्रांतून मुक्त होतो, हे सर्व विचार नेमावलींत आलेले आहेत. इतकेच नव्हे तर, स्वरूपसाक्षात्काराविषयी गुरुदेवांनीं आपल्या सर्व ग्रथांत उधृत केलेली महत्त्वाची वचनेंहि नेमावलींत त्यांनीं दिली आहेत. याचा अर्थ हा की १९१० मध्ये, त्यांच्या वयाच्या चोवीसाव्या वर्षीच, त्यांच्या साक्षात्कारशास्त्राचा आराखडा त्यांच्या बुद्धीपुढे स्पष्ट उभा होता. पुढे त्यांत पुष्कळच तपशील त्यांनी भरला व त्यांचे उत्कृष्ट ग्रंथ तयार झाले. यासबंधी मी त्यांना एकदा विचारले, "नेमावलींतच आपल्या तत्त्वज्ञानाचा आराखडा आपण मांडला आहे; पुढील ग्रंथांत अनेक प्रकारे त्यांत तपशील भरून आपले तत्त्वज्ञान आपण स्पष्ट, पूर्ण केले, असे म्हणता येईल कां ?" त्यांनीं उत्तर दिले, " तसे म्हणण्यास हरकत नाही."

उ) १९२१ मध्यें गुरुदेव फार आजारी होते. तरीहि उप-निषद्रहस्य लिहिण्यासाठी अवश्य ती तयारी ते करीत होते. नामस्मरण हेच जर उच्चतम कर्म आहे, तर अशा आजारांत, स्वतःला केवळ नामस्मरणाला वाहून न घेता, अभ्यासाचे कष्ट गुरुदेव कां घेतात हा प्रश्न माझ्या मनांत वारंवार येई. शेवटी पत्राने या प्रश्नाचे उत्तर मी त्यांना विचारले. प्रश्न अडाण्याचा होता, त्यांत औधत्यहि होते; ते पत्र लिहिले याची पुढे मलाच लाज वाटली. पण ते लिहिले तेव्हां या गोष्टीची मला मुळीच जाणीव नव्हती. शंका आली की तिचा निरास गुरुदेवांच्याकडून करून घ्यावयाचा, या माझ्या वृत्तीला अनुसरून मी पत्र लिहिले. राग न मानता त्यांचे उत्तर आले.

" अखंड, नामस्मरण करता आले असते तर मी तेच केले असते. पण हे कोणालाहि शक्य नाही. म्हणून उरलेल्या वेळांत मी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतो. उपजीविकेचा कांहीं व्यवसाय करावाच लागतो. माझा व्यवसाय हा आहे. एक काल होता की परमार्थापेक्षा तत्वज्ञानानेच मला अधिक आकर्षित केले असते. पण मला सांगायला आनंद वाटतो की तो काल आतां पार मागे पडला आहे." या त्यांच्या लहानशा पत्रांत, त्यांच्या साक्षात्कारशास्त्रांतील कांही महत्त्वाचे सिद्धांत अंतर्भूत आहेत, हे त्यांचे ग्रंथ वाचाल्यावर समजले. परमार्थ–साधना बरोबर त्याला पोषक असे कार्य, प्रकृतिधर्मानुरूप, साधक करीत असतोच व त्याने केले पाहिजे. तत्त्वचिंतन हा गुरुदेवांचा प्रकृतिधर्म असल्याने त्यांनी ते काम स्वीकारले. "आतम विद्या पढै, पढावै।" हा तुलसीरामायणांत भक्तीच्या नवविध प्रकारापैकी एक प्रकार सांगितला आहे श्रवण–कीर्तन या दोन भक्तींत "पढै–पढावै।" हाच आशय आहे. ही तत्त्वज्ञानात्मक भक्ति–मुख्य नामस्मरण साधनाने उपांग–स्वत.च्या व इतरांच्या परमार्थ–विकासाला फार उपयुक्त असते. या वेळा (१९२१) गुरुदेव उच्च साक्षात्काराने गुरुपदाचे अधिकारी झाले होते. त्यांना भक्ति वाढविण्याचे, परमार्थ प्रसार करून जगाला खऱ्या सुखाचा व परम हिताचा मार्ग सांगण्याचे, कार्य करावयाचे होते यालाच ते ते "महाराजांची, देवाची कीर्ति वाढविणे" असे म्हणत असत. देवाला व महाराजांना कीर्तीची कोठे आवश्यकता होती? त्यांची कीर्ति वाढविणे म्हणजे ईश्वर–साक्षात्कार हे उच्चतम जीवनमूल्य जगाला सांगणे सर्व संताप्रमाणे गुरुदेवांना ही उत्कंठा होतीच. तिचा उगम भूतदयेत आहे. त्यासाठी तत्त्वज्ञानाचा उपयोग ते करणार होते व त्यांनी केलाहि. त्यांनी " मराठी संताचा साक्षात्कारमार्ग " या ग्रथांत म्हटल्याप्रमाणे, " साक्षात्कारी संताने तत्त्वज्ञान लिहिले किंवा सांगितले पाहिजे असे नाही. त्या संताचा उच्च आत्मानुभव त्याला देवपदाची प्राप्ति करून देण्याला पुरे आहे. पण जर त्याने तत्त्वज्ञान लिहिले तर, ते बुद्धीप्रधान लोकांना परमार्थांत

उपयोगी पडेल." गुरुदेवांना अशा लोकांत परमार्थाचा प्रसार करावचा होता. त्यासाठी परमार्थपर ग्रंथ लिहिणे उपयुक्त होते. या सर्व गोष्टी त्यांच्या पत्रांत सूचित केल्या होत्या.

(ऊ) १९२० मध्ये गुरुदेव इंचगेरीस आजारी असतांना मी त्यांना भेटायला अहमदाबादेहून आलो. मी अहमदाबाद येथे नोकरीस होतो. या वेळी तेथील वातावरण महात्माजींच्या असहकाराच्या आदेशाने भाराऊन गेले होते. त्याचा परिणाम माझ्यावरहि झाला होता. लोकांना जागृत करण्याकरता, 'यंग इंडिया' मधील एका लेखांत महात्माजींनी लिहिले होते, "स्वातंत्र्याची एवढी प्रचंड चळवळ झाली, त्या वेळी तुम्ही काय केले? असा प्रश्न २५ वर्षानंतर तुमच्या मुलांनीं तुम्हांला केला तर, 'आम्ही नुसते बघे होतो,' हेच उत्तर तुम्ही त्यांना देणार कां ?" हा मुद्दा मी गुरुदेवांना सांगितला. ते अगदी शांतपणे म्हणाले, "स्वातंत्र्यासाठी कांहींतरी करण्याची प्रेरणा मलाहि १९०८ च्या सुमारास होती. तुम्हांला माहीत आहेच की त्या वेळी डेक्कन कॉलेजमध्ये लाठी बोथाटीचे वगैरे शिक्षण देण्याचा उपक्रम सुरुं झाला होता. त्यांत मी होतो. परंतु पुढे माझी खात्री झाली की, माझ्यापुरते तरी, मी परमार्थ करून जे देशकार्य माझ्याकडून होईल तेवढेच मी करूं शकेन. सर्व कांहीं ईश्वराच्या इच्छेप्रमाणे घडते, त्यासाठी त्याची भक्ति केली पाहिजे. या श्रद्धेने देशाचे प्रेमहि मला परमार्थ–प्रवृत्त करण्याचे एक कारण आहे." त्यांच्या या एकांतिक श्रद्धेचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. पुढें, त्याचे ग्रंथ पाहिल्यावर स्पष्ट दिसले की, त्या वेळी ही श्रद्धा त्यांनीं स्वतःपुरती म्हणून सांगितली असली तरी, त्यांच्या मते साक्षात्काराचे प्रभावी तत्त्वज्ञान सर्वत्र दृढमूल झाले, तरच भारतांतील राजकीय, धार्मिक वगैरे सर्व कलह व संघर्ष नष्ट होतील. साक्षात्काराचे सामर्थ्य सर्वत्र पसरले म्हणजेच प्रक्षुब्ध भावना शांत होतील, विरोधी हितसंबंधांचा समन्वय होईल आणि मानवता ही समाधान, आनंद आणि वैभव यांचा आदर्श होईल." गुरुदेव सांगत, "आपण नाम-

स्मरण करावे; त्याने कोणाचे तरी कोठे तरी कल्याण होतेच. ते कोठे होते हे आपल्याला कळत नाही, ही देवाची कृपा. नाही तर अहंकार वाढला असता. कांहीं संतश्रेष्ठ कांहींहि दृष्य कार्य न करता जगाला हालवूं शकतात. We believe in the physical transmission of spiritual power. आध्यात्मिक शक्ति जड विश्वांत प्रवेश करुं शकते, अशी आमची श्रद्धा आहे." अध्यापन व ग्रंथनिर्मिती हे गुरुदेवांचे बौद्धिक कार्य फार थोर व उज्ज्वल आहे, यांत शंका नाही. परंतु तेच करीत राहून जगांत विद्वान म्हणून कीर्ति मिळवायची, हे त्यांचे ध्येय कधीच नव्हते. परमार्थ किंवा ईश्वर प्राप्ति हे परमश्रेष्ठ, ध्येय त्यांच्यापुढे होते. त्यापुढे त्यांना इतर गोष्टी तुच्छ होत्या. परमार्थ अर्थात् भक्तिसाधन करून, उरलेला वेळ ते प्राध्यापन व ग्रंथनिर्मिती यासारख्या कार्यांत घालवीत. त्यांतून, तत्त्वज्ञान हा त्यांचा अभ्यासाचा विषय असल्याने तो त्यांच्या परमार्थाला साहजिकच पोषक झाला व साक्षात्कार व तत्त्वज्ञान यांची सांगड त्यांना घालता आली. " माझ्या तत्त्वज्ञानाचा उगम परमार्थांत झाला व त्याची परिणतिहि परमार्थांतच व्हावी अशी माझी इच्छा आहे, " आणि " माझ्या परमार्थावरील श्रद्धेचा तर्कांच्या दृष्टीने पाया काय आहे, हे शोधण्यासाठी मी तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला " हे त्यांचे उद्गार सूचक आहेत. त्यांचे स्पष्टीकरण करतांना गुरुदेव एकदा म्हणाले, " नामस्मरणाने रूप–तेज–नादादि आत्मानुभव येतात, हे मला स्वानुभवाने समजले होते. म्हणून महाराजांवर व त्यांनीं सांगितलेल्या मार्गावर माझी पूर्ण श्रद्धा होती. परंतु इतर काहीं गोष्टी महाराज सांगत असत, त्या माझ्या पूर्वीच्या विश्वासाला धक्का देणाऱ्या होत्या, उदाहरणार्थ, महाराज सांगत " ज्ञानेश्वरांनीं रेडा बोलविला, भिंत चालविली ही रूपके आहेत, सत्यघटना नाहीत यांचा अर्थ विषयांध, निर्बुद्ध अज्ञानी, अशा लोकांना ज्ञानदेवांनीं परमार्थ-मार्गाला लावले. " मी या सत्यघटना मानीत आलो होतो. श्रद्धेंत अनन्यता येण्यासाठी महाराज सांगतात ते सर्व पटले पाहिजे. म्हणून मी तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला आणि माझी पूर्ण खात्री झाली की

महाराज सांगतात तेच खरे आहे. " ही घटना १९१० च्या सुमाराची असावी. तत्त्वज्ञानाचा परमार्थास कसा उपयोग होतो, हे यावरून स्पष्ट होईल. म्हणून, गुरुदेवांचे खरे चरित्र आध्यात्मिक असून बौद्धिक जीवन हे त्यांचे केवळ बाह्यांग आहे. त्यांनी आपल्या सद्गुरूंना लिहिलेली पत्रे उद्बोधक असून, त्यावरून त्यांच्या आध्यात्मिक तळमळीची स्पष्ट कल्पना येते. अशा एका पत्रांत ते सद्गुरूंना लिहितात, " यापुढे सर्व आयुष्य नामस्मरणांत व साधु-संतांच्या संगतींत घालवावे असे वाटते. तेव्हां तसे करण्यास पात्र करावे येवढीच प्रार्थना आहे. संसारदु:खे फार त्रासलो, वैराग्य व भक्ति उत्पन्न व्हावी व ज्ञानमार्गांत नेऊन उत्तरोत्तर आश्रय देऊन वाढवावे. गुरुकृपेवांचून दुसरा आसरा नाही. (२८–७–१९०६)"† पारमार्थिक चारित्र शब्दांच्या पलीकडे असते. ते ज्याचे तोच अनुभवतो; किंबहुना त्याला स्वत:लाहि ते शब्दांत सांगणे अवघड होते, असे " **ते सुख काय सांगो वाचे बोलतां न ये,** "। अशा संतांच्या वचना-वरून दिसते. " **तुका म्हणे अंगें व्हावे जें आपण । तरी महिमान कळो येई ।।** " हेच खरे आहे. तरींहि त्यांतील बाह्यांगांचा थोडा फार मागोवा घेता येईल; त्यांतील कांहीं टप्पे सांगता येतील; कांहीं खुणा दाखविता येतील. त्याविषयाकडे आतां वळूं.

## आध्यात्मिक चरित्र

गुरुदेवांच्या आध्यात्मिक जीवनाचे चार भाग स्थूलमानाने पाडता येतील. (१) १९०१ ते १९०८–प्राथमिक साधकदशा (२) संकटांची परंपरा, तीव्र मुमुक्षा व उत्कट साधकावस्था (३) परमार्थाचा उष:काल व प्रभात; गुरुकृपेने अभ्युदय–निश्रेयस्–प्राप्ति; गुरुपदाचा अधिकार, पण प्रकट कार्य नाही; (४) " यारे

---

† १) ही पत्रे डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी लिहिलेल्या चरित्रांत ( गुरुदेव रा. द. रानडे : चरित्र आणि तत्त्वज्ञान, आवृत्ती २ री) पृष्ठ ९०–१४० वर दिली आहेत.

यारे अवघे जन "!, पर्जन्य-वृष्टि न्यायाने नामदान. या सर्वांचा आतां परामर्श घेऊः-

**१) प्राथमिक साधकदशा :-** गुरुदेवांची वृत्ति लहानपणापासूनच भाविक आस्तिक, सात्त्विक पण जिज्ञासू होती. रस्त्याने जातांना दिसणाऱ्या देवाचे दर्शन घेणे, परिक्षेत यश मिळावे म्हणून देवाला नमस्कार करणे, हे ते नेहमी करीत. त्यांच्या मातोश्रीहि भाविक, भक्तिप्रवण, भोळ्या होत्या. त्यांचा बराच काल देव-देव करण्यांत जाई. गुरुदेव खऱ्या परमार्थाला लागण्याची वेळ १९०१ मध्ये आली. इंचगेरीचे संतश्रेष्ठ श्री भाऊसाहेबमहाराज उमदीकर हे दिवाळीला प्रतिवर्षी आपल्या शिष्यांच्या विनंतीवरून जमखंडीस जात असत. तेथे भक्तीचा मोठा सोहळा होत असे. त्यावेळी त्यांच्या भजनाला गुरुदेव जात असत. १९०१ मध्ये गुरुदेवांच्या कै. कल्लू भोकरे या मित्राने श्रीभाऊसाहेबमहाराजांकडून नाम घेतले, व अगदी अल्प कालांत त्याला थोडा अनुभव आला. बालसुलभ सरलतेने त्याने तो गुरुदेवांना सांगितला. त्याने प्रेरणा मिळून गुरुदेवांनींहि त्याच वर्षी वैकुंठचतुर्दशीस नाम घेतले, असा त्यांच्या परमार्थ-गंगेचा उगम झाला. या वयांत, नाम घेण्याने काय साधावयाचे इत्यादि परमार्थांतील मोठ्या गोष्टींचे ज्ञान असणे शक्य नसते. नाम घेणे, नामस्मरण करणे, ही एक फार चांगली गोष्ट आहे, त्याने आपले कल्याण होईल अशी सामान्य कल्पना असते. भक्तिहि मुख्यतः सकामच असते. पुढे श्रद्धा व ज्ञान त्याचप्रमाणे अनुभव वाढतात, श्रद्धा अधिक निष्काम होऊं लागते. गुरुदेवांची परमार्थविषयक भावना या वेळी अशीच होती. महाराज एकदा पोथी सांगताना म्हणाले, " नेम (नामस्मरण) केले म्हणजे परीक्षाहि चांगल्या रीतीने पास होते. " हे महाराजांचे वचन ऐकल्यावर त्याची प्रचीती पाहाण्याचे गुरुदेवांनी ठरविले. १९०२ मध्ये मॅट्रिकची परीक्षा झाल्यावर ते रोज नियमाने एक तास नेम करीत. याने आपल्याला संस्कृत शिष्यवृत्ति मिळाली तर महाराजांच्या म्हणण्याचा प्रत्यय आला अशी त्यांची धारणा होती.

त्याप्रमाणे त्यांना पहिली शिष्यवृत्ती मिळाली, परीक्षेत दुसरा क्रमांक लाभला. त्यामुळे ते पुढील शिक्षणासाठी पुण्याच्या सुप्रसिद्ध डेक्कन कॉलेजमध्ये जाऊं शकले. याच वेळी त्यांना कांहीं चांगले रूप–तेजादि पारमार्थिक अनुभवहि आले. अर्थात् महाराज व नाम यावरील श्रद्धा दृढतर होत गेली. पुढे दरवर्षी परीक्षा झाल्यावर ते याप्रमाणे नेम करीत. सर्व परीक्षेत ते उत्तम रीतीने पास झाले; आत्मानुभव आणखी वाढले; श्रद्धा दृढतर होत राहिली. तरीहि नियमित नेम १९०८ मध्ये डेक्कन कॉलेजमध्ये फलो झाल्यावर होऊं लागला. आपले अनुभव त्यांनी डेक्कन कॉलेजमधील प्रा. वुडहाऊस यांना सांगितले. ते थिऑसफिस्ट होते; गुरुदेवांबद्दल त्यांना प्रेमादराची भावना होती. त्यांचे अनुभव एकल्यावर, याविषयी आपण बेझंटबाईंना विचारूं, असे सांगून, ते गुरुदेवांना बनारसला बेझंटबाईकडे घेऊन गेले. ते गुरुपुत्र आहेत, हे समजल्यावर बाईंनी त्यांच्याकडे महाराजांचा फोटो पाहण्यास मागितला, तो पाहिल्यावर त्या म्हणाल्या "तुम्हांला अधिकारी गुरूची कृपा लाभली आहे." [You are in safe hands] तुमचे अनुभव चांगले आहेत. सत्त्वशुद्धि होत असल्याचे ते लक्षण आहे." यामुळे गुरुदेवांना आनंद झाला. जमखंडीस परत आल्यावर, ही सर्व हकीकत त्यांनीं महाराजांना सांगितली व बेझंट-बाईचा फोटो त्यांना दाखविला. तो पाहून महाराज म्हणाले "बाईंनी योग केलेला दिसतो." श्रद्धा वाढण्याला या सर्व घटनेचा उपयोग झालाच.

**२) संकट परंपरा–तीव्र मुमुक्षुता व उत्कट साधकदशा :–** १९०९ ते १९२० या कालांत गुरुदेवांचे भवितव्य घडविणाऱ्या अनेक घटना घडून आल्या. त्यापैकी पहिली म्हणजे १९०९ साली त्यांना जडलेला मेंदूचा क्षय हा भयंकर आजार होय. त्यांतून ते जगण्याची आशा उरली नव्हती. या आजारामुळे ते डेक्कन कॉलेज सोडून गावांत राहण्यास गेले; त्या वेळी त्यांच्या मित्राने त्यांना भगवद्गीता वाचून दाखविली. त्यांतील—

**" मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।। "**

( भ. गी. १८.५८ )

या श्लोकावर गुरुदेवांचे मन खिळून राहिले. ईश्वर-चित्त होणे म्हणज नामस्मरण करणे हे त्यांना ठाऊक होतेच. नामस्मरणावरील त्यांची श्रद्धा १९०२ ते १९०८ पर्यंत दृढ होत चालली होती. म्हणूनच वरील श्लोकाकडे ते आकर्षित झाले. त्यांच्या श्रद्धेस या श्लोकाने आणखी दृढता आली. भगवंताच्या या प्रतिज्ञेवर श्रद्धा ठेवून त्यांनीं जास्तीत जास्त नामस्मरण करण्याचा प्रयत्न केला. त्याची प्रचीतीहि त्यांना लवकरच आली. त्यांना अनाहत नादाचा अनुभव येऊं लागला आणि त्याच वेळी

**" नादानुसन्धान नमोऽस्तु तुभ्यम् ।। त्वां साधनं तत्त्वपदस्य जाने ।।**
**भवत्प्रसादात्पवनेन साकं । विलीयते विष्णुपदे मनो मे ।। "**

हा योगतारावलीतील श्लोकहि प्रथमच त्यांच्या हाती आला. प्रकृतीही थोडी सुधारु लागली. या घटनेचा ओझरता उल्लेख त्यांनी आपल्या गीतेवरील ग्रंथात केला आहे, ( भ. गी. २-६८ ) अर्थात् नामस्मरणच आपल्यास बरे करेल ही श्रद्धा वाढून ते नियमाने सुरुं झाले. लौकिक आकांक्षा भंग पावलेल्या आणि भविष्य कालांत सर्वत्र अंधार पसरलेला, अशी तेव्हांची त्यांची मनःस्थिति होती. प्रकृतिमान अशा स्थितीला आले होते की साधे वाचनहि करणे कठीण; परमार्थसाधन तर फारच कठीण. पण अशा स्थितीतहि त्यांची सद्गुरूंवरील व परमार्थावरील निष्ठा अचल होती; इतकेच नव्हे तर, या प्रसंगाने ती वाढली. या आपत्तीत, तुकारामाप्रमाणे, त्यांनी भय-अट्टाहासाने देवाला हाक मारली. आंत-बाहेर शारीरिक व मानसिक वैफल्याने पोळलेले गुरुदेव नामसाधनेकडे अधिक जोराने वळले. याच वेळी त्यांची अनन्य निष्ठा दाखविणारी एक घटना घडली. प्रा. रॉलिन्सन यांनी, ससून हॉस्पिटलमध्ये युरोपिअन् वार्डमध्ये राहून त्यांच्यावर उपचार व्हावा, अशी व्यवस्था केली.

त्या कालांत एका एम. ए. च्या विद्यार्थ्यांसाठी हे करणे म्हणजे मोठे दिव्य होते. परंतु गुरुदेवांनी तेथे जाण्यास नकार दिला. " मी लागवणकर वैद्यांचे औषध घेत आहे. त्याचा महिनाभर परिणाम पाहून नंतर ससूनमध्ये जाण्याचा विचार करीन, " असे उत्तर त्यांनी दिले. परंतु हो केवळ सबब होतो. ते औषध घेत होते, हेहि खरे; पण त्यांचा मुख्य भर नाम–औषधावरच होता. परमार्थांत अशा अनन्य श्रद्धेची अत्यंत आवश्यकता आहे, हे सांगताना आपल्या हिंदी ग्रंथांत गुरुदेवांनीं एक दोहा घातला आहे. त्यांत त्यांच्या स्वतःच्या अशा श्रद्धेचे स्पष्ट प्रतिबिंब दिसते.–

**" एक भरोसो, एक बल, एक आस बिस्वास।**
**एक राम घनश्याम हित, चातक तुलसीदास ।। "**

(हिं. प. सो. पृ. २६६)

चातकाला एका मेघाचाच आधार, तसा तुलसीदासांना रामाचा आणि गुरुदेवांना सद्गुरूंचा व त्यांनी दिलेल्या नामाचा. संकटे किंवा प्रलोभने यापैकी कोणत्याहि कारणानी हा एकमेव आधार सोडून त्यांनीं अन्य आधार घेतला नाही.* या वेळी त्यांची आई व गुरुबंधु कै. लिंगप्पा सावळगी यांचे परमार्थाच्या दृष्टीने त्यांना फार साह्य

---

* संतांचे ग्रंथ स्वानुभवावर आधारलेले असतात. त्यांत त्यांच्या जीवनाचाहि मागोवा घेता येतो. गुरुदेवांचे ग्रंथ याच स्वरूपाचे आहेत. म्हणून आपले पारमार्थिक–विचार सांगण्यासाठी त्यांनीं निवडलेल्या संतांच्या कांहीं वचनांत, त्यांच्या जीवनाचेहि प्रतिबिंब दिसते. असाच त्यांच्या "हिंदी परमार्थ सोपानांतील " एक दोहा वर उद्धृत केला आहे. आणखी थोडे दोहे पुढे देणार आहे. त्यांच्या सर्व ग्रंथात अशी अनेक स्थळं सांपडतील. ती एकत्र करून त्यांच्या आधारे गुरुदेवांच्या तत्त्वज्ञानाचा त्यांच्या जीवनाशी पडताळा घेणे उद्बोधक व मनोरंजक होईल. गुरुदेवांचे मित्र प्रा. शुक्ल यांना अलाहाबादेच्या कांही मंडळींनीं विचारले " प्रा. रानडे यांनीं आत्मचरित्र लिहिले नाही काय ? " यावर, " हे पहा त्यांचे आत्मचरित्र. " असे म्हणून प्रा. शुक्लांनी गुरुदेवांचा हिंदी संतांवरील ग्रंथ त्यांच्या पुढे टाकला.

झाले. त्यांचे उपकार ते नेहमी आठवत असत. या नंतर १९१० च्या श्रावणांत त्यांनी महाराजांच्या सान्निध्यांत काळ घालविला. त्याचा त्यांना मोठा पारमार्थिक लाभ झालाच; पण प्रकृतिहि बरीच सुधारली. महासंकट नष्ट झाले; महाराजांच्यावर व नेमावर पूर्ण श्रद्धा बसलीं; सकाम भक्ति निष्काम होऊं लागलीं. त्यांना नेमाचा इतका ध्यास लागला की १९१४ मध्ये ते एम्. ए. च्या परीक्षेला बसले तेव्हां परीक्षेच्या दिवसांतहि त्यांचा नेम चुकला नाही.

या प्रमाणे १९१० नंतर प्रपंच-परमार्थ दोन्ही क्षेत्रांत सर्व सुरळीत चालले होते. परंतु १९१४ मध्ये श्रीभाऊसाहेबमहाराजांनी देह ठेवला; त्यामुळे गुरुदेव पुन्हा निराधार झाले. त्यांना महाराजांच्या निर्याणाने अत्यंत दुःख झाले. रात्री अश्रूनीं उशी भिजून जाई, असे ते सांगत. गुरुदेवांच्या गुरुभक्तीला उपमा म्हणजे ज्ञानेश्वरांच्या निवृत्तिनाथांविषयी भक्तीचीच होय. " आपण केवळ देवरूपच झाल्याने आपणांस आत्मदेव म्हणून हाक मारण्यास काय हरकत आहे ? " असे एका पत्रांत त्यांनीं महाराजांना म्हटले आहे. तरी, महाराजांच्या निर्याणानंतर आपले अधिकारी गुरुबंधु श्रीअंबुराव-महाराज व तशाच गुरुभगिनी श्रीशिवलिंगव्वा यांच्या सहाय्याने त्यांनीं आपली परमार्थाची वाटचाल नेटाने चालू ठेवली.

परंतु देवाने त्यांची जणु परीक्षाच पाहण्याचे ठरविले होते. दुःखांतून देवाकडे जावे लागते, सूळ हाच देवाच्या मंदिरांत जाण्याचा जिना आहे, या नियमाला गुरुदेव तरी अपवाद कसे ठरतील ? १९१६ मध्ये त्यांचा एकुलता एक मुलगा एक वर्षाचा होण्यापूर्वी गेला. १९१८ च्या इन्फ्लुएंझांत मातोश्री व पत्नि कालवश झाल्या. आतां गुरुदेव अगदी एकाकी झाले. "**देव भक्तालागीं करूं नेदी संसार,**" ही तुकारामांची उक्ति सत्य ठरली. या वेळी ते " अध्यात्म-भुवन " या आपण बांधलेल्या घरांत राहात असत. तेथे त्यांचा परमार्थ वाढीस लागला. परंतु हेही फार दिवस नीट चालले नाही. त्यांच्या आजाराने १९२० साली पुन्हा जोर केला.

या वेळी मात्र मनाशी कांहीएक निर्धार करून त्यांनीं पुणें सोडले व ते इंचगेरीस गुरुचरणांजवळ आपले जेष्ठ गुरुबंधु श्रीअंबुरावमहाराज यांच्या सान्निध्यांत जाऊन राहिले. प्रकृति सुधारण्याचे कांहीं लक्षण दिसेना; त्यांनीं आपले मृत्युपत्रहि लिहिले. तरी देहाचे काय व्हायचे असेल ते गुरुचरणांपाशी होवो, अशा निर्धाराने, त्यांनी इंचगेरीस कठोर साधन आरंभिले. हाच त्यांच्या सत्त्वपरीक्षेचा खरा काळ होता. प्रकृतिमान आसन्नमरणदशेला आलेले, आप्तेष्ट आणि सहकारी दुरावलेले, जगांत उपेक्षा झालेली, अशी त्यांची या वेळी अवस्था होती. या सर्व अंधारांत, परमार्थावरील व सद्गुरूंवरील श्रद्धेचा सूर्य मात्र तळपत होता, साधनांत विलक्षण तीव्रता आली होती. गुरुकृपा, स्वतःची कठोर साधना आणि श्रीअंबुरावमहाराजांचे प्रेमाचे छत्र यांच्या आधारे या कसोटीला ते उतरले. श्रीअंबुरावमहाराजांनीं आशा मुळीच सोडली नाही. "तुम्ही ६० वर्षे जगाल असे महाराजांनीं सांगितले आहे. ते खरे ठरलेच पाहिजे, मग डॉक्टर कांहींहि म्हणोत. मी तुमच्या मृत्युपत्रावर साक्ष घालणार नाही," असे प्रेमळ आश्वासन त्यांनीं गुरुदेवांना दिले. हाच दुःखाचा आणि निराशेचा काळ त्यांच्या अत्युच्च पारमार्थिक उत्कर्षाचा ठरला. १९२० च्या शेवटी त्यांना एक अत्युच्च अनुभव आला. तो त्यांनीं श्रीअंबुरावमहाराजांना सांगितला; तेव्हां आपल्यामागे परमार्थ चालविणारा अधिकारी सद्गुरु झाला, या विचाराने त्यांना फार आनंद झाला. "रामराया, आतां तुम्ही नाम देण्यास सुरुवात करा," असे ते गुरुदेवांना म्हणाले. सारांश या अनुभवाने गुरुदेव गुरुपदाचे अधिकारी झाले. या अनुभवाचा उल्लेख कांहींसा आडपडदा ठेवून गुरुदेवांनीं आपल्या कन्नड संतावरील ग्रंथात केला आहे. (क. सा. पृ. ११५). भक्तिमार्गात कठोर शारीरिक दुःखाबरोबर ईश्वरसाक्षात्काराचा परमानंदहि असतो, हे स्वतः अनुभवल्यावर खालील दोह्यांच्या आधारे त्यांनी तो मांडला असेल का ?

**"चढा मन्सूर सूली पर, पुकारा इष्कबाजों से ।**
**यह उसके नाम का जीना है, आए जिसका जो चाहे ।**

(हिं. प. सो. पृ. २३४).

सूळ हाच ईश्वरदर्शनाला जाऊन त्याचा आनंद भोगण्याचा जिना आहे. ज्यांची इच्छा असेल त्यांनीं या जिन्याने यावे.

**"बडा लुल्फ़ है यार इश्क में, यार भी है और प्यार भी है ।।**
**सूली पर मन्सूर खडा है, दार भी है, दीदार भी है ।।**

(हिं. प. सो. पृ. २८४)

मित्रा, प्रेमांत मोठी मौज आहे. त्यांत फार यातना आहेत, पण प्रेमाचा आनंदहि आहे. मन्सूर सुळावर उभा असताना त्याला प्राणांतिक वेदना होत आहेत, पण त्याबरोबरच ईश्वरदर्शनाचा परमानंदहि आहे. १९०९ ते १९२० हो गुरुदेवांच्या पारमार्थिक जीवनांतील गाढ निराशेची रात्र म्हणता येईल. त्यातहि १९१८–२० ही गडद अंधाराची मध्यरात्र होय. या अवस्थेतहि निष्ठेने, निश्चयाने प्राणपणाने भक्तिसाधन केल्यावर सुप्रभात दूर कशी राहू शकेल ?

**(३) परमार्थाचा उषःकाल व प्रभात :– गुरुकृपेने अभ्युदय–निःश्रेयसाची प्राप्ति – गुरुपदाचा अधिकार, पण प्रकट कार्य नाही– (१९२१–३३)** – याच सुमारास श्री. काकासाहेब कारखानीसांना लिहिलेल्या पत्रांत गुरुदेव म्हणतात, " सर्व गोष्टी समर्थ–इच्छेने व कांही अशी अंतःप्रेरणेने होतच आहेत. आपल्या परमार्थाची सीमा जाहलेखेरीज जगदुद्धार करूं पाहणारा मनुष्य फसल्याखेरीज राहणार नाही. " यांत सुचविल्याप्रमाणे, आपल्या परमार्थाची सीमा करून, ते गुरुपदाचे अधिकारी झाले होते. श्री अंबुरावमहाराजांनीं अनेक वेळा, तुम्ही नाम देऊ लागा, असे त्यांना सांगितले पण त्यांनी नकार दिला. "तुम्ही असतामा मी नाम देण्याचे कारण काय ?" असे

उत्तर त्यांनी दिले. दोघे नाम देऊ लागल्यावर संघर्ष ( द्वैत ) होण्याची शक्यता असते. ती टाळण्यासाठी त्यांनी असा नकार दिला. शिवाय, श्रीनिंबर्गीमहाराजांची त्यांना तशी सूचनाहि मिळाली होती की, "अधिकार आला आहे; पण प्रत्यक्ष कार्य सुरू करण्याला अवकाश आहे." १९३३ डिसेंबरमध्ये श्रीअंबुरावमहाराज ज्योतिरूप झाले, त्या नंतर गुरुदेव नाम देऊं लागले.

परमार्थ उच्च अवस्थेला पोहोंचला तरीं गुरुदेवांच्या प्रापंचिक अडचणी संपल्या नाहीत. प्रकृति अजून अशक्तच होती ; आजारामुळे नेहमी रजा घ्यावी लागे ती बिनपगारी असे. त्यामुळे आर्थिक प्रश्न होताच. तरी ते खचून जाणारे नव्हते. सद्गुरु, नामसाधन व ईश्वर यावरील दृढ श्रद्धा, हे त्याचे बल होते. त्यांच्या सामर्थ्यापुढे कळिकाळाचेहि सामर्थ्य त्यांना ठेंगणे वाटे. "माझ्यापुरता माझा परमार्थ झाला आहे. आता परमार्थाच्या सेवेसाठी महाराजांची इच्छा असेल तो पर्यंत हा देह राहील." ही आत्मसमर्पणाची. शरणांगतीची वृत्तिहि त्यांच्या ठिकाणी बाणली होती. भक्तिभावाचा परमोच्च बिंदु म्हणजे शरणागति, असे त्यानी म्हटले आहे. त्यासाठीच जणु या सर्व आपत्ति त्यांना भोगाव्या लागत होत्या. परंतु यांतही त्यांची श्रद्धा अटळ होती. यावरुन खालील दोह्याची आठवण होते. अशी श्रद्धा असल्यावांचून ईश्वर–प्राप्ति अशक्य आहे, हे सांगण्यासाठी गुरुदेवांनी तो घेतला आहे.

"बध्यौ बधिक पर्‍यौ पुन्यजल, उलटि उठाई चोंच ।
तुलसी चातक–प्रेम–पट, मरतहूँ लगी न खोंच ।।

( हिं. प. सो. पृ. २६६ )

व्याधाचा बाण लागून चातक गंगाजलांत पडला ; प्राणांतिक वेदनांची तृष्णा शमविणे, मृत्यूनतर स्वर्गप्राप्ति, हे दोन्ही लाभ गंगाजलाच्या प्राशनाने झाले असते. पण, मेघातील पाण्यावांचून

अन्य जल घ्यायचे नाही, या व्रताला अशा प्रसंगीहि चातकाने वट्टा लागूं दिला नाही; गंगाजल कदाचित चुकून मुखांत जाईल म्हणून चोंच उलटी उचलली.

संकटाचे ढग हळूंहळूं वितळूं लागले. या सर्व कालात त्यांचे वाचन, ग्रंथलेखनाची तयारी, प्रकृति बरी असेल तेव्हा कॉलेजात शिकविणे, हे कार्य सुरूं होतेच. प्रकृतीच्या वगैरे कारणांनी त्यानीं डेक्कन एज्युकेशन सोसायटींतील नोकरीचा १९२४ मध्ये राजीनामा दिला. ही घटना मागे सांगितलीच आहे. १९२२ मध्ये त्यांचा दुसरा विवाह झाला. या सुमारास कांहीं दैवी सूचनेवरून त्यांनी निंबाळास स्थलांतर केले व तेथें घर बांधून ते राहू लागले. निंबाळ हे रेल्वे स्टेशन अगदी जवळ असलेले, शहरापासून दूर असे, शांत खेडे आहे. तेथेच त्यांचा उपनिषदावरील जगभर गाजलेला ग्रंथ प्रसिद्ध झाला, व त्यानेच त्यांची अल्पावधींत एक द्रष्टे तत्त्वज्ञ अशी सर्वदूर प्रसिद्धि झाली.

१९२४ मध्ये फर्ग्युसन कॉलेज सोडल्यानंतर पुढे काय करावयाचे हा प्रश्न निर्माण झाला. तेव्हां "Academy of Comparative Philosophy & Religion," या नांवाची संस्था काढण्याची योजना त्यांनीं आखली. हा विषय मागे आला आहेच. त्यासंबंधी आपले मित्र कै. गदगकर यांना लिहिलेल्या पत्रांत, बौद्धिक कार्य व परमार्थ यासंबंधी, त्यांच्या भावना अगदी स्पष्ट झाल्या आहेत. म्हणून त्यांतील कांहीं भाग उद्धृत करतो.

"...पारमार्थिक जीवन हेच मला सर्वश्रेष्ठ वाटत आले आहे. शैक्षणिक, तत्त्वज्ञानपर आणि प्रचारात्मक कार्य हे त्या जीवनाचे केवळ अस्पष्ट असे पडसाद होत. मी केवळ बौद्धिक आणि तत्वज्ञानपर कार्यालाच वाहून घेतले आहे, असे समजणारे लोक आभासाला सत्य समजत आहेत. कारण, आध्यात्मिक जीवनाचा अनुभव घ्यावा, ही माझी अंतःकरणाची खरी ओढ आहे.

हे तुमच्याप्रमाणे फार थोडया लोकांना ठाऊक आहे. मात्र, तुम्ही म्हणता त्याप्रमाणे अजूनही माझ्या जीवनात परमार्थाला सर्वश्रेष्ठ स्थान प्राप्त झाले आहे, असे म्हणता येत नाही. पैलतीरावर असलेल्या मंदिराला पोंचण्यासाठी अद्यापही मला बौद्धिकतेच्या प्रवाहांतूनच जाणे भाग आहे. त्या मंदिरापर्यंत मी कदाचित् पोंचूंहि शकणार नाही. पण आज तरी बौद्धिक आणि तत्त्वज्ञानात्मक कार्यापेक्षा अधिक महत्वाचे कार्य, माझ्यासमोर नाही, हे निश्चित. कॉलेजसारख्या शैक्षणिक संस्थेंत राहून जर मला माझ्या जीवनाचे ध्येय गांठता येत नसेल तर, माझा तत्त्वज्ञानाचा व्यासंग जगाच्या अधिक उपयोगी पडेल असे नवीन क्षेत्र शोधणे मला आवश्यक आहे. मी ज्या कार्यासाठी स्वतःला वाहून घेतले आहे, ते कार्य जर मला करता येत नसेल, तर आजवर मी आयुष्याची बारा वर्षे ज्या संस्थेंत घालविली, त्या संस्थेहून अधिक व्यापक अशी संस्था काढून मला ते करावे लागेल. त्या दृष्टीने पाहता "ॲकॅडमी ऑफ कंपॅरेटिव्ह फिलॉसफी अँड रिलिजन," यापेक्षा अधिक व्यापक संस्था दुसरी कोणती असणार ? अशा संस्थेतच सव धर्मांचे व तत्त्वज्ञानाचे प्रतिनिधी एकत्र येऊं शकतील आणि परमेश्वराची थोरवी व वैभव व्यक्त करणाऱ्या विचारांची देवघेव करूं शकतील ... मला स्वतःला उपजीविकेसाठी या संस्थेवरच अवलंबून रहावे लागेल किंवा काय ते सांगवत नाही. परंतु इतके खरे की, ही संस्था म्हणजे माझ्या केवळ उपजीविकेचे साधन म्हणून न राहाता, ती माझ्याबरोबर इतरांच्या, किंबहुना ईशप्रवण अशा अखिल मानवजातीच्या पारमार्थिक अभ्युदयास साहाय्यभूत होईल यांत शंका नाही. हे ध्येय प्राप्त होणे न हाणे सर्वस्वी परमेश्वराच्या इच्छेवर अवलंबून आहे सावध राहून धीराने कार्य करीत राहणे व देवाची करुणा भाकणं एवढेच आपल्या हाती आहे."

(निंबाळ, ता. १४-८-१९२४)

ही संस्था साकार झाली नाही. परंतु पुढे काय करायचे हा प्रश्न आपोआप सुटला. मागे सांगितल्याप्रमाणे, १९२७ मध्ये गुरुदेवांची नेमणूक अलाहाबाद विश्वविद्यालयात प्राध्यापकपदी झाली. १९४६ मध्ये निवृत्त होईपर्यंत ते त्या संस्थेतच होते.

अॅकॅडेमी साकार न होण्याचे कारण गुरुदेवांनीं सांगितले; तेहि चिंतनीयच आहे. ते एकदा मला म्हणाले, "या संस्थेसाठी निधी जमविणे अवश्य होते. त्यासाठी लोकांकडे पैसे मागितले पाहिजेत. संस्थेचा डायरेक्टर म्हणून मी त्या निधींतूनच पगार घेणार होतो. कारण तेच माझ्या उपजीविकेचे साधन होते. आपल्या सांप्रदायांत परधन घ्यावयाचे नाही, हे पथ्य आहे. म्हणून माझे मन द्विधा होऊं लागले. निधी जमविण्याचे काम मी करूं शकलो नाही."

१९२५ पासून गुरुदेव निंबाळास राहत असत. १९२७ नंतर, उन्हाळ्याच्या सुटींत ते निंबाळास येत असत; एरव्ही अलाहाबादेस नोकरीसाठी रहावे लागे. या कालांत ते स्वतः नाम देत नसले तरी, परमार्थाचा प्रसार अप्रत्यक्षपणें त्यांच्याकडून होत होताच. ते उन्हाळ्यांत निंबाळास आल्यावर बरेच जिज्ञासु, मुमुक्षु व साधक त्यांच्याकडे येत असत, त्यांच्या पारमार्थिक अधिकाराची कीर्ति हळूंहळूं पसरूं लागली होती. त्यांच्याकडे आलेल्या लोकांपैकी ज्यांची नाम घेण्याची इच्छा असेल त्यांना ते त्यासाठी श्रीअंबुराव महाराजांकडे जाण्यास सांगत. त्यांत सुशिक्षित मंडळीच अधिक संख्येने असत. श्रीअंबुरावमहाराजांकडून नाम घेऊन असे जिज्ञासु व मुमुक्षु परमार्थमार्गास लागत असत. १९३४ पर्यंत असे पुष्कळ लोक त्यांच्या प्रेरणेने नामधारक झाले. या पूर्वी म्हणजे १९१४ पर्यंतहि त्यांच्या प्रेरणेने श्रीभाऊसाहेबमहाराजांकडून नाम घेतलेले कांही थोडे नामधारक आहेत. गुरुदेव म्हणत, " महाराजांनीं बी पेरले, श्रीअंबुरावमहाराजांनीं तयार पीक कापून घेतले. त्यांच्या

शिष्यांत सुशिक्षित लोक पुष्कळ आहेत. महाराजांच्या शिष्यांत तसे नव्हते." याच दृष्टांतांत थोडी भर घालून म्हणता येईल की, महाराजांनी पेरलेल्या बियांतून उगवणाऱ्या रोपट्यांची जोपासना गुरुदेवांनीं केली व शेवटी पीक श्रीअंबुरावमहाराजांनी कापून घेतले. श्रीअंबुरावमहाराजांकडे पुष्कळ लोक स्वतंत्रपणेहि गेले व त्यांनीं नाम घेतले. वरील विचार विशेषतः सुशिक्षित नामधारकांबद्दल आहेत. याप्रमाणे, त्यांचा सांपत्तिक स्थिति व कीर्ति यांत वाढ होऊं लागली, ती, त्यांनी कठोर साधनाने मिळविलेल्या ईश्वराच्या कृपेने, शेवटपर्यंत वाढतच गेली. देवाची कृपा नसेल तर दैन्य येते; ती कृपा प्राप्त झाल्यावर वैभव लाभते. हे सांगण्यासाठी त्यांनी निवडलेल्या दोह्यांत त्यांच्या १९२१ पूर्वीच्या व नंतरच्या स्थितीचे जणु वर्णन आले आहे.

**"घर घर माँगे टूक, पुनि, भूपति पूजे पाय ।**
**ते तुलसी तब राम बिनु, ते अब राम सहाय ॥**

(हिं. प. सो. पृ. २४०)

**४) "यारे यारे अवघे जन" पर्जन्यवृष्टीने नामदान :-** १९३३ डिसेंबरमध्ये श्रीअंबुरावमहाराज ज्योतिरूप झाले व १९३४ पासून गुरुदेवांनीं नाम देण्यास सुरुवात केली. कारण, श्रीअंबुराव-महाराजांच्या निर्याणानंतर परमार्थाची ज्योत प्रज्वलित ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावरच पडली. ती धुरा उचलण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झाला होताच. स्वतःचे उच्च आत्मानुभव, आजेगुरुंचा दृष्टांत व गुरुबंधूचे आश्वासन, हे सामर्थ्य त्यांच्या मागे उभे होते. परमार्थाचे केंद्र आतां निंबाळ बनले. प्रथम कांही वर्षे नाम देण्याचे कार्य त्यांनी फार सावधानपणे केले. प्रतिवर्षी थोड्यांच मुमुक्षुंना नाम दिले. १९४० नंतर मात्र प्रतिवर्षी ही संख्या वाढू लागली, निंबाळास येणाऱ्या लोकांची संख्याहि वाढली. कमल पूर्णपणे उमलल्यावर भ्रमरांना आमंत्रण द्यावे लागत नाही. त्याचप्रमाणे

गुरुदेवांना आध्यात्मिक उच्चावस्था लाभून, त्याचा कीर्तिसुगंध सर्वत्र दरवळूं लागल्यावर, मुमुक्षूंची गर्दी होऊं लागली. " **वाऱ्याहाती माप चाले सज्जनाचे,** " या तुकारामांच्या उक्तीप्रमाणे, गुरुदेव अगदी प्रसिद्धिपराङ्मुख असूनही, त्यांची कीर्ति पसरुं लागली. त्यांचे अंतःकरण अतिमृदु, परदुःखे दुःखित होणारे असल्याने, त्यांनी आल्यागेल्या सर्वांना नाम देऊन भक्तिमार्गास लावले. त्यांच्यामागची संकटे अजूनही संपली नव्हती. १९४१ मध्ये त्यांचा ४ महिन्याचा मुलगा गेला, पत्नी मरता मरता वांचल्या, ते स्वतः अधिक आजारी झाले. तरी परमार्थ प्रसाराच्या कार्यात खंड पडला नाही.

१९४६ साली अलाहाबादेच्या नोकरीतून निवृत्त झाल्यावर, त्यांचा मुक्काम निंबाळास वर्षात ७–८ महिने पडे. या सर्व कालांत परमार्थप्रेमी मंडळी त्यांच्याकडे निंबाळास सवडोप्रमाणे येत असत. अर्थात्, नाम घेणाऱ्यांची संख्याही खूपच वाढत चालली. आपले निंबाळचे घर त्यांनी, तुळसीदासांनी म्हटल्याप्रमाणे "रामप्रेमपुर" केले.

**" घर राखे घर जात है, घर छाँडे घर जाय ।**
**तुलसी घर बन बीच रहु, राम प्रेम पुर छाय ।। "**

(हिं. प. सो. पु. २३२)

घर केव्हांहि जाणार आहे, म्हणून घर व वन-प्रपंच व संन्यास यामध्ये राहून ईश्वराच्या प्रेमाचे पुर तयार करावे. अर्थात् प्रपंचातील देहधारणेला अवश्य त्या सुखसोयी व संन्यासांतील अलिप्तता यांचा समुच्चय करुन, अशा रामपूरांत इतर भक्तांच्या संगतींत परमार्थ-साधन करीत राहावे हेंच गुरुदेव करीत होते. सारांश, निंबाळला एक पुण्यक्षेत्र हे पद प्राप्त झाले. गुरुदेवांच्या शिष्यांत, शब्दशः राजा–रंक, विद्वान, धनगर, वृद्ध–तरुण–बालक, स्त्रीपुरुष, ब्राह्मण–हरिजन, अशी सर्व मंडळी व सर्व धर्मातील व धर्मपथांतील लोक, यांचा समावेश होता. त्यांत कसलाच भेदभाव नव्हता. साक्षात्कार हा

विश्वधर्म आहे, हे त्यांच्या शिष्यांतील विविधतेवरुन, त्यांनी सिद्ध केले. त्यांच्या साक्षात्काराची मंदाकिनी विस्तार पावत, आर्तांचे पाप-ताप फेडीत, तटावरील वृक्षांना पोषीत सहस्त्रमुखानी ब्रह्मानंद सागराला मिळण्याला चालली होती. "यारे यारे अवघे जन," या वृत्तीने सर्वांना भक्तीची हाक देऊन ते जवळ करूं लागले व परमार्थ-प्रेमाने शेवटी शेवटी त्यांनी मेघवृष्टिने उपदेश केला. स्वतःच्या जीवनाचे सोने करून आपल्या सान्निध्यांत आलेल्यांच्या जीवनाचेहि त्यांनीं सोने केले. शरीर अत्यंत क्षीण व रोगजर्जर झाले होते. पण परमार्थाचा, भक्तीचा प्रसार करताना, आपल्या सद्गुरूंचे कार्य करताना, त्यांनीं देहाची मुळीच पर्वा केली नाही. त्यांच्या कृपेने मुमुक्षु झाले; मुमुक्षूंचे साधक झाले; पण साधकांचे सिद्ध मात्र कोणी झाले नाहीत हेच आज सर्वांना सलणारे शल्य आहे. गुरुदेवांनी सर्वांना भक्तीसुखाची वाट दाखविली; हाच त्यांचा पारमार्थिक कर्मयोग. "स्वतः ईश्वर-प्राप्ति करुन घेऊन इतरांनाहि ती करवून देणे, हेच जीवनाचे ध्येय आहे व असावे." या स्ववचनाला ते अखेरपर्यंत जागले. जीवन्मुक्तीच्या अवस्थेंतील भक्तांच्या कार्याचे वर्णन गुरुदेवांनीं दोन दोह्यांत केले आहे. ते दोहे आत्मचरित्रपर आहेत, असे म्हटले तर वावगे होणार नाही.

**"कबिरा हम गुरुरस पिया, बाकी रही न छाक।**
**पाका कलश कुम्हार का, बहुरि न चढ़सी चाक ॥"**

(हिं. प. सो. पृ. २८८)

सद्गुरूंनीं सांगितल्याप्रमाणे साधन करून गुरुदेवांनीं आत्मानुभवाच्या आनंदाचे मनसोक्त अमृत प्राशन केले, त्यामुळे वासनेचा शेषहि उरला नाही. मग पुन्हा जन्माला येण्याचे कारण काय ? जन्म-मृत्यूचे चक्र संपले. स्वरूपसाक्षात्काराने आलेली ही अनुभूति म्हणजेच जीवनमुक्ति. आपण मुक्त झालो याविषयी त्याना मुळीच संशय उरला नाही. पण उर्वरित प्रारब्ध आहे तोपर्यंत देह असतोच-तो कसा वागतो, काय करतो ?

" हद हद पर सब ही गया, बेहद गया न कोय ।
बेहद के मैदान में, रमे कबीरा सोय ॥ "

( हिं. प. सो. पृ. २९० )

थोडा फार परमार्थाचा लाभ पुष्कळांना होतो. पण बेहद्दीच्या मैदानांत अनंतब्रह्माशी एकरूप होऊन त्या अवस्थेत केवळ जीवन्मुक्तच खळतो; तो खेळतो याचा अर्थ केवळ आनंदाकरता, स्वतंत्रपणे, कोणत्याहि कर्तव्याने बांधलेला नसताना, जगाला परमार्थाचे मार्गदर्शन करीत राहतो. हेच त्याचे सहजकर्म.

" तुका म्हणे मुक्ति परिणीली नोवरी ।
आतां दिवस चारी खेळीमेळी ॥ "
आणि
" प्रारब्धशेष उरले जननिश्चयाला ।

अशा वचनांतहि हाच आशय आहे. गुरुदेवांच्या १९३३ नंतरच्या कार्याचे हेच स्वरूप आहे.

**अमृतमहोत्सव :–** जमखंडीच्या गुरुदेवांच्या शिष्यांनीं व इतर त्यांच्या चाहत्यांनीं, त्यांच्या संमतीने, ३–७–१९४६ दिनी जमखंडीस त्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे, हा अत्यंत हृदयस्पर्शी, भव्योदात्त उत्साहपूर्ण सोहळा त्यांच्या ३ जुलै या वाढदिवशी अत्यानंदाने साजरा झाला होता. सर्वांच्या आनंदोत्साहाला व भक्तिप्रेमास पूर आला होता. हा आनंदाचा सोहळा पाहून सर्वांची अंतःकरणे भरून आली, डोळे निवले. जमखंडी ही लौकिक व पारमार्थिक दोन्ही दृष्टीनी त्यांची जन्मभूमि. तेथेच ते सद्गुरूच्या अनुग्रहाने पूनीत झाले. श्रीभाऊसाहेबमहाराज जमखंडीला परमार्थाचे माहेरघर म्हणत असत. अशा ठिकाणी आल्यावर गुरुदेवांचा आनंद व उत्साह काय वर्णावा ! या दोन्ही भावना त्यांच्या देहमनांतून

ओसंडत होत्या. वस्तुत:, अमृतमहोत्सव हे त्यांच्या दृष्टीने निमित्त होते. जमखंडीला जाण्यांत त्यांचा खरा हेतु सद्‌गुरूंचे चरण आठवून पारमार्थिक निरवानिरव करणे हा होता. तेथून परतल्यावर, उत्सवाच्या अध्यक्ष, जमखंडीच्या राणीसाहेव, यांना लिहिलेल्या पत्रांवरून हे स्पष्ट होते. ते लिहितात.– " जमखंडीविषयी मला काय वाटते, हे निराळे सांगणे नकोच. महाराज येथे ३०–३२ वर्षे येत होते व ज्यास त्यांनी परमार्थाचे माहेर बनविले, जेथे मी जन्मलो, वाढलो व अनुग्रहित झालो, तेथे राहण्याची मंगल संधि तुम्ही सर्वांनीं मला आणून दिली, याबद्दल कोणीकोणाचे आभार मानावे ! तुम्ही व आम्ही मिळून ईश्वराचेच आभार मानले पाहिजत." (१३–८–५६). या उत्सवानंतर गुरूदेव चार आठवडे जमखंडीस राहिले. या अवधींत त्यांनीं गुरूचरणांनीं पवित्र झालेल्या तेथील अनेक स्मृतिस्थलांचे दर्शन घेतले; अनेक आठवणींना उजाळा दिला; अनेकांच्याकडून गुरुगोष्टी पुन्हा पुन्हा ऐकून कान पवित्र केले. त्यांच्या जमखंडीच्या वास्तव्याच्या कालांत त्यांनीं २०० च्यावर मुमुक्षूंना नाम दिले. या नंतर गुरुदेव निंबाळास परत गेले.

**निर्याण :**– हा अमृत–महोत्सव म्हणजे दिवा जाण्यापूर्वी मोठा होतो, तसाच ठरला. लोकांनीं केलेल्या गौरवाचा तो उच्च विंदु होता. त्यांच्या अंतरीचा साक्षात्कारदीप मात्र सतत वर्धिष्णू–प्रभविष्णु होता. १९५७ मध्ये ते थोडे उशीराच म्हणजे १२ मार्चला, अलाहाबादेस गेले; ते आजारी पडूनच, देहाच्या अत्यंत विकल अवस्थेंत, एप्रिलच्या शेवटी निंबाळास परत आले. त्यांची ही अवस्था पाहून भेटायला येणाऱ्या सर्वांचे मन चरके; पण त्यांनीं अनेक दारूण आजारांना तोंड दिले होते. तेव्हां या वेळीहि हेच घडेल ही खोटी आशा सुटत नव्हती. आपल्या निर्याणापूर्वी १०–१२ दिवसच आधी "**स कालेनेह महता योगो नष्ट:परंतप**" (भ. गी. ४–२) या श्लोकाच्या संदर्भात त्यांनीं दोन वेळा सांगितले होते की, साक्षात्काराची गंगा फल्गुनदीप्रमाणे गुप्त होते. ही

निर्याणाची स्पष्ट सूचना होती. पण भक्तांची आशा सुटत नव्हती. शेवटी, रविवार ता. २ जून पासून त्यांनीं अन्नपाणी वर्ज केले; आंत नाम-माला चालली होती. तरीहि ३ जूनलादेखील त्यांनी मुमुक्षूंना नाम दिले. ता. ६ जूनला रात्री १०-३० ला त्यांनीं पार्थिव देह टाकला व त्यांची ज्योति ज्योतींत लीन झाली.

आपण सुखसागर होऊन जगाला आत्मप्राप्तीचा उपदेश करणाऱ्या, आपण तरून विश्वाला तारणाऱ्या, जगतावर सदा मंगलाचा वर्षाव करणाऱ्या संतामध्ये गुरुदेव रानडे यांना मानाचे स्थान आहे. १९३४ पासून १९५७ पर्यंत भूतदयेने प्रेरीत होऊन व ईश्वरांचा आदेश जाणून हे महत्कार्य करून ते अनंतांत विलीन झाले त्यांच्या निर्याणाने त्यांच्या भक्तांना किती दारूण दुःख झाले असेल; कशी निराशाजनक पोकळी वाटली असेल, त्यांची कल्पनाहि करणे कठीण आहे.

याप्रमाणे गुरुदेव स्वतःच्या जीवनाचे तर सोने करून गेलेच; पण इतरांनाहि त्यांनी तसे करण्याचे नामरूपी साधन दिले. स्वतः गुरुदेवांच्या जीवनाला अनेक पैलू होते. ते विद्वान होते, स्वतंत्रपणे विचार करणारे प्रज्ञावंत तत्त्वज्ञ होते, प्रेमळ शिक्षक होते, उत्कृष्ट ग्रथकार होते. सर्व जगाशी मैत्री ठेवणारे जगमित्र होते. ज्या ज्या क्षेत्रांत त्यांनीं पाऊल टाकले ते ते क्षेत्र त्यांनीं आपल्या प्रतिभेने उजळून दाखविले. पण हे सर्व त्यांच्या जीवनाचे निरनिराळे पैलू झाले. त्यांच्या जीवनाचा आत्मा भक्ति किंवा परमार्थ हा होता. त्यासाठी त्यांनीं आपल्या आयुष्यांतील प्रत्येक क्षण वेचला. म्हणून डॉ. राधाकृष्णन् यांनीं त्यांच्याविषयी बोलतांना "We read Philosophy; Ranade lives it" ("आम्ही तत्त्वज्ञान वाचतो, रानडे तत्त्वज्ञान आचरणात आणतात") असे सार्थ उद्‌गार काढले होते. खरोखर, गुरुदेव हे आजच्या भौतिक युगांतील एक चमत्कार होते. त्यांच्या निधनानंतर एक वर्षाने अमेरिकेतील प्रा. जॉर्ज बच

यांनीं त्यांच्याविषयी लिहिलेला लेख महत्वाचा आहे. त्यांत शेवटी ते म्हणतात की, "इतर देशाप्रमाणे भारतांतही निरनिराळ्या संशोधनक्षेत्रांत काम करणारे विद्वान आहेत, सत्तत्त्वांत खोलवर शिरणारे तत्त्वज्ञ आहेत, शद्वातीत अनुभव घेणारे साक्षात्कारी पुरुष आहेत, आपल्या विद्यार्थ्यांना स्फूर्ति देणारे थोर शिक्षक आहेत, आणि ज्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व बाहेर ओसंडत असते. असे थोर महात्मेहि आहेत. परंतु या सर्व भूमिका एकाच वेळी वठविणारा फार क्वचित् आढळतो. प्रो. रानडे हे त्यापैकी होत. मनुष्यस्वभाव किती उत्कृष्ट असू शकतो याचा ते जणुकांहीं आदर्शच होते."

गुरुदेवांच्या शेवटच्या ग्रंथातील शेवटचा परिच्छेद उद्धृत करून त्यांचे हे अल्प चरित्र पूर्ण करतो. यांत व्यक्ति, समाज, राष्ट्र, मानवता. या सर्व दृष्टोनी साक्षात्काराच्या परिणामांचा सूत्ररूपाने उल्लेख असलेला दिसून येईल. गुरुदेवांचे जीवन व तत्वज्ञान यांच्या दृष्टीनेहि तो अर्थपूर्ण, चिंतनीय, उद्बोधक वाटेल, अशी आशा आहे.

**The ideal of the philospher-king : Svarajyam, Vairajyam.**

The released soul becomes an overlord. Merely by willing it he can get any desire fulfilled (IV. 4-8). All his forefathers are elevated to divinity by his mere power of will. Badarayana holds the ideal of the Philosopher-king and in a much more intensified form than Plato. Plato had held that, "Until philosophers are kings .... and political greatness and wisdom meet in one ..... cities will never have rest from their evils, no, nor the human race ... and then only will this our state have a possibility of life and behold the light of the day" If Plato's ideal of philosopher-kings, ever comes true, there would be the contingency of

many philosopher-kings, each ruling his own Republic. Such a multiplicity of philosopher-kings might not lead to concord and harmony. Moreover it would be well-nigh impossible to determine the **primus inter pares** ' in this multiude who may establish harmony. But the ideal of Badarayana, the overlord of all suffers on ccmpeer ( Ananyadhipatih ) and has omniscience, omnipotence and bliss He is the one sovereign (Ekarat), the Vedic Hymn proclaims who has the sway over all that exists and down to eternity. It is he who enjoys real Svarajya—the Atmanic imperishable bliss–as the saint cf Nimbargi used to say. Thus, far from being poli-centric or even cosmo-centric the ideal visualised by the ancient Rsis at the dawn of human history is the kingdom—immortal (Amrtam Purim ) which transcends the limits of here and now. The modern frantic cries for a League of Nations or United Nations all aiming at universal brotherhood are but distant re-echoes of the encompassing oneness of all, tuned in the Vedic sing-song praising the glories of Theopolity of the philosopher-saint-the very ectype of God.

( Vedanta ; The Culmination of Indian thought P. 177 )

भावार्थ :–

तत्त्वज्ञ–राजा हे ध्येय :
स्वाराज्यम्, वैराज्यम्

मुक्त साक्षात्कारी पुरुष सम्राट होतो. केवळ इच्छामात्रे तो कोणतीहि इच्छा पूर्ण करून घेऊं शकतो. त्याच्या केवळ इच्छाशक्तीने त्याचे सर्व पूर्वज देवपदाला पोहोंचतात, तत्त्वज्ञ–राजा

हे ध्येय बादरायणानेहि मानले आहे. पण प्लेटोपेक्षां त्याच्या ध्येयाचे स्वरूप फार उत्कट, भव्य आहे. प्लेटोचे म्हणणे असे की, "जोपर्यंत तत्त्वज्ञ राज्यपदाचे अधिकारी होत नाहीत ...... आणि राजकीय प्रभुत्व व दूरदर्शी विवेक एकत्र येत नाहीत ...... तोपर्यंत नगरराज्यांची दुःखे-संकटे दूर होऊन त्यांना शांति मिळणार नाही; इतकेच नव्हे तर मानवतेला शांति मिळणार नाही; तत्त्वज्ञ राजे झाले तर आणि तरच आपल्या राज्याला खरे जीवन आणि प्रकाश मिळण्याची शक्यता आहे." प्लेटोचे हे तत्त्वज्ञ-राजाचे ध्येय कधी काळी सत्यसृष्टींत साकार झालेच तरी, आपापल्या राज्याचे शासन करणारे अनेक तत्त्वज्ञ-राजे निर्माण होण्याचीं शक्यता आहेच. असे अनेक तत्त्वज्ञ-राजे झाल्यावर सुसंवाद व सहजीवन नांदू शकेलच असे नाही. त्याचप्रमाणे या अनेक समान-अधिकारी राजांमधून, सुसंवाद व शांति स्थापूं शकेल असा प्रमुख म्हणून एखाद्याला निवडणे अशक्यप्राय होईल, परंतु बादरायणाचा आदर्शभूत तत्त्वज्ञ-राजा सम्राट आहे; (अनन्याधिपती) त्याच्याबरोबरीचा दुसरा नाहींच, तसाच तो सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् व आनंदस्वरूप आहे. वेदांतील मंत्रांत सांगितल्याप्रमाणे तो एकराट् आहे; जे कांही आहे. त्या सर्वांवर त्याची सदा, अनंतकाल सत्ता आहे. तोच खरे स्वराज्य-निंबर्गी महाराज म्हणत असत त्याप्रमाणे आत्मदर्शनाचा परमानंद-भोगतो. याप्रमाणे, मानवी इतिहासाच्या बाल्यावस्थेच्या कालांतच सनातन ऋषींच्या प्रज्ञेपुढे साकार झालेले ध्येय केवळ नगर-राज्य-केंद्रित किंवा विश्व-केंद्रितहि नव्हते; स्थल-कालांच्या अतीत असे अमर-राज्य (अमृतपुर) हे ते ध्येय होते. ईश्वरांची प्रत्यक्ष प्रतिमाच अशा तत्त्वज्ञसंताच्या ईश्वरसत्ताक राज्याचे वैभव वर्णितांना वैदिकसूक्तांने अनेक समावेशक एकतेचे गुणगान केले आहे. विश्वबंधुत्व साधण्याच्या हेतूने आधुनिक कालांत लीग ऑफ नेशन्स किंवा यूनो यांच्या नांवानें जे गदारोळ चालले आहेत ते म्हणजे वरील सर्वसमावेशक एकतेचे फार दुरून ऐकू येणारे मंद, अस्पष्ट असे, पडसाद आहेत.

# भाग पहिला

# साक्षात्काराचे तत्वज्ञान

## प्रकरण १ ले : विषयप्रवेश

१) **साक्षात्कार व समाज** – " जेथे जेथे व जेव्हां जेव्हां ईश्वराचा संदेश प्रसृत करणे शक्य आहे, तेथे तेथे व तेव्हां तेव्हां तो प्रसृत करण, हेच अशा साक्षात्कारी पुरुषाचे कर्तव्य उरते व ठरते. एक ईश्वर, एक विश्व, एक मानवता, हा त्याच्या आचाराचा आधारभूत सिद्धांत असावा. ईश्वराधिष्ठित विश्वबंधुत्व हेच त्याचे ब्रीदवाक्य असले पाहिजे. ईश्वर एकच आहे, तो सर्वत्र भरलेला आहे. हा साक्षात्कार ज्याला झाला आहे, तो पुरुष, ईश्वराच्या ऐश्वर्याच्या जगाला ज्ञान द्यावे, इतकेच नव्हे तर ईश्वराच्या ऐश्वर्याची जगाला प्राप्ती व्हावी, या एकाच कार्याला आपल्याला वाहून घेतल्याशिवाय राहणार नाही. * " सर्व साक्षात्कारी मंताविषयी लिहिलेल्या या शब्दांत गुरुदेव रानडे यांचेहि यथार्थ दर्शन होते. त्यांच्या जीवनाचा व तत्त्वज्ञानाचा परामर्श या विचारांच्या पार्श्वभूमीवर घ्यावयाचा आहे. स्वत: उच्च साक्षात्कार लाभल्यावर, स्वानुभवाने सत्य ठरलेले सिद्धांत, त्यांनी जगाच्या परमहितासाठी तत्त्वज्ञानाच्या रूपाने मांडले, हे त्यांच्या ग्रंथाचे वैशिष्ठ्य आहे. " सेवितों हा रस वांटितो आणिकां, " " आधी केले, मग सांगितले, " हा सताचा बाणा त्यांना पाळला. गुरूदेव रानडे यांनी साक्षात्कारशास्त्राविषयीं स्वत:ची मते आपल्या ग्रंथात स्वतंत्रपणे मांडलेली नाहीत. उपनिषदे, मराठी–हिंदी–कन्नड संतकवी, भगवद्‌गीता व वेदान्तसूत्रे यांचे स्पष्टीकरण करताना त्यांनी आपले सिद्धांत मांडले

---

*भ. गी. १६६;

आहेत. तरी यांत त्यांची स्वतःची मते निश्चित शोधून काढता येतात. ते आपल्या "उपनिषद्रहस्य" या ग्रंथांत लिहितात, "या ग्रंथात स्वतःची तत्त्वज्ञानविषयक मते मी बुद्धिपुरस्पर कोठेच मांडलेली नाहीत, तरी या ग्रंथांतील तत्त्व-प्रणालीचा नीट अभ्यास करणाऱ्याला माझी मते काय आहेत ते कळून येईल; परतत्त्वज्ञानांतील स्वतःची मते वनविण्यासाठी मी हा ग्रंथ लिहिला आहे, हे सहज दिसेल. †" तरीहि, त्यांची मतें शोधणे साधारण कठीणच पडते. म्हणून आपल्या ग्रंथांत आपले साक्षात्कारशास्त्रांतील अनुभवाधिष्ठित सिद्धांत त्यानी मांडले आहेत, हे सुरुवातीलाच मी मुद्दाम सांगत आहे. वाचकांनींहि हे नीट ध्यानीं घ्यावे.

२) **गुरुदेव रानडे यांच्या ग्रंथांतील कांही महत्वाचे सिद्धांत :-** वर उध्दृत केलेल्या वचनांत गुरुदेवांचे अनेक सिद्धांत सूचित केलेले दिसतात. १) ईश्वरसाक्षात्कार करून घेणे यांत मानवाचे परमहित, जीवनसाफल्य आहे; म्हणून हेच मानवाचे ध्येय आहे. २) हे जीवनसाफल्य प्राप्त करून घ्या, हा तत्त्वज्ञानाचा, साक्षात्कार-शास्त्राचा खरा आदेश आहे. केवळ बौद्धिक आनंदासाठी तत्त्वज्ञान लिहावयाचे किंवा वाचावयाचे ही संतांची भूमिका नाही. ३) ईश्वर-साक्षात्काराचा निश्चित साधनमार्ग आहे; ४) ईश्वराच्या साक्षात्काराने त्यांचे भक्ताला ऐश्वर्य लाभते; ५) साक्षात्कारी संत कर्मयोगी, भक्तियोगी, ज्ञानयोगी अशा कोणत्याही नांवाने ओळखला जावो; तो नेहमी समाजहिताचे कार्य प्रकृतिस्वभावानुरूप करीतच असतो. ते केल्याशिवाय तो राहूंच शकत नाही. असे अनेक महत्वाचे विचार वरील वचनावरून सुचतात. गुरुदेव रानडे यांनी त्यांची सविस्तर चर्चा अनेक ठिकाणी केली आहे. ती आपल्याला अर्थात् यथाक्रम पहावयाची आहेच. येथे त्यांच्या ग्रंथ-लेखनाची पार्श्वभूमि थोड्याफार विस्ताराने सांगावयाची आहे.

---

† उप. प्र. २०-२१

त्यांच्या ग्रंथांतच तिचा शोध घेता येतो. पूर्ण जीवनसाफल्य, अर्थात्, ईश्वरसाक्षात्काराने लाभणारा आत्मानंद, मुक्ति, स्वरूपप्राप्ति–सर्व एकाच अवस्थेची वर्णने आहेत–हे गुरुदेवांचे ध्येय होते. तत्त्वज्ञानात त्यासंबंधी सिद्धांत असले तरच तत्त्वज्ञानाला महत्व व मूल्य आहे, असे त्यांचे मत आहे. " तत्त्वज्ञानांतील सिद्धांतांत जीवनाला दिव्यत्व प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य किती आहे, यावरुन त्यांची सत्यता व जिवतपणा ठरवावयाची असतात. ‡" असे सत्यसिद्धांत साक्षात्कार-शास्त्रच सांगू शकते; म्हणून त्यालाच खरे तत्त्वज्ञान म्हणावयाचे, हेहि त्यांच्या वचनावरून दिसून येईल. " कोणत्याहि तत्त्वज्ञानाची परिणती साक्षात्कारवादांतच झाली पाहिजे; उपनिषदाच्या तत्त्व-ज्ञानाची परिणतीहि साक्षात्कारवादांतच झाली पाहिजे; त्यांतील परतत्त्वज्ञान, मानसशास्त्र, नीतिशास्त्र, हे सर्व विषय म्हणजे साक्षा-त्कारवाद सांगण्यासाठी केलेली पूर्वतयारी आहे.† " साक्षात्कारवाद म्हणजेच तत्त्वज्ञानाचे आचरणांत आणावयाचे अंग होय, म्हणून ज्यांना तत्त्वज्ञान जीवनांत आणावयाचे आहे, त्यांचे समाधान एका साक्षात्कारवादानेच होऊं शकेल. * "

३) **साक्षात्कार म्हणजेच आत्मानंद** :– एकाच अनुभूतीचे दोन भिन्न दृष्टिकोनांतून केलेले हे वर्णन आहे, बुद्धि त्याला ज्ञान किंवा दर्शन म्हणते भावना आनंद म्हणते, हा सिद्धांत सांगून, पुढे अनेक ठिकाणी आत्मानंद हेच ध्येय, यानेच जीवनसाफल्य लाभते, असे विचार गुरुदेव रानडे यांनीं मांडले आहेत. " अनंताचे दर्शन म्हणजे आनंद; इतर सुखे वस्तुतः सुखेच नव्हेत; भूमा ( मोठे अनंत ) आणि अल्प अशी अगदी भिन्न जातीची सुखे आहेत; आत्म्याच्या दर्शन–श्रवण–ध्यानाने होणारे सुख ते भूमा; ते अमर आहे. इतर सर्व, ऐहिक संपत्ति, पत्नि, पुत्र इत्यादीपासून मिळणारे सुख ते अल्प; ते नाशवंत आहे. वर, खाली, मागे, पुढे, सर्वत्र ब्रह्म भरलेले आहे, असा अनुभव आला म्हणजे भूमा ( मोठे ) सुख लाभते.

---

‡ उप. प्र. १४-१५; † उप ६५; * म. सा १

असा पुरुष आत्म्यावरच प्रेम करतो; आत्म्याशीच क्रीडा करतो, आत्मानंद भोगतो, आत्म्याच्या संगतींत सुखाने असतो,* " हेच गुरुदेवांनीं भोगलेले जीवनसाफल्य, हीच मुक्ति. अशा आनंदाने मानवाच्या सर्व शक्तींना पूर्णता येते, पूर्ण समाधान लाभते; म्हणून हेच उच्चतम जीवनमूल्य, हेच मानवाचे ध्येय, हेहि त्यांच्या वरील वचनांत दिसून येते. भारतीय तत्त्वज्ञान निराशावादी आहे, यांत आनंद असलाच तर तो अभावात्मक आहे, या कांहीं पाश्चात्य पंडितांच्या आक्षेपाला उत्तर देताना गुरुदेव रानडे म्हणतात, " अभावात्मक आनंद ही कल्पनाच तर्कदुष्ट आहे. आत्मानंद हा मानवमात्रात एकाच स्वरूपाचा आहे. ईश्वराने एकाच प्रकारच्या बुद्धि. भावना व क्रियाशक्ति अशा शक्ती मनुष्याला दिल्या आहेत. त्यांना पूर्णता आणणारा मानवाला दिलेला आत्मानंदहि एकाच स्वरुपाचा आहे.‡ " आत्मसाक्षात्कार, अर्थात् आत्मानंद, हाच मानवाला जीवनसाफल्य देतो, हेच मनुष्यमात्राचे ध्येय, उच्चतम मूल्य आहे, हे गुरुदेव रानडे यांनीं स्वानुभवावरून जाणले आणि हे ज्ञान जगाच्या कल्याणास्तव त्याला देण्यासाठी ग्रंथ लिहिले, तत्त्वज्ञानाचा प्रपंच केला. स्वानुभव हा त्यांच्या साक्षात्कारशास्त्राचा पाया, हे वरील विवेचनावरून बरेच स्पष्ट होईल. ग्रंथवाचनाने व तत्त्वचिंतनाने त्यांची साक्षात्काराच्या सिद्धांतावर श्रद्धा बसली असे नाही; स्वानुभवाने त्यांची सत्यता पटली. नंतरच त्या सिद्धांतांची तर्काधिष्ठित मांडणी करण्यासाठी त्यांनीं तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला व आपले साक्षात्कारशास्त्र मांडले. " साक्षात्कारशास्त्रावरील माझ्या श्रद्धेचा तर्काच्या दृष्टीने पाया काय आहे, हे शोधण्यासाठी मी तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला, ( I studied Philosophy to find the rational foundation of my faith )." या आपल्या वचनाचे स्पष्टीकरण करताना गुरुदेव रानडे म्हणाले, " परमार्थावरील माझ्या श्रद्धेचा आधार माझा आत्मानुभव हा होता, त्याला तर्काची जरूर नव्हती, पण साक्षात्काराचे तत्त्वज्ञान आधुनिक

* उप. ३०४–३०५; ‡ उप. प्र. १२–१३;

जगाला पटावे व उपयोगी पडावे, यासाठी ही श्रद्धा आधुनिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेहि तर्कशुद्ध आहे, हे दाखविणे अवश्य आहे ". प्रातिभ अनुभव ( Intuitive Experience ) हे सत्याचे उच्चतम प्रमाण आहे. त्याने जाणलेल्या सत्याला तर्काची मान्यता असलीच पाहिजे. तत्त्वज्ञानाच्या परिभाषेंत कशी मांडावयाची येवढाच विचार करावयाचा असतो.

" आपल्या बुद्धीला जे पटले, जे जाणवले, ज्याचा आपल्याला साक्षात्कार झाला आहे म्हणजे ज्याचा अनुभव आला आहे, तेवढेच आपले तत्त्वज्ञान असावे,† " हे आपले मत गुरुदेव रानडे नेहमी बोलतांनाहि सांगत असत. हा आपला दंडक त्यांनीं आपले ग्रथ लिहिताना तंतोतंत पाळला. म्हणून केवळ एका सिद्धहस्त विद्वानाने, गाढ अभ्यास, सखोल चिंतन, सूक्ष्म चिकित्सक बुद्धि आणि प्रभावी, सुंदर भाषा या गुणसंपदेच्या बळावर लिहिलेले ग्रंथ, येवढ्याच दृष्टीने त्यांच्याकडे पाहूं नये; तर या सर्व गुणसंपदेवर आत्मसाक्षात्काराचा तेजस्वी मुकुट चढलेल्या संत-तत्त्वज्ञाने, जीवनसाफल्यासाठी, जगाला साक्षात्कार हे ध्येय व त्याच्या प्राप्तीचा मार्ग सांगण्यासाठी, लिहिलेले, ज्ञानेश्वरी-दासबोधासारखे प्रासादिक ग्रंथ म्हणून त्यांचा अभ्यास करावा. यांत वाचकांचे खरे हित आहे. अर्थात्, ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे, अधिकारीच त्यांच्या अंतरंगाचे सेवन करतील, पण " लोकूहि वाक्चातुर्ये होईल सुखिया, " कारण वाक्चातुर्याचे वैभवहि त्या ग्रंथांत आहेच. गुरुदेव रानडे यांच्या ग्रंथाशी त्यांच्या जीवनाचा किती निकट, जिव्हाळ्याचा संबंध आहे, हे येथपर्यंत पाहिल्यावर, आतां त्यांच्या सर्व ग्रंथांसंबधीं कांही सामान्य मुद्यांची चर्चा करावयाची आहे. ग्रंथलेखनाचा हेतु, त्यांतील केंद्रीय सिद्धांत, मुख्य शिकवण व तर्कप्रणाली, ग्रंथांचे स्वरुप इत्यादि विषयांचा परामर्श घ्यावयाचा, आहे. त्यांतील कांहींचा निर्देश वर आलाच आहे. त्यांचा विस्तार

---

† भ. गी. १९८

गुरुदेव रानडे यांच्या शब्दांत करावयाचा आहे. त्यांनी आपल्या पहिल्याच ' उपनिषदरहस्य ' या ग्रंथांत त्यांचे स्पष्टीकरण केले आहे.

४) **गुरुदेवांचा ग्रंथलेखनाचा हेतू** :- ईश्वरसाक्षात्काराने मानव पूर्णतेला पोहोंचतो, ईश्वरच होतो, हेच त्याचे एकमेव कर्तव्य आहे. हा सिद्धांत तर्कशुद्ध पद्धतीने पटवून देणे, त्यांत तर्कविरोधी असे कांहीहि नाही हे दाखविणे व ईश्वर प्राप्तीचा मार्ग सांगणे हा गुरुदेव रानडे यांचा ग्रंथ लेखनाचा हेतु आहे. " मानवी जीवनाचे ध्येय (ईश्वरप्राप्ति) व ते साध्य करण्याचे साधन, ही प्राचीन कालापासून आहेत तीच आहेत; ईश्वरविषयक प्रश्न हाच सर्वांत महत्वाचा प्रश्न आहे. म्हणून, पारमार्थिक जीवन हेच उच्चतम जीवन होय; हा सिद्धांत तत्त्वज्ञानाला व तर्काला मान्य आहे. हे आजही दाखविणे अवश्य आहे †" " उपनिषदांतील तत्त्वज्ञान हेच सत्यार्थाने धार्मिक तत्त्वज्ञान आहे. त्या तत्त्वज्ञानावरील आपली श्रद्धा आधुनिक तत्त्वज्ञानाचे दृष्टीने तर्कमान्य, बुद्धिनिष्ठ आहे, हे दाखविणे आधुनिक भारताचे कर्तव्य आहे.*" " बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवाद हे आज परस्परविरोधी शब्द मानले जातात; परतु हा सर्वमान्य सिद्धांत झाला पाहिजे. माझ्या या ग्रंथाने या कार्याला थोडे जरी साह्य झाले तरी आपल्या श्रमाचे सार्थक झाले असे मला वाटेल.‡"

५) **ग्रंथांतील मुख्य शिकवण-साक्षात्कारवाद हा केंद्रीय सिद्धांत** :- उपनिषदावरील ग्रंथासंबंधी गुरुदेव रानडे यांचे विचार वर उद्धृत केले आहेत, ते त्यांच्या सर्व ग्रंथांना लावता येण्यासारखेच आहेत. सर्वांचा हेतु, मुख्य शिकवण व केंद्रीय सिद्धांत सारखेच आहेत. हेच विचार अर्थात् त्यांच्या स्वतःच्या तत्त्वज्ञालाहि लागू आहेत. त्यांतील मुख्य सारभूत शिकवण ही कीं, " विश्वाच्या उत्पत्ति-स्थिति-लयाचे एकमेव अविनाशी कारण, सर्वांचा स्वामी, सच्चिदानंद, अनंत, अव्यय इत्यादि अनेक गुणांनी धर्मशास्त्रांत व

* उप. प्र. १७ † उप. प्र. ४ ‡ उप. प्र. १५

तत्त्वज्ञानांत ज्याचे वर्णन केले आहे, तो ईश्वर, ब्रह्म, आत्मा (सर्व शद्व सामान्यतः समानार्थी आहेत) म्हणजे केवळ कल्पना नव्हे; तो प्रत्यक्ष आहे. विशिष्ट साधन करून त्याचा प्रत्यक्ष अनुभव येऊं शकतो; त्या अनुभवाने मनुष्याला परमानंद होतो, अमरत्व लाभते, तो ईश्वरच, ब्रह्मच होतो; अर्थात् त्याचे जीवन कृतार्थ होते." हाच साक्षात्कारवादाचा केंद्रीय सिद्धांत; त्याच्या अनुषंगाने विश्व व जीव यांचाहि विचार करावा लागतो; ब्रह्मांशिवाय इतर सर्व कांहीं माया, नामरूपें, अशाश्वत आहे, हेहि दाखवावे लागते. या सर्व सिद्धांतांचा विस्तारशः विचार पुढील अनेक प्रकरणांत करावयाचा आहे. यावरून साक्षात्कारवाद हाच गुरुदेवांच्या तत्त्वज्ञानांतील केंद्रीय सिद्धांत आहे, हे स्पष्ट दिसतेच. "जीवनाला दिव्यता प्राप्त करून देण्याला उपयुक्त असे सिद्धांतच सत्य," हे त्यांचे मत वर आलेच आहे. साक्षात्कारवादच हे करूं शकतो; म्हणून तोच गुरूदेवांच्या तत्त्वज्ञानांतील मुख्य सिद्धांत. त्यांच्या ग्रंथांतील इतर सर्व विवेचन, उपनिषदाप्रमाणेच, हा मुख्य सिद्धांत सांगण्यासाठी केलेली पूर्व तयारी आहे. त्यांच्या ग्रंथांतील साधनमार्ग हाहि अत्यंत महत्वाचा भाग आहे.

६) **ईश्वर साक्षात्काराने जीवनसाफल्य** :— साक्षात्काराने साधक ब्रह्मच होतो, नित्यानंदपदाला पोहोंचतो, असे म्हटल्यावर जीवनसाफल्याविषयी अधिक कांहीं सांगण्याचे कारणच नाही. परंतु, या अवस्थेचा ज्यांना अनुभव नाही, त्यांना त्यांच्या परिभाषेंत जीवनमूल्यांचा विचार सांगणे अवश्य आहे; तरच त्यांना पटेल व आकर्षक वाटेल. म्हणून तत्त्वज्ञानांत त्यांना जीवनमूल्यें मानतात, त्या सर्वांची प्राप्ति आणि त्यापेक्षाहि आणखी कितीतरी उच्च जीवन साक्षात्काराने लाभते, हे गुरुदेवांनीं दाखविले आहे. सत्यं-शिवं-सुंदरं (ज्ञान-नीती-कलानंद) सुखप्राप्ति, विश्वबंधुत्व, मानवाची सेवा, इत्यादी जीवनमूल्ये आधुनिक तत्त्वज्ञान मानते. गुरुदेव रानडे यांनीं त्यांचा नामनिर्देश करून त्यांतील प्रत्येक व ही सर्व साक्षात्काराने

लाभतात असे स्वतंत्रपणे एका विशिष्ट ठिकाणी लिहिलेले नाही. परंतु "साक्षात्काराचे पारणाम" वर्णिताना त्यांत व इतर कांहीं ठिकाणीही साक्षात्कारी पुरुषांना ही सर्व जीवनमूल्ये लाभली असल्याचे दाखविले आहे. त्या त्या प्रकरणांत या विषयाचा विचार होईलच, पण येथे त्यांचे थोडे दिग्दर्शन करणे इष्ट वाटते. उपनिषदांत साक्षात्कारी पुरुषाची पुढील लक्षणे सांगितली आहेत, "शरीराला संतप्त करणाऱ्या प्रक्षोभाचा नाश, संशय, वासना, कर्म यांचा नाश, परमानंद; सर्व कामनांचा परिहार; आत्मानंदाने निर्भयता; पूर्ण स्वातंत्र्य; आत्म्याकडून पाहिजे त्या गोष्टींची प्राप्ति, *" अशा पुरुषाची लक्षणे भगवद्गीतेंतहि आली आहेत; "आनंद व शांति; विषयांचा पूर्ण निर्वेद; पापनाश; संकटांचा नाश; विश्वाचे कोडे उलगडणे‡" या लक्षणांत सत्यं–शिव– सुंदरं यांचे एकत्र उच्चतम दर्शन होते; त्यापेक्षा अधिकही कांहीं दिसते.

संशयाचा नाश व विश्वाचे कोडे उलगडणे हे 'सत्य' (ज्ञान), पापनाश कामनानाश हे 'शिव' (नीति); कलानंद ज्याच्या पासंगालाहि पुरणार नाही असा आत्मानंद हे सुंदर'. आत्मानंद म्हणजे शिवहि आहे, हे मागे पाहिलच आहे. विश्वबंधुत्व व समाज-सेवा हे दोन्ही सद्गुण संतश्रेष्ठाच्या अंगी किती उत्कटतेने असतात हे कळण्याला या प्रकरणाच्या सुरुवातीला दिलेला उतारा पुरेसा होईल. गुरुदेव रानडे स्पष्ट सांगतात, "देवाचे राज्य किंवा रामपूर (Kingdom of God Theopolis) हे सर्व धर्मांचे व संतांचे ध्येय आहे. त्यांचा आदर्श समाज ईश्वराधिष्ठित आहे. ईश्वराची भक्ति हे एकच ध्येय मानून, त्याचा भक्तींत मग्न झालेला, ईश्वराची आज्ञा शिरीं धरणारा, ईश्वरप्रेमाने परस्पराबद्दल समभाव व बंधुत्व वाटणारा समाज, हा संतांचा आदर्श समाज होय.†" सारांश, एक देव, एक धर्म, तरच एक मानवता; विश्वबंधुत्व निर्माण करण्याला दुसरा

---

* उप ३४७ ते ३५०; ‡ भ. गी. २६५ ते २३८

† क. सा. ३०८–३०९

मार्ग नाही साक्षात्कारी पुरुषाच्या वरील सर्व लक्षणांशी तुलना करता, सत्यं–शिव-सुदरं ही आधुनिक तत्त्वज्ञानांतील मूल्ये सर्व प्रकारे अगदी तोटकी पडतात. त्यांचे स्पष्ट स्वरूपच समजलेले नाही, त्यामुळे एकाचीहि पूर्णत्वाने प्राप्त होण्याची शक्यताच नाही. त्यांच्यात परस्परांत संवाद नाही, सघर्ष आहे, त्यामुळे सर्वांची प्राप्ति अशक्य आहे. त्यांच्या प्राप्तीचा निश्चित मार्गहि माहित नाही. हे सर्व दोष तत्त्वज्ञ प्रांजळपणे मान्य करतात. तरी, त्यामुळे जीवनाची पातळी कांही प्रमाणांत उंचावत चालली आहे, यांत शंका नाही. गुणांच्या भाषेत बोलावयाचे झाले तर रजतमांतून निघून सत्त्वगुणाचा उत्कर्ष करण्याचे कार्य त्यांच्यामुळे घडत आहे. सत्त्वगुण मोचक आहे, परमार्थाला उपकारक आहे. परंतु पूर्णता, जीवनसाफल्य मात्र त्यापासून कधीच मिळणार नाही.

७) **ग्रंथांतील तत्त्वप्रणाली** :– साक्षात्कारवाद तर्कमान्य आहे हे कोणत्या तर्कप्रणालीने सिद्ध करता येईल, याचे गुरुदेव रानडे, यांनीं विवरण केले आहे. त्याच तर्कप्रणालीचा त्यांनीं आपल्या ग्रंथांत अवलंब केला आहे. " सनातन आत्मानुभवाच्या भक्कम पायावर आधारलेले जे तत्त्वज्ञान आपण सांगूं, ते आधुनिक शास्त्रे, तत्त्वज्ञान व धर्म यांच्याशी सुसगत आहे, हे दाखवून त्याचा बुद्धिवादाशी समन्वय केला पाहिजे. म्हणजे शास्त्रे व तत्त्वज्ञान यांची कितीहि प्रगति झाली तरी साक्षात्काराच्या तत्त्वज्ञानाला धक्का लागणार नाही. इतकेच नव्हे तर त्याचा पाया अधिकच दृढ होईल †" हे करणे सहज शक्य आहे. कारण " कोणत्याही शास्त्राला ज्याची शंका घेता येणार नाही, असा (अनेक साक्षात्कारी पुरुषांचा) प्रत्यक्ष, अपरोक्ष, प्रातिभ अनुभवाचा पुरावा त्याला आहे. " मी ज्याचा शोध करीत होतो ते हेच " अशी साक्षात्कारवादाला तत्त्वज्ञान संमति देईल, आणि सर्व धर्मांत व धर्मपंथांत हेच केंद्रिय सत्य अनुस्यूत आहे, त्याकडे धर्म लक्ष देत नाहीत. म्हणून धर्मकलह होतात. † "

---

† उप. प्र. ९

आपल्या सर्व ग्रंथांत गुरुदेव रानडे यांनी हेच सूत्र अवलंबिले आहे. साक्षात्कार किंवा आत्मानुभव याचे स्वरूप, त्याचे साधकाच्या जीवनावर होणारे परिणाम, ते प्राप्त करून घेण्यासाठी प्रतिपादिलेला साधनमार्ग, यासंबंधी उपनिषद्कालीन ऋषि, मराठी–हिंदी–कन्नड संत व गीता या सर्वांनी सांगितलेल्या विचारांत विलक्षण साम्य व एकरुपता आहे, हे आपल्या सर्व ग्रंथांत त्यांनी दाखविले आहे. हाच, सर्व शास्त्रांनी मान्य केलाच पाहिजे असा. साक्षात्कार-वादासंबंधी भक्कम पुरावा होय. या अनुभवांचा परिणाम म्हणजे जीवनाला दिव्यता, पूर्णता, सफलता येणे, याचा थोडा विचार वर झालाच आहे. जीवनाला अशी दिव्यता कशाने येईल याचाच शोध खरे तत्त्वज्ञान करीत असते. म्हणून साक्षात्काराच्या परिणामांचा विचार केल्यावर "हेच मी शोधीत होतो," असे तत्त्वज्ञान सांगेल. या बाबतींत धर्मांची एकवाक्यता दाखविणारे विशेष लेखन गुरुदेव रानडे यांनीं केलेले नाही. कारण त्यासंबंधी विशेष मतभेद नाहीत. मराठी व हिंदी संतवचनांवरील ग्रंथांच्या प्रस्तावनेत भारतीय व ख्रिश्चन संतांच्या व क्वचित् सूफी संतांच्या वचनांचा तौलनिक विचार करून, त्यांतील एकरूपता दाखवली आहे. गुरुदेव रानडे यांनीं स्वतःचे विचार स्वतंत्रपणे न सांगता इतर साक्षात्कारपर ग्रथांचे स्पष्टीकरण करताना ते का मांडले आहेत, याचे एक कारण वरील विवेचनांत दिसते. शास्त्रांना हवा असलेला साक्षात्कारवादाचा अनुभवसिद्ध पुरावा व त्या शास्त्राने जीवनाला दिव्यता लाभते, हा तत्त्वज्ञानाला अवश्य तो पुरावा, गुरुदेवांच्या ग्रंथरचनेंतच सांपडतो, स्वतंत्र सिद्धांत स्वतःचे म्हणून सांगून, त्यासाठी निराळा पुरावा देण्याचे कारण पडत नाही. त्याचप्रमाणे वाचकांसमोर उपनिषद्कालापासून आजपर्यंतच्या अनेक साक्षात्कारी पुरुषांच्या वचनांचा बनलेला साक्षात्काराचा विशाल, परम कल्याणकारी, कल्पवृक्ष, उभा राहतो. ऋषिसंतांची प्रासादिक, अमृतमय वचने वाचनांत येतात. या सर्वांचे वाचकांची श्रद्धा दृढतरतम होण्याला साह्य होते, वेदान्तशास्त्रान्वये, शास्त्र-गुरु-आत्मप्रचीति ऐक्यतेला येण, हा सत्यज्ञानाचा निकष आहे. त्या

निकषावर घांसून गुरुदेव रानडे यांनीं आपला साक्षात्कारवाद (साक्षात्कारशास्त्र) जगाच्या हवाली केला आहे. त्यांनीं आधारभूत म्हणून घेतलेल्या ग्रंथांतून शास्त्रप्रचीति दिसते, त्यांच्या थोर सद्‌गुरूंची प्रचीति त्यांना सुपरिचित होतीच; स्वतःच्या प्रचीतीने दोहोंचे सत्यत्त्व त्यांनीं स्वानुभवाने जाणले. याप्रमाणे तिन्ही प्रचीतीचे ऐक्य करून त्यांनीं ते आपल्या ग्रंथांत मांडले.

८) **आत्मानुभव आणि बौद्धिक ज्ञान :–** ईश्वराचे प्रत्यक्ष, प्रातिभदर्शन, आत्मानंदाची अनुभूति ( दोन्ही एकच ) हे ध्येय गुरुदेव रानडे यांना प्रतिपादावयाचे आहे. त्याला उपयुक्त तेवढेच बौद्धिक ज्ञानाचे महत्व आहे. नुसते बौद्धिक ज्ञान जीवनमूल्याबद्दल कांहींच सांगू शकत नाही. कांटच्या " तर्कबुद्धीची चिकित्सा " या ग्रंथाला उद्देशून गुरुदेव रानडे लिहितात, " कल्याण, मांगल्य, जीवन-मूल्ये इत्यादि गोष्टींचा विचार न करता, केवळ बौद्धिक विचाराच्या आधाराने जीवनाच्या ध्येयाविषयी तत्त्वज्ञान काय सांगू शकणार ? त्यांत केवळ दिङ्मूढ करणारे विरोधाभास आणि सर्वतः असाध्य अशी ध्येये दृष्टीस पडतील.*" " ॠषींची आत्मानुभूति व त्यांचे परिणाम यांचा विचार केला तर, आत्म्याच्या नुसत्या बौद्धिक ज्ञानापेक्षा त्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करणे हे फार श्रेष्ठ होय असे दिसून येईल.† " म्हणून साक्षात्कार हेच एकमेव ध्येय ठरल्यावर, बुद्धि-वादी लोकांच्या बुद्धीचे समाधान होऊन साक्षात्कारवाद सत्य आहे हे त्यांना पटेल, इतके तत्त्वज्ञान, उपनिषदे व भगवद्‌गीता यावरील आपल्या ग्रंथांत, त्यांनीं सांगितले. त्यानंतर, मराठी, हिंदी व कन्नड संतांचा " ईश्वरप्राप्तीचा मार्ग " या ग्रंथांत साधनमार्ग, साक्षात्काराचे मानसशास्त्र – यावर कटाक्षाने भर दिला जावा, हे साहजीकच आहे. साक्षात्कार व त्याचे परिणाम वाचून अंतःकरणांत ईश्वराबद्दल प्रेमभाव व ओढ उत्पन्न होते आणि ही भावनात्मक स्फूर्ती बौद्धिक श्रद्धेपेक्षा अधिक प्रभावी ठरते. " ईश्वराला वाहिलेल्या शुद्ध, निर्मल

---

* उप प्र. ९    † उप. २८७

भावना साक्षात्काराला अत्यंत आवश्यक आहेत; मात्र भावनावर बुद्धीचे नियंत्रण ठेवून त्यांना योग्य वळण दिले पाहिजे,‡ " या गुरुदेव रानडे यांच्या विचारांत बुद्धि व भावना, अर्थात् तत्त्वज्ञान व भक्ति, यांचा संबंध स्पष्ट दिसतो.

प्रस्तुत पुस्तकांतही गुरुदेव रानडे यांच्या तत्त्वज्ञानाचे विवेचन थोडक्यांत म्हणजे पहिल्या तीन प्रकरणांत येईल. पुढील सर्व प्रकरणे साधनमार्ग साक्षात्काराचे प्रकार व स्वरूप आणि त्यांचे परिणाम यांना दिली जातील.

* *

‡ म. सा. प्र. २६

## प्रकरण २ रे : परतत्त्वज्ञान (Metaphysics)

१) **आत्मानंद हेच सर्व दर्शनांचे लक्ष्य** :– आपल्या तत्त्वज्ञानाची मांडणी गुरुदेव रानडे यांनीं आधुनिक तत्त्वज्ञानाच्या पद्धतीने व त्या परिभाषेत केली आहे. तोच क्रम प्रस्तुत पुस्तकांतही ठेवावयाचा आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानांत अनेक विषय आले आहेत. परंतु त्यांतील परतत्त्वज्ञान, नीतिशास्त्र व साक्षात्कारवाद येवढ्यांचे विवेचन प्रस्तुत पुस्तकांत होईल; कारण हे पुस्तक सर्वसाधारण वाचक, जिज्ञासु, मुमुक्षु, साधक यांना गुरुदेव रानडे यांच्या तत्त्वज्ञानाचे सामान्य ज्ञान व्हावे, विशेषत: साधनमार्ग कळून यावा, या हेतूने लिहिले आहे. त्याचा विस्तारहि मर्यादित आहे.

परतत्त्वज्ञानाच्या विवरणाला सुरुवात करण्यापूर्वी, तत्त्वज्ञानाच्या शाखोपशाखांचे लक्ष्य आत्मानंदच आहे, या गुरुदेव रानडे यांच्या विचाराचा थोडा परामर्श घेणे योग्य होईल. तो वाचकांना निश्चित उद्‌बोधक व मनोरंजक वाटेल, अशी आशा आहे. ते म्हणतात :– "आत्मानंदाचे स्वत:चे असे एक तत्त्वज्ञान आहे. आत्मानंदाचा पुढील सहा दृष्टींनी विचार करता येईल; परतत्त्वज्ञान व ज्ञानशास्त्र; मानसशास्त्र व साक्षात्कारवाद; नीतिशास्त्र व जीवनमूल्यशास्त्र. दृष्टीकोन कोणताहि असो, शेवटी साध्य आत्मानंद हेच आहे आणि जगांतील सर्व साक्षात्कारी पुरुषांनीं आत्मानंद हेच साध्य आपल्यापुढे ठेवले आहे†". याची अधिक चर्चा त्यांनीं केलेली नाही. या विषयाचे विस्तृत विवेचन न करता अगदी थोडक्यांत त्याचा स्थूलमानाने आशय देता येईल, अगदी काटेकोर तत्त्वज्ञानाच्या चिकित्सेने नाही. विश्वरूपाने दिसणाऱ्या विश्वांत अविनाशी, अविकारी असे तत्त्व कोणते आहे याचा विचार परतत्त्वज्ञान करते;

---

† क. सा. ५

त्याचे उत्तर "आत्मानंदच ते तत्त्व," हे आहे. मनुष्याला होणाऱ्या ज्ञानांत **सत्यज्ञान** म्हणजे आत्मानंदच, हे ज्ञानशास्त्रासंबंधी म्हणता येईल. आत्मानंद म्हणजेच नीतीचे शिखर, तेच उच्चतम जीवनमूल्य; त्याचेच दुसरे नांव ब्रह्मसाक्षात्कार किंवा स्वरूपसाक्षात्कार; हा नीतिशास्त्र, जीवनमूल्यशास्त्र व साक्षात्कारवाद या दृष्टींनी विचार झाला. शेवटी तर्क (न्याय) शास्त्राला हवे असलेले सत्यतेचे प्रमाण, सत्यता ठरविण्याचे साधन म्हणजे प्रतिभशक्ती, (Intuition), अनुभूति; दुसरे प्रमाण नाही. म्हणून प्रतिभशक्तीने येणारा आत्मानंदाचा अनुभव, आत्मानंद हेच सत्य तर्काला मान्य होईल. यावरून परतत्त्वज्ञान, नीतिशास्त्र व साक्षात्कारवाद यांच्या विचारांत इतर शास्त्रांचाही अवश्य तो विचार येतो, हे दिसून येईल. ब्रह्म व आत्मानंद एकच हे पुन्हा सांगण्याचे कारण नाही ही अनुभूति म्हणजेच जीवाची मुक्ति, उच्चतम अवस्था, अर्थात् त्याचे मूळचे ब्रह्मत्व. हा मानसशास्त्राच्या दृष्टीने आत्मानंदाचा विचार म्हणता येईल. साक्षात्कारशास्त्रांत मानसशास्त्राचा विचार जीवात्म्याच्या संबंधांत, "मुक्तीचे स्वरूप काय या चर्चेत, मुख्यतः येतो. "सच्चिदानंद" किंवा "आनंद" हेच ब्रह्माचे स्वरूप आहे. या सिद्धांतांत वरील सर्व विचार अंतर्भूत आहेत. कारण ब्रह्मच सत्यतत्त्व, 'तेच सत्यज्ञान; परमोच्च आनंद; उच्चतम जीवनमूल्य; जीवाचे मूळ स्वरूप; आणि "अनुभूति", स्वसंवित् हेच त्याच्या ज्ञानाच्या सत्यतेचे प्रमाण; अर्थात् "आत्मानंद" स्वयंप्रमाण आहे, जेथे द्वैत संपते, तेथं दुसरे प्रमाण कोठून येणार ?

२) **तत्त्वज्ञानाच्या विचारांतील क्रम परतत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, साक्षात्कारवाद :–** हा क्रम कसा तर्कशुद्ध आहे हे गुरुदेव रानडे यांच्या एका वचनांत सहज दिसून येते. उपनिषदांतील ऋषि परतत्त्वज्ञानाकडून, नीतिशास्त्रामधून साक्षात्कारवादाकडे कसे वळले, हे सांगताना ते लिहितात, "विश्वाच्या मुळाशी असलेले परतत्त्व, म्हणजे आत्मा हे काय आहे ? त्याच्या स्वरूपाची बुद्धीने काय कल्पना करता

येईल ? या प्रश्नाचे उत्तर शोधतांना परतत्त्वज्ञानाचा मूळ सिद्धांत त्यांच्या हातीं आला. हा प्रश्न कांहीं प्रमाणांत बुद्धीने सोडविल्या-नंतर, आत्म्याची प्राप्ति, त्याचा साक्षात्कार कसा होणार, त्याच्या साक्षात्कारासाठी कोणाचा आचारधर्म पाळला पाहिजे, या प्रश्नाचा विचार करताना ते नीतिशास्त्राकडे वळले. शेवटी नीतीला पूर्णता साक्षात्कारानेच येऊं शकते, अशा विचाराने त्यांनीं साक्षात्कारमार्ग धरला. याप्रमाणे तत्त्वज्ञानाची परिणति साक्षात्कारवादांतच झाली पाहिजे.* " असो. आतां परतत्त्वज्ञान या मुख्य विचाराकडे वळूं

३) **समन्वयाचा दृष्टिकोन :–** दृश्य विश्वाच्यामागे, त्याचे आदिकारण असे, अविकारी, अविनाशी, परमसत्य तत्त्व काय आहे, त्याचा शोध करणारे शास्त्र म्हणजे परतत्त्वज्ञान. त्यांत दृश्य जग द्रष्टा आत्मा व ईश्वर या तीन गोष्टींचा विचार येतो. वेदांतांत यासंबंधी द्वैत, अद्वैत इत्यादी अनेक मते आहेत; तशीच आधुनिक पाश्चात्य तत्त्वज्ञानांतहि आहेत. गुरुदेव रानडे यांचा त्या मतांकडे पाहण्याचा समन्वयाचा दृष्टिकोन आहे; म्हणजे "कोणतेही मत अगदीं असत्य म्हणून टाकावयाचे नाही; उच्चतम सिद्धांताशी त्याचा समन्वय करून त्याला योग्य स्थान द्यावयाचे, † " असा आहे. वेदांतातील भिन्नभिन्न मतांचा असा समन्वय त्यांनीं केला आहे, हे या प्रकरणाचे शेवटी दिसेल.

४) **परतत्त्वज्ञानांतील मुख्य विषय :–** " ईश्वराचे स्वरूप व त्याची लक्षणे कोणती ? तो ब्रह्माहून निराळा, त्यांत अंतर्भूत, कां ईश्वर व ब्रह्म यांत अभेद आहे, अर्थात् धर्मशास्त्रांतील ईश्वर व तत्त्वज्ञानांतील ब्रह्म किंवा आदितत्त्व, दोन्हीहि एकच, अभिन्न आहेत कां ? जीवात्मा व परमात्मा यांचा संबंध कोणत्या प्रकारचा आहे ? दृश्य विश्व सत् की असत्, सत्य का भ्रम ? ब्रह्म

---

* उप. ६४–६५. † उप. २७६

सर्वाव्यापी कां सर्वातीत ? ते सगुण की निर्गुण किंवा दोन्ही ? अमरत्व किंवा मुक्ति म्हणजे काय ?† इत्यादि प्रश्नांचा विचार परतत्त्वज्ञानांत होतो. या प्रश्नावरून वेदांतांत व पाश्चात्य तत्त्वज्ञानांत अनेक सांप्रदाय व मतमतांतरे निर्माण झाली आहेत. गुरुदेव रानडे यांनीं आपल्या ग्रंथांत त्या सर्वांची चर्चा करताना स्वतःचे त्यासंबंधी सिद्धांत मांडले आहेत. तेवढ्यांचाच आपल्याला विचार करावयाचा आहे.

५) **उपनिषदांचे आत्मकेंद्रित परतत्त्वज्ञान :** – आत्मा हेच परमसत्यतत्त्व हा उपनिषदांचा सिद्धांत गुरुदेवांना संमत आहे. त्याची लक्षणेहि त्यांनीं उपनिषदांच्या शद्बांत दिली आहेत. "आत्मा हेच परमसत्यतत्त्व हा उपनिषदांचा सिद्धांत आहे; त्याच्या तुलनेने ईश्वर व विश्वहि कमी सत्य होत; असे प्रतिपादून शेवटी ईश्वर व आत्मा यांचे तादात्म्य त्यांनीं दाखविले आहे. § " "आत्म्यापेक्षा निराळे किंवा त्याच्यावाहेर कांही नाही; त्याच्या एका अंशाचे ज्ञान म्हणजे सर्व आत्म्याचें ज्ञान होय. तोच विश्वाचे कारण आहे. * " चराचरांत एकच आत्मतत्त्व आहे, अन्नमयादि कोष ही त्याची आवरणे आहेत; आपल्यामधील आत्मतत्त्व म्हणजेच परमसत्यतत्त्व. ‡ " देहांतून बाहेर पडून तेजोमय बनून, साधकाच्या स्वरूपांत त्याच्यापुढे उभा राहतो तो आत्मा, तेच ब्रह्म; स्वसंवित् हेच सत्यतत्त्वाचे स्वरूप होय. जे स्वतःला पाहते व ओळखते ते परतत्त्व, स्वसंवेद्य, आत्मसाक्षी, आनंदमय, अशा समाधीमध्ये साधक या परतत्त्वाला पोहोंचतो ‡ " "प्रतीक किंवा मूर्ति ही सत्यतत्त्व नव्हते, विश्वाचे व मनाचे नियमन करणारा स्वामी अंतरीच आहे; आत्मा म्हणजेच तो स्वामी. £ " याप्रमाणे "स्वसंविद्रूप आत्म्याच्या भक्कम पायावर उपनिषदांनीं आपले परतत्त्वज्ञान उभारले आहे. स्वसंवित् हेच परमसत्यतत्त्व. स्वसंवित् व ईश्वर, तसेच स्वसंवित् व

† उप. २०६ § उप. २४८; * उप २१८;
‡ उप २६४. ‡ उप. २६८; £ उप. ४;

विश्व यांत तादात्म्य नसेल तर तो ईश्वरच नव्हे, ते विश्वच नव्हे. जे पूर्णतः स्वसंवेद्य नाही ते सत्यतत्त्वच नाही. स्वसंवित् हीच पारमार्थिक सत्ता होय + " " मानवाच्या अंतःकरणात असलेले सारभूत आत्मतत्त्वच निसर्गात भरलेले आहे हे समजल्यावरच सर्व विश्वांत ऐक्य होते.* " भेद उरत नाही, विश्वांतील ईश्वर व अंतरी असलेला आत्मा यांचे तादात्म्य सिद्ध झाले, म्हणजे परमसत्यतत्त्व सांपडले. तोच सर्व विश्वांत भरलेला आहे; † " व त्याच्या अतीतही आहे; एका अंशाने त्याने विश्व व्यापले आहे; उरलेला विश्वातीत आहे, ( भगवद्गीता १०–४२ ). अशा केवलाद्वैताच्या सिद्धांताला हे तत्त्वज्ञान पोहोंचते. " देह पडल्यावरहि मागे राहणारा शाश्वत आत्माच खरा देव असून तो निर्विकारी आहे. इतर सर्व, मूर्ति, अवतार हेहि विकारी नश्वर आहेत.‡ "

६) **ईश्वर जीव व विश्व :–** एक आत्माच सत्य, तर प्रत्यक्ष दिसणारे विश्व व जीव आणि त्यांचा निर्माता ईश्वर यांची व्यवस्था कशी लावावयाची ? शांकरवेदान्ताच्या मायावादाच्या पार्श्वभूमीवर या प्रश्नाचा विचार करावयाचा आहे. प्रातिभासिक सत्ता (रज्जु–सर्पाप्रमाणे भासणे यासारखा भ्रम), स्वाप्निक सत्ता, व्यावहारिक सत्ता (जागृतावस्थेतील अनुभव) व पारमार्थिक सत्ता (आत्म्याला आत्म्याने पाहणे) अशा मानवी अनुभवाच्या सत्याच्या चढत्या चार पायऱ्या त्यांनीं दाखविल्या आहेत; हा क्रम सहज समजण्यासारखा आहे; पारमार्थिक सत्य हे उच्चतम सत्य. हा क्रम उलट करून त्यांना असत्याच्या पायऱ्या म्हणता येतील, कारण सत्य एकच असते. सर्व आपापल्यापरीने सत्यच आहेत, पण त्यांत चढत्या पायऱ्या आहेत. जग माया आहे, याचा अर्थ ते वंध्यापुत्राप्रमाणे "नाही" असे नाही. ते क्षणभंगुर आहे. गुरुदेव रानडे लिहितात, "गीता जगाला व्यक्त-मध्य

---

+ उप. २७०; * उप. २५७

† उप. २६२–६३ ‡ उप ३८०–३८१;

म्हणते, त्याच्यामागे अव्यक्त, अनंत पुढे अव्यक्त, अनंत आहे. या भूतभविष्यकालाच्यामध्ये असलेल्या वर्तमानकालाशीच त्याचा संबंध आहे. मग त्याला सत्य म्हणा वा असत्य म्हणा." कोणत्याहि तत्त्वज्ञानांत सत्याच्या पायऱ्या मानाव्याच लागतात. प्लेटो, प्लॉटिनस, हेगेल, ब्रॅडले या सर्वांनीं हे मान्य केले आहे. आभास, माया, क्षणभंगुरत्व या सिद्धांतांत एक मोठे नैतिक तत्त्व सामावलेले आहे, हे मायावादावर टीका करणारे विसरतात.+ जीवनमूल्याच्या दृष्टीने विचार केला तर क्षणभंगुर वस्तु तिच्या विनाशित्वामुळेच निरुपयोगी ठरते, हेच ते नैतिक तत्त्व. मनुष्याला अमरत्व, नित्यानंद हवा आहे. क्षणभंगुर जगापासून तो कसा मिळणार ? जगाच्या उत्पत्तीसंबंधी चिद्विलासवादाचा-ब्रह्मच जगद्रूपाने प्रकाशले आहे हा-विचार करतांना गुरुदेव रानडे यांनीं हेच सूचित केले आहे. सत्य-असत्य याचा विचार जीवनमूल्याच्या दृष्टीने करावयाचा आहे, केवळ तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने नव्हे. परतत्त्वाच्या दृष्टीने जग सत्य असले तरी नैतिक व आध्यात्मिक दृष्टीने ते असत्य आहे.§ अर्थात् केवळ नामरूपात्मक जगत् नैतिक व आध्यात्मिक कृतार्थता देऊं शकणार नाही. त्यासाठी त्याच्यामागे असलेल्या ब्रह्माचे अपरोक्ष ज्ञान झाले पाहिजे मृगजळ कांहीं तरी आहे यांत शंका नाही, पण ते जळ नव्हे, त्याने तहान भागणार नाही.

७) **व्यावहारिक सत्ता** :- आपण ज्यांत राहतो ते जग म्हणजे व्यावहारिक सत्ता. पारमार्थिक सत्तेच्या तुलनेने ती कमी सत्य असली, तरी साधकाच्या दृष्टीने तिचे सापेक्ष सत्यत्त्व मानलेच पाहिजे आत्मा, ईश्वर, जग या गोष्टी आपापल्यापरीने सत्य आहेतच. त्यांतील सत्त्वगुण, सद्गुण, सत्संगति, सगुणभक्ति, नामसाधन या गोष्टी ईश्वर–साक्षात्काराला उपकारक, पोषक म्हणून सत्य आहेत. त्याच्या विरोधी गोष्टीहि साक्षात्काराला अपकारक, मारक म्हणून सत्यच आहेत त्यासाठी पहिल्यांचा स्वीकार व दुसऱ्यांचा त्याग

---

+ भ. गी. १८०  § म. सा. १७१

कटाक्षाने केला पाहिजे. " अद्वैत मतांत नीति–अनीति कांहींच नाही, " अशी टीका करणाऱ्या पाश्चात्य तत्त्वज्ञांनाच्या ध्यानांत वरील सत्य येत नाही म्हणून अज्ञानाने ते तसे म्हणतात. " अजात-बाद ( अरे जे जालें चि नाहीं । त्याची वार्ता पुससी काई ।।+ ) सांग-णारे अद्वैताचे आद्याचार्य गौडपादाचार्य यांनाहि आध्यात्मिक पूर्णतेच्या व नैतिक आचाराच्या व्यवस्थेसाठी जगाची मर्यादित सत्यता मान्य करावी लागली आहे, * " असे गुरुदेव रानडे म्हणतात. सारांश, व्यावहारीक सत्तेंत ईश्वर, जीवात्मे, जग सर्वकांहीं आहे. साधन-मार्गाचा विचार या सत्तेंतच करावयाचा असतो. पारमार्थिक सत्तेंत एक ब्रह्मच उरल्यामुळे साध्य–साधन विचारच संपतो.

८) **मुक्तीचे स्वरूप :**– जीवासंबंधी मुख्य प्रश्न म्हणजे मुक्तीचे स्वरूप काय ? भगवद्गीतेंत क्रममुक्ति व विदेहमुक्ति असा विरोधाभास दिसतो, पण त्यांचा समन्वय गीतेंत जीवनमुक्ति या विचाराने केला आहे, असे गुरुदेव रानडे म्हणतात. येथे क्रममुक्ति याचा अर्थ अनेक जन्म–संसिद्ध झाल्यावर मिळणारी मुक्ति असा घ्यावयाचा. त्यांच्या मते, सलोकता, समीपता, स्वरूपता किंवा चंद्रादि लोकावर जाऊन पुढे ब्रह्मलोकाला जाणे, इत्यादि मुक्ती या तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने मुक्तीच नाहीत. ती रूढ मते आहेत, इतकेच. गुरुदेव रानडे जीवनमुक्तीविषयी म्हणतात, " जीवनमुक्ति हा शब्द भगवद्गीतेंत नसला तरी भगवद्गीता २.७२ मधील ब्राह्मी-स्थिति म्हणजे जीवनमुक्तिच आहे; ब्राह्मीस्थिति म्हणजे ईश्वरस्वरूपी, ब्रह्मस्वरूपी राहणे, असा पुरुष जिवंत असतांनाच व असूनहि ईश्वराचे समाधान, शांति आणि आनंद भोगतो. या अवस्थेचे दुसरे लक्षण म्हणजे त्याच्याभोवती ब्रह्म सदा भरलेले असते. " **अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ।** " ( भगवद्गीता ५.२६ ) ईश्वराच्या साक्षात्काराने मन आनंदाने भरून जाते, हीच मुक्ति,

---

\+ दासबोध ८, ३, १      * उप. १६६

हाच मोक्ष. जिवंत असतांनाच देवाचा चढता वाढता साक्षात्कार करून घेणे, त्याच्या दर्शनाचा आनंद भोगणे, त्याच्या सेवेला वाहून घेणे, हीच मुक्ति व ही मुक्ति मिळाल्यावर अंतेमुक्ति सहज आहेच. कारण मरणापूर्वीच जे देवाला मिळाले ते मृत्यूनंतर दुसरीकडे कोठे जातील ?* (ज्ञानेश्वरी. ९–३६५), जीवन्मुक्ति अनेक जन्म-संसिद्ध होऊनच मिळते. असा जीवन्मुक्ति, क्रममुक्ति व अंतेमुक्ति यांचा समन्वय होतो. असेच विचार उपनिषदांतहि आहेत. "नामरूपाचा त्याग करून साक्षात्कारी पुरुष परमपुरुषांत प्रवेश करतो. साप कात टाकतो, त्याप्रमाणे, देह टाकून स्वतः ब्रह्म असल्यामुळे ब्रह्मांत प्रवेश करतो. ही मुक्ती जिवंत असतांनाच मिळाली पाहिजे व मिळते. ती मिळाल्यावर अंतेमुक्ति निश्चित आहेच. त्याचे देहाशी तादात्म्य उरत नाही.‡" या ऐक्यासाठी देहभाव पूर्णतः नष्ट झाला पाहिजे व त्याकरिता देवाला सर्वभावे शरण गेले पाहिजे. पूर्ण शरणागति म्हणजे मुक्ति, तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने देवाशी ऐक्य,† असे गुरुदेव रानडे सांगतात.

९) **पूर्णत्वाकडे अखंड वाटचाल** :– गुरुदेव रानडे यांचा एक महत्वाचा सिद्धांत म्हणजे या शरणागतीकडे भक्ताची अखंड वाटचाल सुरूं असते; देह असेपर्यंत त्यांत पूर्णतः कधींच येत नाही. पौर्णिमेचा चंद्र व चतुर्दशीचा चंद्र; इतके अतर तरी देव व भक्त यांत राहतेच. कारण हे की देह असतांना देहाच्या, मनाच्या कांही मर्यादा त्याला राहतातच.§ मृत्यूनंतर मात्र त्याचे देवाशी पूर्ण ऐक्य होते. हिंदी संतांवरील ग्रंथांत त्यांनी हाच सिद्धांत मांडला आहे व साधकाच्या दृष्टीने तो फार महत्त्वाचा कसा आहे हेहि स्पष्ट केले आहे. "सतत पूर्णतेच्या-साक्षात्काराच्या उच्चतम शिखराच्या-जवळजवळ वाटचाल करीत राहणे, हीच मनुष्याला करता येण्यासारखी गोष्ट आहे. यांत

---

* भ. गी. १८९.९०;  ‡ उप. २२३;

† भ. गी. ६७  § भ. गी. ७०–७१;

गर्व किंवा अल्पसंतुष्टता यापैकी कोणताच दोष राहात नाही. हा अखंड वाटचालीचा नियम नीति, परतत्त्वज्ञान, ज्ञानशास्त्र या सर्व क्षेत्रांत सारखाच लागू आहे. † या वृत्तींत " आम्ही जाहलो " असा गर्व किंवा उद्धर्ष अथवा " अधिक प्रगति शक्य नाही " अशी अल्पसंतुष्टता व अवसाद, यापैकी कोणताच दोष उरत नाही.

**१०) ईश्वराच्या लक्षणांतील विरोधाभासाचा परिहार :–** ईश्वर व ब्रह्म यांत तादात्म्य आहे; पण व्यावहारिक सत्तेत थोडा भेद आहेच. " ब्रह्माचे सगुण स्वरुप म्हणजे ईश्वर, ईश्वराचे निर्गुण स्वरूप म्हणजे ब्रह्म. तरीहि, तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने, ईश्वरापेक्षा ब्रह्म ही कल्पना उच्चतर आहे+". उपनिषदांत ब्रह्म–विचार अधिक असल्याने, निर्गुणावर भर असला तरी, ईश्वराचे सगुण-निर्गुण असे उभयविध वर्णन त्यांत येते. तो गुणातीत आहे, असा त्याचा निष्कर्ष निघतो. उदाहरणार्थ-ईश्वर " तेजोमय-अतेजोमय, काममय-अकाममय, क्रोधमय–अक्रोधमय, धर्ममय–अधर्ममय सर्वमय " आहे, असे वर्णन बृ IV–४–५ मध्ये आले आहे.

ईश्वराच्या लक्षणांचा अधिक विचार गुरुदेव रानडे यांनीं आपल्या गीतेवरील ग्रंथांत केला आहे. त्यांच्या मते गीतेंत ईश्वराविषयी खालील तीन विरोधाभास आढळतात व त्यांचा परिहारहि गीतेंतच मिळतो. त्यांचा क्रमशः परामर्श घेऊं.

**१) ईश्वर सगुण की निर्गुण :–** भगवद्गीता ९–१७ मध्ये त्याचे जगाचा पिता, माता, धाता, पितामह असे सगुणपर व ९–१८ मध्ये प्रभव, प्रलय, स्थान, निधान, अव्ययबीज असे निर्गुणपर वर्णन आहे. याचा परिहार तो सगुण-निर्गुण दोन्हीं आहे, गुणातीत आहे, या सिद्धांताने होतो.

---

† हिं. सा. १९७; + उप. २१९

२) **ईश्वर कर्ता की द्रष्टा** :– याचा समन्वय तो मूळ प्रेरक आहे, या वचनाने होतो. " **मयाऽध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।**" (भगवद्गीता ९–१०) ईश्वराच्या अध्यक्षत्वामुळे, प्रेरकत्वामुळे प्रकृतिगुणांची साम्यावस्था किंवा निष्क्रियता भंग पावते. प्रत्यक्ष सृष्टिकार्य पुढे प्रकृति करते. म्हणून तो साक्षी आहे; प्रेरक म्हणून कर्ताहि आहे.

३) **ईश्वर अंतर्यामी की सर्वातीत** :– याचा परिहार तो दोन्हींहि आहे, या सिद्धांताने होतो. त्याने एकांशाने जग व्यापिले आहे; पण अनंतपणे तो विश्वाच्या पलीकडे आहे. (भगवद्गीता-१०–४२; ९–४). शेवटी या विरोधाभासाचा निरास गीतेने अवतार या कल्पनेने केला आहे. तो सर्वातीत आहे; पण अवतार घेऊन तो जगांत, जगाच्या अंतरी उतरतो.

**सगुण-निर्गुणविषयी** गुरुदेव रानडे यांनीं एक महत्वाचा विचार मांडला आहे. या विषयावर अपारमित वाद झाला आहे. " पण यासंबंधी हे लक्षांत ठेवावे की संतांची परमार्थांत जशी प्रगति होते, तसे त्याला साक्षात्काराचे नवे अनुभव येऊं लागतात व त्यांच्या पार्श्वभूमीवर तो ईश्वराच्या स्वरूपाविषयी आपल्या कल्पना बनवितो*". संतांना सगुण, निर्गुण, गुणातीत असे देवाच्या रूपाचे तिन्हीं प्रकारचे अनुभव आले; हा या मतभेदांचा पाया आहे. म्हणून तिन्हीं सत्य आहेत; त्यांत विरोध नाही. हे प्रश्न साक्षात्काराच्या आधारे सोडविले पाहिजेत, केवळ तर्काने नाही.

११) **वेदान्त सांप्रदायांचा समन्वय** :– याच पद्धतीने वेदान्त सांप्रदायाचा समन्वय गुरुदेव रानडे यांनीं केला आहे; साक्षात्कार-सोपानाच्या पांच पायऱ्या दाखवून, प्रत्येक पायरीच्या दृष्टीने प्रत्येक सांप्रदाय सत्य आहे, असे सुचविले आहे. पुढील विवेचनांत " आत्मा "

---

* क. सा. १५१

हा शब्द 'मी' या अर्थी वापरलेला नसून, साक्षात्कारांत अनुभवाला येणारे आत्मतत्त्व या अर्थी वापरला आहे. यालाच "वस्तु", (बुद्धि व कल्पना या पलीकडचे सत्यतत्त्व), हा शब्दहि वापरतात.

**पायरी पहिली :–** आत्मा अगर वस्तु म्हणजे स्वत:पेक्षा निराळा असा वस्तूचा साक्षात्कार, अर्थात् अंतर्यामी आत्म्याच्या ऐश्वर्याचे दर्शन. "**आत्मा वा अरे द्रष्टव्य : ।** (बृ. II–४–५).

**पायरी दुसरी :–** मी देह, अन्नमयादि कोष नसून, माझे खरे स्वरूप शुद्ध आत्मतत्त्व आहे, हा अनुभव. "**आत्मानं विजानीयादयमस्मीति पुरुष : ।।**" (IV–४–१२).

**पायरी तिसरी :–** वस्तु, आत्मा म्हणजे ब्रह्म हा अनुभव. हेच जीवात्मापरमात्मा, वस्तु व ब्रह्म यांचे ऐक्य. ब्रह्म अनंत, आत्माहि अनंत. म्हणून ब्रह्मांतून आत्मा वजा केला तरी बाकी अनंतच उरते, अशा अनंताच्या राशी ईशोपनिषदांत रचल्या आहेत. याचा अर्थ असा की आत्मा व ब्रह्म यांत भेद नाही; पूर्ण तादात्म्य आहे. "**अयमात्माब्रह्म**" (बृ. II–५–१९).

"**पूर्णमद : पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।**
**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।**"
( ईशोपनिषद् शांतिः )

**पायरी चवथी :–** "मी आत्मा" व "आत्माच ब्रह्म" यावरून मीच ब्रह्म हा सिद्धांत तर्कप्राप्त आहे–आणि "मी ज्ञाता ब्रह्म तर माझाच (Projection) विस्तार, आविष्कार जे ज्ञेय तेहि ब्रह्मच हा सिद्धांतहि क्रमप्राप्त आहे. "**अहं ब्रह्मास्मि**" (बृ. I–४–१०) "**तत्त्वमसि**" (छां. VI–८–७).

**पायरी पाचवी :–** आतां "मी ब्रह्म, व तूंहि ब्रह्म" ज्ञाता ब्रह्म व मी स्वत:, सर्वकांहीं ब्रह्म, हा निष्कर्ष सहजच निघतो.

**'सर्व खल्विदं ब्रह्म "** (छां. III–१४–१) अशा वैचारिक उत्तुंग शिखरावर साक्षात्कार सोपानाचे चिंतन पोहोंचते. † या सर्व अनुभवांत ईश्वराचे सगुण, निर्गुण स्वरुप, वेदांताचे भिन्नभिन्न सांप्रदाय इत्यादींची बीजे सांपडतात. त्याचप्रमाणे अनुभवाच्या पाचव्या पायरीपर्यंत ईश्वरविषयक मते कशी बदलत जातील हेहि स्पष्ट होईल. गुरुदेव रानडे म्हणतात, "तुकाराम प्रथम विठ्ठलाची, सगुणरूपाची, भक्ति करीत होते. पुढे साक्षात्कार झाल्यावर हे सगुणरूप व आंत ज्याचे दर्शन होते ते रूप एकच, ईश्वर सर्वत्र भरलेला आहे, हे समजले. अशा साक्षात्कारनंतर पाषाणाच्या मूर्तीकडे कोण लक्ष देणार ? ईश्वर सर्वांच्या अंतर्यामी आहे, हा अनुभव आल्यावरच मनुष्यमात्र देव आहे, हे कळते व देव म्हणून संत त्याकडे पाहूं लागतात. **अवर आहां, अमर आहां। खरें कीं पाहा खोटें हें।** तुकाराम ८४९ § ".

**१२) अवतार** :– अवतारांची सगुण म्हणून भक्ति केली जाते. देव प्रत्यक्ष देह घेऊन जन्माला येतो, ही कल्पना गुरुदेव रानडे यांना मान्य नाही. "देव प्रत्यक्ष देह घेऊन प्रकट होते, अशा कथावर विश्वास ठेवणे शास्त्रीय व तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने कठीण आहे. साक्षात्काराच्या दृष्टीने त्याला महत्व नाही. साक्षात्कारांत देवाचे दर्शन होणे अशक्य नाही ‡ ". अवताराचा त्यांचा स्वतःचा अर्थ "अव म्हणजे खाली, पण साक्षात्काराच्या दृष्टीने खाली. साक्षात्कारांत साधकाच्या दृष्टीसमोर देवाचे स्वरूप अवतरणे म्हणजे अवतार * ". राम व कृष्ण या संबंधी ते लिहितात, राम व कृष्ण हे थोर साक्षात्कारी पुरुष होते; भक्ति करून त्यांनी साक्षात्कार प्राप्त करून घेतला होता. त्याच्या सामर्थ्याने ते थोर पराक्रमी पुरुष झाले, जणु देवासारखे झाले व त्यांना अवतार

---

† उप. २७६-२७८; § म. सा. ३४३

‡ हि. सा. ३२४; * भ. गी. १७५-१७६

मानण्यांत येऊं लागले ‡" श्रीकृष्ण व राम त्यांनी भक्ति केली होती, असेहि त्यांनीं दाखविले आहे. *

१३) **ईश्वर हे परमाश्चर्य** :– या विषयांत गुरुदेव रानडे यांनीं साक्षात्काराला अपरोक्षानुभूतीला महत्व दिले आहे, बौद्धिक ज्ञानाला नाही. "साक्षात्काराच्या तुलनेने बौद्धिक ज्ञान केवळ शरीरकष्ट; त्याने आत्माप्राप्ति होणार नाही. एखाद्या अनुभूतीचा उपभोग व तिचे वर्णन यांत महदंतर आहे. म्हणून उपनिषदांनीं आत्मप्राप्तीचा मार्ग सांगितला आहे. 7" आत्मा व अनात्मा, सत् व असत् यांतील भेद ब्रह्माच्या जगांतच (आत्मानुभवांत) तमः प्रकाशवत् स्पष्ट दिसतो ϐ" "सर्वं खलु इदं ब्रह्म ही अद्वैतावस्था साक्षात्कारानेच प्राप्त होते, शब्दज्ञानाने नाही β". "ईश्वराचे चिंतन, त्याच्याशी ऐक्य, त्यांत प्रवेश हे सर्व झाल्यावर मायेचा नाश होतो §" साक्षात्कार हेच गुरुदेवांचे एकमेव ध्येय असल्याने, त्यांनीं ईश्वराच्या स्वरुपाविषयी प्रदीर्घ बौद्धिक चर्चा केलेली नाहीं. "तात्त्विक दृष्टीने ईश्वराच्या स्वरूपाचा निर्णय करण्याच्या प्रयत्नांत मनुष्य वादविवादाच्या चिखलांत अडकून पडतो. ईश्वरप्राप्तीचा मार्ग कोणता ? या प्रश्नाचे उत्तर शोधून काढणे महत्वाचे आहे. +" साक्षात्काराच्या भूमिकेवरूनच निश्चित केलेले परतत्त्वाचे स्वरूप गोंधळ माजविणाऱ्या आग्रही मतांचा समन्वय करील. जे आपल्या अनुभवाला आले तेच आपले तत्त्वज्ञान असे आपण ठरवावे∅" या दृष्टीने गीतेच्या आधारे गुरुदेवांनीं ईश्वरविषयी तीन विचार मांडले आहेत.

१) ईश्वर हे परमाश्चर्य आहे. म्हणून आपण त्याच्याकडे पाहतो, त्याच्याबद्दल बोलतो, ऐकतो, पण अशा रीतीने पाहून,

---

‡ हिं. सा ३३१; * भ. गी. १०२–१०३ 7 उप. ३२६–३२७;
ϐ उप. २९; β उप २८७; § उप. २२६;
+ भ. गी. २३१; ∅ भ. गी. १९१.

बोलून, ऐकूनहि त्याचे खरे अंतिम स्वरूप समजत नाही. (भगवद्गीता २-२९)

२) मागे होऊन गेलेल्या, आज असलेल्या व पुढे होणाऱ्या भूतांचे ज्ञान एका देवालाच आहे; त्याचे पूर्ण ज्ञान मात्र कोणालाहि, केव्हांहि झालेले नाही. देवाच्या स्वरूपाच्या बाबतींत मनुष्याचे ज्ञान मर्यादितच आहे. (भगवद्गीता ७–२६)

३) शेवटी ईश्वराच्या सत्य स्वरूपाचे ज्ञान केवळ त्यालाच आहे. ईश्वरी स्वसंवित् हेच अंतिम सत्यतत्त्व आहे. † (भगवद्गीता १०–१५)

**स्वसंवित्** :- वरील भगवद्गीता १०–१५ या श्लोकावरूनहि, स्वसंवित् हेच परमतत्त्व हा, मागे उपनिषदांतील म्हणून सांगितलेला, सिद्धांत गुरुदेव रानडे यांनीं मांडला आहे. "मानवी स्वसंवित् (Self-Consciousness) हेच सारभूत, अंतिम परमसत्यतत्त्व, असे बर्कलेपासून सर्व चिद्वादी (Idealist) तत्त्वज्ञांनीं प्रतिपादिले आहे. परंतु ईश्वरी स्वसंवित् (Divine Self-Consciousness) हे ते तत्त्व आहे; त्याहून श्रेष्ठ असे कांहीहि नाही; तेच तत्त्वज्ञानाचे व विश्वाचे आधारभूत तत्त्व, त्यांचे शिखरहि आहे. ॲरिस्टॉटलने ईश्वराला विचारांचा विचार म्हटले असून त्याला 'आत्मचिंतन' (Theoria) हे नांव दिले आहे. *" बालस्वरूपांत झालेल्या देवाच्या दर्शनाविषयीं पुरंदरदास सांगतात, "त्याचे सत्यस्वरूप व त्याचा महिमा एक त्यालाच माहीत; इतर कोणालाहि नाही. कारण तो साकार आहे, निराकारही आहे. §" अद्वैत तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने मानवी स्वसंवित् असे कांहीं नाहीच. ती पाश्चात्य तत्त्वज्ञानांतील व मानसशास्त्रांतील एक कल्पना आहे व ती मनाच्या पलिकडं गेलेली नाही; संकुचित आहे. ज्ञान (संवित्) हे स्वसंवित्

---

† भ. गी. १९१–१९२. * भ. गी. १९२; § क. सा. १५९;

किंवा आत्मज्ञान या अवस्थेला पोहोंचले की तेच ब्रह्म, तोच आत्मा तीच तुरीयावस्था होय. या अवस्थेंत "आत्म्याला आंतले–बाहेरचे कशाचेच ज्ञान नसते; तो (आत्मा) जडहि नसतो, त्याचे अनुमान, चिंतन किंवा निर्देश करता येत नाही. त्याचा **एकात्मतेने**, अनुभव येतो; तो परमानंदमय भेदरहित असतो.‡" पातंजलयोगांतील चित्तवृत्ति निरोधाने येणारी स्वरूपस्थिती (स्वरूपेऽवस्थानं) व रामदासांचे "पाहावे आपणासी आपण" हे ज्ञान म्हणजे ही स्वसंवित्, चिन्मय ब्रह्म, आत्मतत्त्वच होय. ही अवस्था आनंदमय असल्याने हेच सच्चिदानंद ब्रह्म होय. त्याला केवळ आनंदहि म्हणतात; कारण आनंदात सत् व चित् अंतर्भूत आहेतच. केवळ बौद्धिक ज्ञान जीवनसाफल्य देण्याला असमर्थ आहे हेहि या सर्व विवेचनावरून स्पष्ट होईल.

❖ ❖

---

‡ उप. १४०

## प्रकरण ३ रे : नीतिशास्त्र ( Ethics )

१) **तत्त्वज्ञानानंतर नीतिविचार क्रमप्राप्त** :— जीवनसाफल्य देणारे परमसत्यसत्त्व म्हणजे आत्मा होय. त्याचे स्वरूप बुद्धीने शक्य तितके ठरविल्यावर त्याच्या प्राप्तीचे साधन शोधणे हे क्रमप्राप्त आहे कारण, आत्म्याचे बौद्धिक ज्ञान हे ध्येय नसून त्याची अनुभूति हे ध्येय आहे. आत्मप्राप्तीचे साधन म्हणून नीतीचा विचार येतो; तिच्या पूर्ततेसाठी साक्षात्कारमार्ग धरणे अवश्य आहे याप्रमाणे परतत्त्वज्ञानानंतर नीतिशास्त्र व साक्षात्कारवाद यांची चर्चा क्रमाने येते.

नीति ही इच्छाशक्तीची प्रेरणा आहे. इच्छा या शब्दांतच सुखाची इच्छा व त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न या दोन्हीं गोष्टी येतात. कोणत्या सुखाची इच्छा धरावी व त्यासाठी काय प्रयत्न करावा हे नीतीचे प्रश्न आहेत; विचार व आचार या दोन्हींचाहि यांत संबंध येतो आत्मप्राप्ति हे ध्येय ठरल्यावर त्याची, अर्थात् आत्मानंदाची इच्छा धरणे, त्याला अवश्य तो विचार, आचार स्वीकारणे याला नीति असे म्हटले पाहिजे. मनुष्याच्या मनांत अनेक प्रकारच्या सुखांच्या इच्छा, वासना असतात; त्यासाठीं त्याचे प्रयत्नहि असतात. त्यांत काल व शक्ति व्यर्थ गेली तर, आत्मानंदप्राप्तीचे, साधन होऊं शकणार नाही. म्हणून त्यांचा त्याग हाहि नीतिविचारांत अंतर्भूत आहेच. सारांश, आत्मप्राप्तीचे, साक्षात्काराचे साधन म्हणून गुरुदेव रानडे यांनीं नीतिशास्त्राचा विचार केला आहे: साक्षात्कारांत परिणत न होणारे स्वतंत्र ध्येय म्हणून नाही

२) **परतत्त्वज्ञान-नीतिशास्त्र-साक्षात्कारवाद** — या तिन्हींचा निकट संबंध गुरुदेव रानडे यांनीं स्पष्ट केला आहे. “मानवी

अंत:करण अखंड आहे, त्याच्या पूर्ण विकासासाठी, त्याचे बौद्धिक, नैतिक व आध्यात्मिक भाग तुटक ठेवणे अशक्य आहे. नीतिविरहित तत्त्वज्ञान म्हणजे केवळ शब्दच्छल व नीतिविरहित साक्षात्कारी पुरुष–असा तिरस्करणीय प्राणी असेल तर तो–परमार्थाला लांछनच होय. तसेच नीतिशास्त्र तर्कशुद्ध बनण्यासाठी त्याला तत्त्वज्ञानाचे साहाय्य घेतले पाहिजे व त्याच्या पूर्ततेसाठी साक्षात्कारमार्ग अवलंबिला पाहिजे. सारांश, बुद्धि, भावना, क्रियाशक्ति ज्याप्रमाणे अलग करता येणार नाहीत, त्याचप्रमाणे तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र व साक्षात्कारवाद यांनाहि अगदी वेगवेगळे ठेवता येणार नाही. साक्षात्काराच्या भक्कम पायावर उपनिषदांनीं सर्वनैतिक प्रश्न सोडविले आहेत * ".

३) **नीतीची प्रमाणे** :– शास्त्राची व थोर पुरुषांची वचने (Heteronomy किंवा परायत्तता), ईश्वराची आज्ञा (Theonomy किंवा ईश्वरायत्तता) आणि स्वत:ची बुद्धि (Autonomy किंवा स्वायत्तता) अशी नीतीची तीन प्रमाणे सांगतात. ईश्वराची इच्छा हेच नीतीचे प्रमाण; त्याच्या इच्छेप्रमाणे वागणे हीच उच्चतम नीति, असे गुरुदेव रानडे यांचे मत आहे. नीतीचा विचार साक्षात्काराच्या दृष्टीने करावयाचा आहे. म्हणून शरणागति हीच खरी नीति होय. "सर्व धर्मांचा त्याग करून मला एकट्यालाच शरण ये (भगवद्गीता १८.६६) हे वचन अगदी शब्दश: खरे मानले पाहिजे. आपली कर्मे करण्यात केवळ ईश्वरप्राप्तीचे ध्येय पाहिजे. तेच नैतिक जीवनाचे उच्चतम ध्येय आहे.‡" "देवाची इच्छा तीच आपली इच्छा असावी, आपण निमित्तमात्र व्हावे, या भावनेत ईश्वराच्या इच्छेप्रमाणे वागणे हे एकच नियत, श्रेष्ठतम कर्तव्य होय, हा महत्वाचा नैतिक सिद्धांत आहे.†" या तत्त्वाचाच एक उपसिद्धांत म्हणून "**देव जोडे तरी करावा अधर्म । नातुडे तो धर्म न आचरावा ।**" हे तुकारामांचे वचन

---

* उप. २८८–२८९. ‡ भ. गी. १७२ † भ. गी. १६२

त्यांनीं दिले आहे. नीतीची प्रमाणे म्हणून शास्त्रवचन, थोर पुरुषांचा आदेश (परायत्तता) व स्वतःची सदसद्विवेकबुद्धि (स्वायत्तता) यांचा उल्लेख वर आला आहे. नीतिशास्त्राच्या दृष्टीने स्वायत्तता श्रेष्ठ आहे. नैतिक नियमांचा उगम आपल्या आत्म्यांतूनच झाला पाहिजे. या सर्वांचा "**शरणागतीशी**" समन्वय करता येतो. शास्त्रे व थोर (साक्षात्कारी) पुरुष हाच सिद्धांत सांगतात. हे आचाराचे तत्त्व ठरल्यावर त्याचा तपशील साधकाने ठरवावा लागतो; पूर्ण तपशील कोणी देऊं शकत नाही; पुन्हा, प्रकृति स्वभावानुरूप तपशील बदलतोहि. येथे स्वतःच्या बुद्धीला (स्वायत्तता) स्वातंत्र्य आहे. थोर साक्षात्कारी पुरुष देवाशी ऐक्य पावतात; त्यांची इच्छा व देवाची इच्छा एकच होते; ईश्वरायत्तता व स्वायत्तता एकरूप होतात. या उच्चपदाला पोहोंचल्यावरच खरी स्वायत्तता लाभते. एरव्ही ती कधीच प्रमाणभूत ठरणार नाही.

४) **शरणागतीचो तात्त्विक चर्चा :-** शरणागतीची थोडी विस्तृत चर्चा करणे इष्ट आहे. शरणागति म्हणजे ऐक्य, मोक्ष; या अवस्थेकडे अखंड वाटचाल सुरू असते, हे सर्व विवेचन मागील प्रकरणांत आले आहेच. सामान्यतः देह, मन, बुद्धि, यांचे सुख, त्यासाठी विषयप्राप्तीचे प्रयत्न, कर्म, त्यांचे चिंतन, यांतच मनुष्य आसक्त असतो. या सर्व गोष्टी म्हणजे अनात्मा. माया, असत्य होत. याबद्दल आसक्ती, प्रेम हाच बंध, कारण अशा आसक्तीमुळे घडणाऱ्या कर्मांतून सुखदुःख, लाभहानी ही द्वंद्वे उत्पन्न होतात. या सर्व गोष्टी आत्मप्राप्तीच्या, आत्मानंदप्राप्तीच्या म्हणजे ध्येयाच्या आड येतात. हा बंध अनात्म्याची आसक्ती सोडण्याचा प्रयत्न केला नाही तर, वाढतच जातो; ध्येय दुरावत जाते. देहावरील आसक्ती हा या बंधाचा पहिला दुवा आहे. तो नष्ट करण्यासाठी ईश्वरावर प्रेम केले पाहिजे, त्याची भक्ति केली पाहिजे. दुसरा मार्ग नाही. कारण इतर कशावरहि प्रेम केले तरी ते अनात्म्यावरच प्रेम होते; त्याने बंध वाढतच जातो. शरणागति म्हणजे आश्रय घेणे, अनात्म्याचा आश्रय सोडण्यासाठो

आत्म्याचा, देवाचा आश्रय घेणे, अर्थात् त्याची भक्ति करणे हीच शरणागति. मनुष्याला कशाचा तरी आश्रय घ्यावाच लागतो. विश्वांत आत्मा व अनात्मा या दोनच गोष्टी आहे; यांनाच ब्रह्म व माया; सत्य व असत्य असेंहि म्हणतात. तेव्हां आत्मप्राप्तीसाठी, आत्म्याचा आश्रय, ईश्वराची भक्ति हा मौलिक सद्‌गुण ठरतो. देवावर भक्ति जडली म्हणजे चिंतन, कर्म सर्व देवासाठीच घडते. याप्रमाणे सर्व नैतिक जीवनाचा पाया, सर्व सद्‌गुणांचा मुकुटमणी, म्हणजे भक्ति, शरणागति, असे गुरुदेव रानडे यांनी म्हटले आहे. इतर सद्‌गुणांचा भक्तीशी असलेला संबंध पुढे स्पष्ट होईल. देवावरील सहज परिणाम म्हणजे आपली इच्छा, सुखाची वासना सोडून देवाच्या इच्छेने वागणे, तो करील ते मान्य करणे, हा आहे. ईश्वर हेच एकमेव सत्य त्याच्याशिवाय दुसरे कांहीं नाहीच. तेव्हां जे जे घडते ते केवळ त्याच्या इच्छेने, त्याच्या नियमाने; ते मंगलच असणार. म्हणून आत्महितासाठी तेच मान्य करणे उचित ठरते. दुसरी गोष्ट म्हणजे, ते मान्य न करणे यांत, त्या व्यतिरिक्त आपल्याला कांही इच्छा आहे, हे व्यक्त होते. तशी इच्छा नसेल तर, ते मान्य करण्याला कांहींच अडचण येणार नाही. ही इच्छा म्हणजे अर्थात् अनात्म्याविषयी आसक्ती टाकलीच पाहिजे. सद्‌गुण व भक्ति यांच्या दृष्टीने शरणागतीचा इतका विस्तृत अर्थ आहे. नीति व परमार्थ–साधन यांत या सर्व सूत्राचा परामर्श घेत, विचार करावयाचा आहे. म्हणून त्याचे येथे थोडे, प्रदीर्घ विवेचन केले आहे. अनात्म्याविषयी आसक्तीचीच, देहतादात्म्य किंवा अहंकार व वासना ही रूपे आहेत, हेंहि ध्यानांत ठेवावे.

५) **नैतिक ध्येये :–** नैतिक जीवनाचे ध्येय, त्याने काय प्राप्त करून घ्यावयाचे, यासंबंधी अनेक भिन्न मते आहेत. त्यांतील कांहींचा निर्देश करून आत्मानंद व आत्मसाक्षात्कार हेच उच्चतम नैतिक-आध्यात्मिक ध्येय असून, नाण्याच्या दोन बाजूप्रमाणे दोन्हीं एकच आहेत, हे महत्त्वाचे मत गुरुदेव रानडे यांनीं सांगितले आहे. या

पार्श्वभूमीवर इतर सर्व नैतिक ध्येयांचा, प्रत्येकांत सत्याचा अंश आहे, पूर्ण सत्य कोणतेच नाही, असा साक्षात्काराशी समन्वय केला आहे.

अ) **निवृत्तिपर ध्येय** :- ऐहिक गोष्टींचा त्याग या ध्येयांत अभिप्रेत आहे. त्यांचा क्रमाने विचार करूं. सुखाच्या मागे लागल्याने दुःख होते, म्हणून ते त्यागावे, असा **भोगविन्मुखतावाद** क. I–२.१–२ मध्ये सांगितला आहे. परंतु हे स्वतंत्र ध्येय नसून आत्मानंदाच्या प्राप्तीसाठी भागांचा त्याग सांगितला आहे. भोगाने वासना वाढतात, काल व्यर्थ जातो, मनोदुर्बलता येते, अर्थात् आत्मानंदप्राप्तीचे प्रयत्न होऊं शकत नाहीत. भोगविन्मुखतेच्या कल्पनेतून **निराशावाद**, मानवी जीवन गर्हणीय आहे ही कल्पना, क्रमप्राप्त आहे; पण तिचा अतिरेक होतो. 'सर्वं दुःखं दुःखं' हे अंतिम सत्य नव्हे. जीवनांत जराव्याधि–मृत्यु ही दुःखें आहेतच; ती नाकारता येणार नाहीत पण केवळ दुःखेच नाहीत; योग्य प्रयत्न केल्यास आत्मानंदाची प्राप्ति होऊ शकते; हा थोर आशावाद गीतेंत आहे. भोगविन्मुखता व निराशावाद यांतून **संन्यास व कर्मत्याग** या कल्पना सहजच निघतात. पण आत्मानंदाच्या प्राप्तीच्या मार्गांतील विघ्ने म्हणून कर्मत्याग उपदेशिला आहे. हा उपदेश म्हणजे, आत्मानंदाच्या तुलनेने असत्य व पोकळ अशा वैषयिक जगाचा निर्वेद येऊन त्यापासून दूर होण्याची प्रवृत्ति होय. त्याच्या अंतरी आत्मानंद व साक्षात्कार हे सारभूत ध्येय आहे. आध्यात्मिक जीवनांत निष्क्रियता मुळीच नसते. असा पुरुष जरी बाह्यतः निष्क्रिय, जनसंपर्कांपासून दूर जाऊन एकटाच आत्मचिंतन करीत बसलेला दिसला, तरी त्याला क्रीडा करण्याला रममाण होण्याला आत्मा हा विषय असतो. (मु. III–१.४)

वस्तुतः त्याच्या या अनुसंधानांत, म्हणजे आत्मिक जीवनांत, अंतर्यामी उत्कट आध्यात्मिक क्रिया सुरूं असते. हे सर्व विचार

गुरुदेव रानडे यांनीं उपनिषद्रहस्यांत मांडले आहेत.† प्लेटो म्हणतो, " आध्यात्मिक क्रिया हेच मनुष्याचे उत्कट कार्य असून तेच मानवतेला अत्यंत उपकारक आहे." आत्मविनिग्रह, अनासक्ति, त्याग हे सद्गुण वरील ध्येयांत अंतर्भूत आहेत. त्यांचा भक्तीशी संबंध दाखविताना गुरुदेव रानडे म्हणतात, " परमात्मा आपला प्रियतम; इंद्रियनिग्रह केल्यावांचून त्याची प्राप्ति होणार नाही. ईश्वर आंतरतर, प्रियतम आहे. म्हणून इतर सर्व आंतर व बाह्य गोष्टीविषयी अनासक्ति ठेवलीच पाहिजे; अर्थात् ईश्वरासाठी सर्वस्वाचा त्याग केला पाहिजे. * सारांश, ईश्वरप्राप्तीचे साधन म्हणून निवृत्ति व संन्यास यांना महत्व आहे. त्यांचा अतिरेक मात्र होता कामा नये.

**आ) प्रवृत्तिपर ध्येये** :– वरील आध्यात्मिक क्रियाशीलतेपेक्षा निराळी अधिभौतिक क्रियाशीलता (Activism) आहे तीच क्रियावादांत अभिप्रेत आहे; गुरुदेव रानडे म्हणतात, "ईशोपनिषद् कर्म व ज्ञान यांचा समुच्चय, साक्षात्कारासाठी अवश्य आहे, वर उडण्याचे हे दोन पंख आहेत, असे सांगते; पण पंखापेक्षा उडून अनंताला पोहोंचणे श्रेष्ठ आहे, ते ध्येय आहे. अर्थात् ज्ञान व कर्म दोन्ही साधने म्हणून महत्वाची आहेत. साध्य मिळाल्यावर त्यांचे कार्य संपते. ऐहिक कर्माला याप्रमाणे कांहीं महत्त्व दिल्याचा सहज परिणाम म्हणजे ऐहिक मूल्यांना, पुत्र–धन–कीर्ति इत्यादिकांनाहि कांहीं महत्त्वाचे मानणे हा होतो. ऐहिक सुस्थिती हा जीवनमूल्याचा एक पैलू, येवढे तरी मानले पाहिजे. याज्ञवल्क्यासारख्या थोर ध्येयवाद्यानेहि; लोकांना उदाहरण म्हणून असेल, पण हेच दाखविले आहे. जनकराजाच्या सभेत, " तुम्हांला वादांत जय हवा का हजार गाई पाहिजेत ?" या प्रश्नाला " उभयमेव सम्राट् ", अर्थात् दोन्हीं पाहिजेत, असे उत्तर दिले, ‡ हे मान्य करूनहि गुरुदेव शेवटी सांगतात की, परमार्थाचे साधन म्हणूनच ऐहिक ऐश्वर्याचा उपयोग मानला पाहिजे.

---

† उप. २१५–२१६ * भ गी. २१४ ‡ उप. २१९;

**" घर राखे घर जात है, घर छांडे घर जाय ।**
**तुलसी घर बन बीच रहूँ, राम प्रेम पुर छाय ।। "** तुलसीदास

घर व वन यांच्यामध्यें राहून रामप्रेमपुर तयार कर. प्रपंच व परमार्थ यांचा समुच्चय यांत आहे. जीवनाला अवश्य त्या प्रपंचातील सुखसोई व संन्यासांतील अनासक्ति यांचा संगम करून मनुष्याने स्वतःच्या व भक्तबंधूंच्या परमार्थाला साह्य करावे, हा ऐहिक वैभवाचा खरा उपयोग प्रपंच-परमार्थ-समुच्चय, हेच सर्वांगीण श्रेयस् [Eudaemonism] परमार्थ करण्यासाठीहि कांहीं किमान सुखसोई लागतातच; परमार्थ प्रचारासाठी, म्हणजे समाजकल्याणासाठी त्यामोठ्या प्रमाणांत लागतात. तेव्हां ऐहिक सुस्थितीकडे पूर्ण दुर्लक्ष करून चालणार नाही. त्याचा उपयोग मात्र सर्व विश्व ईश्वराच्या भजनाने व वैभवाने भरून टाकणे, हा असला पाहिजे. सारांश, निवृत्ति केवळ देहदंडासाठी नाही, प्रवृत्ति केवळ भोगासाठी नाही. दोहोंचा उपयोग ईश्वरप्राप्तीसाठी केला पाहिजे. मग त्यांत विरोध नाही *

६) **आत्मानंदवाद** :– ऐहिक मूल्यांना असे कांही महत्व दिले पाहिजे हे खरे. पण त्याने आत्मानंद या आध्यात्मिक मूल्याचे माप करता येणार नाही. तैत्तिरीय उपनिषदांत म्हटले आहे की आधिभौतिक सुख अनेक, हजारो पटीने वाढविले म्हणजे ते आत्मानंदाचे माप ठरते. पण हे बरोबर नाही. आत्मानंदाने मनुष्य निष्काम होतो, त्याच्या सर्व कामना नष्ट होतात. हे कार्य कोणतेहि ऐहिक सुख किंवा अनेकपटीनी वाढलेली सर्व ऐहिक सुखेहि करूं शकत नाहीत, मग ती शारीरिक, मानसिक, बौद्धिक किंवा भावनात्मक, कोणतीहि असोत. आत्मानंदांची जातच निराळी आहे. आत्मानंदच उच्चतम जीवनमूल्य होय. §

---

* हि. सा. २९४–२९५ § उप. २२०

७) **आत्मसाक्षात्कार** :– आत्मसाक्षात्काराने लाभणाऱ्या आनंदाचे मोजाप कोणत्याहि ऐहिक सुखाने करता येणार नाही. पण कित्येक पाश्चात्य तत्त्वज्ञ, " आत्मा नित्यसिद्ध सदा प्रत्यक्षच आहे; त्याचे प्रत्यक्षीकरण करून घेण्याचा प्रश्नच कोठे येतो ? कल्पनामय गोष्ट प्रयत्नाने प्रसिद्ध, प्रत्यक्ष करता येईल. सिद्धवस्तु पुन्हा प्रत्यक्ष कशी करणार ? कारण ती प्रत्यक्ष आहेच," अशी आत्मासाक्षात्काराच्या कल्पनेची थट्टा करतात. गुरुदेवांचे याला उत्तर असे की, आत्मा प्रसिद्ध आहे हा एक बौद्धिक सिद्धांत, परतत्त्वज्ञानांतील सत्य आहे. त्याची अनुभूति करून घेणे निराळी गोष्ट आहे. चित्त शुद्ध करून, स्वभावत: अंत:करणाला जडलेला अनात्म्याचा मोह आत्मचिंतनाने दूर करून, आत्मा आपल्या पूर्ण ऐश्वर्यांत आणि शुद्धावस्थेत आपल्यासमोर उभा असलेला पाहणे, याचे नांव आत्मसाक्षात्कार. पाश्चात्य तत्त्वज्ञ मानतात तो, बुद्धि, भावना, क्रियाशक्ति या अनात्मशक्तींचा विकास म्हणजे, साक्षात्कार नव्हे. असो. आत्मसाक्षात्कार व आत्मानंदच उच्चतम जीवनमूल्य, याचा आणखी विचार गुरुदेव रानडे यांनीं मांडला आहे. बृहदारण्यक, उपनिषद् म्हणते की आपल्या अंतरी व बाह्य विश्वांत, सर्वत्र भरलेले सत्यतत्त्व म्हणजे आत्मा. तो द्रव्य–पुत्र–कांता या सर्वांपेक्षा आंतरतर आहे; मागे सांगितल्याप्रमाणे त्यालाच परमप्रिय मानले पाहिजे, अर्थात् त्याचीच भक्ति, त्याच्याच प्राप्तीची कामना धरली पाहिजे (येथे आनंद व भक्ति (प्रेम), यांचा संबंध स्पष्ट होतो. आत्म्यावर प्रेम म्हणजे आत्मानंदावर प्रियतम; कारण तोच उच्चतम आनंद होय.) परंतु आत्मा हा प्रेमाचा एकमेव विषय आहे, यापेक्षा उपनिषदांतील आत्मसाक्षात्काराच्या सिद्धांतांत अधिक अर्थ आहे. आपण–पुत्र–वित्त–कांता इत्यादि कोणत्याहि गोष्टीवर प्रेम करतो, ते त्या त्या गोष्टींसाठी नसून आत्म्यासाठी आहे. आत्म्यावरील प्रेमाचीच ती स्वरुपे किंवा आविष्कार असतात.

**" न वा अरे सर्वस्य कामाय सर्वं प्रियं भवति ।**
**आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति ।। "*** (बृ. II –४.२–५)

अर्थात्, आत्मा प्रियतम वाटावा, इतरांवरील प्रेम आत्म्याचे आविष्कार वाटावे, असे येथे सांगावयाचे आहे. तसे आपल्याला वाटत नाही; तसे वाटणे कठीण आहे; पण ते ध्येय पाहिजे. तेव्हां आपण ज्यांच्यावर प्रेम करतो, त्यांच्या दृष्टीने देखील आत्माच प्रियतम मानावा; अर्थात् आत्माच खरा आनद, खरा आप्त, खरे नैतिक मूल्य. साक्षात्कारप्राप्तीनंतर, संत आपल्या प्रपंचावर प्रेम करतातच; पण त्यांत आसक्ति नसते; देवावरील विशाल सर्वव्यापी प्रेमाचा तो आविष्कार असतो, म्हणून तो सर्वांनाच मोचक असतो. देहासक्तीने केलेले प्रेम बंधक असते. " **देवाच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगासी तुटी ।।** " या समर्थांच्या वचनांत हाच आशय आहे. यासाठी ध्यान करून आत्मसाक्षात्कार मिळावा असे बृहदारण्यकोपनिषद् सांगते.

८) **आत्मसाक्षात्काराच्या नैतिक व अनुभूतिपर बाजू :–** गुरुदेव रानडे लिहितात, " छांदोग्योपनिषदाच्या एका सुप्रसिद्ध वचनांत आत्मसाक्षात्काराच्या नैतिक व अनुभूतिपर बाजूंचा उत्कृष्ट संगम दृष्टीस पडतो. त्याचा भावार्थ असा; " अनंताचे दर्शन म्हणजे आनंद, खरे सुख, इतर सुखें ती सुखेंच नव्हेत. भूमा (अनंत) आणि अल्प अशी अगदी भिन्न जातीची सुखें आहेत. आत्म्याच्या दर्शन–श्रवण–ध्यानाने मिळणारे सुख ते भूमा; इतर सर्व ऐहिक, अनात्म गोष्टींकडून, मिळणारे सुख ते अल्प; वर खाली, उजवीकडे, डावीकडे सर्वत्र एक ब्रह्मच आहे, आत्माच आहे, मीच आहे, असा ब्रह्म-आत्मा–मी यांच्या ऐक्याचा अनुभव म्हणजे (भूमा), मोठे सुख (आत्मानंद) लाभणे. असा साक्षात्कारी पुरुष आत्म्यावरच प्रेम करतो, त्याच्याशीच क्रीडा करतो. त्यांच्या संगतींत सुखाने राहतो. सारांश, असा तिहींच्या

---

* उप. २२२

ऐक्याचा आपल्या अनन्यभक्तीच्या साधनाने झालेला साक्षात्कार म्हणजेच. ज्याला उच्चतम नैतिकमूल्य म्हटले आहे तो, आत्मानंदच होय. † "

९) **गीतेंतील नैतिक ध्येये :–** कर्मयोग, ज्ञानकर्म समन्वय, नीतिवाद, अतिनितिवाद व आत्मानंदवाद या नैतिक ध्येयांचा विचार गुरुदेव रानडे यांनीं आपल्या भगवद्गीतेवरील ग्रंथांत केला आहे. त्याचा अतिम निष्कर्ष, आत्मानंद हेच नीतीचे शिखर, हाच आहे; तरी तर्कप्रणाली निराळी आहे. या विषयावर त्यामुळे आणखी प्रकाश पडेल. म्हणून त्यांचा परामर्श घेत आहे.

अ) **ज्ञान–कर्म समन्वय :–** यांत कर्म व योग अंतर्भूत आहे. गुरुदेव रानडे यांनीं ज्ञानाचा अर्थ आत्मसाक्षात्कार असा घेतला आहे. बौद्धिक ज्ञान नव्हे. ते म्हणतात, कर्माला पुढे दिलेल्या, निश्चित मर्यादा आहेत.

१) एक प्रकृतिस्वभावांत भेद असतात; म्हणून सर्वांना लावता येईल असा कर्मयोगाचा, नियम कर्तव्याचा, एकच नियम ठरविता येणार नाही.

२) साक्षात्कारानंतर कर्म संपते. (भगवद्गीता ४.३७).

३) आत्मदर्शन व आत्मानंद यांचा उपभोग घेणाऱ्या पुरुषाला कर्तव्य उरत नाही. तेथे कर्माची गति खुंटले. या अपूर्णतेमुळ कर्म हे उच्चतम ध्येय होऊं शकत नाही. ध्येय हे दिक्कालातीत, अपवाद-रहित असले पाहिजे, हे उघड आहे. एरव्ही ते उच्चतम ध्येय म्हणता येणार नाही, तरीहि कर्म व ज्ञान–साक्षात्कार–यांत विरोध नाही. त्यांचा समन्वय करता येतो. कारण साक्षात्कार–ही कधीच

† उप. २२२

पूर्ण न होणारी प्रक्रिया आहे. (It is a process, not an event). तेव्हां आत्मसाक्षात्कारासाठी साधन करीत असता, प्रत्येकाला आपल्या प्रकृतिधर्माप्रमाणे, परमार्थाला अनुकूल असे कार्य करीत राहण्याला मुळीच प्रत्यवाय नाही. प्रकृतिभेद सांगण्याचा एक नमुना म्हणून, त्यांनीं प्रकृतीचे आठ भेद दाखविले आहेत. बुद्धी, भावना, क्रियाशक्ति व प्रतिभा यांच्या अनुरोधाने चार व यांतील प्रत्येकाचे अंतर्मुख व बहिर्मुख असे दोन, म्हणजे एकंदर आठ प्रकार होतात. यांत तत्त्वज्ञ राजकारणी भक्त, शास्त्रज्ञ इत्यादींचा अंतर्भाव होतो. प्रत्येकाने आपापले कार्य करीत राहावे. प्रकृतिधर्म थोडेफार बदलता येथील. पण त्यांचे स्वरूप आमूलाग्र बदलता येणार नाही.§

श्रीशंकराचार्यांचे उदाहरण घेऊन. प्रत्येक साक्षात्कारी पुरुष जगदुद्धारासाठी कर्म करतोच; मग तो ज्ञानभोगी, भक्तियोगी, ध्यानयोगी, कोणीहि असो; हे गुरुदेव रानडे यांनीं दाखविले आहे. ( प्रकरण १ परिच्छेद १ पहा. ). त्याचप्रमाणे, प्रत्येक कार्याला भक्ति अवश्य आहेच, असे सांगून तुकाराम व पुरंदरदास यांनी मानवतेच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी, रामानुज व एकनाथ यांनीं सामाजिक प्रगतीसाठी, नानक व रामदास यांनीं राजकारणासाठी आणि ज्ञानेश्वर–कबीरांनी साक्षात्कारात पाऊन पुढे पडावे म्हणून मानवतेची आजन्म सेवा केली, हे स्पष्ट केले आहे.* यांत ज्ञान–कर्म यांचा समन्वय झालाच; त्याचप्रमाणे साक्षात्कार व समाजसेवा यांचाहि झाला. परमार्थाला केवळ उच्च स्वार्थ मानणारांनीं हे ध्यानीं घ्यावे.

**आ) नीतिवाद :–** नीति-विचारांत, सद्‌गुणांची तपशीलवार चर्चा येथे केलेली नाही. ती पुढे ' सद्‌गुणसंपादन किंवा नैतिक सिद्धता ' या प्रकरणांत येईल. येथे त्याची तात्त्विक दृष्टीने चर्चा करून, सर्व सद्‌गुण भक्तीची स्वरूपे, तिचा आविष्कार किंवा परिणाम

---

§ भ. गी. २०४–२०८ * भ. गी. १३६

आहेत, असे दाखविले आहे यांत असेहि दिसून येईल की साधनरूप भक्तीशी संबंध असलेले हे सद्‌गुण अपूर्ण आहेत. त्यांचाच साध्यरूप. परा, अद्वैत भक्तीशी संबंध पाहिला म्हणजे ते पूर्णतेला गेलेले दिसतात, यांतहि नीतीला पूर्णता येण्यासाठी तिला साक्षात्काराकडे वळावे लागते, हे सिद्ध होते. सद्‌गुणांची नुसती यादी करणे महत्त्वाचे नसून, त्यांना एखाद्या मुख्य सद्‌गुणांच्या सूत्रांत ओवण आवश्यक आहे, असे सांगून गुरुदेव रानडे यांनीं भक्तीच्या सूत्रांत त्यांना गोवले आहे. प्लेटो, सेंट ऑगस्टाईन, ख्रिश्चन चर्च यांनींहि असा प्रयत्न केल्याचे त्यांनीं दाखविले आहे. भगवद्‌गीतेंत सद्‌गुणांचा उल्लेख खालील ठिकाणी आला आहे. " **अद्वेष्टा सर्व भूतानाम्** " इत्यादि भक्त लक्षणांत गीता १२–१३ मध्ये; **अमानित्वमदंभित्वम्** " इत्यादि ज्ञान लक्षणांत, गीता १३–७ मध्ये; " **अभयं सत्त्वसंशुद्धि :** " इत्यादि दैवीसंपत्तीच्या लक्षणांत, ।' गीता १६–१ यांत आणि " **शमो दमस्तप : शौचं** " इत्यादि चातुर्वर्णांच्या गीता १८–४२ मधील वर्णनांत. अध्याय १२ व १३ मधील सद्‌गुण, भक्ति व ज्ञान म्हणजे साक्षात्कार या दोन सूत्रांत गुंफलेले आहेत. अध्याय १३ मध्ये " भक्तच मला परमप्रिय " असे ३–४ वेळां म्हटले आहे. अर्थात् साक्षात्कार या ध्येयाचे मुख्य साधन म्हणून भक्ति हाच मुख्य सद्‌गुण होय. पुढे इतर कांही सद्‌गुणांचा-गुरुदेव रानडे यांचा भक्तीशी असलेला–संबंध लावता येईल. १) **करुणा**– देवापाशी दयेची याचना करणे या भावनेचेच दया व करुणा हे एक स्वरूप आहे. ज्यानें देवापाशी दया भाकली त्याने सर्वांना आत्मवत् लेखून त्यांच्यावर करुणा दाखविणे अवश्य आहे. २) **समता**– थोडी-फार समता असल्यावांचून ईश्वरप्राप्ति होणार नाही; साक्षात्कारा-वांचून समतेला पूर्णता येणार नाही. ३) **शुचिता**– भक्तीने, ईश्वराने अंत:करण भरून गेले म्हणजे त्यांत कुकल्पना प्रवेश करूं शकणार नाही, अंत:करण अगदी शुद्ध होईल. देव फार मत्सरी आहे. तो आपल्या सिंहासनावर कोणालाहि बसूं देत नाही. ४) **अहिंसा**– सर्वांना आत्मवत् लेखणें यांत अहिंसा आलीच भूतमात्राला सुखाने

जगण्याचा हक्क आहे, या तत्त्वांत अहिंसेचा जन्म आहे. ५) **आत्मविग्रह किंवा इंद्रियनिग्रह** – आपला प्रियतम जो परमेश्वर त्याची प्राप्ती करून घ्यावयाची असेल, तर इंद्रियाधीन होऊन अनंत विषयांच्या मागे धावता कामा नये. ६) **आसक्ति किंवा अनासक्ति**– देवाबद्दल आसक्ति म्हणजे इतर गोष्टीबद्दल अनासक्ति हे उघडच आहे. ७) **अभय**– उच्च साक्षात्काराच्या आनंदाने अभय अंगीं बाणते. ८) **यज्ञ** - साक्षात्कारासाठी सर्वस्वाचा त्याग अवश्य आहे. त्यावरोबर निष्कामपणे परहित करण्याची त्यागवृत्तिहि येते. ९) **शांति**– उच्च साक्षात्काराचे सर्वश्रेष्ठ प्रमाण म्हणजे शांति. शांति व दिव्य आनंद परस्परावलंबी असून त्यांची वाढ बरोबरच होते. १०) **तेज**– ईश्वरपदाला पोहोंचलेल्या पुरुषांच्या आचारविचारांत शौर्य व्यक्त झालेच पाहिजे. म्हणून भक्तीला शौर्याची (तेजाची) आवश्यकता आहे. ११) **ईश्वर भाव** – तेजापाठोपाठ साक्षात्कारी पुरुषांत सर्वेश्वरत्व प्रकट होते; आपली सत्ता सर्वत्र आहे असे त्याला दिसून येते. तो आपल्या वैभवांत एकाकी, स्वस्थ उभा असतो. कोणीहि त्याच्याशी सलगी करूं शकत नाही; तरी, आपल्या इच्छेप्रमाणे जगाचे कल्याण करण्याचे सामर्थ्य त्याला असते. १२) **परिचर्या (सेवा)**– असे सर्वेश्वरत्व असूनही समाजाची सेवा करण्यांत त्याला मुळीच संकोच वाटत नाही. लोकांत परमार्थ-प्रवृत्ति उत्पन्न करणे आणि साक्षात्कारमार्ग दाखवून त्याला अनुकूल अशी परिस्थिती उपलब्ध करून देणे, यांतच स्वतःला लाभलेल्या साक्षात्काराची परमोच्च सफलता आहे †. आपल्या हिंदी संतावरील ग्रंथांत इतर कांहीं सद्गुण भक्ति या केंद्रभूत सद्गुणांत कसे ओवलेले आहेत हे त्यांनी दाखविले आहे १३) **विवेक** – भक्ति व विवेक यांचे नाते आंधळा व लंगडा असे आहे. विवेकाच्या मार्गदर्शनावांचून भक्ति प्रभावी ठरणार नाही. १४) **सबूरी (धीर)** – ईश्वरदर्शन म्हणजे कांहीं पोरखेळ नव्हे. अगदी थकून जाईपर्यंत धीर धरणे अवश्य १५) **दया–परहित** -

† भ. गी. २१३–२१५

मनुष्याच्या अंतर्यामी ईश्वर आहे. म्हणून प्रत्येकावर दया केली पाहिजे. दयेची परिणती परोपकारांत झालीच पाहिजे. १६) आत्मविद्या– ईश्वराचे स्वरूप निश्चित करून घेणे व त्यामुळे त्यावर भक्ति बसणे, यासाठी आत्मविद्येचे अध्ययन – अध्यापन केलेच पाहिजे. १७) **गुरुपद–पंकज–पूजा** – देवापेक्षाहि संताना अधिक आदर भाव दाखवावा, असे तुलसी–रामायणांत म्हटले आहे. ते मान्य केले नाही तरी, सद्गुरूंविषयी परमादर असल्यावांचून ईश्वराची भक्ति व त्याचे दर्शन, हे शक्य होणार नाही. हे कुलूप उघडण्याची **"सद्गुरु–कृपा हेचि किल्ली"** आहे. १८) **मंत्रजप व गुणगान** – हे दोन गुण व भक्ति परस्परावलंबी व परस्परपोषक आहेत; मंत्रजप व गुणगान यावांचून भक्ति वाढणार नाही आणि अंतःकरणांत भक्तीचे बीज असल्यावांचून मंत्रजप व गुणगान करण्याची इच्छा होणार नाही. १९) **रामभरोसा– सख्यभक्ति किंवा शरणागति**–मानवी जगांत किंवा निसर्गांत जे जे घडते ते सर्व ईश्वराच्या इच्छेने घडते; त्याच्या इच्छेवांचून कांहीं होऊं शकत नाही. ईश्वर परमकृपाळु व सर्वशक्तिमान आहे. तो करतो ते चांगलेच असले पाहिजे. हा तर्कशुद्ध आध्यात्मिक सिद्धांत अनुभवाने पटून जे घडेल त्यांत आनंद मानण्याची तयारी झाली नाही, तर भक्तीचा उपयोग काय ? भक्तीची परिणति अशा राम-भरोशाच्या वृत्तींत झाली पाहिजे. §

इ) **अतिनीतिवाद** – नैष्कर्म्य, निस्त्रैगुण्य व स्थितप्रज्ञता यांचा अंतर्भाव गुरुदेव रानडे यांनीं अतिनीतिवादांत केला आहे. नैष्कर्म्य म्हणजे सर्व कर्म व धर्म यांचा त्याग. ईश्वराला शरण जा त्याचे ध्यान कर म्हणजे कोणत्याहि कर्माचा लेप लागणार नाही (भगवद्गीता १८. ५६; ६६). याप्रमाणे कर्म व धर्म यांच्यापलिकडे जाणे हीच उच्चतम नीतिमत्ता होय. ‡ भक्ति व साक्षात्कार यावांचून

---

§ हिं. सा. ९५–९७ ‡ भ. गी. २१५–२१६.

नैष्कर्म्यसिद्धि होऊं शकत नाही, त्याचप्रमाणे त्रिगुणातीत होण्याचे (निस्त्रैगुण्यसिद्धीचे) एकमेव साधन म्हणजे भक्ति व साक्षात्कार‡ (भगवद्गीता १४. २६). साक्षात्कार म्हणजे आत्मानंद. यावरून नैष्कर्म्य व निस्त्रैगुण्य ही स्वतंत्र नैतिक ध्येये नसून, आत्मानंदाच्या उच्चतम नैतिक ध्येयांत ती अंतर्भूत आहेत, हे सहज दिसून येईल

ई) **स्थितप्रज्ञता**- गीतेंत प्रतिपादिलेली उच्चतम नैतिक अवस्था म्हणजे स्थितप्रज्ञता होय. त्यांत नीति-अतिनीति-आत्मानंद या तीनहि सिद्धांतांच्या छटा आहेत; पण त्यांत आत्मानंद हा मुख्य भाग आहे. स्थितप्रज्ञ पुरुष इंद्रियापासून मन निवृत्त करतो इंद्रियांचा व विषयांचा त्याच्यावर प्रभाव पडूं शकत नाही; (भगवद्गीता २. ५८-६७-७०). देहात असतांनाही तो कामक्रोधांचे कठोर आघात व आवेग सोसूं शकतो; गाय, कुत्रा पंडित, श्वपच या सर्वं ठिकाणी त्याला एकच दर्शन होते; त्याच्या ठिकाणी समता असते; (भगवद्गीता ५.१८-१९; २३). शुद्ध साक्षात्काराचे त्याच्या ठिकाणी दिसणारे लक्षण म्हणजे त्याच्याभोवती आनंदमय ब्रह्म फिरत असते; मागंपुढे, उजवीकडे-डावीकडे, तो पाहील तिकडे त्याला ब्रह्मच दिसते. "**अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम्।**" (भगवद्गीता ५.२६). "**हरि हा भोवे भोवताला.**" असे तुकारामहि म्हणता. अशा सर्वत्र ईश्वरदर्शनाने साधक स्थितप्रज्ञ होता*. या लक्षणावरूण आत्मानंद दृष्टीसमोर यतो, कारण आत्मदर्शन व आत्मानंद एकच हे मागे पाहिलेच आहे.

ड) आत्मानंद - स्थितप्रज्ञाच्या सर्व लक्षणात आत्मानंदालाच मुख्य स्थान दिले पाहिजे. गुरुदेव रानडे यांनी आत्मानंदाचो तीन लक्षणे दिली आहेत. १) तो ब्रह्मसंस्पर्श, ब्रह्माच्या प्रत्यक्ष, अपरोक्ष अनुभवातून येणारा आनंद असला पाहिजे; (भगवद्गीता ६. २८). २) त्यांत संत व ब्रह्म यांचे ऐक्य झालेले असते व या ऐक्याच्या

‡ भ. गी. २१८-२१९ * भ. गी: २१९-२२२

आनंदाने त्याला परमानंद लाभतो; (भगवद्गीता ५. २४) आमानंदच ब्रह्म होतो (भगवद्गीता) ६. २७). मागील प्रकरणांत स्वसंवित् म्हणजे परतत्त्व, ब्रह्म हे दाखविले आहे. त्याचप्रमाणे येथे आत्मानंद, म्हणजेच परतत्त्व, हे सिद्ध झाले आहे †. सारांश, आमानंद, स्वसंवित्, परतत्त्व, ब्रह्म सर्व एकच. शेवटी, उच्चतम ज्ञान व उच्चतम नैतिक ध्येय यांचा संगम अद्वैतसाक्षाकारांत होऊन ज्ञान–आनंद–साक्षात्कार असा पवित्र त्रिवेणी संगम दृष्टीस पडतो.

१०) **आत्मानंदांत सर्व सद्‌गुण** – आत्मानंद ही अभेदानुभूति, अभेदावस्था आहे. तिच्यांत द्वैत, पैलू असे कांही नाही. परंतु त्या अनुभूतीमुळे जीवन – मुक्ताच्या जीवनांत, त्याच्या शरीर–मन बुद्धि इत्यादिकांतून, सर्व सद्‌गुणांचा आविष्कार होतो. त्याचे मानसशास्त्राच्या दृष्टीने थोडे विश्लेषण करणे इष्ट वाटते. सर्व दुर्गुण, अहंकार, देहतादात्म्य व वासना यांची अपत्ये आहेत. सुखाच्या प्राप्तीसाठी दुर्विचार व दुराचार घडतात, हे सहज मान्य होईल. ते सिद्ध करण्याचे कारण नाही. आत्मानंदाने–नित्य–निरतिशय आनंदाने – सर्व कामना, वासना नष्ट होतात, हेहि उघड आहे. अंतःकरण अखंड आनंदाने भरलेले असल्यावर त्यांत वासना कोठून उद्‌भवणार ? आत्मानंदांत देह व इंद्रिये यांचाच विसर पडतो; मग विषयांचे स्मरण व त्यांच्या प्राप्तीसाठी कर्म यांचा संबंधच कसा उरणार ? अहंकाराचा नाश, वासनांचा नाश, या लक्षणाबरोबर ब्रह्माशी ऐक्य झाल्याने सर्वात्मभाव हे आत्मानंदाचे आणखी एक लक्षण आहे. या तीन लक्षणांतून जीवन्मुक्ताच्या जीवनांत सर्व सद्‌गुणांचा आविष्कार होतो, कांहीं उदाहरणांवरून हे पाहता येईल. अ) अमानित्व, अदभित्व, अनहंकार यांत देहतादात्म्याचा अभाव अंतर्भूत आहे. आ) अनासक्ति, अचापल, विषयवैराग्य, दम, आत्मनिग्रह हे सद्‌गुण वासनानाशावांचून येणार

† भ. गी. २२३–२२४

नाहीत. इ) अभय, अक्रोध, अहिंसा, मैत्री, करुणा, दया, क्षमा, आर्जव यांत सर्वात्मभावाचे दर्शन होते.

आत्मानंदांत सर्व सद्गुण पूर्णतेला जातात, त्याचप्रमाणे दुर्गुण ओसरणे व सद्गुण वाढणे हे कार्यहि शास्त्रशुद्धरीतीने आत्मनंदाच्या वाढीबरोबरच होते. उच्च आनंद लाभल्यावर त्याच्या लाभासाठीच मनुष्य हीन सुख सोडतो. ते सुटते. ज्ञानेश्वरी (अ. १२. १०६–१०९) मध्ये हा विचार स्पष्ट केला आहे, " अर्जुना तूं रोज थोडा वेळ माझे ध्यान करीत जा. मग त्यापासून तुला (माझ्या साक्षात्काराचे) थोडें सुख होऊं लागेल. त्या सुखामुळे विषय नकोसे होतील. याप्रमाणे सुख व विषय-निर्वेद वाढत वाढत तूं मला येऊन मिळशील, ईश्वरच होशील §. " राजयोगी वीर ध्यानाच्या खड्गाने अहंकारादि सर्व शत्रू मारून ब्रह्मस्वरूप होतो, असे भगवद्गीता अ. १८.५३ मध्ये, म्हटले आहे. ज्ञानेश्वरी अ. १८.१०६७ मध्ये सर्व सद्गुण अशा वीराचे मांडलिक होऊन रहातात असे सांगितले आहे. अपूर्ण सद्गुण साक्षात्काराचे साधन, त्यांना पूर्णता साक्षात्कारानेच लाभते, हा सिद्धांत वर पुन्हा एकदा दिसतो. साक्षात्कार व सद्गुण यांच्या संबंधाचे अत्यंत उद्बोधक व सूक्ष्म विवेचन ज्ञानेश्वरी अ. १८.९९–१२२५; अ. १२ १४४–१८९ व दासबोध ८.९ यांत सांपडेल, ते वाचकांनीं मुळांतून अवश्य वाचावे.

११) **आत्मस्वातंत्र्य** :– याविषयी गुरुदेव रानडे सांगतात, " पूर्ण नसले तरी मनुष्याला कांहीं प्रमाणांत, विशेषत: नैतिक व आध्यात्मिक क्षेत्रांत, स्वातंत्र्य आहे. आपल्या वासना शुभमार्गाने जायला लावण्याचे सामर्थ्य त्याला आहे. परमार्थ साधन करून ते वाढविता येते. शेवटी पूर्ण साक्षात्कार झाल्यावर मात्र त्याला खरे पूर्ण स्वातंत्र्य लाभते.† "

---

§ म. सा. ११५ † उप. २२९–२३०;

**१२) पापपुण्यातीत कोण होतो :–** गुरुदेव रानडे यांच्या मते ब्रह्म हे सद्गुण व निर्गुण यांच्यापलीकडे, अतीत आहेच; तसेच ते नीति-अनीती, सद्गुण-दुर्गुण यांच्याहि अतीत आहेच. परंतु ज्याप्रमाणांत मनुष्य ईश्वरस्वरूप, ईश्वरांत लीन होईल, त्याप्रमाणांत तोहि नीति-अनीतीच्या पलीकडे जाईल.*

आत्मस्वातंत्र्य व अतिनीतिवाद यांचा साक्षात्काराशी अतिनिकट संबंध आहे. आत्मसाक्षात्कार, आत्मानंद व त्यापासून स्थितप्रज्ञता, उच्चतम नीति, असे अतिसुंदर विवेचन अ. २.३६६-३६७ मध्ये दिसते.

**" ऐसा आत्मबोधें तोषला । जो परमानंदे पोखला ।**
**तोचि स्थिरप्रज्ञु भला । वोळख तूं ।।**
**तो अहंकारातें दंडुनी । सकल कामु सांडोनी ।**
**विचरे विश्व होऊन । विश्वाचि माजीं ।।**

यांत ब्रह्मत्व म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य आलेच. आत्मानंदाने अहंकार व वासनांचा नाश, ब्रह्मत्व पावल्याने सर्वात्मभाव, (विश्व होणे) हे विचारहि दुसऱ्या ओवींत आले आहेत, तो विश्व होऊन देहाने विश्वांत फिरतो, अर्थात् ही स्थितप्रज्ञाची लक्षणे म्हणजे जीवन्मुक्ताचीच लक्षणे होत.

* उप. २२४–२२५

## प्रकरण ४ थे : साक्षात्कारवाद (Mysticism)

१) **व्याख्या :–** या प्रकरणांत साक्षात्काराचा तात्त्विक दृष्टीने विचार करावयाचा आहे. साक्षात्काराचे मुख्य साधन, त्याला अनुषंगिक गोष्टी, साक्षात्काराचे स्वरूप व त्याचे परिणाम यांचे विवेचन पुढील सर्व प्रकरणांत होईल. साक्षात्कार म्हणजे ईश्वराची प्रत्यक्ष, अपरोक्ष, प्रातिभ अनुभूति, आणि ईश्वराचे असे दर्शन होऊं शकते, तेच जोवनाचे ध्येय आहे. अशी भावना म्हणजे साक्षात्कार-वाद. त्यांत, शांतपणे, समाधानाने ईश्वराचा आनंद भोगणे, ही कल्पना अंतर्भूत आहे. हाच उच्चतम भाव; हेच उच्चतम ध्येय होय.† " असे गुरुदेव रानडे यांनीं म्हटले आहे. "साक्षात्कारी पुरुषाला आत्म्याचे असे दर्शन होऊं शकते. अंतरी असलेला आत्मा बाहेर काढून त्याचे दर्शन घ्यावे ‡."

२) **आत्मा अज्ञय म्हणजे काय :–** आत्मा बुद्धि–मन–इंद्रियातीत आहे; तोच एक ज्ञाता आहे; मग त्याचे ज्ञान कोणास व कसे होऊं शकेल ? मग त्याचा साक्षात्कार कसा करून घ्यायचा ? आत्मा पूर्णतः अज्ञेय आहे, तो केवळ श्रद्धेचा विषय आहे, असे गुरुदेव रानडे यांचे मत नाही. मनबुद्धीच्या वरची प्रतिभा (Intuition) नांवाची एक शक्ति आहे, तिला आत्म्याचा अनुभव येऊं शकतो. तोच अज्ञेय आहे, याचा अर्थ आणखी एका दृष्टीने त्यांनीं स्पष्ट केला आहे. आत्म्याचे सारभूत स्वरूप, लक्षण काय आहे ते कळत नाही. तो आहे हा अनुभव येतो. त्याचप्रमाणे सामान्यज्ञानांत ज्ञाता–ज्ञेय–ज्ञान हे भिन्न घटक असतात; तसे आत्म्याच्या ज्ञानांत नसतात. म्हणून त्याला अज्ञेय म्हटले आहे. पण आत्म्याला दुसरा ज्ञाता नसला, तरी आत्मा

---

† म. सा. प्र. १ ‡ उप. २५०

आत्म्याला जाणूं शकतो; ज्ञाता व ज्ञेय असे स्वतःचे दोन भाग करण्याचे महान सामर्थ्य त्याला आहे. स्वसंवित् हे त्याचे नांव आहे. हे आत्मज्ञान, ही स्वसंवित् शक्य आहे, इतकेच नव्हे तर हेच एकमेव सत्यतत्त्व आहे. यांत सत् व चित्, सत्यतत्त्व व ज्ञान ही एकरूप आहेत ‡. हे विवेचन परतत्त्वज्ञान या प्रकरणांत आलेच आहे; हाच आनंदहि आहे, हे प्रकरण ३ मध्ये पाहिले आहे. याप्रमाणे सत्–चित्–आनद हें एकच सत्यतत्त्व आहे.

३) **प्रतिभाशक्ति :–** नामस्मरण साधनाने जागृत होणारी ईश्वराचे दर्शन घेऊं शकणारी, शक्ति म्हणजे प्रतिभा. ती बुद्धि भावना–क्रियाशक्ति यांच्या वरची, पलीकडची आहे. परंतु तिचा या तीन शक्तींशी विरोध नाही; या तीनहि शक्तींची परमार्थाला आवश्यकता आहे. मात्र, प्रतिभा या सर्वांच्या पाठीशी असली पाहिजे. साक्षात्काराचे निश्चित तत्त्वज्ञान आहे. त्यांत प्रतिभेला बुद्धीचे साहाय्य होते. साधन दीर्घकाल निश्चयाने करावे लागते; म्हणून **क्रियाशक्ती** अवश्य आहे. विपुल, शुद्ध, देवाकडे वळविलेल्या **भावना** असल्यावांचून साक्षात्कार शक्यच नाही. ज्ञाता व ज्ञेय याचे ऐक्य भावनांमुळेच होते. मात्र भावना बुद्धीच्या नियत्रणाखाली पाहिजेत. पण या तीन शक्ती परतत्त्वाशी देवाशी संबंध जोडण्याला पुऱ्या पडत नाहीत. म्हणून शास्त्रे, तत्त्वज्ञान किंवा कला या क्षेत्रांतहि कांही उच्चांक गांठावयाचा असेल तर प्रतिभेसारखी शक्ती लागतेच. कारण यासाठीहि परतत्त्वाशी संबंध जोडावा लागतो. साक्षात्कारासाठी तर परतत्त्वस्पर्श अत्यंत अवश्य आहे; म्हणून प्रतिभाशक्ति मानावीच लागते. प्रतिभेने होणारे ज्ञान प्रत्यक्षासारखे असते, बुद्धि ज्ञानाचे स्वरूप विकृत करते. प्रतिभेने होणारे म्हणून आत्मानुभवांना प्रातिभ म्हणतात*. त्याची आणखी दोन लक्षणे आहेत. ते अतींद्रिय व अंतःस्फूर्त आहे. "आंधळ्याने देखिले, बहिऱ्याने ऐकिले " अशी संतांची वचने सुपरिचित आहेत. अंतःस्फूर्त

---

‡ उप. १९८–२०१ * म. सा. प्र. १–२

म्हणजे बाहेरून कांहीं न येता आंतून प्रेरित होणे. बाह्य विश्वाचे अनुभव बाह्यःस्फूर्त असतात. तेजाच्या व नादाच्या लहरी डोळ्याच्या व कानाच्या मज्जातंतूतून मेंदूला पोहोंचतात व तेथे ज्ञानकेंद्रांत दर्शन–श्रवण हे अनुभव येतात. प्रातिभ अनुभवांत बाहेरून कांहीं येत नाहीं. नामस्मरणाने जागृत झालेली आत्मशक्ति पाठीच्या कण्यांतील मज़्जारज्जूच्या ( सुषुम्ना ) मार्गाने मेंदूतील ज्ञानकेंद्रांना पोहोंचते. तेथे आत्मानुभव येतात. म्हणून त्यांना अंतःस्फूर्त म्हटले आहे. प्रतिभा ही शंकराचार्यांच्या " **अनुभूति** " सारखी शक्ति आहे. शब्द–स्पर्श–रूप–रस–गंध या पांच इंद्रियज्ञानासारखे, पण अतींद्रिय असे हे अनुभव असतात.

४) **आत्मानुभवाच्या सत्यतेची प्रमाणे** – प्रातिभ अनुभव म्हणजे केवळ कल्पनाविलास, भ्रम किंवा इंद्रियविकृतीचे परिणाम नाहीत, ते सत्य आहेत, याला प्रमाणे कोणती आहेत ? गुरुदेव रानडे यांनी प्रत्यक्ष, अव्यव ( अखंडत्व ) व सुसुख ( आनंद ) ही तीन प्रमाणे दिली आहेत. ( भगवद्गीता ९.२ ) १) शरीरशास्त्राच्या दृष्टीने आत्मानुभव अंतःस्फूर्त, **प्रत्यक्ष** इंद्रियज्ञानासारखे स्पष्ट, पण अतींद्रिय असतात याचा विचार वर झालाच आहे. २) मानस-शास्त्राच्या दृष्टीने **अखंडत्व** म्हणजे स्थल, काल, किंवा जागृति–स्वप्न सुषुप्ति तूर्या या अवस्था, यांनींहि त्यांत खंड पडता कामा नये; त्यांचे सातत्य राहिले पाहिजे. अखंडत्वांत अनुभवांची वाढहि अभिप्रेत आहे. त्या अनुभवाला सोडले तरी त्याने आपल्याला सोडता कामा नये. एक थोर सत्पुरुष सांगत असत की आपला देह पडला तरी आपणाला ऐकूं येणारा अनाहत नाद, दिसणारे दिव्यरूप ही अखंड शाश्वत असतात. आंतबाहेर डोळे मिटून, उघडे ठेवून एकाच प्रकारचे दर्शन झाले पाहिजे, हाहि अखंडत्वांत विचार आहे$\beta$. ३) नीतिशास्त्राच्या दृष्टीने साक्षात्कारापासून होणारा **आनंद** हे त्याचे निर्विवाद प्रमाण आहे.

---

$\beta$ भ. गी. २३२–२३३

आत्मानुभव व आनंद एकच, त्याचे विस्तृत विवेचन मागील प्रकरणांत झालेच आहे. सुखवादाचे उच्चतम, निर्दोष, पण सुखवादाला कधीच न दिसलेले स्वरूप म्हणजे आत्मानंद.

५) **साक्षात्कारशास्त्राच्या सत्यतेची प्रमाणे** :– आत्मानुभवांच्या सत्यतेची अंत:प्रमाणे, अनुभवांत दिसणारी लक्षणे वर सांगितली. पण असे अनुभव येतात, याला म्हणजे साक्षात्कार-शास्त्राच्या सत्यतेला प्रमाणे आहेत का ? अशी प्रमाणे गुरुदेव रानडे यांनीं दिली आहेत. त्यांत तर्कशास्त्राच्या दृष्टीने, सर्व देशांतील, कालांतील, धर्मांतील संतांच्या अनुभवांतील **सार्वत्रिकता**, (Universality) एकरूपता, हे अत्यंत महत्वाचें प्रमाण आहे. उपनिषत्कालापासून आजपर्यंत भारतीय व इतर देशांतील साक्षात्कारी पुरुषांनीं. आपले आत्मानुभव, त्यांचे परिणाम, आत्मानुभवांच्या प्राप्तीचे साधन याविषयीं जे वर्णन केले आहे, त्यांत विलक्षण साम्य आहे. सर्वांना **एकाच सत्यवस्तूचा अनुभव** आला असला पाहिजे. म्हणूनच हे साम्य दिसते. सर्वांच्या अनुभवाच्या मुळाशी एकच सत्यतत्त्व असले पाहिजे. भ्रम, कल्पना–विलास यांत एकरूपता असणे अशक्य आहे. या सार्वत्रिकतेवरूनच त्याचे **अवश्यभावित्व** (Necessity), **वस्तुनिष्ठत्व** (Objectivity), (कल्पना नव्हेत) व **प्रमाणभूतत्व** (Validity) ठरते §. गुरुदेव रानडे यांनी अन्य धर्मांतील संतांची अशी कांहीं वचने उध्दृत केली आहेत ‡. प्रस्तुत पुस्तकाच्या " साक्षात्कार " व " साक्षात्काराचे परिणाम " या प्रकरणांत आपल्याला अशा एकरूपतेचे व सार्वत्रिकतेचे दर्शन घडेल. या विषयाचा थोडा विचार पहिल्या प्रकरणांत झालाच आहे.

६) **साक्षात्काराचे भव्योदात्त परिणाम** :– जीवनमूल्य–शास्त्राच्या दृष्टीने, साक्षात्काराचे जीवनावर होणारे थोर सुपरिणाम हे त्याच्या सत्यतेचे निसंदिग्ध प्रमाण आहे. जीवनाला धन्यता

---

§ हिं. सा. प्र. ८; ‡ म. सा. प्र. १४–१५

प्राप्त करून देणारे ते सत्य, उपयुक्त ते सत्य, असे एकमत आहे. (Pragmatism). त्या दृष्टीने साक्षात्काराचे सत्यत्व ठरते. साक्षात्काराने वुद्धि–भावना–क्रियाशक्ति यांचा होणारा विकास व साक्षात्कारी पुरुषाचे आत्मतृप्त, परोपकारी, नीतिमान्, शुद्ध जीवन, या परिणामावरून साक्षात्काराची सत्यता सिद्ध होते. सर्व साधकांत तीनहि शक्ती पूर्ण विकसित होतात असे नाही; पण एकीचा उच्च व इतरांचा थोडाफार विकास होतोच. ज्ञानेश्वर प्लॉटिनस्, ऑगस्टाईन हे साक्षात्कारी संत म्हणजे **बुद्धीच्या विकासाची** उदाहरणे होत. **प्रभावी बुद्धि व विचारांची स्पष्टता** ही साक्षात्काराच्या सत्यतेची प्रमाणे होत. ईश्वराच्या संबंधी बौद्धिक प्रेमाने भावनांच्या पलीकडे गेले पाहिजे, असे स्पायनोझा सांगतो. सर्व **भावनांची परिणति** ईश्वर–प्रेमांत झाली पाहिजे. देवाबद्दल **अनन्य प्रेम** हे साक्षात्काराच्या सत्यतेचे प्रमाण आहे व्यक्तीची व समाजाची **नैतिक उन्नत्ति** घडवून आणण्याचे सामर्थ्य साक्षात्कारांत निश्चित आहे. वैयक्तिक उच्च नीति व परोपकार परमार्थ जीवनाला अत्यंत अवश्य आहेत. अद्वैतवादी तत्वज्ञ नीतीची अपेक्षा करतात. हा आक्षेप अगदी खोटा आहे. ज्ञानेश्वरी अ. १६.६८–२१२ मध्ये ज्ञानेश्वरांनी सद्गुणांचे केलेले विवेचन अद्वितीय आहे हे सर्व सद्गुण साक्षात्काराला अत्यंत अवश्य आहेत, असे निक्षून सांगणारे ज्ञानेश्वरांसारखे संत नीतीची उपेक्षा करतील काय ? "ईश्वर–दर्शनाने भक्तांत ईश्वरासारखेच सद्गुण निर्माण होतात. देवाचे ध्यान केले म्हणजे त्याची थोरवी व व आपली क्षुद्रता समजू लागते. देवाला समर्पण केलेल्या नसतील त्या सर्व गोष्टी तुच्छ वाटतात. देवाशी संस्पर्श झाल्यावर त्याचे प्रातिभज्ञान होते व त्याचे गुण संतांमध्ये उरतात, ईश्वराचे ज्ञान प्रसाद व सामर्थ्य यांचे ज्ञान होते व संतांचे जीवनहि सद्गुण संपन्न होत," असे सेंट टेरेसा सांगते. संतांच्या सद्गुणांचे वर्णन करतांना रामदासांनीहि हाच सिद्धांत सांगितलेला आहे. समाजाला संतांचा काय उपयोग ? या प्रश्नाला उत्तर हे की समाजाला

ज्याचा उपयोग होत नाही, तो साक्षात्कारी संतच नव्हे. प्रकृतिभेदाप्रमाणे कोणी समाजांत जाऊन कार्य करील, कोणी कार्यांत फारसा सांपडणार नाही, परंतु ईश्वराचे दर्शन व थोरवी याकडे त्यांच्यामुळे मानवाचे सतत लक्ष वेधले जावे, हा त्यांचा समाजाला होणारा उपयोग फार मोलाचा आहे. कांहीं संत ॲरिस्टॉटलच्या देवाप्रमाणे स्वतः विशेष कांहीं कार्य न करता केवळ चिंतनाने जगाला हलवूं शकतात. प्रकरण १, पृ. ३९ वरील सुरुवातीला उद्धृत केलेला उतारा संतांच्या समाजकार्याबद्दल फार बोलका आहे. प्रकरण ३ मध्येहि हे विवेचन झालेले आहे. शेवटी, संताला आपल्या अनुभवाची वाटणारी निःसंदेह सत्यता, हे स्वानुभवाचे प्रमाण उरत नाही. असा पुरुष आपल्या अंतःप्रेरणेशी प्रतारणा करीत नसेल, सदाचार, सद्गुण यापासून ढळत नसेल, त्याचे सर्व जीवन देवाचे चिंतन व समाजाचे कल्याण याला वाहिलेले असेल; आपल्या साक्षात्काराची वाढ म्हणजे या दोन गोष्टी करण्याची वाढती संधी, असे त्याला वाटत असेल, तर साक्षात्कार–साधन करून त्याने ईश्वरप्राप्ती करून घेतली, याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. या प्रमाणांच्या, म्हणजे ईश्वराचे प्रत्यक्ष, प्रतिदर्शन यांच्या तुलनेने वरील इतर प्रमाणे गौण, पण मुख्य प्रमाणाला साह्यभूत अशी आहेत. साक्षात्काराने प्राप्त झालेले ईश्वरत्व हेच साक्षात्काराचे प्रमाण आणि त्याची सत्यता ठरविणारा एक साधकाचा आत्माच.* संतांच्या वचनांत साक्षात्काराचे परिणाम म्हणून ही सर्व प्रमाणे आली आहेत. त्या प्रकरणांत त्यांची आणखी चर्चा होईल.

ज्यामुळे जीवन दिव्य होते, तो परतत्त्वज्ञानातील सिद्धांत सत्य. या गुरुदेव रानडे यांच्या प्रकरण १ मध्ये दिलेल्या व्याख्येप्रमाणे साक्षात्कारवाद हाच परतत्वज्ञानाचा सत्यसिद्धांत, हे वरील विवेचनावरून ठरते तसेच, आत्मानुभव म्हणजेच परमसत्यतत्वाचा अनुभव, हेहि वरील प्रमाणावरून सिद्ध होते. या प्रमाणांत आणखी

---

* म. सा. प्र. २९–३०.

उपयोग हा की, यावरून आपले अनुभव सत्य की भ्रम हे साधकाला निश्चित करता येईल. दृश्य जगांत असे भ्रम आहेत तसेच परमार्थातहि असतात. म्हणून अनुभवांची पारख करणे अवश्य असते.

**७) साक्षात्कारविषयक कांहीं महत्वाचे मुद्दे :– अ) धर्म व तत्वज्ञान यांचा संबंध :–** ईश्वराचे अस्तित्व व त्याच्याशी मानवाचा व निसर्गाचा असलेला संबंध, हा अतिमहत्त्वाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करताना, तत्वज्ञान बौद्धिक दृष्टीने विचार करते, धर्म कृतीच्या दृष्टीने त्याकडे पाहतो. याप्रमाणे तत्वज्ञान व धर्म यांत विरोध नसून ते परस्परांना पोषक आहेत. तत्त्वज्ञान त्याची बौद्धिक चौकट तयार करते; धर्माकडून त्यांत भरावयाचे साहित्य मिळते. केवळ तत्त्वज्ञान म्हणजे रिकामी चौकट; केवळ धर्म म्हणजे आकार नसलेले साहित्य ठरेल. वरील प्रश्नाचे उच्चतम उत्तर शोधण्यासाठी या दोहोंचा समन्वय केला पाहिजे. येथे धर्म शब्दाचा अर्थ केवळ अंधश्रद्धा व तन्मूलक आचार हा नव्हे, धर्म म्हणजे देवाचे व मानवाचे प्रत्यक्ष, जिवंत, जिव्हाळ्याचे नाते. या देव–मानवाच्या नात्यांत कांहीं वैशिष्ठ्य, अलौकिकता असेल, तर जेथे जेथे मानव आहे तेथे तेथे ते असलेच पाहिजे. अमुक धर्मातच ते आहे, असे म्हणणे बरोबर नाही. सत्यधर्म हा सर्व धर्मपंथांत अनुस्यूत असलेल्या, देशकालातीत, सारभूत गोष्टीकडे पाहणारा आहे. धर्म (व धर्मपंथ) देशकालांनीं मर्यादित, बाह्य गोष्टीकडे पाहणारा आहे. म्हणून सत्यधर्म व धर्म (आणि धर्मपंथ) यांतील भेद लक्षांत ठेवला पाहिजे. भ्रममूलक श्रद्धा व संशयवाद या दोन्हीं दोषांपासून सत्यधर्म दूर ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य तत्वज्ञांच्या साह्याने होईल.

**आ) सद्गुरुंची आवश्यकता :–** " अहं ब्रह्मास्मि " असा स्वतः ब्रह्म असल्याचा आत्मानुभव असलेल्या सद्गुरुंकडून मिळालेल्या नामाच्या जपानेच साक्षात्कार होऊं शकतो, त्याशिवाय नाही, असे गुरुदेव रानडे यांचे स्पष्ट मत आहे. प्लेटोच्या शब्दांत, " पुस्तकांतून हे ज्ञान होणार नाही; कारण, पुस्तकांतील ज्ञान निर्जीव तर सद्गुरु-

मुखाने आलेल्या ज्ञानाच्या मागे त्यांचे पूर्णतेला पोहोंचलेले जीवन असते. " हे ज्ञान इतके सूक्ष्म व गूढ असते की ते केवळ स्वतःच्या प्रयत्नाने मिळणे शक्य नाही. सद्गुरु त्या मार्गाने गेलेले असल्यामुळे शिष्याला येणाऱ्या अडचणी दूर करून पायरी पायरीने, त्याला शिखराला पोहोंचवू शकतात. पारमार्थिक गुरुत्वाकर्षणाच्या नियमाने साधन करणाऱ्या शिष्यांत सद्गुरुंचे आत्मानुभव आपोआप उतरतात. ते ईश्वराचे अलक्ष्यरूप पाहतात; अनाहत नाद ऐकतात; दिव्य अमृत, रस प्राशन करतात आणि शिष्यालाहि हे दाखवितात, ऐकवितात-पाजवितात. साक्षात्कार होण्यासाठी सूत्राचे बल, म्हणजे सद्गुरुंकडून त्यांच्या कृपेने मिळालेले नाम, अवश्य आहे. त्याचे स्मरण करून, ईश्वरकृपा झाली तर, शिष्यालाहि उच्च साक्षात्काराने गुरुपदाचा अधिकार येईल. गुरुला साक्षात्कार नसला तर, शिष्यालाहि होणार नाही. गुरुला साक्षात्कार नसूनहि शिष्याला कधीकधी आत्मानुभव येतात पण ते मर्यादित असतात. " सद्गुरुंची लक्षणे व कार्य यांचे विवेचन पुढे ८ व्या प्रकरणात येईल.§

---

§ गुरुदेवांच्या निर्याणानंतर, ज्यांना अधिकारी सद्गुरु भेटले नाहीत असे मुमुक्षु, गुरूदेवांनाच सद्गुरु मानून नाम घेतात, ती पद्धत अशी–आपल्याला ज्याची भक्ति करायची आहे अशा देवाचे आपल्याला आवडणारे नाम मुमुक्षु निवडतो व ते कागदाच्या चिठ्ठीवर लिहून गुरुदेवांच्या समाधीसमोर ती चिठ्ठी ठेवतो. नंतर गुरुदेवांची तो कळकळीने अंतःकरणपूर्वक प्रार्थना करतो " आपण देहाने गेला असला तरी ब्रह्मरूप झाल्याने विश्वांत भरलेले आहांत. माझ्याहि अंतःकरणांत आपण आहांत. हे नाम घेण्याची पवित्र प्रेरणा आपणच मला दिली आहे, असे मी अंतःकरपूर्वक मानतो. म्हणून आपण माझे गुरू असून मी आपला नम्र शिष्य आहे. मी शिष्यधर्म पाळीन आपण माझ्यावर कृपा करावी. " ही प्रार्थना झाल्यावर मुमुक्षु ती चिठ्ठी उचलून घेतो. पुढे त्याच नामाचे तो स्मरण करूं लागतो. नामस्मरण करण्याची प्रक्रिया त्याला गुरुबंधूंच्याकडून समजून घेता येते. या प्रकारे साधन करणाऱ्या साधकांना पारमार्थिक लाभ झाल्याचेहि दिसून येते. सांप्रदायांत रूढ असलेली ही पद्धत वाचकांच्या केवळ माहितीसाठी सादर केली आहे. त्यांत कोणताहि सिद्धान्त सांगण्याचा हेतु नाही. इतर सांप्रदायांतहि पद्धत ही रूढ आहे

**इ) गाढ निराशेची रात्र :–** साधकाच्या मार्गांत विघ्ने फार. अनेक विकल्प, शंका, विकट प्रसंग साधकाच्या मनांत उद्‌भवतात व साध्य मृगजळाप्रमाणे दूरच आहे, असे वाटून, तो क्षणोक्षणी निराशच होतो. ही निराशेची स्थिति म्हणजे आत्मारूपी सूर्याच्या उदयापूर्वीची काळोखी रात्र होय. या स्थितींत जागृत राहून जो सूर्योदयाची वाट पाहतो, त्यालाच आपले अंतिम साध्य गांठता येते. या स्थितींत मात्र मनाची भयंकर तळमळ चालू असते. असे या निराशेच्या गाढ रात्रीचे वर्णन तुकाराम–वचनामृतांच्या प्रस्तावनेंत (पृ. ८) गुरुदेव रानडे यांनीं केले आहे. हिला ख्रिश्चन धर्मांत Dark Night of the Soul म्हणतात. गुरुदेव रानडे यांच्या मते ही अवस्था सर्व धर्मांच्या व धर्मपंथांच्या साधकांत आढळते; ती परमार्थ जीवनाचे एक अटळ अंग आहे; बहुतेक सर्व संतांना ती भोगावी लागलेली आहे; दुर्दैवाचे धक्के ज्यांना सोसावे लागले नाहीत असे ज्ञानेश्वर, प्लॉटिनस यासारखे साधक विरळा. या रोगट अवस्थेचा अनुभव साधकाला आवश्यक आहे. त्यावांचून आध्यात्मिक आरोग्य लाभणार नाही व त्याचे महत्त्वहि कळणार नाही. †

**ई) ईश्वराचे प्रेम व वैषयिक प्रेम :–** भक्ताने स्वतःला पत्नि व देवाला पति समजून त्यावर प्रेम करणे याला मधुराभक्ति म्हणतात. गुरुदेव रानडे यांचा तिला पूर्ण विरोध आहे. त्याचप्रमाणे भक्तीला शृंगारिक उपमा देणे हेहि त्यांना मान्य नाही. ते म्हणतात, "वैषयिक उपमा ईश्वरभक्तीला व आत्मानंदाला लावता येणार नाहीत. त्या सुखाच्या दोन भिन्न जातीच आहेत. आत्मानंदाच्या तुलनेने विषयानंद अतिक्षुद्र आहे. या उपमांत आणखी एक असा दोष आहे, की विषयसुखांत रमलेल्या लोकांना उगाच असा भ्रम होईल की या सुखांत आपल्यालाहि आत्मानंदाचाच अंशतः तरी लाभ होत आहे. देव व भक्त व पतिपत्नी यांच्या

† म. सा. प्र. १७–१८.

प्रेमांत साम्य मानणे हे त्याहीपेक्षा मूर्खपणाचे आहे. देवभक्तांचे प्रेम इतके अपूर्व आणि अलौकिक आहे की त्याला कसलीच उपमा देणे शक्य नाही. तरीहि संतांनी या प्रेमाला दिलेल्या शृंगारिक उपमा म्हणजे दडपलेल्या (Suppressed) विषयवासनांचे आविष्कार आहेत; अशी हीन टीका करणाऱ्यांना गुरुदेव रानडे यांचे उत्तर हे की, ही टीका बरोबर नाही. देवभक्तामधील उत्कट प्रेमाला संतांना व्यवहारांतील दुसऱ्या उपमा सांपडल्या नाहीत, म्हणून यांनीं त्या दिल्या असाव्यात. भक्ति व शृंगार यांत कोणतेही साम्य नाही; ते एकत्र राहूंच शकत नाहीत. विल्यम जेम्स म्हणतो त्याप्रमाणे, प्रेमाचे विषय, वृत्ति, शक्ति व कृति या प्रत्येक बावतींत या दोन भावनांत महदंतर आहे. परमार्थ शृंगाराच्या पलीकडे जातो; त्याला जिंकतो. ज्यांना खऱ्या आध्यात्मिक जीवनाचे ज्ञान नाही, अशांनीं कृष्ण-गोपींच्या शृंगारिक लीला पुराणांत मागाहून घुसडलेल्या असाव्यात. त्यांचे कोणत्याहि प्रकारे समर्थन करता येणार नाही. साक्षात्काराच्या दृष्टीने त्यांचा उलगडा करता येईल. आध्यामिक अनुभवांत गोपींना कृष्णदर्शन झाले; म्हणून प्रत्येक गोपीने एकाच वेळी या दर्शनाचा आनंद भोगला; पुरुषाप्रमाणे स्त्रीलाहि साक्षात्कार होऊं शकतो. ‡

**८) साक्षात्कारवाद हाच विश्वधर्म :–** " आत्मानुभव प्रातिभ असल्यामुळे शब्दांतीत आहे. अनुभव नसलेल्यांना शब्दांनीं सांगून ते समजणार नाहीत. म्हणून साक्षात्कारी भक्तांचे जणू एक गुप्त समान ध्येय असलेले संतकुलच बनते. त्याचे नियम एक देवालाच माहीत; संतानाहि ते माहीत असतील की नाही कोणाला ठाऊक. सर्व देशांतील, कालांतील, धर्मांतील संत एकाच आध्यात्मिक जगांत राहणारे असल्याने आपल्या अनुभवासंबंधी ते एकच भाषा बोलतात; त्यांच्या वर्णनांत एकरूपता दिसून येते. वंश, जाति, धर्म, देश यांच्यामुळे त्यांची मते विकृत, दूषित होत नाहीत. शाश्वत, मर्यादातीत असा त्यांचा

---

‡ म. सा. प्र. २३–२४; हिं. सा. ७५,

अनुभव दिक्कालातीत असल्याने त्यांच्या देशकालाशी कांहीं संबंध राहत नाही. * या ऐक्यावरून सर्व धर्मांचे मूळ एकच आहे, साक्षात्कार हाच विश्वधर्म आहे, हे स्पष्ट दिसते. धर्माधर्मांत भेद अज्ञानामुळे बाह्याचारांत दिसतात. ईश्वराचा साक्षात्कार हेच मानवतेचे उच्चतम ध्येय, एकमेव धर्म आहे; या ध्येयामुळे सर्व संतामध्ये जसे देश–काल–धर्म–भाषातीत ऐक्य झाले आहे, तसेच मानवजातीतहि होऊं शकेल.

---

* हिं. सा. प्र. २

# भाग दुसरा

# साक्षात्कार सोपान

## प्रकरण ५ वे : परमार्थाची प्रवृत्ति, प्रगति आणि परिपूर्ति

१) **प्रास्ताविक :–** साक्षात्कार, आतमानंद प्राप्त करून घेणे हे मनुष्यांचे ध्येय आहे; त्यानेच जीवनसाफल्य होईल; केवळ बौद्धिक ज्ञानाने होणार नाही. म्हणून साक्षात्काराच्या तत्त्वज्ञानाच्या बौद्धिक विवेचनानंतर साक्षात्कार-सोपानाचा विचार क्रमप्राप्त आहे. त्याच्या स्वरुपासंबंधी गुरुदेव रानडे लिहितात– " जगांतील तत्त्वज्ञाने व धर्म, विशेषत: संतश्रेष्ठांची जीवने व शिकवण, यांचा विचार केला तर, ईश्वरप्राप्तीच्या मार्गाच्या सामान्य लक्षणांचे पांच पायऱ्यांत वर्णन करता येईल. १) परमार्थ–प्रवृत्तीची, ईश्वराकडे वळण्याची तत्त्वज्ञानविषयक जीवनमूल्यविषयक, किंवा नैतिक आणि शारीरिक कारणे असतात. २) परमार्थ–प्रगतीसाठी करावयाच्या आध्यात्मिक व नैतिक तयारीचा प्रश्न. ३) आपल्याला माग घेता येईल अशा आचाराचे व साध्याची प्राप्ति झालेल्यांचे आदर्श डोळ्यापुढे ठेवले पाहिजेत. भक्तच असे आदर्श आहेत. ईश्वराची भक्त सापेक्ष लक्षणे आणि तो भक्तांसाठी काय करतो याचे तात्विक व व्यावहारिक दृष्टीने ज्ञान करून घेतल्यावांचून साधकांना असे आदर्श सांपडणार नाहीत. ४) हे निश्चित ज्ञान मिळविल्यावर, स्वत: परमार्थ मार्गाचे आक्रमण करून आत्मानुभव घेतला पाहिजे. त्यावांचून संतांच्या अनुभवाची सत्यता पटणार नाही. ५) शेवटी अनेक शारीरिक, मानसिक, सामाजिक यातना सोसून, दीर्घकाल परमार्थ मार्गाचे आक्रमण केल्यावर, त्यांना मार्गदर्शकदीपासारखे, खुणांसारखे कांहीं अनुभव येतील,

त्यांच्याआधारे, धैर्याने व आत्मविश्वासाने, तो मार्ग आक्रमून ते आपल्या ध्येयाला पोहोंचतील §. याप्रमाणे परमार्थ सोपानाच्या पांच पायऱ्या म्हणजे १) परमार्थ–प्रवृत्तीची व वाढीची कारणे, २) सद्‌गुणसंपादन ३) देवभक्तांचे नाते ४) साधनमार्ग ५) साक्षात्काराचे स्वरूप व त्याचे परिणाम. प्रस्तुत प्रकरणांत परमार्थ–प्रवृति कोणत्या कारणानी होते व तिचा पूर्णतेपर्यंत विकास कसा होतो याचा विचार करावयाचा आहे. दोन्ही एकत्रच दिली आहेत. कारण ज्या कारणानी परमार्थ–प्रवृत्ति होते, त्यांनींच ती वाढते.

२) **परमार्थ–प्रवृत्तीविषयी कांहीं सामान्य विचार** – देवाकडे मनुष्य कसा वळतो, ती प्रवृत्ति कशी वाढते येवढेच गुरुदेव रानडे यांना सांगावयाचे नाही. आपण देवाकडे वळणे, ती प्रवृत्ति वाढविणे, आपल्या खऱ्या हिताचे आहे; इकडे वाचकांचे, विशेषत: मुमुक्षुसाधकांचे लक्ष वेधावे, हा त्यांचा मुख्य हेतु आहे. कारण ईश्वर–साक्षात्कार हे उच्चतम ध्येय त्यांना जगापुढे ठेवावयाचे आहे. या दृष्टीने हा विषय वाचणे योग्य आहे. हेच विचार पुढील सद्‌गुण–संपादन व देवभक्तांचे नाते या प्रकरणांसंबंधीहि लक्षांत ठेवावे. चित्तशुद्ध व ईश्वरावर श्रद्धा, व भाव या गोष्टी साक्षात्काराला अत्यावश्यक आहेत. त्यांचे विवेचन त्या दोन प्रकरणांत आले आहे. आणखी एक सूचना म्हणजे परमार्थप्रवृत्ति, चित्तशुद्धि व भाव या सतत वाढत्या प्रक्रिया आहेत; साक्षात्कार व या प्रक्रिया परस्परांना पोषक असून, एकमेकांच्या साह्याने साधकाच्या जीवनांत या चारींची प्रगति होत असते. देह आहे तोपर्यंत पूर्ण साक्षात्कार होत नाही, हा गुरुदेव रानडे याचा विचार मागे आलाच आहे अर्थात् देह आहे तोपर्यंत इतर तीन प्रक्रियाहि वाढत राहिल्या पाहिजेत. यासाठी या सर्व विषयांचे श्रवण, वाचन, मनन अखंड सुरू ठेविले पाहिजे. श्रवण–कीर्तन भक्तींत यांचा अंतर्भाव आहे, हे सहज समजू शकेल.

---

§ हि. सा. १-२

३) **परमार्थ प्रेरणेचा उगम :–** मनुष्याच्या अधिक चांगले जीवन घालविण्याच्या प्रेरणेचा उगम त्याच्या सहज, मूळ स्वभावांतूनच होतो, तत्त्वज्ञानाचा मुळीच विचार न करणाऱ्या अगदी सामान्य मनुष्यालाहि, थोडी अधिक सुस्थिति, अधिक चांगुलपणा, अधिक आनंद मिळवावा असे वाटते. प्राप्तपरिस्थितीत कोणाचेहि समाधान राहूं शकत नाही. आजची परिस्थिति हे उद्या अधिक चांगले होण्याचे साधन, हीच कळत न कळत, प्रत्येकाची वृत्ति असते. यांतच ध्येय–निष्ठेचे मूळ आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर अपूर्णतेतून पूर्णतेकडे जाण्याचा मानवी प्रवृत्तीत ध्येयवादाचा उगम आहे. अगदी सामान्यांच्या अशा प्रयत्नाला ध्येयवाद म्हणता येणार नाही. ध्येयवादाचे लक्ष्य उच्चतर, जीवनाच्या अनेक बाजूचा विकास करणाऱ्या, साध्याकडे असते. सत्य–शिव–सुंदर ही मुल्ये अशा प्रयत्नांचे साध्य असते. त्यांच्या मर्यादा व अपूर्णता यांचा मागे उल्लेख आलाच आहे. सर्वांनाच अपूर्णतेची जाणीव असूनहि, उच्चमूल्याकडे फारच थोडे वळतात; याचे कारण हे की ती जाणीव व पूर्णतेची इच्छा अगदी मंद ,दुर्बल असते, त्यांत तीव्रता, नसते; म्हणून त्यांतून प्रयत्न निर्माण होत नाही. ध्येयवादाच्या दोन बाजू असतात; एक अपूर्णतेची जाणीव व दुसरी पूर्णतेच्या स्वरूपाची थोडीफार कल्पना. यांनाच असार व सार हे शब्द लावले, तर ध्येयवाद हा सारासार विवेकाचा सहज परिणाम आहे, असे म्हणता येईल. हा विवेक पक्का, उत्कट असेल तर असाराचा त्याग व साराची प्राप्ति यांच्या प्रयत्नाला मनुष्य लागलेच; पण ही उत्कटता फार थोड्यांमध्ये असते. सामान्यत: विशेष कष्ट व त्रास न सोसता, प्राप्त परिस्थितींत थोडीफार सुधारणा करून सुखासीन जीवन घालवावे, हीच प्रवृत्ति असते. म्हणून उच्च ध्येयवादी फार थोडे असतात. परमार्थाचा विचार करावयाचा म्हणजे पूर्ण, सफल जीवनाचा विचार होय. अपूर्णता अनेक स्वरूपांत जाणवते. त्यांचे सामान्यत: दु:ख, पाप व अज्ञान असे वर्ग करता येतात. या प्रत्येकाची अनेक रूपे असतात. या सर्वांतून पूर्णता कशाने साधता

येईल, हा परमार्थाचा, साक्षात्कारशास्त्राचा प्रश्न आहे व ईश्वर-प्राप्तीने, आत्मानंदाने पूर्णता येईल. हे त्याचे उत्तर आहे. मागील तीन प्रकरणांतील विवेचनावरून पूर्णज्ञान, पूर्णनीति व पूर्ण आनंद आत्मसाक्षात्कारांत अंतर्भूत आहेत, हे पाहिले आहे. म्हणूनच साक्षात्कार, आत्मानंद, हेच मनुष्यमात्राचे उच्चतम, एकमेव ध्येय ठरते. इतर ध्येये म्हणजे अपूर्णता थोडीफार कमी करण्याचा प्रयत्न, इतकेच. ज्ञानेश्वरांनीं एका सुंदर, अर्थपूर्ण ओवींत म्हटल्याप्रमाणे, मनुष्यमात्र ईश्वराचेच भजन करतो. पूर्णत्वाच्या प्राप्तीचाच प्रयत्न करतो, पण पूर्णत्वाचे स्वरूप, त्याच्या प्राप्तीचा मार्ग यांचे ज्ञान नसल्याने त्याला पूर्णत्व, ईश्वर लाभत नाही, कोणत्या तरी कमी प्रतीच्या मूल्यालाच तो ईश्वर, पूर्णत्व मानतो.

४) **परमार्थ-प्रवृतीची कारणे :-** पुढे परमार्थ-प्रवृत्तीच्या ज्या कारणांचा विचार करावयाचा आहे. त्यांत कांहीं अपूर्णतेचे प्रकार आहेत. त्यांचे ज्ञान सर्वांना असते. कांहीं पूर्णतेचे ईश्वरप्राप्तीचे परिणाम दाखविणारी आहेत; त्यांचे ज्ञान शास्त्रे व संत यांच्याकडून मिळवावे लागते. हे ज्ञान असल्याशिवाय, नुसत्या अपूर्णतेच्या असंतोषाने मनुष्य ईश्वराकडे वळणार नाही. दुसऱ्या एखाद्या ध्येयाच्या मागे जाईल, ही गोष्टहि लक्षांत ठेवली पाहिजे. म्हणजे या दोन प्रकारची कारणे कां सांगितली आहेत, हे कळून येईल, आतां गुरुदेव रानडे यांनीं दाखविलेल्या परमार्थ-प्रवृत्तीच्या कारणांकडे वळू.

अ) **जरा-मृत्यु-दुःख :-** वर म्हटल्याप्रमाणे, जीवनांतील दोषावरोवर देवाच्या प्राप्तीने या दोषांतून पार पडता येईल ही ही जाणीवहि असेल, तरच मनुष्य परमार्थाकडे वळेल. म्हणून संतांनीं जन्म-मृत्यु-जरा-व्याधि इत्यादि जीवन दोषांवरोवरच, भक्तीने व ईश्वरप्राप्तीने आनंदमय जीवन लाभेल, हेहि सांगितले जीवनातील या सर्व आपत्तींतून पार पडण्याला ईश्वरभक्ति हा

एकच मार्ग आहे, असे सांगताना ज्ञानेश्वरांनीं त्रिविधतापांचे वर्णन केले आहे; " जीवन ही, हजारों भोकें पडलेली नाव, सर्वत्र पेटलेला वणवा आहे; मृत्यु व दुःख यांची विक्री करणारा बाजार आहे. यांत सुखाचा सौदा कसा करता येईल ? मातेच्या उदरांतच गर्भाला मृत्यु ग्रासतो. बालक रोज मृत्यूकडेच जात असते; पण आईबाप उत्साहाने त्याचे वाढदिवस करतात. सगळे यमलोकाला जातात. परत मात्र कोणीच येत नाही. अशा दुःखमय मृत्युलोकांत जन्माला आलेल्या प्रत्येकाने देवाची भक्ति करून त्याच्या प्राप्तीने जीवन अव्यंग आनंदमय करून घ्यावे. (ज्ञानेश्वरी ९/४९३-५१६). दोन सुंदर ओव्यांत ते सांगतात.

**" अहा कटा हें वोखटें । मृत्युलोकींचे उफराटें ।**
**एथ अर्जुना जरी अवचटें जन्मलासी तूं ॥**

**तरि झडझडोनि वाहिला निघ । इयें भक्तीचिये वाटे लाग ।**
**जिया पावसी अव्यंग निजधाम माझें ॥ * "**

" जगाचे क्षणभंगुरत्व, प्रत्येक गोष्टीची अशाश्वतता व अनिश्चितता, अटळ मृत्यु, हे जीवनांतील दोष दाखवून, त्यांतून पार पडण्यासाठी ईश्वराच्या भक्तीचा मार्ग धरा, " असे रामदासहि सांगतात.

सारांश, देह, जीव व त्यांवर अवलंबून असलेल्या सर्व गोष्टी सोडा आणि देवाच्या मागे जा; तरच जीवनाचे मर्म कळेल.

मृत्यु व दुःख यांच्या जाणिवेने, ते प्रत्यक्ष आले नसतांनाहि, मनुष्याची कशी केविलवाणी स्थिती होते, याचे हृदयस्पर्शी वर्णन नामदेवांच्या अभंगांत आहे.-:

---

* म सा. १०८-१०९;

अंतकाळीं मी परदेशी। ऐसें जाणोनि मानसी।
म्हणोनिया हृषीकेशी। शरण तुजसी मी आलों।।
नवमास गर्भवासी। कष्ट झाले त्या मातेसी।
ते निष्ठुर झाली कैसी। अंतीं दूर राहिली।।
ऐसा जाणोनि निर्धार। मज आला गहिंवर।।
तंव दाही दिशा अंधकार। मज कांहीं न सुचे।।
नामा म्हणे तुझे पायीं। ठाव देई विठोबा। §

आ) जीवनांतील अस्थिरता व वंचना; जीवाचे अंधत्व :- जगांत सर्वकांहीं अस्थिर क्षणभंगुर, सदा वदलणारे आहे. म्हणून स्थिरता, शाश्वतता, निश्चितता यांच्या प्राप्तीसाठी मनुष्य भक्तिमार्गाला लागतो. २) जीवनांत वंचना अनुभवाला येते; सुखाच्या प्रयत्नाचे फल दुःख ठरते; विषयसुख म्हणजे केवळ मृगजळ ठरते. परमेश्वर मात्र हृदयांत असूनहि अंतरतो. विषयासक्ति, लोभ, भ्रम, वंचना यांचा असा दुःखद परिणाम पाहून वंचनारहितसुख भक्तीने मिळेल म्हणून, मनुष्य देवाकडे वळतो. ६) पोटाचा धंदा, विषयासक्ती, यांत गुंतल्याने खरे हित समजत नाही. चंचल मन घात करील हे कळत नाही. भोवतालच्या दुःखाच्या वणव्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नाही. खरे हित, ईश्वरप्राप्ति, ते अंतरींच आहे. हेहि समजत नाही. या अंधत्वाची जाणीव झाली म्हणजे मनुष्य, सद्गुरूंकडून मार्गदर्शन मिळवून परमार्थ करूं लागतो †.

इ) अटळ प्रारब्ध – ज्यांचा पुनर्जन्मावर विश्वास आहे, त्यांना नीच योनींतील जन्म व त्यांतील दुःखें यांचे भय वाटते. तेव्हां भक्ति करून जन्म–मृत्यूचा फेराच टाळावा, या हेतूने ते देवाला भजूं लागतात. प्रारब्ध टळत नाही; राम, कृष्ण, पांडव यांनाहि ते चुकले नाही. देवाला शरण जाण्यानेच ते टळेल. म्हणून कोणी त्याला शरण

---

§ म सा. १९२–१९३ † हि. सा. २७२;

जातात. प्रारब्धाविषयी गुरुदेव रानडे म्हणतात, " या नियतीच्या अटळ गतीकडें चार दृष्टींनीं पाहता येते. "

१) विश्वाची निमायक शक्ति कळणें शक्य नाही; म्हणून तिचे कार्यहि समजणें शक्य नाही. हा विचार शास्त्रविरोधी नाही. २) विश्वक्रियेमागे हेतुच नाही; सगळे आंधळे कार्य आहे. ३) आपल्याला कळत नसली तरी विश्वक्रियेत व्यवस्था आहे; तिच्याशी सामंजस्य राखावे. ४) नियती ही वस्तुता देवाचीच इच्छा आहे. देव सर्व कांहीं करतो, त्याला शरण जावे, " देव करील ते मानावे " ही नम्रपणाची वृत्तिच योग्य. देवाला शरण जाऊन त्याच्यावर सर्व सोडावे, हाच ध्येय साधण्याचा योग्य, प्रभावी उपाय आहे. "

**ई) पापाची जाणीव –** आपण पापी आहो, विषयाकडे धावतो; या विषयासक्तीने दुःख होईल, नाश होईल; ईश्वराची भक्ति केली तर त्याच्या कृपेने यांतून मुक्त होऊं, या विचाराने मनुष्य परमार्थाकडें वळतो. विषयवासनांना मायानदी हे नांव देऊन ज्ञानेश्वर सांगतात–" द्वेष, मद, मत्सर यांचे भोवरे प्रमादांचे नक्र, कामाची वेटे असलेल्या या मायानदींतून भक्तीशिवाय कोणत्याही उपायांनी तरून जाता येणार नाही भक्त मात्र तरून जातात नव्हे तरून जाण्याच्या प्रयत्नाला लागतात तोच नदीचे पाणीच नाहीसे होते " ‡.

**" येथ येकचि लीला तरले । जे सर्वभावें मज भजले ।**
**तयां ऐलीच थडिये सरलें । मायाजळ ।।** ज्ञानेश्वरी ७.९७.

पापाची उत्कट जाणीव म्हणजे पश्चाताप; देवाशिवाय कोणी सोडवणार नाही; अशी पश्चात्तापी माणसाची खात्री झालेली

---

‡ भ. गी. ६१–६२;

असते. म्हणून पश्चात्तापदग्धता हे परमार्थाला लागण्याचे अत्यंत प्रभावी कारण आहे. त्यामुळे अनन्यभावाने भक्ति करून असा मनुष्य ईश्वराला जाऊन मिळतो *.

या संबंधांत एका महत्त्वाच्या नैतिक प्रश्नाची गुरुदेव रानडे यांनी चर्चा केली आहे. " जगांत सदाचारी लोकांना दु:ख व दुराचाऱ्यांना सुख, असे अनेक वेळां दृष्टीस पडते. कर्माप्रमाणे फळ मिळाले पाहिजे या मनुष्याच्या नैतिक श्रद्धेला यामुळे धक्का बसतो. याने अस्वस्थ होऊन कांटने असा सिद्धांत मांडला की, हा सुखदु:खाचा या जगांत अपूर्ण दिसणारा हिशोब मृत्यूनंतर पुरा होत असला पाहिजे. त्यासाठी जीवाचे मृत्यूनंतर अस्तित्व व हिशोब करणारा स्वामी म्हणून देवाचे अस्तित्व मानले पाहिजे. आपल्याला या प्रश्नाकडे आध्यात्मिक दृष्टीने पाहावयाचे आहे. परमार्थी मनुष्य म्हणून, कर्माप्रमाणे प्रत्येकाला फळ मिळावे अशी प्रार्थना करणे, हे आपले कर्तव्य नाही कां ? हा न्याय जगांतच मिळावा असा आध्यात्मिक प्रयत्न (देवाची प्रार्थना) आपण करावी. त्याने आपल्या परमार्थ-प्रवृत्तीला तरी जोर स्फूर्ति मिळेल " †

नामदेव, गोराकुंभार, चोखामेळा इत्यादि मध्ययुगीन संतांत मुख्यत: दु:ख व पाप यामुळे परमार्थ-प्रवृत्ति उत्पन्न झालेली व वाढलेली दिसते. " पश्चाताप; दु:ख, तसेच केवळ मनुष्याच्या प्रयत्नाने ईश्वरप्राप्ति होणार नाही या विचाराने आलेली अगतिकता, मानवाच्या स्वाभाविक पापप्रवृत्तीची जाणीव; सर्व दु:खांतून पार करतील अशा सद्गुरूंचा शोध व शेवटी जीवनपरिवर्तन होऊन परमार्थ – प्रवृत्ति, ही लक्षणे या संतांत दिसतात + . "

**उ) विश्वाचे कोडे :–** विश्वाच्या रचनेंत व नियमांत दिसून येणारे अतुल कौशल्य व अगाध सामर्थ्य पाहून साधकाचे मन

---

* म. सा. ११० † हिं. सा. १८; + म. सा. २०९;

आश्चर्यमुग्ध होते. निसर्गाचे सर्व नियम म्हणजे ईश्वराची शक्ति आहे. हे कार्य जड शक्तीचे नाही; चैतन्याचे आहे; या विचाराने व विश्व हे एक कोडे आहे, त्यांतील प्रश्न ईश्वरसाक्षात्कारावांचून सुटणार नाहीत, या भावनेने, विश्वकार्याचा विचार मनुष्य करूं लागतो व ईश्वराची प्राप्ति हेच उच्चतम ध्येय ठरवून परमार्थमार्गाला लागतो *. याप्रमाणे, तत्त्वचिंतनानेहि मनुष्याचे व देवाचे अगदी जिव्हाळ्याचे नाते आहे, हे समजून परमार्थ प्रवृत्ति उत्पन्न होते. ज्ञानेश्वर सांगतात त्याप्रमाणे –

**" जो मज होय अनन्य शरण । त्याचें निवारीं मी जन्ममरण ।**
**यालागीं शरणागता शरण्य । मीचि एकु ॥ "**
**" तैसा ब्रह्मादि सर्वां भूतां । सुहृद तो मी ॥ "**
**" नित्यानंद गा निर्दोष । हें स्वरूप माझे ॥ "**

(ज्ञानेश्वरी ९. २८८–२९०–३१४)

**ऊ) जीवाचे मूळ ब्रह्मत्व व संतांचे दिव्य, भव्य जीवन :–** साक्षात्कारी संतांनी साक्षात्काराने लाभलेल्या आपल्या आनंदमय, अमर, दिव्य जीवनांचे वर्णन अनेक प्रकारे केले आहे. त्यावरून मूळचा सच्चिदानंद, जीव ब्रह्म आहे; अज्ञानाने तो स्वतःला देह समजतो व देहाच्या सुखासाठी विषय–कर्म द्वंद्वे या दुष्टचक्रांत सांपडून दुःखी होतो, देवाची भक्ति करून, त्याचा साक्षात्कार झाला म्हणजे तो पुन्हा आपल्या मूळ स्वरूपाला जातो, सच्चिदानंद होतो; हे सर्व सिद्धांत शास्त्रांनीं व संतांनीं मांडले आहेत. संस्कारक्षम मुमुक्षु–जिज्ञासूंना ते अत्यंत आकर्षक वाटतात. असे दिव्य जीवन आपल्यालाहि लाभावें, मूळचे ब्रह्मत्व प्राप्त व्हावे, अशी उत्कंठा त्यांना वाटूं लागते व त्यामुळे ते परमार्थमार्गाला लागतात. प्रकरण १ मध्यें उपनिषदे व भगवद्गीता यांत आलेले साक्षात्काराचे परिणाम दिले आहेत. पुढे " **साक्षात्कार** " व " **साक्षात्काराचे परिणाम** "

---

* भ. गी ५९–६०.

या प्रकरणांतहि या विषयावरील अनेक वचने उध्दृत करावयाची आहेत. येथें नमुना म्हणून एकच प्रसिद्ध अभंग देत आहे :-

**योगिया दुर्लभ । तो म्यां देखिला साजणी ।**
**पाहतां पाहतां मना न पुरे धणी**
**देखिला देखिला माये देवांचा देवो । फिटला संदेही**
**निमाले दुजेपणा**
**अनंत रूपे अनंत वेषे देखिले म्यां त्यासी ।**
**बापरखुमावरी खुण बाणली कैसी ॥**

यांत देवाचे अनंत रूपांत, दर्शन, हा देवांचा देवच आपण पाहिला असा निश्चय, त्यामुळे अवीट आनंद, सर्व संशयांचा निरास आणि देवाशी अभेदाची ऐक्याची अनुभूति हे सर्व विचार आले आहेत. हेच संतांचे भव्य, दिव्य, आनंदमय जीवन होय. यामुळे मिळणारी प्रेरणा अत्यंत प्रभावी ठरते.

गुरुदेव रानडे यांनीं आर्त अर्थार्थी, पश्चाताप पावलेला पूर्ण पापी आणि जिज्ञासु असे परमार्थाचे अधिकारी वर्णिले आहेत. त्यात पहिले दोन शारीरिक, तिसरा नैतिक व चौथा तत्त्वज्ञानात्मक कारणांनीं देवाकडे वळतो हे उघड दिसते§.

**ए) परमार्थ प्रवृत्तीच्या कारणांत जीवनसाफल्याचा निर्देश :-** सर्व पापे नष्ट झाली, जन्ममृत्यूचे चक्र थांवले, अर्थात् सर्व दुःखांचा शेवट झाला, मी कोण देव कोण हे जाणले, पूर्ण शरणागति झाली व विश्व कोणी व कशाचे केले आहे, या सर्व गोष्टींची स्वतःला अनुभवाने प्रचीति आली, म्हणजे ईश्वराला पोहोंचलों असे समजावे हे गुरुदेव रानडे यांनीं व रामदासांनीं परमार्थ पूर्णतेला गेल्याचे निकष

---

§ भ गी. २३४-२३६;

दिले आहेत. * (दासबोध १०.८.२१-२४) परमार्थ प्रवृत्तीची सर्व कारणे व त्यांची पूर्तता यांचा या ओव्यांत निर्देश आहे. ईश्वराकडे वळण्यास कोणतीहि एक प्रवृत्ति कारण झाली असली तरी, ईश्वर प्राप्तीनंतर तिन्हींचीहि परिपूर्ति होते. सर्व पापांचा व दुःखाचा नाश; देव विश्व यांचे पूर्ण ज्ञान, व अर्थात् मी नाही, विश्व नाही एक ईश्वरच, ब्रह्मच आहे, हा "**सर्व खलु इदं ब्रह्म**" असा अनुभव हे सर्व साक्षात्काराने लाभते हे वरील ओव्यांवरून दिसते.

परमार्थ–प्रेरणेला ख्रिचन धर्मात परिवर्तन (Conversion) असे म्हणतात. त्याची गुरुदेव रानडे यांनीं थोडी तात्त्विक चर्चा केली आहे. "पाश्चात्य लेखकांच्या मते, माणसाच्या स्पष्ट जाणिवेच्या खाली अर्धज्ञात जाणीव (Subliminal Consciousness) असते. ती कांहीं कारणांनीं स्पष्ट जाणिवेंत शिरते व परिवर्तन घडते, असा केवळ मानसशास्त्राच्या दृष्टीने ते विचार करतात. आतां त्या अस्पष्ट जाणिवेला मनाऐवजी आत्मा मानले तर परिवर्तन ही आध्यात्मिक घटना असून ते आत्म्याचे कार्य आहे. ‡ असे म्हणता येईल.

**ऐ) भक्ति करा हा संतांचा आदेश –** मागे जीवनांतील दोष व आपत्ति यांचे वर्णन आले आहे. सर्व संत कळवळ्याने उपदेश करतात, "ईश्वर–चरणी मन ठेव, भक्तिमार्गाला लाग; तरच या सर्व आपत्तींतून पार होता येईल. ईश्वर, तुझा परमसखा पलीकडेच उभा आहे. त्याचे ध्यान कर, अनन्य भक्ति कर, त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न कर †." हा संतांचा उपदेश हे परमार्थ–प्रेरणेचे मुख्य कारण आहे. अशा उपदेशाने सर्व संकटांतून, पापापासून व अज्ञानांतून मुक्त होण्याचा मार्ग एक ईश्वराची भक्ति हाच आहे, हे कळले तरच वरील कारणांनीं मनुष्य ईश्वरप्राप्तीच्या प्रयत्नाला लागेल. एरव्ही त्यांतून मुक्त होण्यासाठी समाजांत रूढ असलेल्या दुसऱ्या प्रयत्नांना तो लागेल. भक्ति करण्याची कल्पनाच त्याला येणार नाही.

---

* म. सा. ४०९ ‡ म. सा. ४९१–४९२ † हि. सा. ४१, ४३

**नरदेहाची महती, अनासक्तीची आवश्यकता विकारांवर जय** – देह असतांनाच ईश्वरप्राप्तीने ईश्वर होणे शक्य आहे; मेल्यावर मुक्ति मिळत नाही. देह असतांनाच भक्ति करून मिळवावी लागते व मिळू शकते. म्हणून संतांनीं नरदेहाची महती गायिली आहे. आयुष्य हे मोठें धन, भांडवल आहे. त्याचा भक्तीकडे उपयोग केला पाहिजे. ते विषयोपभोगांत घालविले तर भक्ति केव्हां करणार ? म्हणून कामक्रोधादि विकारांवर विजय मिळविला पाहिजे. "नरजन्म दिल्यावर ईश्वराची कृतज्ञतेने प्रार्थना करा, त्याची अखंड भक्ति करा, आणि त्याच्या वैभवांत व ऐश्वर्यांत लीन व्हा. विद्युत् तारा व तांबडा, हिरवा, पिवळा हे दिव्य रंग पाहा व देवाच्या नामघोषांत लीन व्हा; शेवटी अनंत ब्रह्माचे ज्ञान करून घेऊन, देवाचे दास, शरणागत होऊन राहा §." नरजन्मांत हे साधावयाचे आहे. त्यासाठी "देवा मला विषयापासून दूर ठेव; पतंग, हत्ती हरिण, भृंग, मासा हे एकेका इंद्रियांच्या एकेका विषयाच्या आसक्तीने नाश पावले, मला पांच इंद्रियांच्या पांच विषयांचे पांच मोह आहेत, मग मी आसक्त झालो तर माझा नाश झाल्याशिवाय कसा राहील ‡." अशी देवाची काकुळतीने प्रार्थना करून अनासक्त राहावे. याचाच अर्थ कामक्रोधादि विकारांचा नाश करावा. "सतत चालत राहा. झोप घेऊ नको, भक्ति सोडून भोगासक्त झालास तर हे कामक्रोधादि विकार तुझें आयुष्यरूपी भांडवल चोरून नेतील. मग काय करशील ? सद्भक्तिरूपी धनुष्याला ज्ञानाचा बाण लावून, जागृत राहून, या चोरांना ठार कर †." भक्ति, अनासक्ति व विकारनाश यांत परस्पर–पोषकता आहे. परस्परांच्या साह्याने ते वाढत जातात. संतांचा हा उपदेश मनांत ठसला म्हणजे परमार्थ–प्रवृत्ति वाढत जाते. सारांश, प्रपंचांत अनासक्त राहून, ईश्वराच्या भक्तींत मग्न असावे, हा संतांचा उपदेश सदा अंतरी धरावा."

---

§ क. सा. १६–१७. ‡ क. सा. २३; † क. सा. २९–३०.

**पक्षी अंगणीं उतरती । ते कां गुंतुनिया राहती ।**
**ऐसे असावे संसारी । जोवरी प्राचीनाची दोरी ।।**
**वस्तीकर वस्ती आला । प्रातःकाली उठोनी गेला** + (एकनाथ)

**ओ) चिंता व नैराश्य :–** "गाढ निराशेची रात्र" या विषयाची चर्चा प्रकरण ४ मध्ये झाली आहे. त्या अवस्थेंत चिंता व नैराश्य अंतर्भूत आहेत. ती अवस्था परमार्थाच्या वाढीला व पूर्णतेला अत्यंत अवश्य आहे. ईश्वराशिवाय कोणाचा आधार नाही, तोच रक्षणकर्ता आहे, अशी श्रद्धा या निराशेच्या, असहाय्यतेच्या व एकाकिपणाच्या अवस्थेंत दृढ होते व साधक ईश्वरावर सर्व सोपविण्यास तयार होतो. जे घडते ते सर्व शक्तिमान परमकृपाळु देवाच्या इच्छेने घडते; त्यांतच आपले अंतिम हित आहे, या श्रद्धेने ईश्वराला शरण गेले म्हणजे चिंता व नैराश्य संपते. "तुझ्या इच्छेला येईल ते होऊं दे *," ही वृत्ती धरली पाहिजे.

**ईश्वराची कृपा :–** शेवटी, परमार्थाचे शिखर गांठावयाला, आपले प्रयत्न आपले साधन पुरे पडत नाही. त्यासाठी ईश्वराच्या अखंड कृपेसाठी त्याची करुणा भाकावी लागते. आपले प्रयत्न तोकडे पडतात, हे पाहून असहाय्यतेने संत देवाच्या कृपेसाठी अत्यंत आर्ततेने त्याचीच आळवणी करतात. परमार्थाच्या सुरुवातीला त्यांत खंड पडूं नये म्हणून, व त्याच्या पूर्ततेला, स्वतःच्या प्रयत्नावरोबर देवाची अखंड कृपा लागतेच. ईशकृपेविषयी गुरुदेव रानडे यांनीं तीन मते मांडली आहेत. १) नास्तिकांच्या मते देवच नाहीं; अर्थात् त्याची कृपाहि नाही, जे घडले ते निसर्गाच्या नियमाने अटळपणे घडते. २) देव साधकांच्या प्रयत्नांच्या प्रमाणांत कृपा करतो. ३) ईश्वर परम उदार आहे; तुमच्या प्रयत्नांच्या प्रमाणाचा हिशोब न करता तो मुक्त हस्तानें कृपा करतो. साधकाला तिसऱ्या प्रकारची कृपा हवी असते $\beta$.

---

+ क. सा. ३५–३७; * क. सा. ३९–४१ $\beta$ क. सा. ४२–४३

**औ) संपूर्ण आध्यात्मिक जीवनाचे संक्षिप्त दर्शन :–** आपल्या एका पदांत महिपतींनीं जणू आपले आध्यात्मिक आत्मचरित्रच दिले आहे. ते सांगतात; " देवा तूं दर्शन देतोस, अदृश्य होतोस. ही तुझी लीला माझ्या मंद बुद्धीला समजत नाही. मी अनेक योनींत फिरलो पण तुझे मूळ, सत्य स्वरूप मला कळलेच नाही. तुझे ज्ञान, दर्शन व्हावे म्हणून मी वेद–पुराणांचा अभ्यास केला, अज्ञानी नालायक लोकांपुढे मस्तक नम्र केले. शरीर दंडणाचे तप केले. पण सर्व व्यर्थ ! तुझे दर्शन झाले नाही. शेवटी काय झाले न कळे; पण परम कृपाळु होऊन तूं पांच प्रकारे माझ्यावर कृपा केलीस. १) मी अंतरी आर्त, नम्र असल्यामुळे दर्शन दिलेस व माझा हात घट्ट धरलास. २) मला उन्मनी अवस्थेला नेलेस. ३) माझे दिव्य चक्षु उघडलेस; त्यामुळे सामान्यांना न दिसणारे सर्व मला पाहतां येऊ लागले. ४) मी सेवन करावे म्हणून अमृताचे ताट माझ्यापुढे ठेवलेस. ५) या सर्व गोष्टींमुळे, मला परमानंदांत ठेवलेस ‡. " परमार्थाच्या पूर्णत्वासाठी, पूर्ण साक्षात्कारासाठी ईश्वराला सर्वस्वी शरण जाऊन त्याची कृपा भाकीत राहिले पाहिजे; हाच एकमेव उपाय आहे. साधकांमध्ये अशी पूर्ण शरणागतांची वृत्ति निर्माण झाली पाहिजे. प्रस्तुत पदांत परमार्थ प्रवृत्तीपासून उच्च साक्षात्कारापर्यंत सर्व अवस्था दिसतात.

* *

‡ व. सा. ४४–४६.

## प्रकरण ६ वे : नैतिक सिद्धता–सद्‌गुणसंपादन

**१) नीति व साक्षात्कार यांचा संबंध** – परमार्थ–प्रेरणा कशी होते, या चर्चेनंतर आतां, साक्षात्कारासाठी अवश्य त्या नैतिक सिद्धतेचा म्हणजे कोणते दुर्गुण टाकावयाचे, कोणते सद्‌गुण संपादावयाचे याचा, आचरणाच्या दृष्टीने विचार करावयाचा आहे. प्रकरण ३ मध्ये नीतीचे तात्त्विक दृष्टीने विवेचन झाले. त्यांतील कांहीं मुद्दे येथे थोडक्यांत देणें इष्ट वाटतें. उच्च साक्षात्काराच्या अवस्थेंत सर्वात्मभाव ( अभेद ) असतो. अहंकार व वासना पूर्णतः नष्ट झालेल्या असतात. अहंकार, देहतादात्म्य व वासना यांमुळे जीव बद्ध होतो; साक्षात्काराने ही दोन्हीं नष्ट होतात. अहंकार व वासना यांतून सर्व दुर्गुण निर्माण होतात. ही दोन्हीं कमीकमी करणें म्हणजे दुर्गुणांतून सद्‌गुणांत, अभेद आणि अहंकार व वासना यांचा अभाव; ही लक्षणे असतात. प्रकरण ३ मध्ये कांहीं सद्‌गुणांची लक्षणें स्पष्ट केली आहेत. अर्थात् सद्‌गुण म्हणजे साक्षात्काराने मिळणाऱ्या ब्रह्मत्वाकडे वाटचाल होय. मात्र पूर्ण साक्षात्कार होई-पर्यंत सद्‌गुण अपूर्णच असतात. त्यांना पुर्णता साक्षात्कारानें, आत्मानंदानें येते हेहि प्रकरण ३ मध्ये पाहिले आहे. भक्ति हा सद्‌गुणाचा मुकुटमणी होय, सद्‌गुणांची वाढहि मुख्यतः नामस्मरणानें होते. त्या बरोबरच यमनियम, संतसंगति, श्रवण–कीर्तन, पठन व चिंतनमनन, या भक्तिसाधनांच्या उपांगांचाहि सद्‌गुणांच्या वाढीसाठी उपयोग होतो व केला पाहिजे. सद्‌गुण–संपादनाच्या चर्चेत वरील मुद्दे लक्षांत ठेवावे. ही नैतिक सिद्धता परमार्थाला सुरुवात करण्या-पासून त्याच्या पूर्ततेपर्यंत अवश्य आहे व परमार्थाच्या प्रगतीबरोबर वाढत ती पूर्णतेला जाते, हेहि यावरून दिसून येईल.

दुर्गुणत्याग म्हणजे अहंकार, मी–माझे व वासना यांना विसरणे. त्यांची आसक्ति म्हणजें न सुटणारे स्मरण. विसरणे ही अभावात्मक

क्रिया आहे. दुसऱ्या कशाच्या तरी स्मरणाने ही आसक्ती सोडली (विसरली) पाहिजे. आतां विश्वांत दोनच गोष्टी आहेत; एक त्रिगुणातीत ब्रह्म व दुसरे त्रिगुणात्मक, विषयरूप विश्व. तेव्हा देवाशिवाय कशाचेहि स्मरण केले तरी ते विषयांचेच स्मरण होणार; त्यामुळे विषय विसरले जाणार नाहीत. म्हणून दुर्गण–त्यागाने अर्थात् तद्विरोधी सद्गुणसंपादनाचे मुख्य साधन म्हणजे देवाचे नाम स्मरणे, हे स्पष्ट होते. अखंड नामस्मरण करणे शक्य होत नाही; तेव्हां इतर सत्वगुणयुक्त विषयांचे चिंतन, आचार–विचार यामध्ये स्वतःला गुंतविले पाहिजे; म्हणजे सत्वगुण वाढेल, रज–तम कमी होतील. सत्त्वगुण मोचक तर रज–तम बंधक आहेत, हे गीतेंत दाखविलेच आहे. तेव्हां सद्गुणांचे चिंतन हे सद्गुण–संपादनाचे दुय्यम साधन आहे. या विषयाची विस्तृत चर्चा साधन–विचारांत होईल.

२) दुर्गुणत्याग – सुवर्णाची चोरी, सुरापान, गुरुपत्नीशी व्यभिचार, ब्रह्महत्या व ही पातके करणाऱ्यांची संगति, ही पांच महापातके उपनिषदांत सांगितली आहेत. काम–क्रोध–लोभ या विकारांना गीतेंत परमार्थ मार्गावरील वाटमारे म्हटले आहे. ज्ञानेश्वरींत अज्ञानाची व आसुरी संपत्तीची लक्षणे म्हणून अनेक दुर्गुण दाखविले आहेत. त्यांतील महत्वाचे उध्दृत करतो. सर्वांची यादी अनावश्यक आहे. दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, कठोरता, अज्ञान म्हणजे अविवेक पापपुण्याची खिचडी करणे; लोकेषणा; संशय, भीति व चिंता; वासना व विषयासक्ति; दुर्गुणांचाच अभिमान धरणे; मरणाचे विस्मरण या सर्वांचा अर्थ उघड आहे. त्याचे स्पष्टीकरण करीत नाही.

गुरुदेव रानडे यांनीं आणखी कांहीं दुर्गुणांची उद्‌बोधक चर्चा केली आहे. १) अभिमानी नास्तिक; याच्या वृत्तीतील विरोध चिंतनीय आहे. तो जग असत्य मानतो; ( भ. गी. १६.८ ) पण

स्वतःला मात्र श्रेष्ठ समजतो. २) शृंगारिक वृत्तींना उत्तेजन देणारी नृत्यें व गायन व सर्व कला म्हणजे दुधारी तलवारी आहेत. त्यांचा उपयोग बहुधा शृंगारासाठी होतो; तसा केला तर तो घातक ठरतो. ईश्वराच्या सेवेसाठीही तो करता येतो मग तो तारक ठरतो. ईश्वराचे वैभव दाखविणे व मानवाची सेवा करणे यांसाठीच कलेचा उपयोग केला पाहिजे. ३) नास्तिक खलांची संगति सर्वथा त्याज्य, संगतीने स्वभाव बदलतो म्हणून कुसंगति टाळली पाहिजे. *

३) **सद्‌गुण संपादन –** येथे सर्व सद्‌गुणांची यादी द्यावयाची नाही; किंवा त्यांच्या अर्थाचेहि फारसे विश्लेषण करावयाचे नाही, सद्‌गुणांची लक्षणे बहुतेकांना परिचित असतात, मुख्य सद्‌गुणांचा उल्लेख करून, त्यांतील कांहीं सद्‌गुणांवरील ज्ञानेश्वरांच्या भाष्याचा अगदी संक्षिप्त आशय द्यावा असे योजिले आहे. ज्ञानेश्वरांचे "ज्ञान" व "दैवीसंपत्ति" यांमधील सद्‌गुणांवरील भाष्य हे काव्य, मानसशास्त्र, साक्षात्कारशास्त्र या सर्व दृष्टींनीं निरुपम आहे. ते मूळांतूनच वाचावे; अत्यंत उद्‌बोधक व स्फूर्तिदायक वाटेल.

ब्रह्मचर्य. दान, तप, अहिंसा, ऋजुता व सत्य हे सद्‌गुण उपनिषदे व भगवद्‌गीता यांत दिसतात. दान श्रद्धेने, नम्रपणे व उदारपणे द्यावे असेहि सांगितले आहे. सात्त्विक–राजस–तामस वृत्तींच्या व्यक्तींनीं अनुक्रमे दमन, दान व दया हे गुण अंगी आणावे. सत्याचा खरा अर्थ ब्रह्म–साक्षात्कार असा केला आहे. "ज्याला साक्षात्कार झाला तोच सत्य सांगू शकतो." † रामदासहि म्हणतात. "**सत्य म्हणजे स्वरूप जाण ।**" (दासबोध. १०–१०–५५)

४) **ज्ञान म्हणज सद्‌गुण :–** भगवद्‌गीता अध्याय १३ मध्ये सद्‌गुण हे ज्ञानाचे, साक्षात्काराचे परिणाम म्हणून सांगितले आहेत. त्यांतील कांहींचा तपशील ज्ञानेश्वरीच्या आधारे पाहू. **अदंभित्व–**

---

* हिं. सा. ५१–५३, २८८–२८९. † उप. २२६–२२९.

**अमानित्व-अहिंसा** म्हणजे केवळ दंभ-मान-हिंसा यांचा अभाव नव्हे; तर अनुक्रमे, पराकाष्ठेची प्रसिद्धी-पराङ्-मुखता, परम नम्रता, व अपार दया. **क्षान्ति** म्हणजे तापत्रय सहज सोसणे; सोसतो ही जाणिवहि नसणे. सहिष्णुता, धैर्य हे याच स्वरूपाचे आहेत. **आर्जव** (सरलता) म्हणजे आपपर ही भाषाच माहीत नसणे. **आचार्योपासना** म्हणजे तनमनधन सर्वस्वी गुरूसेवेला अर्पण करणे; गुरूचेच ध्यान, गुरु हाच देव, तेच पुण्यक्षेत्र, त्यांनी दिलेले नाम हाच मंत्र, ही वृत्ति व आचरण असावे. पावित्र्य म्हणजे शुचित्व. बाह्यमल सत्कर्मांनीं व आंतरमल ज्ञानाने प्रक्षाळिल्याने विषयविकार शिवतच नाहीत. **आत्मनिग्रह, वैराग्य, अनासक्ति, शम, अलोलुपत्व, अचापल्य** हे सर्व एकाच वर्गातील सद्‌गुण म्हणता येतील. मन व इंद्रिये यांचे नियमन करून त्यांना विषयापासून दूर ठेवणे, कोणच्याहि सुखाच्या लोभाला बळी न पडणे, विषयांचा तिटकारा वाटल्याने त्यांचा वाराहि इंद्रियांना लागू न देणे, ही सर्व लक्षणे त्यांत अंतर्भूत आहेत.

**अपैशुन्य, दया, मार्दव व अद्रोह** हे सर्व, आर्जवाप्रमाणे सामाजिक गुण आहेत. प्राणिमात्रांवर मातेप्रमाणे प्रेम, त्यांचे दैन्य दुःख दूर करण्याची उत्कंठा, त्यांचे दोष न पहाणे, ही वृत्ति या गुणांत असते; त्याप्रमाणेच आचरणहि असते व असावे.

**अध्यात्मज्ञान, स्वाध्याय, अध्ययन, अध्यापन** हे बौद्धिक सद्‌गुण आहेत. ईश्वरप्राप्तीसाठी श्रुतींचा अभ्यास व चिंतन करून तेच ज्ञान इतरांना देणे, हे परमार्थाला उपयुक्त व अवश्य आहे. **अनहंकार** म्हणजे कर्तृत्वाहंकार न ठेवता निष्कामपणे सर्वविहित कर्मे उत्तम प्रकारे करणे, हाच कर्मयोग होय.

५) **दैवी संपत्ती :-** दैवी संपत्तीच्या कांहीं सद्‌गुणावरील ज्ञानेश्वरांच्या भाष्यांत त्यांचा उत्तुंग अर्थ प्रतीत होतो.

**अभय :–** कर्माकर्माचा अहंकार सोडून, संसाराची भीति टाकणे; किंवा ऐक्य-भावाने, सर्वात्मभावाने भीति आपोआप दूर होणे.

**सत्त्वशुद्धि :–** आत्मस्वरूप रुचल्यामुळे बुद्धि त्याच्याशी एकरूप होणे, अर्थात् विषयापासून दूर होणे.

**ज्ञान–योगाच्या ठिकाणी स्थिर बुद्धि :–** ज्ञान वा योग यापैकी जे आवडेल तेथे सर्व वृत्ति अर्पण करणे.

**दान :–** तनमनधन दुःखितांचे दुःख दूर करण्यासाठी वेंचणे.

**यज्ञ :–** सर्वस्व ईश्वराला अर्पण करणे.

**तप :–** स्वरूप-साक्षात्काराच्या विस्तारासाठी शरीर व मन ह्यांची आटणी करणे.

**शांति :–** ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान या त्रिपुटीचा लय झाल्यावर जें केवळ ज्ञान उरते ती शांति.

**लज्जा :–** दोषपूर्ण किळसवाण्या देहाच्या रूपाने जन्म घेऊन आल्याचा कंटाळा.

**आध्यात्मिक तेज :–** कांहींहि आड येऊं न देता प्राणपणाने अंतःकरण ईश्वराकडे देणें ‡.

**६) हिंदी संतांच्या ग्रंथांतील कांहीं सद्‌गुण** ϕ **:– सत्संग–**याने मोठे लाभ होतात. नानक म्हणतात, " सत्संगाने माझे-तुझे हा भेद नष्ट होऊन सर्व माझेंच झाले. ईश्वर करील तेच चांगले हे समजले. सर्वत्र ईश्वर भरलेला आहे. हे पुन्हा पुन्हा पाहून आनंद झाला †

**अपरिग्रह :–** माझें असे कांहींहि मानूं नयें

---

‡ म. सा. ८६–९१. ϕ हिं. मा. ५७–५८; † हिं. सा. ८७ ९०, ९५-९६

**अप्ररिग्रह** :– हात खाली करूं नये; सहज मिळेल ते घेण्यास हरकत नाही.

**अंतर्मुखता** :– स्वभावतः बहिर्मुख असलेली इंद्रियें आंत वळविणे. याला मोठी नैतिक व आध्यात्मिक शक्ति लागते.

**रामभरोसा** :– परमकृपाळु व सर्वशक्तिमान देव करतो ते माझे अंतिम हितच आहे; अशा श्रद्धेने परमार्थ–पथ आक्रमणे हीच शरणागति. §

**परिमितता** म्हणजे योग्याला अवश्य असलेले भगवद्गीतेतील युक्ताहारविहार होत. भक्तालाहि त्यांची आवश्यकता आहे. भक्त व योगी भिन्न नाहीतच.

**सद्बुद्धि** :– ज्ञानेश्वर सांगतात, "ईश्वरप्राप्ती हेच जिचे ध्येय आहे, त्याशिवाय इतर कशाच्याहि प्राप्तीने जिचे समाधान होत नाही तीच सद्बुद्धी आणि तीच सद्वासना. दोन्ही एकच; त्यांत भेद नाहीत. *"

पश्चातापाने दोषांची जाणीव होऊन ते कमी होतात. त्यांच्या जोडीला संतोष आपोआप येतो.

७) **त्रिगुण** :– सद्गुण–विचारांत त्रिगुणांचाहि संबंध येतो. ईश्वर प्राप्तीची ओढ म्हणजे सत्त्वगुण; अर्थात त्यांत सर्व सद्गुण अंतर्भूत आहेत. रज–तम हे अनुक्रमे कर्मासक्ति ( सकामकर्मे ) आणि आलस्य व प्रमाद यांत गुंतलेले असतात. अर्थात् त्यांतून दुर्गुण निर्माण होतात. म्हणून सत्वगुण वाढविला पाहिजे. शेवटी सत्त्वगुणाच्याहि अतीत झाले पाहिजे. हा विचार या प्रकरणाच्या सुरुवातीला आलाच आहे. सात्त्विक मानस तपाचे लक्षण ज्ञानेश्वर सांगतात, " सर्व संशय व वासना नष्ट झाल्यावर मन स्वरूपाकार होणे, शुद्धता हेच मनाचे स्वरूप बनणे; म्हणजें मानसतप. "

---

§ हिं. सा. ३३०,३६५. * म. सा. ९३-९४.

**दासबोधांतील सद्‌गुण :– निर्मत्सरता, जगन्मित्रता; विवेक.** यांत विवेक म्हणजे

**कर्तयासी वोळखावे । यास विवेक म्हणावें ।।** दासबोध १३.७.२९
**मनातीत निराभास । विवेकें जाणावे ।।** दासबोध १७.१०.९
**देहाभिमान सांडून गेले । विवेकें वळें ।।** दासबोध १७.७.५

मन नेहमी विषयाकडे धावते, त्याच्या मागे जाऊं नका, असा मनोनिग्रहाचा उपदेश संतांनीं केला आहे. मृत्यूचे स्मरण, मौन, परमार्थ उद्यावर न टाकणे, हे सद्‌गुणहि त्यांनीं आवर्जून सांगितले आहेत. " **मुनेर्भाव मौनम् ।**" मुनींचा भाव म्हणजे मौन. जीवनांत फार मोठे प्रमाद जिव्हेने होतात. म्हणून मौन धरून देवाचे नामस्मरण करावे. मृत्यु केव्हां येईल त्याचा नेम नाही; म्हणून परमार्थ उद्यावर टाकूं नये.

**पाप–पुण्याविषयी एक महत्वाचा सिद्धांत :–** गुरुदेव रानडे सांगतात, " पुण्यक्षेत्री किंवा पुण्यकाली मरण आल्याने मोक्ष मिळत नाही. मोक्षाच्या व मृत्यूच्या स्थलकालांचा कांहींहिं संबंध नाही. मोक्षाची योग्यता भक्ति साधन करून मिळविलेल्या नैतिक व आध्यात्मिक उन्नतीवर अवलंबून आहे. † "

या सर्व सद्‌गुणांत अहंकार ( मी–माझे ) व वासना ओसरणे व अभेद ( सर्वात्मभाव ) वाढविणे ही तिन्हीं लक्षणे दिसून येतात. कारण ही तिन्हीं एकत्रच, परस्परांच्या साह्याने विकास पावतात. अहंकार–वासना कमी झाल्या म्हणजे अभेद वाढतो; अभेदाच्या वाढीने अहंकार–वासना ओसरतात, हे पुन्हा एकदा सांगावेसे वाटते. हा फार महत्वाचा विचार आहे. सद्‌गुणांची चर्चा प्रकरण ३ व ५ मध्ये झाली आहे. पुन्हा पुढील प्रकरणांत साधकाची लक्षणे या स्वरूपांत ती होणार आहे, म्हणून येथे अधिक विस्तार करीत नाही.

† हि. सा. ३००

९) **सद्गुण प्राप्तीचा उपाय** :– सद्गुण परस्परावलंबी व परस्परांना पोषक असतात. त्यामुळे त्यांच्या लक्षणांत साम्य असणे साहजिकच आहे. म्हणून सद्गुणांच्या लक्षणांच्या विवेचनांत सहजच पुनरुक्ति होते. असो. सद्गुण कसे संपादन करायचे या विषयी सुचनाहि गुरुदेव रानडे यांनीं केल्या आहेत. जो सद्गुण वाढवावयाचा असेल त्याचे चिंतन, निदिध्यास तीन महिने सतत करावा, म्हणजे तो सद्गुण वाढतो; ही शिकवण थिऑसॉफिकल सोसायटींत देतात, बुद्धानेहि सद्गुणांचे असे ध्यान केले. पतंजलीनेहि योग–सूत्रांत मैत्री, करुणा, मुदिता ( आनंद ), उपेक्षा (परदोषाकडे दुर्लक्ष ) या गुणांचे चिंतन करावे, असे सांगितले आहे. सामाजिक व नैतिक सद्गुणांचा अशा चिंतनाने नैतिक व आध्यात्मिक बल वाढते. दुसरा मार्ग म्हणजे जो सद्गुण वाढवावयाचा असून तो वाढविण्याऱ्या क्रिया दीर्घकाल, अनेकदा कराव्या, निर्भयता वाढविण्यासाठी रोज एक धाडसाची क्रिया करावी. अशा क्रिया केल्याशिवाय सद्गुण आत्मसात करता येत नाहीत. ॲरिस्टॉटलने " संवय म्हणजे शील " असे म्हटले आहे; तुलसीदासांनींहि सत्गुण आत्मसात् करण्यासाठी ' निरंतर ' व ' वहूकरमा ' हा उपाय प्रतिपादिला आहे. *

* *

---

* भ. गी. २४६–२४८.

## प्रकरण ७ वे : देव भक्तांचे नाते

१) **देव–भक्त संबंध :–** नैतिक सिद्धतेनंतर आतां देव–भक्तांच्या नात्याचा विचार करावयाचा आहे. साधकाला आचार व ध्येय यांचे डोळ्यापुढे ठेवावयाचे आदर्श म्हणजे भक्त होत. म्हणून ईश्वराची भक्त–साक्षेप लक्षणे तसेच तो भक्तासाठी काय करतो, याचे तात्त्विक व आचरणात्मक ज्ञान अवश्य असते. त्यांची चर्चा या प्रकरणांत होईल. प्रकरण ३ मध्ये ईश्वराच्या लक्षणांचा तात्त्विक विचार झाला.

२) **साक्षात्काराच्या दृष्टीने ईश्वराची लक्षणे :–** ईश्वराच्या भक्तसाक्षेप लक्षणापूर्वी गुरुदेव रानडे यांनीं त्यांच्या तात्त्विक लक्षणांचाहि विचार केला आहे. " निरंजन, अनंत, परमपुरुष हाच एकमेव खरा देव; अनाहत नाद, उज्वल प्रकाश हे त्याचेच अविष्कार आहेत. हे प्रातिभ अनुभव म्हणजेच देव. साक्षात्कारपर वचनांच्या दृष्टीने ईश्वराचा विचार करणे फारच कठीण होते. कारण, साक्षात्कारवाद तत्त्वज्ञानातील आहे; त्याला प्रातिभ अनुभव पाहिजे. गुणातीत देव म्हणजे निजरूप, पातंजलयोगांतील " स्वरूप " होय. मूर्ति म्हणजे देव नव्हे. भक्तांना देवाची रुपे दिसतात. ती सर्व त्यांत आहेतच. पण या सर्व रूपांच्या बेरजेने देव संपत नाहीं. तो त्यांच्या पलीकडेहि असतो. ईश्वरांत विरोधी गुणांचा समन्वय होतो; तो लोकविलक्षण आहे. क्रोधमय, अक्रोधमय, काममय, अकाममय असा तो आहे. तो हात, रंग व कुंचला यावांचून अस्तित्वांत वसलेल्या भिंतीवर विश्वचित्र रंगवितो.

३) **ईश्वराची भक्त–साक्षेप लक्षणे :–** परमार्थ–प्रवृत्तीच्या कारणांच्या चर्चेत, पाप, अज्ञान, दुःख यांतून मुक्त होण्यासाठी भक्तीमार्गाकडे मनुष्य वळतो व त्याने वळावे, हा विचार आला आहे.

ईश्वराच्या भक्तिसाक्षेप लक्षणांत, त्याची हीच लक्षणे विस्ताराने येतात. तो भक्तांना पाप–ताप–अज्ञान यांतून मुक्त करतो; हेच अनेक प्रकारांनीं सांगावयाचे आहे.

अ) **भक्तप्रिय** :– सर्वाभूतीं समता व स्नेहभाव, संतोष व क्षमा ही ज्यांच्या ठायी आहेत, व्देषभाव मुळीच नाही, मी–माझे जे त्रिसरले व ज्यांच्या अंतःकरणांत देव–भक्त एकासनीं विराजत असतात, ज्यांचे देवावर अत्यंत प्रेम असते, असे भक्त देवाचे प्रियतम होत. त्यांच्या कल्याणासाठी तो सदा सिद्ध असतो. ज्या क्षणी भक्त 'अनन्यगतिके चित्ते' देवाची भक्ति करूं लागतो, मन त्याला अर्पण करतो, त्या क्षणाला त्याचा सर्व भार देवावर पडतो. सायुज्य-मुक्ति, सेवा, जे हवे असेल ते, तो त्याला देतो. भक्ताचे वांछित देव त्याच्यापुढे करतो व यथाकाल त्याची परिपूर्तीहि करतो. काया-वाचामने जे सर्वस्वी देवाला विकलेले आहेत, त्यांच्यासाठी तो सर्व कांहीं करील; कशाचीच चिंता पडूं देणार नाही. आपल्या परम प्रेमामुळे रात्र–दिवस हा भेदहि न कळता जें अखंड ईश्वरदर्शनाचा आनंद भोगीत असतात, त्यांचा तो आनंद काळ आड न येंता अखंड वाढावा असे देव करतो; त्यांच्या सर्व आध्यात्मिक इच्छा पुरवितो. असे अनन्यभक्त विरळा. भक्तांना अनन्यभक्ति; देवाला अशा भक्तीचे प्रेम; असा त्यांचा संबंध आहे. †

आ) **भक्तिप्रिय** :– देव प्रेमभाव जाणतो, भक्तिभावाने फळ, फूल, पान, पाणी कांहींहि दिले तरी तो प्रेमाने स्वीकारतो. पदार्थाची त्याला काय गरज ! पदार्थ हे प्रेमभाव प्रकट करण्याचे केवळ निमित्त आहे. खरी पूजा प्रेमाने करावयाची असते. जगाला मोक्षदान करीत चाललेल्या अशा भक्तांना देव मुकुटाप्रमाणे मस्तकीं धारण करतो. ‡

---

† म. सा. १३०–१३१. ‡ म. सा. १३२.

इ) **संकट – मोचना :–** भक्तिमार्गाने जाणाऱ्या भक्ताने आपले मन देवाला अर्पण केले की त्याक्षणीच तो देवांत प्रवेश करतो. देव त्याला कशाचीच चिंता पडूं देत नाही. त्याचे परम-हित करतो, त्याला सायुज्यमुक्तीचा अधिकारी करतो. जन्मभर अनन्यभक्ति व नित्यसेवा केलेल्या भक्ताच्या मृत्यूसमयीं देव जणू स्वतःच त्याचा चाकर होतो व तो बेसावध होऊं नये म्हणून आपले शांतिदायक स्वरूप व शीतल स्मरण सदा त्याच्या अंतरी जागृत ठेवतो. *

ई) **यशदाता :–** यशाची किल्ली देवाच्या हातांत असल्याने उपासनेशिवाय उदंड प्रयत्न केले तरी यश येंणार नाही. म्हणून भक्ति करावी, तोच एक आधार आहे. एरव्ही " **समर्थाची नाहीं पाठी। तयास भलता च कुटी ।।** " दासबोध १६. १०.३० मी कर्ता नाही, ईश्वर कर्ता, ही जाणीव अखंड जागृत ठेवून देवाचे ध्यान करीत आपले कर्तव्य सुरूं करावे; त्यांत निश्चित यश येईल, यश–कीर्ति–प्रताप जोडतील. मी कर्ता असे मानले तर यश येणार नाही, कष्ट मात्र होतील §.

देवावर भार घातला तर तो निर्धाराने योगक्षेम चालवितो; भक्ताची पीडा दूर करतो. भक्तामुळे जगाला देवाची माहिती, होते, निर्गुण–निराकार देव सगुण–साकार होतो. म्हणून भक्त वडील, देव धाकटा असेच म्हटले पाहिजे. दुसऱ्या दृष्टीने त्यांत अभेद आहे. भक्त केविलवाणा दिसला, त्याचे शद्ब खोटे ठरले, तर त्याची लाज देवाला वाटेल ‡.

२) **भक्तांवर नितांत प्रेम–** भक्ताविषयी देवाला कांहीं आगळेच प्रेम वाटते. भक्ताची सेवा खरी असल्याने, तो देवाला कधींच भीत नाही. जीव, भाव देवाला वाहिला, त्यावर भार

---

* म. सा. १३३. § म सा. ४०० ‡ म. सा. २२४–२२५.

घातला, विश्वंभर माझी चिंता करीलच या श्रद्धेने त्याचे चिंतन केले, म्हणजे तो भक्ताचे पोषण करीलच. त्यासाठी दुसऱ्यापुढे हात पसरणे ही अश्रद्धा, व्यभिचारी भक्ती होय. अत्यंत दारिद्र्यांत ध्यान केले तर, अशा भक्ताच्या सदा निकट असलेला, मनाचा साक्षी देव त्याच्या भावाप्रमाणे त्याला फल देईलच. भक्ति वायां जाणार नाही, याच श्रद्धेने भक्त त्याचे चिंतन करतात; कळवळ्याने त्याला पाचारल्यावर तो येतोच. भक्ताने धीर मात्र धरला पाहिजे. भक्तावर संकटे आली असता, देव निष्ठूर आहे असे वाटते. पण भक्ताच्या रक्षणासाठी उडी घालून, शेवटी तो सर्व संकटांचे निरसन करतो. भक्तांच्या पारमार्थिक कल्याणासाठी त्यांनीं मायापाशांत पडूं नये म्हणून, देव त्यांच्या संसारांत कांहीं उणीवहि ठेवतो. पण न भिता प्रपंचाचे आघात धैर्याने सोसले म्हणजे, विश्वव्यापी देव जवळच आहे, असा प्रत्यय येतो. मृत्यु, संकटे यापासून पळून जाता येणार नाही. पावलोपावली देवाचे ध्यान करावे, म्हणजे सर्व संकटे, भय दूर करून तो भक्ताला सुखी करतो. तो स्वतःच गुरू होऊन त्याला परमार्थाची वाट दाखवितो, मागेपुढें उभा राहून तोच प्रापंचिक व पारमार्थिक योगक्षेम चालवितो; संकट निवारण करतो; सत्य, शुभ संकल्प पूर्ण करतो. कालगति फिरली असेल तर, उतावीळ न होता, योग्य काल येईपर्यंत भक्ताने धीर मात्र धरला पाहिजें. निष्कामपणें, निश्चल मनाने भक्ताने ध्यान करावें; मग दयाळूमायाळू देव न मागताच त्याच्या इच्छा पूर्ण करतो; त्याने कांहीं मागावें, म्हणून त्याच्या मागें लागतो. तो जात पाहात नाही. त्याच्या भक्तवत्सलतेला उपमाच नाही §.

देव भक्ताच्या इच्छा पूर्ण करतो म्हणजें परिस्थितींत अशा घटना घडवितो, की भक्ताच्या मनांत इच्छा उत्पन्न होण्यापूर्वीच त्या तृप्त झालेल्या असतात; हा गुरुदेव रानडे यांचा विचार चिंतनीय आहे. देवाच्या कृपेने रंकाचा राव होतो ७ सामान्य

---

§ म. सा ३३३–३३५. ७ हिं. सा. ३२५

माणसाला जे दिसत नाही, ते सर्व दिव्य दर्शन ईश्वर अंधालाहि दाखवितो. ही दिव्यदृष्टि मला दे असे सूरदासांनी देवाला विनविले आहे.

**ऊ) संकटे व माया तरून जाण्याचा एकमेव उपाय म्हणजे ईश्वराचा आश्रय–** दारूण संकटकाळी, माझे रक्षण कर, अशी देवाची करुणा भाकावी, मग यासंकटांना परस्पर छेद देऊन देव रक्षण करतो. एका चिमणीला मारण्यासाठी व्याध बाण सज्ज करून उभा होता, वर ससाणा उडत होता. तेव्हां चिमणीने अशी करुणा भाकली; त्यावेळी व्याधाला सर्पदंश झाला, बाणाचा नेम चुकून त्याने ससाणा मेला. जात्यांत सर्व दाणे भरडले जातात, मधल्या खुंट्याजवळ असतात ते मात्र बचावतात. या दृष्टांताने देवाच्याजवळ जो राहील तोच सुरक्षित राहील, हे कबीर–कमालांच्या वाचनांत दाखविले आहे. म्हणून भक्ति केली पाहिजे. मायापाशांत भुलून सर्वच भ्रमांत पडले आहेत. भक्तिने ज्याने ईश्वराचा आधार मिळविला, तो मात्र मायेच्या दुःखांतून बचावतो. सारांश, निसर्ग वा प्रारब्ध प्रतिकूल असतील तर सर्व मानवी प्रयत्न व्यर्थ जातात. देवाला आळवून त्याची कृपा संपादन केली, तर तीच आपल्या शक्तीने बचाव करील. ईश्वरकृपेनेच सर्व संकटांचा निरास होऊन साक्षात्कार होऊं शकेल ‡

**देव–भक्तांचे ऐक्य :– " जिवो ब्रह्मैव नापरः । "** या वचना-प्रमाणे भक्त शेवटी देवाशी एकरूप होतोच; पण साधकावस्थेतहि कोणत्यातरी नात्याने देवाजवळ असावे, ही भक्ताची उत्कंठा असते. अनेक प्रकारांनीं, विविध दृष्टांतांनीं ही गोड, चित्ताकर्षक, हृदयस्पर्शी भावना संतांनीं व्यक्त केली आहे. गुरुदेव रानडे यांनीं तिची चर्चा केली आहे.

‡ हि. सा. ३१६–३१८

तुकाराम म्हणतात, "संत म्हणजे देव; प्रतिमा केवळ निमित्तमात्र. देवाला भक्तांनीं नामरुप दिले. भक्तांनीं देवाचा महिमा वर्णिला." तुकारामांसारखे, देवाशी एकरूप झालेले संत देवाशीं बरोबरीदेखील करतात. " देवा तुझ्या माझ्यांत फरक काय आहे ? तूं अमर, तसाच मी; तुला नामरूप नाही; मला तरी कोठे आहे ? देवाशी अभिन्न असूनहि, जगाला मार्गदर्शन करण्यासाठी, भक्तिसुख वाढविण्यासाठी, भक्त अंगी भेद दाखवितात. देव–भक्तांचा भेद–सोहाळा हे नुसते नाटक आहे, वर्म अनुभवी भक्तच जाणतात. देव झाला आहे तोच स्वानुभवाने सर्व देव आहेत हे जाणतो. एका दृष्टीने भक्त देवा–पेक्षांहि श्रेष्ठ होत. देवाला विश्वाची चिंता; भक्ताला चिंताच नाही. " माझ्या घरी चल, मला तुझी पूजा, तुझे पूज्य चरण प्रक्षालन करु दे," अशी सत्ता भक्त देवावर चालवूं शकतो. निराकार देवाला भक्तांनी साकार केला. एका वासना–त्यागाने, ते त्याच्यापेक्षा श्रेष्ठ झाले. भक्त देवापेक्षा श्रेष्ठ या विधानांतील भक्तिभाव, सहृदयता, अनन्यता, वरवर भासणाऱ्या अभिमानांत असलेली नम्रता व लीनता, ईश्वरकृपेचा आनंद व उत्साह या भावना सहज समजण्यासारख्या आहेत +.

बसवेश्वर म्हणतात, " ईश्वर सर्वज्ञ, चित्प्रकाश आहे. पण विदुल्याच्या रूपांत भक्त त्याला पाहतो. तेव्हा भक्त या सर्वज्ञालाहि जाणतो. आपल्या प्रेमभावाने भक्त सर्वव्यापी परमेश्वरास व्यापून टाकतो. सर्वांच्या अंतर्यामी असलेल्या देवाच्या अंतर्यामी भक्त पूर्णतः आहे. अर्थात् दोघांत पूर्ण ऐक्य. अभेद आहे. सर्व शक्तिमान देवाची शक्ति भक्ताच्या अंतःकरणांत उतरली म्हणजे भक्त आपोआप सर्व शक्तिमान होतो. म्हणून भक्त देवापेक्षा श्रेष्ठ आहे." येथेहि सर्वज्ञ, सर्वव्यापी सर्व शक्तिमान देवाचा साक्षात्कार झाल्यावर भक्तांतहि हे सर्व गुण येतात (आत्मविदात्मैव भवति) हा वेदांताच सुप्रसिद्ध सिद्धांत चमत्कृतिपूर्ण रीतीने मांडला आहे †.

---

+ म. सा. ३४१–३४२. † क. सा. १३७–१४०.

**५) भक्ताचा देवाशी कलह –: " ज्याची खरी सेवा। त्याच्या भय काय जीवा। करिता स्वामीसवे वाद। अधिकाअधिक आनंद।।"** (तुकाराम). गाढ निराशेच्या रात्रीच्या अवस्थेंत, आपण आपल्या शक्तीप्रमाणे प्रयत्नांची व त्यागाची पराकाष्ठा करुनहि देव कृपा करुन दर्शन देत नाही, हे पाहून दुःखित होऊन भक्त देवाशी भांडणदेखील करतात. आपली सेवा खरी आहे या पूर्ण विश्वासाने, भीड न ठेवता, ते देवाशी कलह करतात, तुकाराम. आपले आजे–गुरु श्रीनिंबर्गी–महाराज व कन्नड संत कनकदास यांच्या अशा वचनांची चर्चा गुरुदेव रानडे यांनीं केली आहे. तुकाराम म्हणतात, " माझे चित्त खापरांतील लाहीप्रमाणे तडफडत असताहि तुला दया येत नाही. तूं भिकारी असून भक्तांनाहि भिकारी करतोस. तूं आपल्या निर्गुण या नांवाप्रमाणे निष्ठुर आहेस. तुझा दास म्हणवून घेण्याची लाज वाटते. तुझे नांव घेणार नाही; तुझे कुळ बुडवीन; तुझी अन्न घेईन; असेल त्याला देव असो; माझ्या लेखी देव मेला." श्रीनिंबर्गी –महाराजांनी देवाला आरोपपत्रच दिले आहे. " १) आपण खेळगडी म्हणून खेळत असताना मला भवपाशांत अडकवून, तूं मात्र मोकळा राहिलास. २) परमानंद देण्याऐवजी सर्वनाश माझ्या वांट्याला आणलास. ३) मला लुळापांगळा करुन, तूं पोळासारखा बेछूट फिरतो आहेत ४) देव–भक्त यांत भेद नसताना, खोटाच भेद निर्माण केलास ५) कपटाने माझी सर्व पारमार्थिक संपत्ति लुटून नेलीस. ६) सर्वात वाईट म्हणजे, तुझ्या कृपाछत्राखाली मी भक्तीची व तुझ्या आणि माझ्या सद्गुरूंच्या नामस्मरणाची पराकाष्ठा करीत असता तूं माझ्यावर दुःखांचा व संकटांचा वर्षाव केलास. या पापांच्या परिमार्जनासाठी माझ्या सद्गुरूंना शरण जा," असे त्यांनीं देवाला शेवटी म्हटले आहे. § कनकदास देवाला सांगतात, " हाडे, मांस, स्नायु इत्यादि अशुद्ध वस्तूंचा देह बनवून त्यांत चैतन्य घालून तूं मला जन्माला घातलेस. माझ्या जन्माला तूं जबाबदार आहेस. तसेच माझ्या चित्तांत तूं निर्माण केलल्या संकल्पामुळे मी जे कांहीं बरेवाईट

§ क. सा. १४५–१४६.

करतो, त्यालाहि तूं जवाबदार आहेस. पण त्याची फळे मात्र मला भोगावी लागतात. तूं नेता, पुढारी आहेस. आंधळ्याच्या हातांत काठी देऊन तूं त्याला चालायला लावतोस, पण पुढे ती काठीहि काढून घेतोस. मग आंधळा विहिरींत पडला तर त्याला तूंच जबाबदार आहेस. शेवटी तुला सर्वस्वाचे दान केल्यावरहि तूंच जकात मागतोस. ती मी कोठून देणार ? तेव्हां विचार कर आणि सर्व जबाबदारी तुझी असता, त्याचे परिणाम मला भोगायला लावूं नको. †

**६) देव-भक्तांची अनेक नाती :–** भक्ताची वृत्ति व अवस्था कोणतीहि असो, त्याचे ध्यान सदा देवाकडे लागलेले असते, अशी ऐक्याची भावना निवृत्तिनाथांनीं रूपकाने वर्णिली आहे. " आम्ही चकोर, हरि चंद्रमा; आम्ही चंद्रकला हरि पौर्णिमेचा पूर्ण चंद्र; आम्ही देहधारी तर तो आत्मा आणि आम्ही विदेही, देहभावापासून मुक्त, तर हरि परमात्मा " या सर्व नात्यांत ऐक्य असते व भक्त चातकाप्रमाणे सदा देवाच्या कृपेचे कांहीं थेंब मिळावेत म्हणून त्याच्याकडे लक्ष लावून बसतो.

**ऐक्यपणें सकळ वसे । भेदबुद्धि कांहीं न दिसे ।**
**निवृत्ति चातक इच्छिताहे । हरिलागी वरते पाहे ।। ‡**

या दृष्टांतांत व्दैत, विशिष्टाव्दैत व केवलाव्दैत ही मते कुशलतेने ध्वनित केली आहेत.

रैदास म्हणतात, " देवा, मी वनांतील मोर, तूं मेघ, माझे ध्येय व आनंदाचे स्थान. मी पाणी, तूं चंदन, अंतर्यामी राहून सुगंध उत्पन्न करणारा. मी सोने, तूं शुद्ध करणारी सुहागी. मी दोरा, तूं मोती. मी क्षुल्लक, तूं मोलाचा पण माझ्याशिवाय तुझा उपयोग

---

† क. सा. १४६, १४८ ‡ म. सा. १६७;

नाही." जगाला देवाची महती पटते, तो भक्तामुळे.* श्रीनिंवर्गी-महाराज सांगतात, " देवा, मी केव्हांहि तुझ्यापासून निराळा राहिलो नाही. सदा आपण एकत्रच आहोत. तूं अनंत, तर मी निर्विकारी. तूं सगुण तर मी शरणागत. तूं ॐकार, तर मी त्याचा जप करणारा. तूं पंचवदन, तर मी तुझ्या चरणीं लागणारा. तूं, माझे सद्‌गुरु व मी, आपणांमध्ये सदा पूर्ण ऐक्य आहे; आपण सदा एकत्रच राहूंः ‡ विजयदासांच्या एका पदांत साक्षात्काराच्या दृष्टीने देवभक्तांचे नाते वर्णिले आहे. देवा, तूं नादमूर्ति, प्रकाशमयनाद, या रूपांत तूं माझ्या सदा अंतरी राहा, क्षणभरहि दूर जाऊं नकोस. रत्न जडलेल्या प्रकाशाच्या मंडपाच्या मध्यभागी तुला वसवून मी तुझी पूजा करीन; पण ती पूजाद्रव्यांनीं नाही. तुझ्या नामाचे स्मरण व रूपाचे ध्यान हीच माझी पूजा. ही पूर्ण झाल्यावर भक्तिरसाच्या माणिकमोत्यांनीं मी तुला ओवाळीन. तुला सोडून जाणे मला शक्यच नाही. तूं मला सोडून जाऊं लागलास, तर न्यायनिवाड्यासाठी मी तुला संतसभेसमोर नेईन. त्याची आज्ञा तुला मानावीच लागेल † " असे अनेक प्रकारचे भक्ताचे देवाशी नाते असते.

७) **भक्ताची लक्षणे :–** अनन्यभाव व शरणागति या भक्तांच्या लक्षणाचा उल्लेख या प्रकरणाच्या सुरुवातीला "देव भक्तप्रिय आहे." (पृ. ८५) या भागांत आलाच आहे नाम हे चिंतामणि, कल्पतरु, कामधेनु, यापेक्षा श्रेष्ठ आहे. त्याचे सतत स्मरण करीत असल्याने भक्तांचे भय, ताप, पाप दैन्य सर्व नष्ट होते; मेध्य–अमेध्य, पाप–पुण्य दोन्ही दग्ध होऊन ते पापपुण्यातीत होतात. देव अंतर्यामी आहे; त्याच्या चिंतनाने भक्ताचे पाप–ताप नष्ट होतात. त्यांना छळूं पाहणाऱ्यांचा खडकाला धडक देणाऱ्या पुरूषाप्रमाणे नाश होतो. +

---

* हि. सा. ११५–११७ ‡ क. सा. १४८–१४९.

† क सा. १४९–१५०, + क सा. १३०–१३१

निरूपाधिसिद्धांनी सांगितलेली भक्ताची कांही लक्षणे चिंतनीय आहेत.

i) **शारीरिक :–** तो खोल श्वास घेतो; मौन धरतो; त्याचे मुख तेज:पुंज असते. स्नान न करताहि त्याचा देह स्वच्छ व तेजस्वी दिसतो; (ध्यानातून उठल्यावर देह असा दिसतो.) ध्यानामुळे असे सामर्थ्य येते की अन्न न खातां पोट भरल्यासारखे वाटते. ध्यान केल्यावर अर्धा शेर दूध प्याल्यासारखे वाटते, असे एक थोर संत म्हणत असत. अशा भक्ताला पाहिल्याबरोबर त्याला नमस्कार घातल्याशिवाय राहवत नाही.

ii) **मानसिक :–** मद्य न घेता नशा, जागृत राहुन निद्रा ( ही एक प्रकारची समाधि आहे. ) व बाहेरुन वेडा दिसणे, ही भक्ताची लक्षणे होत. भक्ताला भूत–भविष्य कळले पाहिजे हे त्याचे विशेष लक्षण ते सांगतात ‡. संतमहालिंगरंगांच्या मते " संत द्वंद्वातीत असतात, म्हणून ते कसेहि राहिले वागले तरी त्यांना दोष नाही; ते चांगलेच असतात. तो गृहवासी वा संन्यासी, योगीं वा भोगी, राजा वा रंक, वेदान्तीं वा सिद्धान्ती, कोणीहि असो तो श्रेष्ठच आहे. लौकिक नैतिक कल्पनांनीं त्याचे मूल्यमापन करावयाचे नाही β. "

८) **आत्मस्वातंत्र्याविषयी एक महत्वाचा प्रश्न :–** " मी चांगले–वाईट करतो, असे मनुष्याचे म्हणणे मूर्खपणाचे आहे; दोन्हीं देवच करतो, असे जगन्नाथदास म्हणतात. यावरून पुढील महत्वाचा प्रश्न निर्माण होतो, मनुष्याचे आत्मस्वातंत्र्य व क्रियास्वातंत्र्य व ईश्वराचे सर्वज्ञत्व आणि सर्व शक्तिमत्त्व यांचा संबंध कोणत्या प्रकारचा आहे ? याविषयी चार मते आहेत. §

---

‡ म. सा. १३२–१३३. β क. सा. १३३–३४ § क. सा. १३५

i) **चांगले–वाईट सर्व देवच करतो. मनुष्य कांहींच करूं शकत नाही.** आत्मस्वातंत्र्य अमान्य करणारे हे मत पाश्चात्यांना मुळींच पटणार नाही.

ii) **चांगले–वाईट दोन्हीं मनुष्यच करतो; त्याची जबाबदारी त्याच्यावरच** आहे, हे आत्मस्वातंत्र्यवादी मत पाश्चात्यांना पटेल. पण जगन्नाथदास या मताला अधम म्हणतात.

iii) **चांगले देव करतो, वाईट मी करतो.**

iv) **चांगले मी करतो, वाईट देव करतो.** दुर्योधन नेमके हेच म्हणत होता.

या विरोधी मतांचा समन्वय वुल्यम जेम्सने बुद्धिबळ खेळणारांच्या दृष्टांताने केला आहे. नवशिक्या खेळणाराने कशीहि प्यादी टाकली तरी, त्याच्यावर सहज मात करता येईल, अशी प्यादी निष्णात खेळाडू टाकतो. मनुष्याचे क्रियास्वातंत्र्य मर्यादित असल्याकारणाने, त्याने कांही केल तरी सर्वज्ञ, सर्व शक्तिमान देव शेवटी स्वतःच्य इच्छेप्रमाणेच सर्व घडवून आणतो. म्हणुन माझे सदा मंगल कर, अशी देवाची प्रार्थना करीत राहिले पाहिजे' आपले दोष व ईश्वराचे सर्वज्ञत्व आणि सर्व शक्तिमत्त्व संताना मान्य आहे पण मनुष्याने कांहीं केले तरी, त्याच्या दयाळुत्वामुळे व सर्व शक्तिमान–मुळे, त्यांचा वाईट परिणाम कमी करणे हे देवाच्या हातात आहे. म्हणून त्याची कृपा भाकली पाहिजे परिणाम मग, अंती आपल्या चुकांचा परिणाम न होता, ईशकृपेने सर्व चांगलेच होईल. देव भक्तांचे रक्षण करतो. याचा अर्थ आपल्या कृपेने निसर्गात आणि मानवांच्या मनांत भक्तांना अनुकूल अशा घटना व प्रेरणा तो निर्माण करतो; त्याच्या शक्तीने त्या निर्माण होतात. ती विश्वशक्ति मानवरुप घेऊन भक्ताचे रक्षण करते; अशा अनेक पौराणिक व लौकिक कथा आहेत. विश्वशक्तीच्या अगाध लीलांचा अंत मानवबुद्धीला

लागणार नाही. पण सामान्यत. ती शक्ति अशा घटना घडवून आणते तिला मानवरुप घेण्याचे कारण नाही, हा सिद्धांत तर्कमान्य होण्यासारखा आहे. याचा दुसरा उपयोग असा की यामुळे अनेक भ्रामक कल्पना दूर होतील; भोळयाभावडयांना अशा कल्पित कथा सांगून फसविणे व त्यामुळे खऱ्या परमार्थाला दोष लावणे हेहि कमी होईल §.

९) **भक्तांची विनवणी** – भक्तांनीं अनेक पदांत देवाची करूणा भाकली आहे. त्यांत त्यांच्या ईश्वरविषयक भावना उत्कृष्टपणे प्रतिबिंबित झाल्या आहेत. रैदास देवाला विनवतात–" प्रभो, तुझे दर्शन झाल्यावांचून तुझ्यावर मला खरे प्रेम कसे करता येईल? परस्परांना पाहिल्यावरच प्रेम करता येते. तेव्हा कृपावत्सला, मला दर्शन दे. मी अहंकारांत गढलेली दुर्गुणांची मूर्ति, तूं मूर्तिमंत सद्गुण, कृपा करून माझा उद्धार कर." सूरदासांच्या एका पदांत अनन्यभक्तीची साक्ष आहे. "अपरंपार भरलेल्या समुद्रांतील जहाजावर बसलेल्या पक्ष्याला जहाजावांचून दुसरे कोणते आश्रय-स्थान आहे ? तसेच, मला तुझ्याशिवाय कोठे सुख मिळणार ? " सामान्य दैवतांपेक्षा फार श्रेष्ठ असलेल्या भगवंताशिवाय मनुष्याला भवसागरांत दुसरे आश्रयस्थान, दुसरा रक्षणकर्ता, विघ्नहर्ता नाही. त्यालाच आळवावे. भक्तश्रेष्ठ राघवेंद्रस्वामी करुणावाणीने म्हणतात, " देवा, तुझ्या अपेक्षेप्रमाणे भक्ति व सद्गुण माझ्या ठिकाणी नाहीत. मी कुसंगति धरली, अयोग्य मार्गाने गेलो; खरा मार्ग मला कळला नाही; दुःखाचे डोंगर माझ्यावर कोसळले. या सर्व संकटांतून मला तूं मुक्त कर, मला दर्शन दे. तुला काय अशक्य आहे ? " आजपर्यंत अनेकांच्या हांकेला देव धावून आला आहे, त्यांचा उद्धार, त्यांचे रक्षण त्याने केले आहे; तशीच कृपा तो आपल्यावरही करील, याच दृढविश्वासाने भक्त भक्ति करतात ‡. अनन्यभावाचे वर्णन महाभक्त नामदेव करतात –

---

§ हिं. सा. ११९–१२१ ‡ म. सा १४२

**आणीका न मागे हे ब्रीद साजे चातका ।**
**भूमीच्या उदका न खालवी माथा ।।**
**आणिकांचा पांगिला न करी गा देवा**
**नामा म्हणे केशवा दास तुझा ।।**

अशा सर्व भक्तिभावनांची परिणति म्हणजे शरणगति. तोच भक्तीच्या लक्षणांचा मुकुटमणि; स्वत:ला ईश्वरचरणी वाहणे. हिंदी भक्त बहिरो आपल्याला मृत्यु कोणत्या अवस्थेंत यावा याविषयी देवाला कळवळ्याने विनवितात. " देवा, १) कृष्ण, कृष्ण या नामाचे रटन करीत असता, २) तू माझ्याजवळ असताना ३) माझ्या अंतरी भरलेला असताना, ४) तुझे रूप पाहत व अनाहतनाद ऐकत असता, मला मृत्यु येऊ दे. या कोणत्याही अवस्थेंत मृत्यु आला तर तुझ्यांत लीन होऊन मी तुझ्याशी एकरूप होईन. पण यापैकी मला कांहीहि नको. प्रत्येक जण तुझ्याजवळ कांहींतरी मागतच असतो. तुझी मर्जी असेल तेव्हां मला मृत्यु येऊं दे, येवढेच माझे मागणे आहे. "

**दुनिया है अपनी गर्जी । बहिरो कि यही अर्जी ।।**
**जब हो तुम्हारी मर्जी तब, प्राण तन से निकले ।।**

हीच खरी शरणागति. ईश्वराला पूर्णपणे शरण गेले पाहिजे हीच खरी मुक्ति. श्रीअरविंदांनीं शरणागतीला प्रमुख स्थान दिले आहे. येशू ख्रिस्ताच्या जीवनांत शरण–गमन–मुक्ति निश्चित दिसून येते. मृत्यूच्या आधल्यादिवशी, आत्म्याला पराकाष्ठेच्या यातना होत असताना देवाला तो म्हणाला, " हे प्रभो, भक्तीच्या तुझ्या आदेशाचा प्रसार करण्यासाठी आणखीं कांहीं दिवस आयुष्य असावे, अशी माझी इच्छा आहे. पण तुझ्या इच्छेला येईल ते होऊं दे. माझ्यासाठी कांही करूं नको. क्रॉसवर देहाला भयंकर यातना होत असताना तो म्हणाला, " देवा देवा, तूं माझा त्याग का केलास ? " हाच

ख्रिश्चन धर्मातील शरणागतीचा महान सिद्धांत. यालाच रामानुजांचा प्रतिपत्ति हा उत्कृष्ट प्रतिशद्ब लावता येईल. ईश्वराला पूर्णतः शरण जाणे म्हणजे शरण–गमन–मुक्ति. §

१०) **सख्यभक्ति किंवा शरणागती**– दासबोध ४.८. हा समास सख्यभक्तीचा म्हणजे वस्तुतः शरणागतीचाच आहे. ती आत्मनिवेदनाच्या, ईश्वराशी ऐक्याच्या अलिकडची पायरी आहे. त्यांत भक्ताची अनन्यता कशी असावी व अशा अनन्यभक्तासाठी देव काय करतो, या दोहोंचीहि चर्चा झाली आहे. रामदास म्हणतात. " देवाला प्रीतीने बांधून त्याच्याशी परमसख्य करावे. त्याच्या सख्यत्वासाठी जिवलग, तन–मन–धन सर्वस्व, एवढेच काय प्राणहि अर्पावा. प्रपंचाची चिंता सोडून अनन्यभावाने देवाचे चिंतन करावे. आपले सर्वस्व जावे; पण आपला प्राण जो देव त्याच्याशी सख्यत्व असावे; त्याला सोडूं नये; असे अनन्य प्रेम असावे. माता–पिता–सखा–धन–वित्त सर्वस्व देवच आहे अशा भावाने देवाला अंतरी सदृढ धरावे. देवाचे मनोगत तेच आपले हित असे मानून, त्याच्या इच्छेने वर्तावे. तो घडवील ते आनंदाने मान्य करावे. आपल्या मनासारखे झाले नाही, तर देवावर रागावणे; आपली इच्छा पूर्ण पूर्ण झाली नाही तर त्याला विसरणे; ही सख्यभक्ति नव्हे. यांत अनहित आहे. देवाच्या कृपेला वेळ लागला तरी चातक मेघाकडे पाण्यासाठी पाहात असतो, तसे अनन्य भक्तीने त्याच्या प्रेमाची वाट पाहावी. अशा परम भक्तीत सर्व सद्‌गुणांचा अंतर्भाव आहे. समर्थ सांगतात, अशा भक्ताला देव कधीहि विसणार नाही. * (दासबोध. ४.८.२८)

शरणागतीची भावना हळूंहळूं वाढत जाते. परमार्थातील सर्व बाजूंची प्रगतिच हळूंहळूं वाढत जाते, परमार्थ सुरूं करतानाच पूर्ण

---

§ हिं सा. १३०–१३३. * म. सा. ४०५–४०६

शरणागति अशक्य आहे. प्रथय संतवचनांच्या श्रवण–मनन–पठण चिंतनाने, विवेकाने शरणागतीची वृत्ति धरण्याचा प्रयत्न करावयाचा, पुढे साधन वाढत जाते, त्याबरोबर ईश्वर सर्व प्रकारे प्रपंचांत व परमार्थांत दोन्हीं ठिकाणी संरक्षण व साह्य करतो, (प्रपंचांत संकटे दूर करून, सत्यसंकल्प पूर्ण करून आणि परमार्थांत आत्मानुभवाच्या प्राप्तीच्या रूपाने), कांहीं कमी पडूं देत नाही; असे चढते, वाढते अनुभव येतात. मग शरणगतीहि वाढत जाते. मृत्यूपर्यंत ती पूर्णतेला कधीच जात नाही. या बाबतीतहि गुरुदेवांचा " अखंड वाटचालीचा " सिद्धांतत लागूं आहे.

११) **आत्मनिवेदन किंवा अनन्यता :–** " शरणागतीचा तात्त्वज्ञानाच्या दृष्टीने अर्थ अभेद अशा देवाला शरण जा; मग त्याच्याशी एकरुप होशील. शरणागतीशिवाय अंतिम ऐक्य शक्य नाही. शरणागती जीवभाव नष्ट झालाच पाहिजे. नाहीतर ती शरणागती कसली ? जीवभाव नष्ट झाला की साक्षात्कार ऐक्य, आत्मनिवेदन घडते.

**सुवर्णमणि सोनया । ये कल्लोळु जैसा पाणिया ।**
**तैसा मज धनंजया । शरण ये तूं ॥**
**मजसी शरण रिघिजे । आणि जीवत्त्वोंचि असिजे ।**
**धिग्बोली यिया न लजे । प्रज्ञा केवीं ॥**

ज्ञानेश्वरी १८.१४००-१४०२.

" **अहं ब्रह्मास्मि** " " **सर्व खलु इदं ब्रह्म,** " या आत्मनिवेदना अगदी अलिकडची पायरी म्हणजे सख्य, शरणागति. इतके तिचे परमार्थ–साधनांत महत्व आहे.

* *

## प्रकरण ८ वे : साधनमार्गाविषयी कांहीं सामान्य विचार

**१) नामसाधनाविषयी तात्त्विक विचार :–** साक्षात्काराविषयी बौद्धिक नैतिक व भावनात्मक शिदोरी २ ते ७ प्रकरणांत मिळाली. आतां तिच्या साह्याने साधन करून, साक्षात्काराकडे जाणे, हा पुढील भाग आहे. नामस्मरण हे मुख्य साधन प्रकरण ४ मध्ये सांगितले आहे. बौद्धिक ज्ञान, बौद्धिक ज्ञानाने उदय पावलेली भक्तीची भावना येवढ्याने आत्मानंदाची प्राप्ती होणार नाही. त्यासाठी आत्म्याचा साक्षात्कारच झाला पाहिजे. मग बौद्धिक ज्ञान व तन्मूलक भावना यांची सत्यता पटेल. काश्मीरचे वर्णन व त्यामुळे तेथील सौंदर्याविषयी उत्पन्न झालेल्या भावना यांची परिणति काश्मीरदर्शनाच्या आनंदांत झाली, तरच ते सौंदर्य उपभोगले असे होईल. यामुळे नामसाधनाचा सांगोपाग विचार प्रकरण ८ मध्ये सहजच सुरूं होतो.

आत्मतत्त्वच भ्रमाने स्वतःला देह समजून त्याच्याशी तादाम्य पावते; हे जीवाचे स्वरूप आहे.

या देह–तादात्म्यालाच अहंकार हे नांव आहे. अहंकारामुळे देहाला सुख पाहिजे; म्हणून विषयांचाच विचार, त्याच्या प्राप्तीचे प्रयत्न (कर्म), त्यापासून सुखदुःखादि द्वंदे व या द्वंदातून पुन्हा वासना, म्हणजे वासना–कर्म–द्वंद्व–वासनाहे दुष्टचक्र तरु–बीज न्यायाने सुरूं राहते. त्यांतच जीव अडकून पडतो. हाच जीवाचा बंध. अहंकार व वासना यांतून त्याला मुक्त व्हावयाचे आहे. ईश्वर-साक्षात्काराने तो मुक्त होतो, हे मुक्तीच्या स्वरूपाचा चर्चेत पाहिले आहे. ( पृ.४२–४३ ). रामदासांनीं मनाच्या श्लोकात या प्रक्रियेचे सुंदर वर्णन केले आहे–

" सदा वीषयो चिंतितां जीव जाला ।
अहंभाव, अज्ञान जन्मासि आला ।
विवेकें सदां सस्वरूपीं भरावें ।
जिवा ऊगमीं जन्म नाहीं स्वभा ।
स्फुरे वीषयीं कल्पना ते अविद्या ।
स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या ।
मुळीं कल्पना दों रुपें तेचि जाली ।
विवेकें तरी सस्वरूपीं मिळाली ॥"

अहंकार, मी—माझे व विषय यांचे चिंतन हे जीवाचे स्वरूप आहे. तोच स्वरूपाचे चिंतन केल्यावर स्वस्वरूपाला मिळतो: सच्चिदानंद होतो. विषयाचे चिंतन ही अविद्या, बंधनांत पाडणारी; स्वरूपचिंतन ही विद्या, मुक्त करणारी, असे वरील श्लोकांत सांगितले आहे. स्वसंवित् जाणीव म्हणजे आत्मतत्त्व; त्याचेच देहतादात्म्याने जीव हे मायिक, अशाश्वत रूप भासते. सर्व फरक जाणिवेंत झाला आहे; जाणीव, मन, अंतःकरण हे शब्द साधारणपणे समानार्थी वापरतात. जाणीव किंवा मन विषयाने भरलेले असणे म्हणजे जीवत्व, बंध; तेच आत्म्याने, देवाने भरले म्हणजे स्वरूपाला पोहोंचते; सच्चिदानंद होते; मनाचे उन्मन होते. अर्थात् साधनाचा संबंध पूर्णतः मनाशी येतो. वरील श्लोकांत " कल्पना " हा शब्द समर्थांनीं " मनाचा, जाणिवेचा प्रवाह " या अर्थी वापरला आहे. हेच साधन आपण केले असे तुकाराम सांगतात.

" तुका म्हणे देह भरिला विठ्ठले ।
कामक्रोधे केले रिते घर ॥ "

देव भरून वासना काढावी लागते. वासना दूर करणे, नष्ट करणे म्हणजे ती विसरणे व विसरण्याचे कार्य दुसऱ्या कशाच्या तरी स्मरणाने करावे लागते; विसरण्याला दुसरा उपाय नाही. म्हणून देवाच्या स्मरणानेच हळूंहळूं विषय व अहंकार यांचा विसर पडूं

लागतो. यावरून साक्षात्कार-साधनाचे स्वरूप स्पष्ट होते. ईश्वराच्या जवळ जवळ जात राहावयाचे; शेवटी अहंकार व वासना पूर्णत, विसरून ईश्वरांत, आत्मरूपी लीन व्हावयाचे. आतां, ईश्वर अंतरी कसा भरावयाचा, कशाचे चिंतन केले म्हणजे जाणीव ईश्वराकार होईल, हा प्रश्न येथे येतो. आपल्या भोवती पंचभौतिक व पंच-विषयात्मक विश्वच आहे; ईश्वर दिसतच नाही. कशाचेहि चिंतन केले तरी ते विषयांचेच होणार, देवाच्या मूर्ति, त्याचे गुण म्हणजे देव नव्हे. त्यांच्या चिंतनाने मन सात्त्विक होईल; पण गुणातीत होणार नाही. देव गुणातीत आहे. ' वेदहि त्रिगुणांत सांपडले आहेत, तूं गुणातीत हो,' असे गीतेंत अर्जुनाला सांगितले आहे. येथे सद्‌गुरु व नाम यांचा संबंध येतो. साक्षात्कारी सद्‌गुरु जे नाम शिष्याला देतात ते सबीज, आत्मशक्तियुक्त असते, हे प्रकरण ४ मध्ये सांगितले आहे. (पृ. ९१). अशा नामाच्या चिंतनाने जाणीव आत्माकार, ईश्वराकार होऊं लागते; अंतरी नाम भरणे म्हणजे ईश्वर भरणे; तो भरून कामक्रोधादि विकार पूर्णपणे विसरणे, हे साधकाचे कार्य आहे. म्हणून सद्‌गुरु व नाम येथून साधनविचाराला सुरुवात होते. नामस्मरणसाधनाची सत्संग, सद्‌गुणसंपादन, सदाचार इत्यादि उपांगे आहेत; त्यांतहि अहंकार व वासना या कमी करणे, त्यांवरील आसक्ति दूर करणे व देवाविषयी प्रेम वाढविणे हीच प्रक्रिया अंतर्भूत आहे. भक्ति हा सद्‌गुणांचा मुकुटमणि आहे, हे दाखविताना प्रकरण ३ मध्ये हा मुद्दा स्पष्ट झाला आहे. साधनविचारांत या प्रक्रियेची विशेष चर्चा होईल. तेव्हां, अहंकार, वासना, यापासून दूर सरत, त्यांना विसरत, देवाकडे जाणे, त्याचे प्रेमपूर्वक चढते वाढते स्मरण करणे, ही प्रक्रिया साधनांत अंतर्भूत आहे, हे मुद्दाम पुन्हा एकदा सांगून, साधनविचाराकडे वळूं. यांत सद्‌गुरु, सन्नाम, सच्छिष्य, नाम-स्मरण-प्रक्रिया, साधकाची वृत्ति, आचरण व सद्‌गुण, सत्संगाचे महत्व, साधकांच्या अडचणी, निराशेचे गाढ तिमिर व साक्षात्काराची प्रभात इतके विषय येतात.

**२) गुप्तरूप म्हणजे गुरु :–** सद्‌गुरूंविषयी थोडा विचार प्रकरण ४ मध्ये झाला आहे. " गुप्तरूप म्हणजे गुरु " अशी सद्‌गुरुंची व्याख्या श्रीनिंवर्गीमहाराज करीत. त्याचा अर्थ गुप्त अशा आत्मरूपाशी, त्याच्या दर्शनाने ऐक्य पावलेला संतच गुरुपदाचा अधिकारी होतो. " आपल्याला नाममंत्र देऊन ध्यानाची पद्धत शिकवतील असे, विश्व व्यापून उरलेला हरि प्रत्यक्ष डोळयाला दाखवतील असे, सद्‌गुरु कर आणि तन-मन-धन त्यांना अर्पण करून त्यांच्याकडून वस्तु म्हणजे देव मागून घे. कोरडा मंत्र देणारे कानफुंके गुरु पुष्कळ आहेत. सबीज आत्मशक्तियुक्त नाम देऊं शकतील, त्यामुळे प्रत्यक्ष देवाची भेट करून देऊन शिष्याला ब्रह्मपदाला पोहोंचवतील, असे सद्‌गुरु विरळा. त्यांची कृपा ज्याला लाभली नाही अशा निगुऱ्याला (गुरु नसणाऱ्याला) किंवा मन्मुखाला (स्वतःच्या बुद्धीनेच केवळ ईश्वर प्राप्तीचा प्रयत्न करणाऱ्याला) आत्म्याच्या जगांत प्रवेश मिळत नाही. ज्याला परमार्थ साधावयाचा आहे त्याने सद्‌गुरुंचे साह्य घेतलेच पाहिजे. ते साक्षात्कारमार्ग दाखवून त्याचे दार उघडण्याची किल्ली देतात. †

**३) सद्‌गुरूंची लक्षणे :–** कबीरच्या एका पदाच्या आधाराने गुरुदेव रानडे यांनीं सद्‌गुरूंची नैतिक, शारीरिक, साक्षात्कारविषयक व सामाजिक लक्षणे सांगितली आहेत.

**I) – नैतिक लक्षणे :– अ) आत्मानंद** – आत्मानंदामुळे ग्लानि, असमाधान, उपेक्षा हे दोष त्यांच्यामध्ये कधीच दिसत नाहीत. प्रपंचात तो योग जागृत ठेवतो. आ) **नैष्कर्म्य** – कर्मे करूनहि ती ईश्वरार्पण केल्याने तो अकर्ता असतो. हेच गीतेच्या नैतिक शिकवणीचे, कर्मयोगाचे सार होय. इ) **निर्भयता** – आत्मानंदाने निर्भयतेंत व निर्भयतेने आत्मानंदांत वाढ होते; अशी ही परस्परांना पोषक होतात.

---

† म. सा. १६७; १६८; ३९२.

II) - **शारीरिक लक्षणे :-** अ) आध्यात्मिक आनंदामुळे त्यांच्या दहाहि इंद्रियांचे विनाप्रयत्न नियमन होते. इंद्रियांची द्वारे बंद करावी लागत नाहीत. त्याच आनंदामुळे ते डोलले, बोलले तरी त्यांचे चित्त विचलित होत नाही, अनुसंधान तुटत नाही. कर्मे करीत असताहि ते स्वस्थचित्त, निश्चल असतात. आ) सहज दृष्टी टाकली की त्यांना दर्शन होते; हीच सहज-समाधी. ती ते भोगीत असतात. कुंभक करून लागणाऱ्या समाधीपेक्षा ही अगदी भिन्न आहे. इ) ते केवळ कुंभक करून राहतात; हा कुंभक अन्य कुंभकापेक्षा फार श्रेष्ठ आहे. हा आपोआप होतो; प्रयत्न-साध्य नाही. त्यावेळी श्वासोच्छ्वास अति सूक्ष्म, जणू नाहीच असा होतो आणि मन व शरीर अगदी शांत होतात.

III)- **साक्षात्कारविषयक लक्षणे :-** अ) ते नादानुसंधान करून नादांत म्हणजे ब्रह्मांत आत्मलय करतात. आत्म्याशी एकरूप होतात. आ) त्यांना सर्वत्र ईश्वरच भरलेला दिसत असल्याने, ते दुसरा कोणताहि पदार्थ आपल्या दृष्टीस पडू देत नाहीत. सद्‌गुरु व दुसरा कोणताहि पदार्थ ह्यांच्यामध्ये त्यांना देव भरलेला दिसतो. इ) आंत, डोळे झांकून जसे रूप दिसते, अगदी तसेच बाहेर डोळे उघडून दिसते. आंत तेच बाहेर दिसले नाही, तर ते दर्शन केवळ भास असू शकेल. बाहेरील आंत दिसले नाही तर त्याला साक्षात्कार म्हणता येणार नाही; ते अन्य कांहीं असू शकेल.

IV)- **सामाजिक लक्षणे :-** शिष्याच्या साधनाच्या प्रमाणात त्यांचे रूप-नाद- रस-प्रकाशादि आत्मानुभव शिष्यांत उतरले पाहिजेत. हे सर्व ईश्वराचे आविष्कार आहेत. यापैकी कोणताहि अनुभव शिष्याला आला तरी पुरे. सद्‌गुरुंनीं दिलेल्या सबीज नामाच्या स्मरणाने असे अनुभव वाढत वाढत, शिष्य शेवटी ईश्वरस्वरूपांत अवस्थित होतो; हे सद्‌गुरुंचे सर्वात महत्वाचे कार्य होय. असा सद्‌गुरु म्हणजे इहलोकी वावरणारी ईश्वराची प्रतिमाच होय. सद्‌गुरु प्रत्यक्ष

देवच आहेत, असे अनेक संतश्रेष्ठांनीं बाहु उभारून सांगितले आहे. त्यांचे दर्शन म्हणजे प्रत्यक्ष देवाचे दर्शन; ज्या आदरभक्तीच्या भावना, ज्या अपेक्षा देवाबद्दल बाळगावयाच्या, त्या अशा सद्‌गुरुसंबंधीहि बाळगाव्या ß. देव व संत यांत थोडे तरी अंतर राहतेच, हा गुरुदेवांचा सिद्धांत धरूनच वरील वचनांचा अर्थ केला पाहिजे.

रामदासांनीं आदर्श सद्‌गुरूंची आणखी कांहीं लक्षणे दिली आहेत. ती म्हणजे साक्षात्कार, स्वरूपस्थिति, समाधान, वैराग्य, शुद्ध आचार, श्रवण-कीर्तन इत्यादि नवविधाभक्ति, भजन व निरूपण. ही जगदुद्धाराला आवश्यक आहेत. सद्‌गुरूंनीं शिष्यांना साधन करायला लावले पाहिजे *.

ज्ञानेश्वर सांगतात, सद्‌गुरु हे सुखाचा सागर, प्रेमाचा आगर, साधकाची माय, कामधेनु गाय असून भक्तांच्या डोळ्यांत ज्ञानांजन घालून त्यांना ते निजधन, आत्मस्वरूप दाखवतात. शिष्यांची पापे नष्ट करून ते त्यांच्या लिंगदेहाची गांठ सोडतात. +

गुरुदेव रानडे आपले सद्‌गुरु श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांच्यासंबंधी लिहितात, "त्यांची निस्पृहता, त्यांचे दयाळुत्व, त्यांचा नेमस्तपणा, त्यांचा दृढतर मनोनिग्रह, आबालवृद्धांशी समता, शिष्यावर अलोट प्रेम, गुरूंवर आत्मज्ञानावर निःसीम श्रद्धा, अलौकिक शांति व उपाधीपासून अलिप्त राहण्याची शैली, व इतर अनेक गुण वरवर पाहाणाऱ्यालासुद्धा दिसून येतील." ‡

४) **सद्‌गुरूंचे कार्य** :– सद्‌गुरूंची लक्षणे व ते शिष्यासाठी करतात ते कार्य ही संमिश्र स्वरूपांतच राहणार; त्यांची शक्ति हे लक्षण, परिणाम हे कार्य. तसेच, आदर्श शिष्याचे गुण शिष्यांत ज्या प्रमाणांत असतील त्या प्रमाणात या कार्याच्या भाग्याचा लाभ शिष्याला

---

ß हिं. सा १३८–१४४ * म. सा. ३९३-३९४; + म. सा. १९८

‡ सांप्रदायिक नित्यनेमावली–प्रस्तावना.

होईल; अधिक नाही. सद्गुरूंचे थोर गुण व शक्ति, त्यांना मिळणारा शिष्याचा प्रतिसाद या दोहोंचा परिणाम म्हणजे सद्गुरुकृपेने होणारे लाभ होत. तेव्हा शिष्याने आपली जबाबदारीहि ओळखली पाहिजे. असो. सद्गुरूंच्या अंतरी ईश्वराचा वास व त्याची शक्ति असल्यामुळे ते शिष्याला मोक्षपदाला नेतात. यासाठी ते शिष्याचे आत्मतत्त्व त्याच्या जडत्वापासून वेगळे काढू शकतात. त्याचे दोष काढून त्याची ग्रहणशक्ति वाढतात व त्याला परमार्थसाधनाला योग्य असे बनवतात. संकटसमयी त्याला आंतून आधार देतात; त्यामुळे शिष्य ती संकटे धैर्याने सोसूं शकतो. शिष्याचे अंतःकरण तीक्ष्ण, तेजस्वी करुन, कामक्रोधादि विकार नष्ट करुन, सद्गुरु त्याला क्षणांत अमर करतात, अर्थात् अमरत्व मिळविण्यासाठी बीजशक्ति देतात. तिचे फळ शिष्याने आपल्या प्रयत्नाने मिळविले पाहिजे. §

सद्गुरु शिष्याला ध्यानसाधन शिकवून, प्रकाश, परतत्त्व दाखवितात, देव–भक्तांच्या ऐक्याचा अनुभव देऊन मोक्षपदाला नेतात. त्यांच्या मंत्राने शिष्याचे मन त्यांच्या ताब्यांत येते; तो देहभाव विसरतो. त्यांच्या नाममंत्राच्या जपाने विषय–विकार मारक ठरत नाहीत. विदुल्याच्या रूपाने देवाचे दर्शन झाले म्हणजे, हे विदुले केवळ विषयांचाच नव्हे तर देहभावाचाच नाश करते. सद्गुरु मातेप्रमाणे शिष्याचे रक्षण करतात आणि देवाचे संपूर्ण स्वरूप सदा त्याच्या दृष्टीसमोर राहील, त्याच्याभोवती फिरत राहील, असे करुं शकतात. सारांश, जेथे सद्गुरु आहेत तेथे मांगल्य व ऐश्वर्य आहे. शिष्यांच्या मनांत सदिच्छा उत्पन्न होण्यापूर्वीच ते ती पूर्ण करतात. त्यांच्या नेत्रांच्या कडांतून मधुर, शांत प्रकाश ओसंडत असतो. वैराग्याची वात, भक्तीचे तूप व ज्ञानाची ज्योत यांपासून असा प्रकाश पसरतो. मग सहस्त्रदलाच्या सिंहासनावर बसलेल्या ईश्वराचे दर्शन झाले म्हणजे शिष्याला परमानंद लाभतो. ‡

---

§ हिं. सा ३३५ ३३७ ‡ क सा. ६१–६५, ६८ ७३.

नाममंत्राचा जप केला म्हणजे कामक्रोधादि विकार, दशेंद्रिये अष्टमद हे चोर पळून जातात, देवाचे रूप दृष्टीसमोर राहते, व साक्षात्कार व्हावा या उच्चतम इच्छेसह, सर्व इच्छा पूर्ण होतात. नामस्मरणाने व शरणागतीच्या भावाने, ईश्वर करील ते मान्य करण्याची तयारी झाली म्हणजे मृत्यु, संकटे, दोष, दुर्गुण, यांपासून देव शिष्याचे रक्षण करतो. मग नाम विसरुन जगायचे तरी कशाला असे शिष्याला वाटते. आपला देवावर व सद्गुरूंवर खरा विश्वास असेल, आपण परमार्थ करीत असू, तर देव आपले मोहापासून रक्षण करील, डोळचाला दिसणाऱ्या आत्मस्वरूपांत मिसळून गेल्याने पाप घडूंच शकणार नाही. " सद्गुरूंनीं दिलेल्या नाममंत्राच्या जपाने साक्षात्कार झाला; त्याचे जीवनावर फार मंगल परिणाम झाले; १) आत्मानंदाने अव्दैतानुभूतीने भीति दूर झाली; २) प्रारब्ध जळून गेले. ३) आरशात दिसावे तसे माझे चिन्मयरूप मला दाखविले व त्याने परमानंद झाला ". असे एका शिष्याने म्हटले आहे. नाममंत्राच्या स्मरणाने ईश्वराचे सर्वत्र पसरलेले, मागे, पुढे अणूरेणूंत भारलेले रूप अनुभवाला येते. अशी अगणित, अनंत रूपे दिसतात. यांतील एखादे दिसले तरी पुरे; हाच मोक्ष; दुसरे कांही नाही. नामस्मरणापासून पारमार्थिक जीवनाला आरंभ होतो; सर्वत्र दर्शनरूप मुक्तीत त्याची परिणति होते. *

उच्च साक्षात्कारी सद्गुरूंनीच, समाजांतून सर्व दुर्गुण काढून टाकून, त्याला परमार्थाच्या उच्चतम ध्येयाकडे नेण्याचा प्रयत्न करावा. इतर देशांच्या व समाजाच्या ध्येयांचा विचार करूं नये. हे कार्य करीत असताना शिष्यांच्या पापांचा वा दोषांचा संसर्ग त्यांना लागल्यासारखा दिसेल. परंतु त्यांना ईश्वरप्राप्ती झालेली असल्यामुळे शिष्यांच्या पापांचा त्यांच्यावर कांहींच परिणाम होणार नाही म्हणून सतत त्यांनीं शिष्यांना देवाकडे ओढीत नेण्याचा प्रयत्न करावा. बुद्ध,

---

* क. सा. ८०–८४, ८७–९४.

ख्रिस्त, श्रीनिंबर्गीमहाराज अशा अनेक थोर पुरुषांनीं आजन्म हेच कार्य केले. शिष्याने सद्गुरूंच्या दिव्य, चिन्मयचरणांची पूजा केली पाहिजे. अशा चरणांचे दर्शन ही साक्षात्काराची उच्च पायरी आहे. या पूजनाने, अर्थात् अनुभवाने, तत्त्वज्ञानांतील शंका दूर होतात; बौद्धिक ज्ञानाने नाही. सद्गुरु शिष्याला देवाच्या स्पर्शाचाहि अनुभव देतात. त्यांच्या कृपेने देव, गुरु, शिष्य या तिघांच्या ऐक्याचा अनुभव येतो. साक्षात्कारी संत सद्गुरूंविषयी बोलताना, लिहिताना देव व गुरु यांत कधींच फरक करीत नाहीत. शिष्याला गुरूकृपेने प्रथम नाद–बिंदु–कला, नंतर देवाचे रूप व शेवटी दिक्कालातीत ब्रह्म–साक्षात्कार असे अनुभव येतात. † गुरुशिष्यांच्या नात्याची ही परिणति होय.

५) **सद्गुरु–प्रशस्ति :–** थोर संतांनीं, प्रेमादर, कृतज्ञता, कारुण्य इत्यादि भावांनी भरलेल्या अंतःकरणांनीं सद्गुरु–प्रशस्ति गायली आहे. ते सर्वच विचार हृदयस्पर्शी, स्फूर्तिदायक, आल्हादक आहेत. त्यांतहि सद्गुरूंच्या वरील कार्याचे व लक्षणांचेच दर्शन होते. स्थळसंकोचास्तव त्याचे विस्तृत विवेचन करणे शक्य नाही. नमुना म्हणून थोडे उद्धृत करतो.

" सद्गुरूंचा अमर्याद आधार असल्याने, अन्य दैवताकडे जाण्याची इच्छाच उरली नाही. सद्गुरूंनीं माझे मन स्थिर केले, बुद्धि तीक्ष्ण केली, तेज–रूप–नाम इत्यादि अनुभव त्यांच्या कृपेने आले. शेवटी परमोच्च आत्मरूपदर्शनाचा अनुभव आला. त्यांनीं मला अनाहतनाद, शब्द इतकेच नव्हे, तर ईश, दत्त, दिगंबर अशा देवांच्या नावांचाहि अनुभव दिला. जपतपादि साधन न करता अनेक अनुभव आले, ते कोणाला कळणार ? एक मला किंवा सद्गुरूंना. ‡ "

६) **सच्छिष्य लक्षण :–** सद्गुरु हवे ते देण्यास समर्थ असतात. पण शिष्याने हितकर तेच मागावे. जसे (१) प्रापंचिक वैभव,

---

† क सा. १०६, १०९, ९९–१०३, ९२–९३. ‡ क सा. ११३–११५; ३०७

थोरवी ही खोटीं आहेत त्यांचा मोह नको; देवाचे वैभव हे एकच सत्यतत्त्व आहे. ते जगांत भरून राहूं दे. (२) तुझे चिंतन व सेवा येवढीच कामे दे. (३) तुझी कृपा हेच माझे अन्न, पाणी, प्राण असे कर. त्यावर जगावयाचे आहे. (४) तुझे तेच सर्वत्र भरलेले राहूं दे. त्याच्या छत्राखाली माझे विचार व शब्द प्रकाशित होऊं देत; म्हणजे त्यांना जोर येईल. आपल्या जीवनांतील संकटे, आपत्ति दूर होतात, चांगले घडते ते केवळ सद्गुरूंच्या कृपेने, अशी शिष्याची दृढ श्रद्धा असावयाला हवी. सद्गुरूंचा गुलाम होऊन आनंदाने त्यांची कीर्ति गात राहण्याचा उत्साह त्याने धरावा. गुरुदेव रानडे यांचे जेष्ठ गुरुबंधु श्रीअंबुरावमहाराज यांच्या खालील वर्णनात आदर्श सच्छिष्याचे सर्व गुण दिसतात. प्रत्येक साधकाने त्याचे अनुकरण करावे. (१) तो मूर्तिमंत श्रद्धा व दिव्य तप यांचा अवतार (२) तसेच सद्गुरूंच्या हातांतील मुरली. ते सांगतील ते आपोआप करणे. मी करतो ही जाणीवच नाही. (३) त्यास स्वतःच्या थोरपणाचे भानच नाही. सद्गुरूंची कीर्ति गाणे हेच त्याचे काम (४) सद्गुरूंकडून मिळालेले आत्मज्ञान तो जगाला वाटतो, (५) हा आदर्श शिष्य आपण अमर होतो व सद्गुरूंचे नांवहि अमर करतो. §

७) **सच्छिष्याचा आचार :-** १) गुरुचरणकमली रुंजी घालीत राहून आत्मज्ञानाचा मध घेता येईल तितका घे. २) मौन धर, मुद्रा साध्य कर; ज्ञानज्योतीच्या दर्शनाने आनंदित हो आणि साक्षात्काराचे अमृत सेवन कर. मौनाने मन परतत्त्वावर एकाग्र करता येईल अशी मेंदूची व गोळ्यांची अविचलता, स्वरूपानुसंधान व नादानुसंधान याहि मुद्राच म्हणता येतील. ३) वरील चार गोष्टी दीर्घकाल यशस्वीरीत्या केल्यावर ईश्वर साक्षात्कार होईल. मग संत-समागम धर. ईश्वर-दर्शनासाठी सत्संग अवश्य आहे. पण साक्षात्कारानंतर त्याची काय जरूरी ? त्याची दोन कारणे आहेत.

§ क. सा. ९४-९९.

१) स्वतःचा साक्षात्कार वाढविण्यासाठी, २) परमार्थाच्या प्रचारासाठी. साक्षात् ईश्वर अशा सद्गुरूंसारखे आचरण राखून, त्यांच्यासारखाच पूर्ण साक्षात्कार करून घेतला नाही, तर जन्माला येऊन काय साधले ? §"

८) **नाम हे अमोघ साधन :–** साधकाची साक्षात्काराची इच्छा पूर्ण करणारे अमोघ, एकमेव साधन म्हणून सर्व हिंदु, ख्रिचन, मुस्लिम संतांनीं नामाची महती मुक्तकंठाने गायिली आहे. नाम-महतीपर वचने शब्दशः हजारांनीं सांपडतील. त्यांत पुनरुक्ति अटळ आहे. म्हणून गुरुदेव रानडे यांच्या मराठी–हिंदी–कन्नड संतांवरील ग्रंथांतील नामासंबंधी महत्त्वाचे विचार तेवढे येथे संक्षिप्त रूपाने देण्याचे योजिले आहे. सर्व काळी, सर्व स्थळी, सुखदुःखादि सर्व अवस्थांत नामस्मरण करीत असावे. नामस्मरणाचा अधिकार मनुष्यमात्राला आहे. जाति-वय-विद्या-धन असा कोणताहि भेद त्यांत नाही. भक्तीच्या नामघोषाने जगाची दुःखे नष्ट होतात. नामस्मरण करणाऱ्या भक्ताजवळच देव निश्चित असतो. तेथेच तो इतरांनाहि मिळूं शकतो. नामस्मरणाने "न दिसे ते दिसते, न भेटे ते भेटते, जिव्हेवर अमृत स्रवते." नाम ही अमृतरसाने भरलेली भवरोगहारक मुळी आहे. नामस्मरण करणारा संत सहपरिवार तरतो. प्रेमाने आनंदाने, निश्चयाने गुप्तपणे श्वासांत नामस्मरण करणे येवढेच ईश्वर प्राप्तीला पुरे आहे. अशा मंत्रजपाने पापांचा नाश, मंगलाची प्राप्ति, अनेकविध साक्षात्कार हे लाभ होतील. त्याने तृष्णा शमते. नामरूपी कामधेनु तूं प्रयत्न न करता, तुझ्याकडे आली आहे. स्मरणाच्या हाताने तिचे दूध काढून आपल्या अंतरी भरून ठेव. त्याने तुला वैभवशाली साक्षात्कार व भव्य, अमर्याद आनंद लाभेल. गायन–कीर्तन–भजन–ध्यान यांचा नामस्मरणाशी अत्यंत निकट संबंध आहे. मात्र गायन–भजन भावपूर्ण पाहिजे,

---

§ क सा १०४, १०५

त्याच्या आनंदाने अष्टसात्त्विक भाव उमटले पाहिजेत. ते अशा प्रकारचे झाले म्हणजे देवाला उत्तर देणें, कृपा करणे भाग पडते. †

**सबीजनाम –**: साक्षात्कारी सद्‌गुरूंकडून शिष्याला त्याच्या प्रतिभाशक्तीच्या विकासासाठी मिळालेले नाम म्हणजे सबीज नाम होय. ज्याला मोड येऊं शकतो ते सबीज नाम, आध्यात्मिक शक्तियुक्त नाम, सार्थनाम किंवा दिव्यनाम होय. ते आध्यात्मिक शक्तीचा अँटमबाँबच असते. ते नाम कांहीं आगळेच आहे, असे महाभक्त तुकाराम म्हणतात.

**" राम राम राम अवघेची म्हणती ।**
**कोणी न जाणती आत्मराम ॥**
**राम हा कालचा सुत दशरथाचा । अनंत युगीचा आत्माराम ॥**
**रामासी हा राम ठावे जरी असता ।**
**शरण का जाता वसिष्ठासी ॥**
**तुका म्हणे राम तुझा तुजपाशी । विचारून घेसी सद्‌गुरूमुखे ॥"**

श्रेष्ठ साधक आनंदाने ध्यान करीत असता, त्याला कल्पनाहि नसता हे नाम आपोआप ऐकूं येते. यालाच कबीर अजर अमर नाम म्हणतात. नाम म्हणजे आनंदमय, चिन्मय ब्रह्मज्ञान–कुत्रे भुंकावे तसे सहज देवाचे नाम भुंकणे म्हणजे ब्रह्मज्ञान, असे शरीफसाहेब सांगतात. श्रीनिवर्गीमहाराजांनी स्वर्गांतून नाम आणले असे म्हणतात. ते देवाकडून येते व देवच असते. देहधारी देव म्हणून हे नाम आत्मप्राप्तीसाठी शिष्याला देण्यात येते. एक कन्नड संत कवि म्हणतात, " मला अनाहत नाद ऐकूं आला, शद्ब ऐकूं आले; इतकेच नव्हे तर देवाची दत्तदिगंबरादि अनेक नांवेहि ऐकूं आली. " यापैकी कोणतेहि नाम मुमुक्षूला ध्यानासाठी उपयोगात आणता

† म सा ३९९–४००; ११४–११५; ३१८–२०.
हिं सा २६३, क. सा १७२; १७७; १८९; १९२.

येईल. * असे गुरूदेवांनीं म्हटले आहे. गुरुदेवांना असा अनुभव १९२० साली आला व त्याचा आशय त्यांचे वडील गुरुबंधू श्रीअंबूराव-महाराज यानीं त्यांना समजावून सांगितला, असो. असे नाम मिळाले म्हणजे त्याच्या स्मरणाने साक्षात्कार होतो. ऐकलेल्या किंवा वाचलेल्या नामांत हे समर्थ्य नाही. मानव व देव यांच्यांत मध्यस्थी करणाऱ्या ख्रिश्चन धर्मातील लोगॉस (LOGOS) प्रमाणे ते आहे. नाम हे सगुणांनिर्गुणमधील दुभाषी, साक्षी, प्रबोध आहे. स्फोट-वादाच्या कल्पनेप्रमाणे नामांतील शक्तीमुळे कापसाच्या बोंडाप्रमाणे त्याला आपोआप भेगा पडतात व त्यांतून विश्वांतील पदार्थ निर्माण होतात. असे नाम मिळवण्याला संत श्रेष्ठांना पुढील किंमत द्यावी लागते. १) सर्व पापे नष्ट झाल्याची निश्चित जाणीव २) संपूर्ण शरणागति ६) दिव्य अमृतरसाचे प्राशन. असे नाम मिळाल्यावर साधकाला देवाचा साक्षात्कार होऊन, तो देवाशी ऐक्य पावतो. " **अहं ब्रह्मास्मि** " इत्यादि महावाक्याच्या जपाने ते साधत नाही. महावाक्यांतील उपदेश उत्तम आहे पण त्याचा अनुभव घेणे महत्वाचे आहे. हा साक्षात्काराचा ऐक्याचा अनुभव ज्यांनी घेतला ते पक्के, पूर्ण मानवघट इतर सर्व कच्चे, अपूर्ण, नामदेवांचा मते " **नाम तेचि रूप । रूप तेचि नाम । नाम रूपा भिन्न । नाही नाही ॥** " नाम, म्हणजे ब्रह्म असा कबीर सांप्रदायाचा सिद्धांत आहे. ‡

* *

---

* उप. २४२–२४३, हिं. सा. १४२ क सा. २२५, २२६. २३२,

‡ हिं सा १८९; १७०–७२ क. सा. १८४ ८६; १७२, म. सा. १९५

## प्रकरण ९ वे : साधन–विचार

१) **नामस्मरण हे मुख्य साधन :–** मायेचे आपल्याला कळणारे प्रत्यक्ष रूप म्हणजे अहंकार ( देहतादात्म्य ) व वासना हे आहे. माया हा भ्रम केव्हां व कसा सुरूं झाला हे कळणे अशक्य आहे. या भ्रमांतून, अहंकार व वासना यांच्या बंधांतून, मुक्त होऊन मूळचे ब्रह्मत्व मिळविता येते, हे मात्र अनेक साक्षात्कारी पुरुषांनीं स्वानुभवाने सांगितले आहे. नामस्मरण हेच मुक्ति, स्वरूपता मिळविण्याचे साधन आहे, हाहि संतांचा अनुभव आहे. हे सबीजनाम प्रत्यक्ष आत्मब्रह्म किंवा ईश्वर आहे. या सर्व गोष्टी प्रकरण २ व ८ मध्ये पाहिल्या आहेत. प्रस्तुत प्रकरणांत नामस्मरणाच्या प्रक्रियेची चर्चा करावयाची आहे. मागील कांहीं प्रकरणांत सद्‍गुणांचा विचार केला. अहंकार व वासना यांच्यापासून दूर सरणे म्हणजे सद्‍गुण, त्यांत भेदभाव, वासना, अहंकार हे दोष कमी कमी होत जातात. सर्व दुर्गुण या तीन दोषांतून निर्माण होतात. आत्मानंदांत या तीनहि दोषांचा पूर्ण अभाव असल्याने, त्या अवस्थेंत सर्व सद्‍गुण पूर्णत्वाला पोहोंचतात. आत्मानंदप्राप्तीचा प्रधान उपाय म्हणून भक्ति हा सद्‍गुण होय. इतर सद्‍गुणांचा विकासहि मुख्यत्वे भक्तिसाधनाने होतो. त्याच-प्रमाणे भक्ति व सद्‍गुण परस्परावलंबी व परस्परांना पोषक आहेत; हे सर्व स्पष्ट करण्याचा त्या दोन प्रकरणांत प्रयत्न केला आहे. सद्‍गुण व भक्ति यांचा संबंध साधन–विचारांत लक्षांत ठेवला पाहिजे. नाम-स्मरण, मनोजप हे मुख्य साधन आहे. वाचाजप, उपांशुजप करावयाचा नाही, ओठ मिटून नामस्मरण करावयाचे, असे कबीर सांगतात.

**“ बिन ही मुख के जप करो । नहिं जीभ डुलावो ।। ”**

त्या प्रक्रियेचा विचार करावयाचा आहे. पण त्याला सुरुवात करण्यापूर्वी साधक लक्षणांचा परामर्श घेणे अवश्य आहे.

२) **साधक लक्षणे :–** सद्गुरुवचन, ईश्वर व नामसाधन, तसेच ईश्वरप्राप्ती हेच जीवनसाफल्य, या गोष्टीवर दृढ श्रद्धा पाहिजे, ईश्वर आहे, सद्गुरूंना नामसाधनाने त्याचा साक्षात्कार झाला आहे, त्या साधनाने तो मलाहि होईल, ही श्रद्धा दृढ नसेल तर साधन निष्ठेने, निश्चयाने होणार नाही, हे उघड आहे. अर्थात् ही श्रद्धा साधन व अनुभव यावरोवर हळूंहळू वाढत जाते. पण सुरुवातीलाहि श्रद्धेचा पाया बराच भक्कम पाहिजे. साधकाने सद्गुरूंच्या अनुभवा-सारखा अनुभव मिळवण्याचा निश्चयाने प्रयत्न केला पाहिजे. कामक्रोधादि दुर्गुण म्हणजे अहंकार व वासना यांची वाढ; त्यांचा त्याग अगदी अवश्य आहे. लोकलाज, अभिमान परमार्थाच्या आड येतात; आळस, दुर्लक्ष, हेहि मारकच. म्हणून ते टाकले पाहिजेत. विषयोन्मुख मन व इंद्रिये अंतर्मुख करून, देवाकडे वळविणे अवश्य आहे. त्याला मोठें नैतिक व आध्यात्मिक सामर्थ्य लागते. देव हातचा जाऊं नये. त्याच्या आड येणारे ते सर्व शत्रु; देवाच्या सख्यत्वासाठी जिवलगांच्याहि तुटी पडल्या, सर्वस्व गेले तरी दुःख नाही. प्राणाचीहि क्षिती नाही, अशा धैर्याने, धीराने, साधनाने कष्ट सोशीत, प्राणपणाने भक्तिसाधन करणे अवश्य आहे. सर्व देवाचे आहे. त्याचे त्याला द्यावे. त्याचा लोभ कशाला ठेवायचा ? आपले सर्वस्व, आपल्या भावना व वृत्ति देवाला अर्पण कराव्या, परमार्थाच्या लाभांचे, त्याने संतांना लाभलेल्या कृतार्थतेचे, सतत चिंतन करावे. त्याने उत्साह व भक्तिभाव वाढतो. शेवटी, शरणागतीची वृत्ति धरली पाहिजे; त्यावांचून देवाची कृपा व उच्च साक्षात्कार शक्य नाही. * शरणागतीची बरीच चर्चा मागे झाली आहे. तिच्यांत साधकाच्या, सर्व गुणांचा अंतर्भाव आहे.

३) **नामस्मरणाची प्रक्रिया :–** अहंकार व वासना यालाच अनात्म्याचे चिंतन हे सुटसुटीत नांव देऊं. विषयांचे चिंतन म्हणजें जीव; आत्म्याचे चिंतन केले म्हणजे स्वरूपी मिळता येते, मूळ ब्रह्मत्व

---

* म. सा. ४०४–४०६. हिं सा. १५६–१५८

लाभते, हे रामदासांच्या श्लोकांच्या आधारे मागील प्रकरणांत पाहिले. नामस्मरण – प्रक्रियेचे हेच साध्य आहे. नाम म्हणजे आत्मा, ईश्वर; त्याचे स्मरण आहे तोपर्यंत– त्या क्षणापुरता – जीव ब्रह्मच होतो. **"आठव तो ब्रह्म, नाठव तो भवभ्रम"** ( एकनाथ ) नाम विसरले म्हणजे पुन्हा अनात्म्याचे चिंतन, स्मरण आपोआप सुरू होते. कारण मन चिंतनाशिवाय राहूंच शकत नाही. ज्ञानेश्वरांनी म्हटल्या-प्रमाणे "हिणकस सोन्यांतहि सोन्याचा प्रत्येक कण हा बावन्नकशीच असतो; त्याप्रमाणे जीवत्व पावलेला आत्मा मुक्तच असतो." म्हणून नामस्मरणाच्या कालांत जीवाला ब्रह्माशी एकरूप होता येत. साधकाला हे समजत नाही कारण हा काल फार सूक्ष्म असतो; तो सोडला की सर्व द्वैतच असते. त्यामुळे नामस्मरणाच्या कालाची– क्षणाची अद्वैतानुभूति समजून येत नाही. नाम म्हणजेच आत्मा आहे; म्हणून नामस्मरणाने इतर सर्व हळूंहळूं विसरत, जाणिवेची नामा-कारता, स्वरूपाकारता वाढवीत, शेवटी अनात्म्याचा संपूर्ण विसर, जीवभावाचा स्वरूपांत, शिवभावांत लय, होऊन स्वरूपाकार, ब्रह्म होऊन राहणे येवढे महत्कार्य नामस्मरणाने साधावयाचे असते. ते साधते असा अनेक संतांचा निःसंदिग्ध निर्वाळा आहे. नामस्मरणाच्या सर्व प्रक्रियेंत, साधकाच्या लक्षणांतहि या साध्याच्या ध्रुवताऱ्याकडे सतत लक्ष आहे. कारण, साधन व त्याची उपांगे यांत साध्य, साध्याची लक्षणे, अंतर्भूत असतातच. गुरुदेव रानडे यांनीं आपल्या गीतेवरील ग्रंथांत साधनप्रक्रियेची चार अंगे वर्णिली आहेत.

**अ) शारीरिक अंग :–** यांत आसन, प्राणायाम व नासिकाग्र दृष्टि यांचा अंतर्भाव होतो. एकाग्रतेची साधने इतकेच त्यांचे महत्व मर्यादित आहे. एकाग्रता नसणे म्हणजे नामा–व्यतिरिक्त, अर्थात् अनात्म्याचे, विचार जाणिवेत येणे. हे टाळावयाचे आहे. म्हणून एकाग्रतेला उपयुक्त अशा सर्व गोष्टींचे साह्य घेतले पाहिजे. **"स्थिरसुखमासनम्"** (पातंजली योगसूत्र २.४६) ही आसनाची व्याख्या योग्य आहे. ज्या आसनावर बसून पुष्कळ वेळ समाधानाने

नामस्मरण करता येईल, ते आसन उपयुक्त होय. दुसरा भाग प्राणायाम; याचा उपयोगहि, मनाची समता राखण्यापुरताच आहे. फक्त कुंभकाने साक्षात्कार होणार नाही. एकाग्रध्यानांत मनप्राणाचा लय आपोआप होऊन "**केवल कुंभक**" केव्हां केव्हां होतो. तो चिंतनाला फार उपकारक आहे. पण तो प्रयत्न करून साधत नाही. तिसरी गोष्ट "**नासिकाग्र दृष्टि**"; यामुळे बाह्य पदार्थांपासून दृष्टि दूर होईल व त्यामुळे मनांतील विक्षेप कमी होतील. ध्यानांत अनुभवाला येणाऱ्या देवाच्या रूपाकडे दृष्टी लावणे हे महत्त्वाचे आहे. सारांश, या शारीरिक प्रक्रियेपेक्षा भक्तिभाव श्रेष्ठ आहे. तो उत्पन्न करण्याला या व इतर गोष्टींचा थोडाफार उपयोग होतो तेवढा करून घ्यावा §.

आ) **कुंडलिनी** :– गुरुदेव रानडे यांनीं कुंडलिनीसंबंधी स्वतंत्र, निश्चित असे कांहीं लिहिलेले नाही. त्यांच्या ग्रंथात त्याविषयी सहज कांहीं विचार आले आहेत. ते एकत्र देत आहे. पाठीच्या कण्यातील मज्जारज्जूंतून मेंदूच्या ब्रह्मरंध्रापर्यंत जाणारी एक शक्ति आहे व परमार्थाला ती निश्चित उपयुक्त आहे. मज्जारज्जूंतील द्रव पदार्थ म्हणजे ही शक्ति नव्हे. तो तिचा वाहक आहे. ही शक्ति आयुर्वेदांतील ओजस किंवा पाश्चात्यांची मज्जाविद्युत् शक्ति (neuro-electrical energy) यापेक्षा उच्च आहे. हिंदी संत म्हणतात ती **अमीरस शक्ति** हीच. शेष हा विषयांचे प्रतीक आहे. फणाखाली असलेल्या शेषाचे साक्षात्कारांत दर्शन हे विषयवृत्तीचे द्योतक आहे. तो फणा वर करणे हे शिष्याचे काम आहे. हे साधण्याचा मार्ग म्हणजे दर श्वासांत, दर पावलाला नामजप हे होय, वरील अमीरसाला कबीरांनीं मदिरा म्हटले आहे. ती तयार करण्यासाठी, " कामक्रोधादि विकारांचे बारीक तुकडे करून, ते पाण्यांत टाकावे व त्याचा अर्क गुरु शब्दांच्या रसांत मिसळावा ";

---

§ भ. गी. २४९–२५१.

विकारांच्या मुळाशी असलेल्या जीवनशक्तींत नाम मिसळावयाचे. अशा शक्तीशिवाय विकार तरी कसे उत्पन्न होतील ? याचा अर्थ हा की सामान्यत: विकारांच्या रूपाने प्रकट होणारी जीवनशक्तिच नामस्मरणाने आध्यात्मिक शक्ति बनते, परमार्थाला उपयोगी पडते. मन व इंद्रिये यांना विषयोन्मुख करणाऱ्या या शक्तीला ईश्वरोन्मुख करणे हे नामजपाचे कार्य आहे. मग मन व इंद्रिये ही ईश्वरोन्मुख होतात*. वर शेषाच्या दर्शनाचा उल्लेख आहे; त्यावरून, तसेच मज्जारज्जूंचा आकारहि सर्पासारखा आहे, त्यामुळे कुंडलिनीला नागिणीची उपमा दिली असावी. गुरुदेव रानडे यांनीं कुंडलिनीच्या उत्थानाचे साधन म्हणून नामजपाला महत्त्व दिलेले आहे; योगाच्या शारीरिक प्रक्रियांना नाहीं. त्यांच्या मते, कुंडलिनीविषयी सर्व विचार म्हणजे केवळ कवि-कल्पना नव्हेत. पण महत्त्वाची गोष्ट ही की आत्मानुभवांत त्या शक्तीचे शेषासारखे दर्शन व्हावे व त्यावरून आपली आध्यात्मिक अवस्था समजून घ्यावी.

**इ) मानसिक-नैतिक प्रक्रिया :–** अनेक सद्‌गुणांची अवश्यकता साधकाला किती आहे, याची बरीच चर्चा मागील बऱ्याच प्रकरणांत झाली आहे. सद्‌गुणविकास म्हणजे अभेद, अनहंकार व वासना-रहितता, या, ब्रह्मांत अंतर्भूत असलेल्या, लक्षणाकडे वाटचाल आहे. दुर्गुण म्हणजे याच्या अगदी उलट दिशेकडे वाटचाल होय. मग दुर्गुणांचा त्याग व तद्विरोधी सद्‌गुणांचा विकास केल्यावांचून ब्रह्मप्राप्ति कशी होईल ? देवाशिवाय अंत:करणांत कांहींहि राहू द्यावयाचे नाही, हे साधकाला साधावयाचे आहे. ते कार्य प्रत्यक्षपणे नामस्मरणाशिवाय होत नाही. पण नैतिक जीवन हे या मुख्य साधनाचे अत्यवश्यक उपांग आहे. गुरुदेव रानडे लिहितात, "बाहेरील सर्व टाकून एका नामाचेच स्मरण करीत राहिले पाहिजे. मन भटकत आहे लक्षांत आल्यावर साधकाने मनाला कल्पनांपासून दूर

---

* क सा. १९८–२००, हिं. सा. २३३.

करून देवावर, नामावर केंद्रित करावे. नामस्मरणांत एकाग्रतेची जरूर आहे. एकाग्रता नाही, याचा अर्थ, देवाशिवाय इतर कल्पना मनांत आहेत. त्या टाकून आत्म्याचे साम्राज्य चालले पाहिजे; मगच **उच्च साक्षात्कार** होतो. एकाग्रतेसाठी मन शांत निर्भय व प्रबल विकारांपासून दूर ठेवले पाहिजे. मग देव लगेच पुढे उभा राहतो. लोकांच्याकडे लक्ष देऊं नये; केवळ ओठच नव्हे तर कान व डोळेहि मिटावे. काम हा अति प्रबल शत्रु आहे, त्याला जिंकले पाहिजे. त्याचे तीन किल्ले आहेत; मन, बुद्धि व इंद्रिये; म्हणून शृंगारिक विचार–उच्चारालाहि टाळले पाहिजे. कामापासून क्रोध, मोह, स्मृतिभ्रंश, बुद्धिनाश व सर्वनाश अशी विनाश–परंपरा आहे. (भगवद्गीता २.६२ –६३). पतित पुरुषाला साक्षात्कारशक्य नाही, इतकेच नव्हे तर थोडा फार झाला असल्यास, तोहि नष्ट होईल. नीतीशिवाय परमार्थ अशक्य आहे, हा सिद्धांत सर्वसामान्य आहे‡" त्याची अधिक चर्चा करीत नाही.

४) **भक्ति :–** मन–इंद्रिये जिंकली तरी अंतःकरणांत खोल रुजलेली, अज्ञात मनांत गुप्तशत्रूप्रमाणे लपून बसलेली, विषयाची गोडी नष्ट होत नाही. त्यामुळे विवेकी पुरुषहि संधि मिळताच विषयावर झेप घालतो. ही गोडी, हा रस, ईश्वरदर्शनाच्या आनंदाशिवाय नष्ट होत नाही ( भगवद्गीता २.५९ ). म्हणून या रसाच्या नाशासाठी भक्तीची जरूरी आहे. हे परमार्थ–साधनांचे अत्यंत महत्त्वाचे अंग आहे, देवाबद्दल कळकळीची, एकांतिक भक्ति, एकविध भाव वाढू लागे-पर्यंत, साक्षात्काराच्या दृष्टीने वरील इतर शारीरिक–नैतिक अंगांचा उपयोग होणार नाही. भगवद्गीता ८.१४ मध्ये भक्तिमय नामस्मरण यशस्वी होण्यासाठी अवश्य त्या सर्व प्रक्रिया सांगितल्या आहेत.

१) अनन्यचेतस्त्व म्हणजे अंतःकरणांत देवाबद्दल एकांतिक भक्ति उत्स्फूर्त व्हावी; दुसऱ्या कशाचीहि ओढ मनाला असता कामा नये,

‡ भ. गी. २५२–२५३.

२) एक क्षणहि फुकट न घालविता,

३) दिवसामागून दिवस, महिन्यामागून महिने, वर्षामागून वर्षे, असा ध्यानाचा अभ्यास मृत्यूच्या क्षणापर्यंत चालू राहिला पाहिजे.

" **स तु दीर्घकालनैरंतर्यसत्कारसेवितो दृढभूमिः** ". पातंजलि योगसूत्र. १.१४ यांतहि हाच आशय आहे. §

४ अ) **चिंतनाने जीवनांत बदल** :– चिंतनाने, स्मरणाने जीवन बदलते आणि चिंतन सुखाभोवती फिरते, हे मानसशास्त्राचे नियम आत्मनिरीक्षणाने सहज समजण्यासारखे आहेत. ज्याला मनुष्य विशिष्ट काली सुख मानतो, त्याच्या प्राप्तीचा तो विचार करतो; पुढे त्याच्या प्राप्तीचा प्रयत्नहि करतो. भिन्नभिन्न काली सुखाच्या कल्पना भिन्न असतात. त्या त्या कालांतील त्या त्या सुखाच्या चिंतनाने मनावर संस्कार होतात. या संस्कारांनीं स्वभाव बनत जातो. याप्रमाणे सुखाच्या इच्छा बदलून चिंतन बदलले जाते आणि स्वभावहि तसाच बदलत जातो. या नियमाचा उपयोग करून मनुष्याला स्वतःला हवे तसे जीवन व स्वभाव बनविण्याचे स्वातंत्र्य आहे. बाह्य जीवनाचा आविष्कार मनाच्या वृत्तींतून होतो; मन, स्वभाव बदलला की त्याचा आविष्कार म्हणजेच जीवन, त्याला अनुरूप होते. साधकाने ईश्वरप्राप्ति हे ध्येय निश्चित केले; खरे सुख, हित ईश्वरप्राप्तीतच आहे; जीवनसाफल्य इतरत्र कोठेहि नाही, हे बुद्धीत पक्के ठसले; म्हणजे चिंतनहि त्या ध्येयाच्या प्राप्तीचे होईल. अर्थात् नामस्मरण हे त्याचे मुख्य साधन होय. त्यावर श्रद्धा बसली म्हणजे नामचिंतन, नामस्मरण हे त्याचे मुख्य कर्तव्य होईल. आतां नामस्मरणाने चित्तावर, जाणिवेवर होणारी प्रक्रिया एका दृष्टांताच्या साहाय्याने कांहींशी स्पष्ट करूं. चिंतनाने चित्तावर बरेवाईट परिणाम होत असतात. मग ते चिंतन बुद्धि-

---

§ हिं. सा. १५९–१६३.

पुरस्सर केलेले असो, किंवा परिस्थितीमुळे अवश होऊन घडलेले असो. कांहीं पाहिले, ऐकले, की त्याविषयी विचार मनांत येतात. हेच अवशतेने सहज घडून येणारे चिंतन. त्याचेहि संस्कार मनावर होतातच, किंबहुना मानवी मन हे बव्हंशी अशा आगंतुक संस्काराचेच बनलेले असते, मनुष्य जन्माला येतो, तोच मुळी कांहीं संस्कार बरोबर घेऊन. जन्माबरोबरच येणारे असे संस्कार पुनर्जन्म न मानणाऱ्यांनाहि मान्य करावे लागतात. मनुष्याला हौदाची उपमा दिली, तर जन्मतः तो हौद गढूळ व मलिन पाण्याने भरलेला असतो. पुढील जीवनांतहि चित्ताच्या या हौदांत सतत पाणी पडतच असते. नवे संस्कार होतच राहतात. तितक्याच वेगाने हे संस्काराचे पाणी चित्ताच्या हौदातून बाहेरहि पडत असते. प्रतिक्षणी कल्पना येते व नष्ट होते, हे सतत चाललेले असते. या हौदांत पाणी भरणारे, सत्त्व, रज व तम असे तीन नळ आहेत. चौथा नळ गुणातीताचा असून, त्यांतून येणारे पाणी रंगहीन, वर्णातीत असते; उलट सत्त्वाचे पांढुरके, रजाच लाल व तमाचे काळे असे चार प्रकारचे पाणी या हौदांत येऊं शकते. परंतु मनात एकाच वेळी एकच कल्पना येऊं शकते, म्हणजेच एका वेळी एकच नळ चालूं शकतो; इतर बंद पडतात. पाणी बाहेर टाकणारा नळ मात्र सतत वाहतच असतो. साहजिकच पाणी भरणारा जो नळ सर्वांत अधिक काळ चालूं राहील, त्याच्या पाण्याचा रंग हौदाच्या पाण्यांत वाढतांना दिसेल. एखाद्या जीवाचे जन्मकाळचे संस्कार सात्त्विक असले, तरी पुढे तो राजस वा तामस चिंतन व कर्मे करीत राहील, तर या हौदांतील पाण्याचा रंग अधिकाधिक लाल व काळा होत जाईल. उलटपक्षी मुळातला रंग लाल व काळा असला, तरी पुढें दीर्घकाल सात्त्विक चिंतन व कर्मे करीत राहून कालांतराने तो रंग शुभ्र करता येईल. चिंतन व कर्मे यांमुळे घडून येणारी जीवाची नैतिक उन्नतीची अथवा अवनतीची ही प्रक्रिया आपण नेहमीच पाहत असतो. याचा अर्थ असा की योग्य त्याच कर्मांची व चिंतनाची निवड करून माणसाला स्वतःची नैतिक उन्नति साधता येते. ते स्वातंत्र्य त्याला लाभलेले असते. याच्या विपरीत वागण्या-

मुळे अवनति झाली तर तिलाहि तोच जबाबदार असतो. हेच आत्म्याचे स्वातंत्र्य होय. सामान्यतः सत्त्व, रज व तम हे तीनच नळ चालू असतात. चौथा नळ नामाचा. नामस्मरणरूप साधन सुरूं केल्यावर, पारमार्थिक जीवनाचा स्वीकार केल्यानंतर, तोहि नळ चालू होतो. नाम म्हणजे वर्णातीत पाणी, वर्णातीत तत्त्व होय. सुरूं राहिला की हौदांतील सर्वच्या सर्व पाणी वर्णातीत होऊन जाते, हा नळ अखंड मूळच्या स्वरूपाला पोहोंचतो; म्हणजेच जीव त्रिगुणातीत होतो, ब्रह्म होतो. हे सारे कार्य अत्यंत सावकाश चाललेले असते. ते पूर्ण होण्यास प्रदीर्घ कालावधि लागत असला, तरी त्यांतील प्रक्रिया मात्र हीच असते. यावरून नाम व त्याचे अखंड स्मरण यांचे साधनमार्गांतील महत्त्वहि कळून येते. " **आठवतो ब्रह्म, नाठवतो भवभ्रम.** " या नियमाने नामस्मरणाच्या अभ्यासाने देहभाव हळूहळू कमी होणे, आत्मभाव वाढणे हे कसे घडून येते हे वरील दृष्टांतावरून समजेल अशी आशा आहे.

५) **कल्पना कशी मोडावी :–** प्रथम नामस्मरणाकडे प्रवृत्ति नसते हे साहजिक आहे. मी–माझे याचेच चिंतन करण्याची संवय दीर्घकाल जडल्याने, ती जाण्याला पुष्कळ अभ्यास करावा लागतो. त्यामुळे नामस्मरण करूं लागतांच साधकाच्या मनांत अनेक कल्पना उठूं लागून, त्याला बेजार करतात. अशा कल्पना मोडण्याचे संतांनीं कांहीं उपाय सांगितले आहेत. परमार्थपर ग्रंथांचे श्रवण किंवा वाचन हा फार प्रभावी उपाय आहे. त्याने श्रद्धा, भक्ति वाढते, विरक्ति उत्पन्न होते, शंका तुटतात, समाधान वाढून देवाविषयी ओढ वाढते, भाव वाढतो. भक्तिभावाने केलेल्या कीर्तनाने हेच लाभ होतात. भाव वाढत गेला की कल्पना ओसरूं लागतात. " **निर्विकल्पासि कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें ॥** " हा आणखी एक उपाय आहे. देवाविषयी कल्पना प्रयत्नपूर्वक मनांत आणली की इतर कल्पना शमतात. मनाचा हा एक चांगला गुण आहे की जिकडे लावावे तिकडे ते लागते; देवाकडे लावले तर नामस्मरणाने ते देवाकडे

लागते. नामस्मरणाला बसतांना एखादा भक्तिपर अभंग मनःपूर्वक वाचला तर कल्पना कमी होण्याला मदत होते. नामस्मरणाच्या कालांत दुसऱ्या कोणी मधून मधून पोथी वाचली, परमार्थपर पदे म्हटली तर त्यानेंहि हे कार्य साधते. सारांश, आवडीच्या आणि महत्त्वाच्या अशा आध्यात्मिक विचाराकडे मन लावले म्हणजे प्रापंचिक कल्पनांपासून ते आपोआप दूर होते. कल्पना आल्याने नामाचा विसर पडला आहे, हे लक्षांत येतांच नामस्मरण सुरूं करावे, हे मुद्दाम सांगण्याची आवश्यकता नाही. हे सर्व उपाय रोजच्या नामस्मरणाला फार उपयुक्त आहेत. पण साधकाची विषयोन्मुखवृत्ति ईश्वरोन्मुख होऊन त्याचे जीवनच वदलले पाहिजे. त्यासाठी परमार्थाची प्रेरणा देणाऱ्या कारणांचे चिंतन केले पाहिजे. कारण ज्या कारणांनी परमार्थ–प्रेरणा होते त्या कारणांनीच ती, म्हणजे भक्तिहि वाढते. भक्ति हेच ईश्वरप्राप्तीचे एकमेव साधन; म्हणून सर्व विचार व भावना ईश्वरोन्मुख करून, धीर निघत नाही अशा उत्कट प्रेमाने, ईश्वरांत शिरावे. हीच भक्ति, ही भक्ति निष्काम असावी; ऐहिक वैभव किंवा चमत्कार करण्याचे सामर्थ्य यासाठी भक्ति करूं नये. त्याचप्रमाणे देवाशिवाय अंतःकरणांत कांहीं ठेवावयाचे, येऊं द्यायचे नाही. यासाठी एकहि श्वास वायां जाऊं न देता, अखंड, दीर्घकाळ नामस्मरण करावे. नामस्मरण म्हणजे अंतरी देव भरणे, शेवटी देव पूर्णपणे अंतःकरणांत भरला म्हणजे कल्पनांना तेथे येण्याला जागाच उरत नाही. हे सर्व हळूंहळूंच होते. तरी हे ध्येय नजरेसमोर असावे. ज्ञानेश्वर म्हणतात, " एकदम तुझी मन–वुद्धि मला देणे, अखंड नामस्मरण, तुला शक्य होणार नाही; म्हणून रोज थोडा वेळ माझे नामस्मरण कर. मग त्यापासून थोडा थोडा आनंद होऊं लागेल. त्या आनंदाच्या ओढीने ध्यान वाढेल. ध्यान व आनंद हे परस्परांना वाढवित राहिले म्हणजे मन विषयांतून पूर्णपणे दूर होऊन ईश्वरांत शिरेल; विषयांचा, देहभावाचाहि विसर पडेल व तूं ईश्वरच होशील." अशी चढती वाढती भक्ति साक्षात्काराला अगदी अवश्य आहे.

असा देहभावाचा पूर्ण विसर आत्मानंदांतच पडतो; हे कार्य नुसत्या नामस्मरणाने होत नाही. नामस्मरणाने जाणीव आत्माकार होऊं लागली म्हणजे तिचे आविष्कार, आत्माकारतेच्या प्रमाणांत, रूप-तेज-वर्ण-नाद इत्यादि अतींद्रिय, प्रातिभ अनुभवांत होतात. पुढील दोन प्रकरणांत त्यांचेच विवरण येईल. हे आत्मानुभव म्हणजे आत्मा, ईश्वरच आहे, त्यांचे अनुसंधान करावे असे संतांनीं सांगितले आहे. रूप-वर्ण पाहात राहणे, अनाहत नाद ऐकत राहणे म्हणजे अनुक्रमे स्वरूपानुसंधान व नादानुसंधान होय. '**आठवतो ब्रह्म**' या नियमाने, नामस्मरणाने जसे क्षणाक्षणांनी ब्रह्मत्व जोडते व वाढते, तीच प्रक्रिया या दोन अनुसंधानांनीं होते. नादानुसंधानाने मन व प्राण विष्णुपदी, ब्रह्मांत लीन होतात, असे शंकराचार्यांनीं लिहिले आहे. रामदास म्हणतात, " स्वरूपानुसंधानाने देहाभिमानाचा विसर पडतो, मन विश्रांती पावते, पांगुळते, स्वतःला विसरते, कापूर पेटविल्यावर तो थोड्याच वेळांत मावळतो व अग्निरूप होतो. तसे मन मावळते व सर्वत्र आत्माच पसरलेला दिसतो. शेवटी आत्मानुभवाच्या डोहांत विरून, त्यांत पूर्वीच विरलेल्या गुरुशी शिष्य एकरूप होतो." साधनाच्या दृष्टीने नादानुसंधानाचे व स्वरूपानुसंधानाचे फार महत्व आहे. †

**सत्संगति :–** संतसंगतीशिवाय भक्तांची व परमार्थाची वाढ होणे अशक्य आहे. विचार करून संताची संगति धर. परमार्थाचे ज्ञान व भक्ति, देहाचा व मनाचा परमार्थाकडे योग्य उपयोग कसा करावा, हा मार्ग त्यांच्याकडून तुला लाभेल, तीर्थक्षेत्रीं केवळ धोंडा-पाणी आहे, देव संतांजवळ आहे. ते अदृश्य देवाचे दर्शन घडवितात, जन्ममृत्यूच्या चक्रांतून मुक्त करतात. उदारपणे ते, ज्याला हवे त्याला, परमार्थाचे दान करतात. त्यांच्या भेटीने पापतापांचा नाश होतो; अविनाशी सुख जोडते. सद्‌गुरु आई असून संत दाई आहेत. सद्‌गुरु बी पेरतात, संत माळ्याप्रमाणे बागेची मशागत करतात. संताच्या

---

† हि. सा. ३६२– ३६३.

संगतींत परमार्थतरूला फुलें येतात; उच्चतम साक्षात्कारी पुरुषाच्या संगतींत त्याला फळेहि धरतात. कृष्ण व अर्जुन यांच्या संवाद-सुखाच्या स्मृतीने संजयहि त्यांच्याशी एकरूप झाला ( ज्ञानेश्वरी १८. १६०१–०७ ).

**मोक्षश्रिया आळंकृत । ऐसे हे संत श्रीमंत । जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले । जें त्रैलोकीं नाहीं दान । तें करिती संतसज्जन ।। ***

( दासबोध १.५. २१–२४. )

चिंतनाने जीवन कसे वदलते याचे विवरण वर आले आहे. त्याच्या पार्श्वभूमीवर संत–संगतींत साधकाच्या परमार्थाची वाढ कशी होते, त्याचे थोडे विवेचन करणे इष्ट होईल.

साक्षात्कार हेच जीवनमूल्य व ध्येय अंत:करणांत दृढमूल झाले पाहिजे. मग जीवन साक्षात्काराकडे धांवू लागते. येथूनच सत्संगतीचे कार्य सुरूं होते. सत्संगतींत पारमार्थिक ध्येयाचे स्मरण सतत जागे राहते; त्यामुळे ते ध्येय दृढमूलहि होते, सामान्यत: साधकाचे मन प्रापंचिक विचारांनींच व्यापलेले असते. त्यामुळे परमार्थाचे विस्मरण पडते. सतसंगतींत मात्र परमार्थाचे स्मरण करून देण्याचे शुभप्रद कार्य अखंड चालूं असते. कारण–

" **एकमेकां साह्य करूं । अवघे धरूं सुपंथ ।** " आणि

" **एकमेकां करूं सदा सावधान । नामाचे अनुसंधान तुटो नेदूं ।** " असे संताचे ब्रीद असते.

दुसरी गोष्ट म्हणजे मनुष्य स्वत:ची जीवनमूल्यें मुख्यत: समाजा-कडूनच उचलीत असतो. तसेच समाजाला जे रुचेल तेच करण्याकडे त्याची प्रवृत्ति असते. ज्याचा त्याचा समाज त्याच्या स्वत:च्याच पातळीवरचा असतो. त्या समाजाचे संस्कार व्यक्तीवर फार मोठ्या

---

* म. सा. १३७–१३८ हिं. सा. ५७.

प्रमाणांत होत असतात. म्हणून ज्यांच्याकडून स्वतःच्या ध्येयाला अनुकूल असे संस्कार लाभतील, ज्यांनीं आपलेच ध्येय जीवनमूल्य म्हणून स्वीकारलेले असेल, जे त्याच्याच प्राप्तीसाठी प्रयत्न करीत असतील, अशांचीच संगती निवडणे हे ध्येय-प्राप्तीच्या दृष्टीने क्रम-प्राप्त व स्वाभाविक ठरते. साधकाच्या दृष्टीने अशी ध्येयानुकूल संगती संतांचीच होय. तेथे अनुकरणप्रियतेमुळे परमार्थसाधनाच्या अंगोपांगाचेहि आचरण आपोआप घडत असते. मनुष्य स्वभावतःच अनुकरणप्रिय आहे. ज्यांचे अनुकरण मंगलप्रद ठरेल अशांच्याच संगतींत त्याने नेहमी राहावे; म्हणजे सहजच त्याने केलेले अनुकरण मंगलमय फल देईल.

संतांच्या संगतींत विकारांचा नाश व भक्तीचा परिपोष कसा घडून येतो याचा आणखी कांहींसा खोलवर विचार करणे इष्ट ठरेल. माणसाच्या मनांत अनेक वासना, अनेक आवडी, रुजलेल्या असतात. त्यांतील ज्यांना अनुकूल परिस्थिती लाभते त्या कल्पनांच्या रूपाने प्रकट होतात. साधकाच्या अंतःकरणात भक्ति असते, तशाच तिच्या जोडीला इतर अनेक ऐहिक वासनाहि असतातच. संताच्या संगतींत भक्तिभाव तेवढा जागृत राहतो, त्याचे वारंवार स्मरण होते. त्यामुळे तो दृढतर होत जातो, उलट इतर प्रापंचिक आवडींचे स्मरण न झाल्याने त्या क्षीण होत जातात. दोष सर्वच साधकांत असतात. परंतु संताच्या संगतींत ते अव्यक्त राहून भक्तिप्रेम तेवढेच व्यक्त होत राहते. तेवढ्या कालापुरते भक्तिसाधन हेच जाणिवेचे केंद्र होते; कारण वातावरण त्याच ओढीला अनुकूल असते. अर्थात् भक्तीला उत्साह येतो; उत्तेजन मिळते. एका दृष्टीने त्या कालावधीपुरते भेद-भाव व स्वभाववैचित्र्य मावळून सर्वांच्या भावनांत कांहीं प्रमाणांत एकरूपता येते. सर्व सामुदायिक कार्यांत व प्रसंगांत असे घडत असते.

गुरुदेव रानडे असे सांगत की अनुभव येण्याला सत्संगतीचा प्रत्यक्षहि उपयोग होतो. आत्मानुभव लाभलेले व न लाभलेले साधक

वरचेवर एकत्र नामस्मरणासाठी बसले, म्हणजे अनुभवी साधकांना येणाऱ्या आत्मानुभवांच्या लहरींचा परिणाम इतर साधकांवरहि होतो, व तो त्यांना आत्मानुभव येणाच्या दृष्टीने उपकारक ठरतो. " **तेथ मी पांडवा। हारवला गिवसावा। जेथ नामघोष बरवा। करिती माझा॥** " या वचनांतहि हाच आशय आलेला आहे. हा सिद्धांत गुरुदेव रानडे एका दृष्टांताच्या आधारे स्पष्ट करीत असत. एक सतार छेडली की तिच्या सुराला जुळवून ठेवलेल्या अनेक सतारींच्या तारांतून आपोआप सूर उमटूं लागतात. सत्संगतींत साधन करताना कांहींशी अशीच प्रक्रिया घडते.

७) **उत्कट प्रेम** :— याप्रमाणे दीर्घकाल, निरंतर नामस्मरण होण्याला उत्कट भक्तिप्रेमाची अत्यंत आवश्यकता आहे. ज्याच्यावर प्रेम त्याचे स्मरण दीर्घकाल, सतत सहज राहते, हा व्यवहारांत नित्याचा अनुभव आहे. प्रेम व स्मरण परस्पर पोषक आहेत. " एकाग्रता व भक्ति यामुळे उत्पन्न होणाऱ्या उत्कट भावनांचा प्रभावाने अनेक वर्णांचा अनुभव आला पाहिजे. उत्कट भक्ति व अंतःकरणांतील तळमळ असल्यावांचून उच्च साक्षात्कार अशक्य आहे. "

८) **शरणागति आणि भाव** :— चांगल्या नामस्मरणाचे निकष हे की त्यामुळे सर्वत्र ईश्वराचा प्रकाश, अनाहतनाद, ईश्वराचे रूप हे अनुभव आले पाहिजेत. नाम हे या अनुभवांचे वाहक आहे. याप्रमाणे साक्षात्कार वाढत जाऊन पापाचा नाश होतो व साधक पावित्र्याची मूर्तीच बनतो आणि इतरांना शुद्ध करीत जगांत फिरतो. परंतु असा उच्च साक्षात्कार होण्याला वरील सर्व अभ्यासापेक्षा भक्तीचा उत्कटभाव अत्यंत आवश्यक आहे. भाव वाढल्यावर आध्यात्मिक पर्वताचे शिखर लवकर गाठता येते. ज्याचा अर्थ कोणी सांगू शकत नाही, सांगू शकणार नाही, असे देवाबद्दल नितांत प्रेम म्हणजे भाव. असा भाव निर्माण होण्याला दीर्घकाल, निरंतर नामाभ्यासाची आवश्यकता आहे. पण अभ्यास झाला म्हणजे सर्व

झाले असे नाही. भावाची उत्कटता शरणागतीला पोहोंचली पाहिजे. ईश्वराच्या इच्छेने होणार असेल ते होऊं दे, अशा वृत्तीने आपला हवाला सर्वस्वी ईश्वरावर टाकला पाहिजे. सरोवर आटले तर पक्षी उडून जातील; बिचाऱ्या माशांना मात्र सरोवरबरोबरच जगणे, त्याच्याबरोबर मरणे हा एकच मार्ग आहे. भक्ताची देवाबद्दल अशी वृत्ति, असा भाव झाला पाहिजे. चातकाला मेघ तसा भक्ताला देव. तुलसीदास सांगतात, " व्याधाचा बाण लागून एक चातक गंगाजलांत पडला; पण लगेच त्याने चोंच वर केली. मेघाशिवाय दुसरे पाणी प्यावयाचे नाही या व्रताचा मृत्यूसमयीहि त्याने भंग होऊ दिला नाही, " हेच सत्यार्थाने आत्मसमर्पण, एकांतिक भक्ति, शरणागति; हेच साधकाच्या पराकाष्ठेच्या प्रयत्नाने शिखर होय. केवळ अनन्य-भक्तीनेच देवाला जाणणे, पाहणे आणि त्याच्याशी एकरूप होणे शक्य आहे. ( भगवद्गीता ११.५४ ) ईश्वरप्राप्तीची उत्कट इच्छा, अंतःकरणांतील भक्तींचा झरा, आध्यात्मिक वेड म्हणजे भाव, अशा भावावांचून देवाशी शाश्वत ऐक्याचा लाभ होणार नाही. जन्मतःच अशी अनन्यभक्ति असणे शक्य नाही. पण प्रयत्नाने ती प्राप्त होऊं शकेल " **होईल सद्भक्ति येणे पंथे।** " § ( तुकाराम. )

९) **निराशेची अंधारी रात** :- परंतु, अशा शरणागतीच्या अवस्थेला पोहोंचण्यापूर्वी व पोहोंचण्यासाठी गाढ निराशेच्या कालांतून जावे लागते. त्याचा विचार पूर्वी झालाच आहे. गुरुदेव रानडे यांनीं तुकारामाच्या अभंगाधारे, या अवस्थेत भोगावे लागणारे वैफल्य, निराशा, अपमान इत्यादि मानसिक यातनांचे वर्णन केले आहे. ते आतां पहावयाचे आहे. हे सर्व सहन करून, सर्वस्वाचा त्याग करण्याला अतुल धैर्य लागते. म्हणून भक्ति सुळावरची पोळी आहे, ते शूराचे काम आहे. शिर उतरवून जमिनीवर ठेवतो त्याला अमृतरस मिळतो. " **नायमात्मा बलहीनेन लभ्य** " ईश्वर-

---

§ हिं. सा ३६४-३६५. भ. गी २५४-२५५. क. सा. १९४-१९५.

दर्शनाच्या आनंदासाठी सुळावर चढण्याच्या यातनांची किंमत द्यावी लागते. सॉक्रेटिस, ख्राईस्ट, गुरु अर्जुनसिंग यांना हीच किंमत द्यावी लागली, लोखंडीचे चणें खाल्यावांचून ब्रह्मपदाचा आनंद मिळत नाही. तुकारामांना अशा यातना सोसाव्या लागल्या. त्यांच्या पारमार्थिक जीवनांत तीन अवस्था दिसतात. १) प्रपंचाकडे पाठ फिरवून निश्चयाने ईश्वप्राप्तीच्या मार्गाला लागणे; ही **आशेची अवस्था.** २) अंतर्बाह्य युद्ध, साक्षात्कार होणार नाही ही भीति, शंका, प्रपंच–परमार्थ दोन्हीं ठिकाणी वंचना झाल्याचे वैफल्य, ही **निराशेची अवस्था.** ३) ईश्वर दर्शन व त्यामुळे या दोन्हीं अवस्थांच्या अतीत होणे; हा **उच्च आशावाद.** प्रयत्नाची पराकाष्ठा करूनहि ईश्वर दर्शन होत नाही, स्वप्नांतहि तो दिसत नाही, चतुर्भुजरूप दृष्टीस पडत नाही, म्हणून तुकाराम अस्वस्थ, वेडे झाले, तळमळूं लागले. मन व जन यावरोवर सदा असलेल्या युद्धाचीहि या दुःखांत भर पडली. प्रगत साधकाला आत्मनिरीक्षणामुळे आपल्या दोषांची तीव्र जाणीव होते. तुकारामांनाहि तशी जाणीव होऊन, त्यांचे मन, त्यांना खाऊं लागले. हे दोष नष्ट करण्याला आपले प्रयत्न अपुरे पडत आहेत, हे त्यांना समजून चुकले. म्हणून 'देवा, माझे मन, इंद्रिये मला आवरत नाहीत; मी दुराचारी आहे; अहंकार मला जडला आहे. पूर्वीचा भाव माझ्यांत उरलेला नाही. मी पातकांच्या राशी आहे. पण तूं कृपेचा सागर आहेस; तूंच मला यांतून तारून ने; कृपा कर व मला दर्शन दे, अशी त्यांनीं देवाची काकुळती केली. संतांच्या कृपेने साक्षात्कार होईल, या आशेने ते संतांना शरण गेले, संतसंगति दे अशी देवाला विनवणी केली.

परंतु दीर्घकाल वाट पाहूनहि दर्शनाचा लाभ होत नाही, हे पाहून त्यांच्या मनांत विकल्पाचे काहूर उठले. प्रपंच–परमार्थ दोन्हीं बुडाली, द्रव्य संपले दिवाळे निघाले, अब्रू गेली, लोक वेडा म्हणूं लागले. कोणी जवळ करीना; त्यामुळे खापरांतल्या लाहीप्रमाणे ते तडफडूं लागले. नशिवी काय आहे ते त्यांना कळेना. पण या

स्थितीतहि ते फार काळ राहिले नाहीत. देवाच्या सामर्थ्याबद्दलच त्यांना शंका येऊं लागली. आपल्या प्रारब्धापुढे देव दुर्बल ठरला; नाहीतर ते जाळून त्याने आपल्याला दर्शन दिले असते, या विचारांनी त्यांनीं देवाची निर्भत्सनाहि केली. " तुझ्या नामांत वीर्य नाही; तुला सत्ता उरली नाही. तुझे देवपण औदार्य या केवळ पोकळ गोष्टी आहेत. तूं मला पराधीन केलेस. माझ्या लेखी देव मेला; असेल त्याला असूं दे," असे ते देवाला स्पष्ट म्हणाले. शेवटी, देव आपल्याकडे लक्ष देत नाही; तेव्हां आत्मघात करून त्याच्यावर हत्या घालावयाची अशा निकराच्या निर्णयाला ते आले. †

१०) **मंगल प्रभात** :– तुकारामांचा हा मनःस्ताप व यातना शिगेला पोहोंचल्यावर, त्यांची हृदयद्रावक हांक देवाने ऐकिली. मग त्याला धीर धरवेना. त्यांच्या दृष्टीपुढील कृष्णमेघ एकदम दूर झाला व साक्षात्काराच्या दिव्य प्रकाशाचे त्यांना दर्शन झाले ‡. असाच, निराशेच्या तिमिरांतून एकाएकी साक्षात्काराचा प्रकाश दिसतो व तो भक्ताला परमानंद देतो. सर्व साक्षात्कारी पुरुषांच्या चरित्रांत हे दिसते. या भाग्याचे, आनंद व कृतज्ञता यांनीं भारावून जाऊन तुकाराम वर्णन करतात,

> **" हिरा शोभला कोंदणीं । जडित माणिकांच्या खाणी ॥**
> **तैसा शोभे नारायण । मुख सुखाचें मंडण ॥**
> **कोटीचंद्रलीला । पौर्णिमेची पूर्ण कला ॥**
> **तुका म्हणे दृष्टि धाये । परतोनि माघारी तें नये ॥ "**

संत मीराबाईनीं आपली आध्यात्मिक व्यथा अशीच एका पदांत व्यक्त केली आहे. " देवा, तुझ्या दर्शनाची वाट पाहात मी किती वेळ उभी आहे. उभ्या उभ्याच मी सुकून जात आहे. माझे हित-चिंतक माझे शत्रू झाले; सर्वांना मी कडू वाटते. कृपा कर, डोळे

† म. सा २८१, २८६–२९८. ‡ म. सा. २९९.

उघड आणि मला दर्शन दे. विश्वाचे ओझें तूं लीलेने घतोस; मात्र माझे ओझे कितीसे होणार आहे ? " शेवटी त्यांची प्रदीर्घ तपस्या सफल झाली. " भाग्याचे पूर्णसाक्षात्कारी गुरु रैदास मला मिळाले. माझी ज्योत ईश्वराच्या ज्योतींत मिळून गेली. " *

परमार्थ आक्रमीत असता धुके, धूर, काजवा, चंद्र, स्फटिक, अग्नि, कापसाचे गोळे, मोत्याची जाळी इत्यादी रूपे साधकांना दिसतात. त्याचे विस्तृत वर्णन पुढील दोन प्रकरणांत येईल. या खुणा साधकाला परमार्थमार्गांत पुढे पुढे नेतात व शेवटी त्याचे देवाशी ऐक्य होते. हीच आत्मनिवेदन भक्ति होय.

११) **ईशकृपा** :– ध्यानाची पूर्ण फलप्राप्ति, उच्च साक्षात्कार, होण्यासाठी अवश्य ती चौथी गोष्ट म्हणजे ईशकृपा; तिच्याविना केवळ साधकाच्या प्रयत्नाने उच्च साक्षात्कार शक्य नाही. देवाचे हृदय आपल्या भक्तीने हालले पाहिजे; मग तो विश्व हालवील. शरणागति व ईशकृपा परस्पर पोषक आहेत; परस्परांच्या साह्याने दोन्हीं वाढतात. शरणागतीलाच ख्रिश्चनधर्मांत ' देवाने निवड करणे ' असे म्हणतात. त्याचे वर्णन ऑटोने केले आहे. " आपण क्षुद्र दुर्बल आहो; ईश्वर परमसमर्थ, सर्व शक्तिमान आहे, या जाणिवेने साधकाची खात्री होते की आध्यात्मिक धन्यता देण्याला देवाने मला निवडले, ही त्याची कृपा होय, माझा गुण नव्हे. " परमार्थाच्या शिखराच्या जवळजवळ जाणाऱ्या साधकावर ईश्वराची कृपा तीन पायऱ्यांनीं होते.

१) **ददामि बुद्धियोगतम्** । ( भगवद्गीता १०. १० )

२) **तेषामेवानुकंपार्थम्** ( भगवद्गीता १०.११ )

३) **तत्प्रसादात्परां शांतिम्** ( भगवद्गीता १८.६२ )

---

* हि. सा. १८३-१८४.

१) ज्या दिशेने साधकाने कार्य करायला हवे, तसे विशिष्ट वळण, प्रेरणा व दिशा देव त्यांच्या बुद्धीला देतो; तो **बुद्धियोग.**

२) या दिशेने दीर्घकाल साधन केल्यावर साधकाला आत्मानुभव येतात; ही **अनुकंपा.**

३) शेवटी, साक्षात्काररूपी फल साधकाच्या हातीं देऊन, त्याच्या प्रयत्नावर देव आपल्या कृपेचा मुकुट चढवितो; तो **कृपाप्रसाद.** या तीनहि अवस्थाचा अनुभव साधकाला मिळाला; म्हणजेच देवाची कृपा झाली असे म्हणता येईल. ‡

संपूर्ण साक्षात्कारमार्गाचे वर्णन करणाऱ्या एका कन्नड पदाचा भावार्थ देऊन हे प्रकरण संपवू. " खालील गोष्टी केल्यावांचून ब्रह्मानंदाचा पूर्ण अनुभव कसा मिळेल ? नवद्वारे बंद कर; देहदंड व भोग या दोन्हींचाहि अतिरेक टाक; युक्ताहारविहाराच्या नियमाने वाग; मनाचा मळ धुवून त्रिगुणातीत हो; आत्मानुभवाची हळूंहळूं वाढ होऊं दे; अनाहतनादांत देहाला विसर; दिव्य ज्योतिर्मय घोर नाद ( dazzling thunder ) ऐक; सहस्रसूर्यासारखा प्रकाश पाहा; ईश्वराची कृपा संपादन कर; त्याशिवाय उच्च साक्षात्कार शक्य नाही. या सर्व आत्मानुभवांच्या योगाने अनेक वर्णांच्या मंडपांत प्रवेश मिळून अनुभवांत स्थैर्य येऊं दे. मग डोळचाला डोळचाचे दर्शन होऊन ब्रह्मानंदाचा अधिकारी होशील, तेव्हां परमाश्चर्याने देहाचा विसर पडेल आणि भाग्याने लाभलेल्या आपल्या अद्भुत अनुभवांविषयी धन्योद्गार सहजच तुझ्या मुखांतून निघतील. β

* *

---

‡ भ गी. २५५-२५६. β क सा. २९४-२९६,

# प्रकरण १० वे : साक्षात्कार

१) **परमार्थाचे शिखर :– साक्षात्कार :–** दीर्घकाल, निरंतर भक्तिभावयुक्त नामस्मरणाचे साधन करून, ईश्वर कृपेने त्याचा साक्षात्कार होतो; त्याने जीवन आनंदमय, परमपवित्र, दिव्य, धन्य होते, साधक ईश्वरच होतो. हा साक्षात्कार म्हणजे इंद्रियज्ञानासारखे, पण अतींद्रिय, अंतःस्फूर्त आत्मानुभव होत. शब्द, स्पर्श, रस, गंध असेच त्याचेहि प्रकार आहेत. हे अनुभव म्हणजे परमार्थसोपानाचे शिखर, त्याचे भव्य-दिव्य फळ, त्याचा गाभा होय. यांत गुणानुक्रमाने वाढ होते, त्याच्या चढत्या पायऱ्या असतात आणि त्या साक्षात्काराच्या भक्तिभावाच्या उत्कटतेवर अवलंबून असतात. स्थिर, खोल, उत्कट-भाव असेल तर अनुभवहि उच्च स्थिर असतात; एरव्ही, ते सामान्य, अस्थिर असतात. हे अनुभव म्हणजे आत्माच, ब्रह्माचे आविष्कार, ब्रह्म, हे " **अनंतरूपें, अनंत वेषें** " येऊं शकतात. त्यांना मर्यादा नाही. त्यांचा आतां विचार करावयाचा आहे.

२) **आत्मानुभवांचे प्रकार :–** या प्रकरणांत अनुभवांचे नुसते वर्णन येईल, त्यांत विवेचनाचा भाग विशेष नाही. त्यांच्या परिमाणांची चर्चा पुढच्या प्रकरणांत होईल. आत्मानुभवांचेहि इंद्रियज्ञानासारखे पांच प्रकार आहेत. म्हणून गुरुदेव रानडे यांनीं अनुभावनुरूप साधकांचे पांच वर्ग केले आहेत. अर्थात् एकाच साधकाला अनेक प्रकारचे अनुभव येऊं शकतात व येतात. **१) रूप-दर्शी २) तेजोदर्शी ३) वर्णदर्शी ४) नादश्रवा ५) रसास्वादी.** स्पर्श व गंध यांचे अनुभव फार थोड्यांना असतात. त्यांना नांवे दिलेली नाहीत. आत्मानुभवाचेहि त्यांनीं तीन प्रकारांनी विवेचन केले आहे. i) रूप–तेज–नाद इत्यादि प्राथमिक पृथक अनुभव ii) संमिश्र अनुभव iii) उच्चतम, भव्योदात्त अनुभव याच पद्धतीने

पहिल्या प्रकारांतील अनुभव दुसऱ्या व तिसऱ्यांत येतील हे उघड आहे.

**।) प्राथमिक अनुभव :– अ) रूप :–** बिंदुले सुरुवातीचा अनुभव म्हणजे बिंदुले. यालाच गुरुदेव रानडे यांनीं स्पिरिटॉन (Spirition) किंवा आध्यात्मिक अणु म्हटले आहे, प्रथम अनुभव व नंतर त्याला प्रमाणभूत संताचे वचन किंवा त्यांचा आशय या पद्धतीने अनुभवांचे विवेचन करणे सोईचे होईल.

**तिळाएवढें बांधुनि घर । आंत राहे विश्वंभर ।**
**तिळाइतुकें हें बिंदुलें । तेणें त्रिभुवन कोंदाटलें ।।**
**हरिहराच्या मूर्ती । बिंदुल्यांत येती जाती ।।**
**तुका म्हणे हे बिंदुलें । तेणें त्रिभुवन कोंदाटलें ।।** (तुकाराम)

या बिंदुल्यालाच कन्नड संतांनीं वाळवी, नामदेवांनीं मुंगी, इतर संतानीं मोति, रत्न किंवा ( लाल असेल तर ) प्रवाळ म्हटले आहे.

**मोती :– ' सुख सोज्ज्वळ मोतीयाचें लेणें "** आणि **" मोतियाची जाळी विखुरली "** (ज्ञानेश्वर). **" मोतीयन की बरसा झडती "** (गोरखनाथ).

**रत्न :– " अमोलिक रत्न जोडले रें तुज "** ।। (ज्ञानेश्वर) **हिरा शोभला कोंदणीं । तैसा शोभे नारायण "** (तुकाराम)

**शून्य म्हणजे वर्तुळ :– " एकएक चक्रें येती आकाशायेवढी । त्यामध्ये चौकडी मोतियांची "** ।। **" एकएक चक्रें येती व्योमाकार ।। "** (जनाबाई) **" आधी शून्य ते शुभ्रवर्ण । मध्ये श्वेत रचिले जाण । "** (ज्ञानेश्वर)

**डोळा :– "** हा अनुभव फार महत्वाचा आहे. **" डोळाचि पाह डोळा शून्याचा शेवट । नीळ बिंदु नीट लखलखित. "** (ज्ञानेश्वर)

" **डोळियांचा डोळा उघड दाविला । संदेह फिटला माझा तेणें ॥** (एकनाथ)

**ज्योतिर्लिंग :–** " हे लिंग मी देहांतच पाहिले व त्याच्या येवढा झालो (ज्ञानेश्वर). स्फटिक–दीपांत ठेवलेल्या दीपाप्रमाणे ते प्रकाशमान होते. ते माझेच स्वरूप धारण करते व देवभक्तांचे ऐक्य घडवून आणते " (सर्पभूषण).

**चरण :–** ईश्वराच्या चरणाचे दर्शन हा उच्च अनुभव आहे. दीर्घकाल समचित्ताने साधन केल्यावर शेवटी तो येतो. " **मुख पाहा सादर । चरणावरी शिर ठेवोनिया ॥** " (तुकाराम), असे आपादमस्तक रूपाचे दर्शन फार अवघड आहे.

**अनंताचा अनुभव :–** नादाचे वगैरे अनेक अनुभव येतात. व मग **देवरूपाचे** दर्शन होते; त्याच्या आनंदात लीन व्हावे. या दर्शनांत देव–भक्तांचे ऐक्य होते. देवाच्या रूपाचे दर्शन घेऊन दिक्कालातीत ब्रह्माला पोहोंचावे व स्वतः ब्रह्म व्हावे. " *

**आ) प्रकाश :–** ज्वलदग्नि, विद्युत्, तेजस्वी प्रकाश हे तेजाचे अनुभव आहेत. कोटी सूर्यांची प्रभा ही अतिशयोक्ति आहे. " **ज्योती ही वेगळा ज्योती दिसे ।** " " **सहस्त्रदल कमलांत तेज दिसे । ते हे रूप बारे चैतन्य बा ॥** " " **चंद्रसूर्याहूनी तेज ते आगळे । चंचल चांदणे सोमेविण भासले । तेज निमाले रविबिंबेविण ॥** " " **रात्री सूर्य वाहे दिनु चंद्र जाय । ज्ञानेश्वर म्हणे अनुभवी तोचि जाणे । संत येणे खुणे संतोषले ॥** " " **अनुपम्य तेज धवळले ब्रह्मांड । विश्वरूपी अखंड तदाकार ॥ नाद आणि रूप परिपूर्ण आत्मा । ... हरपल्या दिशा देहभाव हरी ।** " (ज्ञानेश्वर), असे विश्वव्यापी तेज हा साक्षात्कारांत फार महत्त्वाचा अनुभव आहे. ज्ञानेश्वर त्याचे स्वरूप सांगतात,

* क सा. १०१–१०३.

" ते आकाशापेक्षा जुने, परमाणूहून सूक्ष्म असून, त्याच्या सान्निध्याने विश्व चालते. विश्वाच्या उत्पत्तिस्थिति–लयाचे ते कारण आहे. चर्मचक्षूंना ते दिसत नाही. साक्षात्कारी पुरुषांना मात्र त्याचा अस्तरहित, सदाचा उदय असतो. मुमुक्षूंपुढे देव सदा कापराच्या दिवटीप्रमाणे चालतो." (ज्ञानेश्वरी–८ ८७–९०; १०. १४२–१४३). **" न कळे दिवसराती । अखंड लागलीसे ज्योति ।। "** (तुकाराम).

**इ) वर्ण :– अखंड तमासा डोळा देख निका । काळा निळा पारवा बाइयानो ।। निळचाचे स्वरूप मनी वसो ।।" " रखुमादेवीवरु अगाध काळे । म्हणोनि सर्वस्व अर्पियले ।।" " काळा लपंडाव काळे रात्री खेळे । काळे निळे हे अभ्र भासले ।।" " निळे हे व्योम निळे हे सप्रेम । निळेपण सम आकारले ।।** ( ज्ञानेश्वर ). **" रक्त, पीत, श्वेत, कृष्ण प्रभा भिन्न । चिन्मय अंजन दिधले डोळा ।। तेणें अंजनगुणे दिव्य दृष्टि झाली । आत्मा निर्वाळला विश्वाकार ।।"** ( तुकाराम ).

पदार्थविज्ञानशास्त्राच्या मते सर्व रंग पांढऱ्या रंगापासून उत्पन्न होतात. साक्षात्कारांत मात्र अनेक रंग काळ्या रंगापासून निघतात आणि काळा म्हणजे तेजाची परासीमा ( Darkness is excess of Ligth ), असा ज्ञानेश्वर–कबीरादि संतांनीं स्वानुभवाने सांगितलेला सिद्धांत आहे. §

वर्णासंबंधी आणखी कांहीं विचार गुरुदेव रानडे यांनीं लिहिले आहेत. तांबडा, काळा, पांढरा व निळा हे अनुक्रमे रज–तम–सत्त्व व निस्त्रैगुण्य या गुणांचे प्रतीक मानतात †. साक्षात्कारांत अनुभवाला येणारा पिवळा रंग भक्तीचा आहे, असा संतांचा अनुभव आहे.

" मला सप्तरंगांनी चमकणारे ज्योतिर्मय लिंग दिसले " ( सर्पभूषण ). उपनिषदांतहि " रक्तवर्ण, वस्त्र, अग्नि, कमल, " अशी दर्शने साधकाला होतात असे उल्लेख आहेत.

---

§ प व्या. ११ † हि. सा. २४७.

प्रातिमदर्शनांना " **वस्तु** " म्हणतात. वस्तु म्हणजे ईश्वर, ब्रह्म, आत्मा ( सर्व एकच ) याचे अनुभवाला येणारे रूप. म्हणून, नाद, अमृतरस यांनाहि वस्तु म्हणण्यास हरकत नाही. वस्तूविषयी महिपती सांगतात : " वस्तु निर्विकल्प, अनन्त आहे. कल्पना, विचार यांच्या अतीत आहे. " **निर्बयलु** ", अनंत, हा अनुभव म्हणजे वस्तुच आहे. वस्तु हा आध्यात्मिक अनुभवाचा सज्जनांच्या हृदयांतील दीप आहे. सदसद्विवेकबुद्धीसारखी ती केवळ बौद्धिक कल्पना नाही. अंतरी भाव असल्याशिवाय नुसत्या भक्तीच्या क्रियांनी वस्तु मिळणार नाही. त्यांनीं चित्तशुद्धि होईल. वस्तु हे जीवन्मुक्तीचे मूळ आहे. हा फार महत्त्वाचा सिद्धांत आहे. देवाचे दर्शन हीच मुक्ति.

ई) **अनाहत नाद :–** " यंत्रांतून आवाज यावा तसा नाद येतो, पण बोलणारा कोणीच दिसत नाही. किनारीच्या रुणझुण नादाने विश्व दुमदुमले आहे " ( निवृत्ति ), " **अनाहती गुंतला नेणे बाह्यरंग । वृत्ति येतां मग बळ लागे ।।** " ( तुकाराम. ); " माझ्यामधून दुसऱ्याचीच वाणी बोलत आहे. मला हवे तेव्हां देव माझ्या प्रश्नाचे उत्तर देतो " ( तुकाराम ). दर्शन, स्पर्शन, संभाषण, यापैकी हा संभाषणाचा अनुभव आहे. " **प्रेम पखावज तार** " आणि " **बिनि करताल पखावज बाजै । अणहद की झणकार रे** " असे कबीर व मीराबाईचे अनुभव आहेत. ब्रह्मरंध्रांत दशविधनादांचा आनंद आपण भोगीत आहो, असे एका कन्नड संतांने लिहिले आहे.

" **सुन्न मंडल में घर किया, बाजे शब्द रसाल ।**
**रोम रोम दीपक भया, प्रकटे दीन दयाल ।।** " कबीर.

यांत नाद व दर्शन दोन्हीं अनुभव एकाच वेळी आल्याचे वर्णन आहे. हे अगदी शक्य आहे, कारण मुख्य अनुभव जाणिवेच्या केंद्रांत असतो; उरलेल्या जाणिवेच्या क्षेत्रांत इतर अनुभव येऊं शकतात. गुरुदेव

रानडे १९०९ साली फार आजारी पडले. तेव्हां मृत्यु आला तरी हरकत नाही, अशा प्राणपणाने त्यांनीं नामस्मरण सुरूं केले. तीन महिन्यांनी त्याना घंटानाद ऐकूं येऊं लागला, हा कसला नाद हे त्यांना कळेना. त्याच दिवशी पुढील श्लोक त्यांच्या वाचनांत आला.

**" नादानुसंधान नमोऽस्तु तुभ्यं त्वां साधनं तत्त्वपदस्य जाने ॥
भवत्प्रसादात्पवनेन साकं विलीयते विष्णुपदे मनो मे ॥ "**
( योगतारावली ४ ).

**भावार्थ :**— नादानुसंधाना, तुला नमस्कार असो. तूंच ब्रह्म-प्राप्तीचे साधन आहेस. तुझ्या प्रसादाने माझे मन व प्राण विष्णुपदीं ( ब्रह्मांत ) लीन होतात. यामुळे प्रोत्साहन मिळून आपल्या पार-मार्थिक जीवनाला नीट वळण लागले; असे त्यांनीं लिहिले आहे. * अनाहतनादांच्या सुपरिणामविषयी चिदानंद सांगतात, " नादाच्या आनंदात मन व इंद्रिये जणु नाहीशीच होतात. म्हणून दुराचार घडूंच शकत नाही. नादाबरोबर झगझगीत तेज व अनेक रंग दृष्टीस पडतात, अनुभवाचा पूर येतो व आपण नाद ऐकतो का तेज–वर्ण पाहतो, हेच कळत नाही; अलक्ष्य रूप पाहून समाधीची झोप लागते, ती कधीच पुरेशी वाटत नाही. त्या अवस्थेच्या पूर्णतेला जावेसे वाटते. " नामदेवहि म्हणतात या झोपेची, " आस नाही पुरली ". परमभक्तीचे फल परमप्रेम; तृप्तीचा अभाव हे त्याचे लक्षण. हे परमश्रेष्ठ फल होय. आत्मानंद कितीहि उत्कट व खोल असला व तो कितीहि भोगला, तरी आणखी हवासाच वाटतो. ‡

**उ) अमृतरस :**— आनंदाने एकाग्र ध्यानांत लाभणारा हा रस ( अमृतरस ) विरळाच कोणाला मिळतो. प्राणपणाने कष्ट सोसून भक्ति करूनहि थोडासा अमृतरस मिळत नाही. कबीरांना हा अनुभव उत्कटतेने होता. अमृतरस सहस्रदल–कमलांत स्रवतो, तेथेच भरून

---

* क. सा. २४२–२४३. ‡ क. सा. २४३–२४४.

राहतो आणि भक्त त्याचे मनसोक्त प्राशन करतो. तो अविट आहे; आणखी हवासाच वाटतो. त्याचे सेवन करणारा संत तो रसच होतो. ईश्वराचा गुण म्हणून तो रस त्याच्यापासून स्रवतो आणि त्याच्या प्राशनाच्या आनंदाने भोक्ता–भोग्य–भोग या त्रिपुटीचा लय होतो. ईश्वर दर्शनाच्या आनंदाने ज्ञाता–ज्ञेय–ज्ञान या त्रिपुटीचा जसा लय होतो, तसाच हा लय आहे. गुरुपुत्रालाच याचा लाभ होतो व त्याने तो अभय, अमर होतो. † श्रीनिंबर्गीमहाराज सांगतात; " तुझे दगडासारखे अंतःकरण मृदु कर. मग सद्‌गुरु हा दगड फोडून तुला अमृतरसाची प्राप्ती होण्याचा मार्ग मोकळा करतील, तुला अमृतरस लाभेल. तुला अंतःकरणांतच कल्पतरू व परीस ( किंवा पुरुष, दोन्हींचा परिणाम एकच ) यांचे दर्शन होऊन तूं देवाशी एकरूप होशील; किंवा खडीसाखर व तिची गोडी, कापूर व सुवास यासारखे गुणी–गुण हे नाते उत्पन्न होईल. अभेद व हे नाते यांत विशेष फरक नाही. साधकाबरोबर नामस्मरण करा, त्या संस्कारांनी चित्तशुद्धी होऊन, अमृतरसाचा अनुभव येईल. मग साधकबंधू व सद्‌गुरु यांच्या-बरोबर त्याचा उपभोग घ्या. ‡" हे आत्मानुभवाचे शिखर आहे.

ऊ) **सुगंध :–** हा अनुभव विरळा; रामानंद व निवृत्तीनाथ यांना तो आला होता. " चंदन उगाळून, देवळांत जाऊन त्या सुगंधाने देवाची पूजा करावी असे मनांत आले; पण सद्‌गुरूने ते ब्रह्म मनांतच दाखविले " ( रामानंद ). " चंदनाचा सुगंध श्रेष्ठ; जाई, जुई, मोगरा यांचा सुवासहि फार; परंतु सुवासाच्या रूपाने प्रकाशणारा विठ्ठलच आम्हांला अधिक साजरा वाटतो + " ( निवृत्ति ).

ए) **स्पर्श :–** स्पर्शाचा अनुभवहि विरळा. " **जोडोनिया कर, मुख पहा सादर। चरणावरी शिर ठेवोनिया ॥** " या अभंगावरून

---

† हि सा. २२८, २३०–२३१, २५५.

‡ क. सा. २४१, २५४–२४६. + हिं. सा १०८, १०९.

तुकारामांना हा अनुभव आलेला दिसतो. कवीरांनींहि " तेजःपुंज स्वामीला स्पर्श केला, " असे म्हटले आहे. *

**आत्मानुभवाची कांहीं वैशिष्टये :–** १) त्यांचा निश्चित क्रम नाही. तेज–रूप–नाद–रस हे क्रमाने येतील किंवा एकाच वेळी येऊं शकतील. २) त्यांना मर्यादाहि नाही. दशविधनाद सांगतात; पण ते कितीतरी अधिक आहेत. याच्यापलीकडे अनुभव नाही; असे कोणालाहि म्हणता येणार नाही. ३) आत्मानुभवांत परस्परोपकारिता ( Reciprocal Causation ) आहे. रसांतून नाद नादांतून रस अनुभवाला येऊं शकतो. कारण ज्ञाता एकच आहे; मग त्याला मेंदू, मन आत्मा कांहींहि म्हणा. ४) वस्तूला खूण म्हटले आहे, पण ही खूण ध्रुवताऱ्याप्रमाणे केवळ दिशादर्शक नसून संरक्षक व साह्यकर्ती आहे. कारण ती ईश्वर आहे. ५) या अनुभवांत इंद्रियांच्या कार्याची अदलाबदल होऊं शकते; डोळे ऐकतात, कान पाहतात, कारण या अनुभवाच्या मागे ज्ञाता एक आत्माच आहे. §

II) **एकत्रित किंवा संमिश्र अनुभव :–** तेज–रूप-नाद-रस इत्यादि अनेक अनुभवांचा समुच्चय म्हणजे एकत्रित अनुभव. कनकदासाचे " वैकुंठ दर्शन " म्हणजे अशा अनुभवांचे उत्कृष्ट उदाहरण आहे. देवाच्या कृपेने व त्याच्या रूपाने माझ्या अंतःकरणांतच मला वैकुंठ दिसले. निबिड अरण्ये, सुंदर उद्याने, सरोवर, सोनेरी मनोऱ्यांचे राजवाडे प्रकाशमान महाद्वार, आंत हिऱ्याच्या तुळचा, देवदेवतांची मंदिरे, यामुळे ते वैकुंठ फारच रमणीय दिसत होते. शेवटी दुष्टसंहारक रंगशाईचे राजभुवन असून, त्यांत अमर ऋषी, रंभा, उर्वशी, नारद, विष्णु, शिव इत्यादि देवदेवता व रंगशाई होते, त्यांचे दर्शन झाले. ‡

सर्पभूषण लिहितात, " अनाहतनाद ऐकले, नीलज्योतीचे दर्शन मला झाले. नंतर मी अमृतरस मनसोक्त प्राशन केला. " अमृतरसाला

---

* हि. सा. ३९०, ३९१. § हिं. सा. २०७-२०८. ‡ क. सा. २४९-२५०.

त्यांनीं दूध म्हटले आहे; कोणी सत्रावीचे पाणी असे नांव दिले आहे. या रसाने मन जिंकता येते, येवढेच नव्हे तर देहावरहि त्याचा परिणाम होतो. शरीर, मन, बुद्धि याची विकृती नष्ट होते †.

संतश्रेष्ठ विजयदास म्हणतात, " देवाच्या व सद्‌गुरूंच्या कृपेने अंत:करणाचे दार उघडले. आंत मोठ्या सभामंडपांत देवाचे गण असून, त्या शृंगारसदनांत, ऐश्वर्यशाली विजय-विठ्ठल विराजत होते. त्यांच्या मुखावर हास्य तळपत होते. हा सच्चिदानंद रमापति, आपल्याच स्वरूपाच्या दासांच्यामध्ये वसला होता. येथे रमापति हे सगुणांचे, स्वमूर्तिगणामध्ये हे अनेकत्वाचे व सच्चिदानंद हे निर्गुणाचे व एकत्वाचे द्योतक आहे; अशा सर्व प्रकारचे देवाचे वर्णन आहे.

गुरूंनी धरिले करी । एका एकी कान फुंकुनी
हात ठेविला शिरी ॥
झाली एक नवलपरी । नानापरिचे शब्द उमटती ध्वनि उठले
अंबरी ॥
रुणझुणिया घागरी । घणघण घणघण घंटा घोष गर्जतसे
अंबरी ॥
मन हे भुलूनि जाये । स्वरुप वारे अंगीभरता वाचे बोलता
नये ॥ धृ ॥ कशि गत झाली सये । स्वरुप वारे. . .
वारा ग सोळा जणी । अवस्थाभवती प्रकाश करिती बहू झाली
दाटणी ॥
दशमे द्वारि जाऊनि । सत्रावीचे अमृत प्याले, हर्ष जाहला
मनी ॥
गगनि लक्ष लावुनीं । पाहणे पाहता तटस्थ झाले निवांतचि
होऊनि ॥ मौनीचे धरुनि पाहे । स्वरुप वारे.
अग्निरुप भासले । नक्षत्रांचा सडा घातला, पूर्णचंद्र उगवले ॥

† क. सा. ११९-१२०.

सूर्यबिंब पाहिले । अर्धा चंद्र शोभत गगनी, ज्योतिरूप पाहुनि वेडावले ।।
बहु देशा चालले । राजहंस पांखरु माझे मजला सांपडले ।।
बसुनि एकांती पाहूं । उडूनि जाईल म्हणूनि सखे बाई डोळचांत सांठवुनि ठेवूं ।।
विसर पडेना माये । स्वरूप वारे. . .
नरहरिनाथ गाऊं । महिपति बाळ कीर्तन करतो चला ग तेथवर जाऊं ।।
सुखांत डोलत राहूं । स्वरूप वारे.

नाथपंथी महिपतींच्या वरील पदांत अनेकविध रूप, तेज, बहूविधनाद, अमृतरस या अनुभवांचे संमिश्र वर्णन आहे.

संत मौलाई वर्णन करतात, "सद्‌गुरुंनी मला खूण दिली, तिच्या सहाय्याने माझे पारमार्थिक जीवन नीट मार्गाला लागले व कष्ट व प्रयत्न करून मी निजधामाला गेलो. ही खूण म्हणजे वस्तु. साधकाच्या आध्यात्मिक वृत्तीला अनुरूप असे तेज, रूप, नाद, रस इत्यादी अनुभव येतात. त्यावरून त्याने आपली आध्यात्मिक पायरी ओळखावी. साधकाला दिसणारे आध्यात्मिक रंग व त्याच्या भावना यांचाहि संबंध आहे. मी आनंदाने नाहले. त्यामुळे देव व भक्त हा भेद नष्ट झाला. मी अमृताचा पेला प्राशन केला; त्यामुळे देवाला जाणले व त्याला जाऊन पोहोचले*."

आमच्या गुरुभगिनी श्रीशिवलिंगाव्वा यांचे सभावर्णन फार सुंदर आहे "ध्यानांत मग्न होऊन बसले असता, योगी, मुनि, संत, फकीर असलेली संतसभा पाहिली. तिच्या मुख्य स्थानी भालाक्ष शंकर होते. तिचे वर्णन काय करूं ! सर्वत्र गुलालाची झुम्बड उडत असून, तेजस्वी ताऱ्यांचा प्रकाश पडला होता. निळा, पिवळा, हिरवा

* हि. सा. २४५–२४९.

तांबडा या रंगाचे अवर्णनीय शेष दिसले. अंतरी भाव असला म्हणजे अंतरंगाचा दरवाजा उघडून दर्शन होते व दुमदुमणारा नाद ऐकू येतो. मी त्यांत बुडून जाते. नुतती नजर टाकली की देव दिसतो. †"

संतकवी मनाला उपदेश करतात; "लाडक्या मना ये. तूं प्रसन्न झालास तर देव व गुरु सहज प्रसन्न होतील. मूळ शाळेचा (सांप्रदायाचा) मूळमंत्र घे आणि ध्यान कर." श्रीनिंबर्गीमहाराजांच्या सांप्रदायाविषयी त्यांचे शिष्य श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर म्हणत असत, "अशी सोप्या व परिणामकारक पद्धतीने साक्षात्काराचा मार्ग शिकविणारी परमार्थाची शाळा काशीपासून रामेश्वरापर्यंत कोठेहि मिळणार नाही." ध्यान केलेस तर तुला नाद–बिंदू–कला यांचा अर्थ समजेल. सहस्रदलकमलावर आनंदाने लोळता येईल, अमृतरस प्राशन करता येईल. आनंदाच्या पाळण्यांत झोपशील, विदेही होशील.+

नामदेवांच्या एका अभंगांत उच्च संमिश्र अनुभव वर्णिलेले दिसतात "ध्यानी पहुडला सांवळा । जवळी नारी बारासोळा । विंझणे वारिती सकळा । सोऽहं शब्द जागरणी ।। धिं धिं तुरे वाजती । अनुहात ध्वनी गर्जती । तेथें निद्रा ना सुषुप्ति । चंद्रसूर्य मावळले ।।"

"शून्यमहालांत, ब्रह्मरंध्रांत नौवत, सतार, किनरी, बीन यांचा नाद, मेघाशिवाय वीज, शिंपल्याविना मोती, नादावांचून शब्द, सर्व तेजाना लाजविणारे ब्रह्म व शेवटी अगम अपार ( ब्रह्म )" असे, कबीरांचे अनुभव आहेत. ‡

III) **दिव्य भव्योदात्त अनुभव** :– हे उच्च दर्जाचे संमिश्र अनुभव आहेत. यांत आत्मस्वरूपाच्या साक्षात्काराचाहि विचार येईल. "समोर तळपणारा देवाचा प्रकाश, त्याचे रूप व वैभव अवर्णनीय आहेत. तो आकाशांत, येथे, तेथे, सर्वत्र विराजमान आहे;

---

† क. सा. २५८–२५९ + क. सा. २५९–२६१ ‡ हिं सा. २२१

मला अत्यंत प्रिय आहे, त्याला कोणी स्पर्श केलेला नाही, करता येणार नाही. आत्मदर्शनाच्या आनंदांत देहभान विसरून आत्म्यांत विलीन झालात म्हणजे परमसत्यतत्त्व सर्वत्र दिसूं लागेल. हा अनुभव आल्यावर, खऱ्या व खोटचा अनुभवांतील भेद कळेल. देहाला स्पर्श न करता, देहापासून निराळा होऊन आत्मा अनंत प्रकाशांत राहतो व ब्रह्माशी एकरुप होतो. एक सृजनशील शक्ति म्हणून तो आकाशांत सर्वत्र विराजमान दिसतो.§ ( निरु-पाधि सिद्ध )

संत कमलेश्वर लिहितात, " आत्मानंदाचे योग्य वर्णन करण्याला शब्दच नाहीत. अंतरीच सुमधुर गुंजारवाच्या श्रवणाने मी परमानंदाने भरून गेलो. त्या अंतरीच्या अनेक नादांतून एक सूक्ष्म ध्वनि उमटला व सर्वत्र भरून गेला. आंत वाहेर असलेला दैदीप्यमान प्रकाश, सहस्त्रदल कमलांत तेजामध्ये उभा असलेला पुरुष, ही दर्शने मला झाली. माझा देहभाव नष्ट झाल्यावर मी ब्रह्माशी एकरूप झालो §".

निर्गुण ब्रह्माचे वर्णन पुरंदरदासांच्या पुढील पदांत आहे, " डोळे भरून परब्रह्म पाहा; अंतरी असलेले दैदीप्यमान रत्न, सोन्याचे तारे पहा. उन्मनी अवस्थेंत ॐकार नाद ऐका. संताना शरण जाऊन त्यांच्याकडून आध्यात्मिक सामर्थ्य मागून घ्या. ते त्यांनीं कितीहि वाटले तरी त्यांचे सामर्थ्य कमी होत नाही. "†

तुकाराम म्हणतात, " **निजल्यानें गातां उभा नारायण । बैसल्या कीर्तन करितां डोले ।। उभा राहोनियां मुखीं नाम वदे । नाचे हा गोविंद नाना छंदें ।। मारगीं चालतां मुखीं नाम वाणी । उभा चक्र-पाणी मागें पुढें ।।** " (तुकाराम गाथा १०३२) असाच अनुभव नामदेव, विजयदास यांचाहि आहे. आपल्या भावनांमुळे देवाचे चलनवलन भक्तांना कळत असावे. म्हणून भक्ताच्या चलनवलनापेक्षा त्यांच्या भावना श्रेष्ठ आहेत. भक्त प्रदक्षिणा घालूं लागला तरी देव निश्चल असणे हा अनुभव कीर्तनाने देव नाचण्यापेक्षा उच्चतर आहे.*

---

§ क. सा. २६६. † क. सा. २६७. * क. सा. २६७.

डोळयांच्या अनुभवांविषयी **महिपती** लिहितात, " चिन्मय परब्रह्म डोळयांतच आहे; पण ते स्वतःला दिसूं देत नाही. असा डोळ्यापुढे डोळा दिसूं लागला व त्या डोळ्याच्या कृपेने सामान्यांना अलक्ष्य अशी हरिहरादींची रूपे मला दिसली. मग नाद ऐकूं आला. हा नाद ईश्वर आहे, इतकेच नव्हे तर हा नाद ऐकण्याची क्रियाहि ईश्वरच आहे. यानंतर बालरूपाने लपतछपत, खेळत देव येतो. तो भक्तासमोर एक नाटक करतो. त्याला पाहण्याचा प्रयत्न केला तर तो दिसत नाही. त्याचे रूप दिसते पण आपले चलनवलन तो कळूं देत नाही. तो आपल्या मूळ वैभवांत राहतो. संतसंगतींत ते रूप स्थिर राहते. कारण त्या संगतींत साधकाचे मन स्थिर राहते. एरव्ही मन चंचल म्हणून रूपहि चंचल असते.§

शेवटी कवीरांच्या एका पदाचा विचार करावयाचा आहे. त्यांत त्यांच्या भव्योदात्त साक्षात्काराचे वर्णन आहे. " मेंदूच्या प्रत्येक पेशीतून अमृतस्त्राव होऊन मेंदू भरून जातो; तेव्हां गगनभेदी नाद ऐकूं येतो. जीवात्मा इतका विशाल होतो की तो ब्रह्मालाच व्यापून टाकतो. हे खरोखरच अवर्णनीय, भव्योदात्त आहे. या अवस्थेत रात्र नाही, दिवस नाही. सतार, बांसरी अशी मधुर वाद्ये वाजतात व अतिमधुर असा रामनाम ध्वनी उमटतो. दहाहि अवतारांची चरित्रे एकामागून एक, अखंड ( किंवा एका रात्रींत ) माझ्या दृष्टीसमोरून जातात. या अनुभवांचे मूल्यमापन करणेच अशक्य आहे. अनंत काल जणु एका क्षणांत घनीभूत झाला आहे. मग स्तुतिस्तोत्रें सहजच मुखांतून निघतात. अशा अनुभवांती ईश्वरांची शक्ती अगाध आहे. या भावनेने साधकाचे मन भारावून जाते. या अतिगूढ गोष्टी क्वचितच कोणी जाणूं शकतात. ‡ "

**स्वरूप साक्षात्कार** :– हा अत्युच्च व अतिमहत्त्वाचा अनुभव आहे. १) आरशांत स्वतःचे प्रतिबिंब पाहिल्याप्रमाणे, पण आरशा-

§ क सा. २६९–२७१. ‡ हिं. सा. २२२–२२४.

शिवाय, आपल्या स्वरूपाचे दर्शन म्हणजे स्वरूप–साक्षात्कार होय. या साक्षात्काराने देवभक्तांचे ऐक्य होते, त्यांतील भेद नष्ट होतो, हे दर्शन झाल्यावर भक्त देवासारखा, देवच होतो. " ज्ञानेश्वर व चांगदेव दोघे जणु डोळस आरसे आहेत. त्यांनी परस्परांना पाहतांच त्यांच्यांतील गुरु–शिष्य, देव–भक्त हा भेद नष्ट झाला " (चांगदेव पासष्टी). " मन निर्विकल्प अवस्थेंत ध्यान करीत असता एक ज्योत प्रकट होते; त्या ज्योतींत निरालंब पुरुषाचे दर्शन होते ". येथे ज्योतींत दर्शनाचा उल्लेख आहे. आरशांत व ज्योतीत आत्मदर्शनाची वर्णनें अन्य ग्रंथांतहि - आहेत. " हृदयांतच आरसा आहे; पण मुख दिसत नाही. मनांतील द्वैतभाव गेल्यावर दिसते "; " जे तेजोमय तत्त्व आनंद समाधीच्या वेळीं आपल्या शरीराच्या वाहेर येऊन तेजाच्या झोतांत स्वतःच्या (साधकाच्या) स्वरूपांत त्याच्या दृष्टीस पडते, तो आत्मा, तेच अमृत, अभय ब्रह्म होय " (मै. उपनिषद् ॥ –१.३). " योगाच्या उच्च अनुभवांत साधक आपण आपल्याला पाहतो व आपल्या ठिकाणीच संतुष्ट होतो " (भगवद्गीता ६.२०). वृत्तिनिरोध झाला म्हणजे आत्मा स्वरूपामध्ये राहतो, या पातंजलि योगसूत्राचा हाच आशय आहे. " आरसा घांसून चकचकीत केल्यावर त्यांत तेजस्वी, स्वच्छ प्रतिबिंव पडूं शकते. तसेच साक्षात्काराच्या उच्च अवस्थेंत साधकाला आत्मस्वरूपाचे दर्शन होऊन, तो कृतार्थ होतो. या आत्मदर्शनाच्या दिव्याने तो अज, ध्रव असे ब्रह्मतत्त्व पाहतो व सर्व पापांतून मुक्त होतो ", (श्वे. उपनिषद् ॥–१४.१५) *. आत्मदर्शन आंत डोळे मिटून होते, तसे बाहेर, डोळे उघडूनहि सर्वत्र होते व तोच मी हा अनुभव येतो; देवभक्तांतील भेद नष्ट होतो. " सोन्याच्या मिशा, सोन्याचे केस, नखापासून सर्व सोन्याचाच, अशा पुरुषाचे दर्शन सूर्यबिंबावर होते व तो पुरुष मीच हा अनुभव येतो " (छांदोग्य उपनिषद् १.६.६; ईश १६). वर ज्ञानदेव व चांगदेव हे

* उप. २५३.

डोळस आरसे म्हटले आहे. त्यांत परस्परांची अनंत प्रतिबिंबे दिसतात. आरशासमोर दुसरा आरसा ठेवल्यावरहि अशी प्रतिबिंबे दिसतातच व त्यामुळे भेदाचा निरास होतो. या दर्शनाने भेदाचा नाश होऊन साधक ब्रह्मपदाला पोहोचतो, जन्ममृत्यूचे चक्र थांबते, हे त्याचे महत्त्व आहे. " **मीच मज व्यालो पोटा आपुलिया आलों** ", " **देखती जें डोळें । रूप आपुलें तें खेळे ।।** ", असे उद्गार आत्मदर्शन झाल्यावर तुकारामांनीं काढले आहेत. हिंदी संत गुलाल म्हणतात, " परमप्रिय आत्मा देहापासून वेगळा झाला; आतां जन्ममरणाचे फेरे संपले ". " अनावृत्तिः शद्बात् " असे बादरायणांचे सूत्र आहे. हीच सायुज्यमुक्ति होय; हाच साधकाचा अत्युच्च अनुभव. अनंत अनंताला जाऊन पोहोंचले, अद्वैतानुभूतींत सर्व कांही मावळले, आत्म्याने सर्व व्यापून टाकले.* "

"**यत्र चैवात्मनाऽऽत्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति**' ( भगवद्गीत ६. २० ) याचे, म्हणजे या आत्मदर्शनाचे मर्म, ज्ञानेश्वरी १५. २६६-८३ मध्ये उत्कृष्टपणे स्पष्ट केले आहे, असे गुरुदेव रानडे यांनीं म्हटले आहे. त्या ओव्यांचा आशय पाहूं. "आत्मसाक्षात्काराच्या खड्गाने प्रपंचरुपी ऊर्ध्वमूल अश्वत्थ तोडून टाकून, ज्ञेय व ज्ञाता, विश्व व जीव हे दोन्हीं जेथे नाहीत, ते आपले रूप आपणच पाहावे, परंतु अडाणी लोक जड आरशांत स्वतःचेच खोटे दुसरे मुख करून पाहतात, तसे मात्र हे पाहावयाचे नाही. या पाहण्याला दृष्टांत म्हणजे विहीर खणली नाही तरी झरा आपल्या उगमांत भरलेला असतो, डबक्यांतील पाणी आटल्यावर, त्यांतील प्रतिबिंब पुन्हा मूळ सूर्यबिंबाला मिळते, तसेच हे आपल्याला आपण पाहणे आहे. जिभेने आपली चव चाखावी, डोळ्याने आपले बुबुळ पाहावे असे हे पाहणे आहे. न जाणता हे जाणणे आहे. या अनुभूतीलाच आदिपुरुष म्हणतात. संसार व स्वर्ग याला विटलेले मुमुक्षू पुन्हा जन्म घ्यावयाचा नाही या निश्चयाने, योगमार्गाने,

* हिं. सा. ३८५-३८७, २५३-२५४, भ. गी. २६१.

आपल्या अहंकारादि सर्व जीवभावाचा झाडा देऊन, या आपल्या मूळ घराला, ब्रह्मत्वाला जाण्याचें आज्ञापत्र घेतात. बर्फाने बर्फ गारठावे, त्याप्रमाणे हे आपले स्वरूप ( वस्तु ) आपण पाहावे. या आत्मदर्शनाची आणखी एक खूण आहे. या दर्शनानंतर, आत्मप्राप्तीनंतर पुन्हा जन्माला यावे लागत नाही "

४) **एकमेवाद्वितीय ब्रह्म :–** स्वाधिष्ठित व स्वयंपूर्ण अशी ही स्वरूप- साक्षात्काराची अवस्था आहे. या दृष्टीने ईश्वरसाक्षात्कारापेक्षा आत्मसाक्षात्कार उच्चतर आहे. "तत्त्वमसि" पेक्षा "सोऽहम्" श्रेष्ठ आहे. या अनुभवालाच कबीर 'बेहद्द' तर कन्नड संत 'निर्बयलु', अवकाशाचा अभाव ( Spacelessness ), म्हणतात, त्याचाच दुसरा अर्थ 'ब्रह्मांत लय', परंतु साक्षात्काराच्या दृष्टीने त्याचा खरा अर्थ दिक्कालातील, अनंत ब्रह्म, परतत्त्व; त्याचा अनुभव, संताना येतो. असाच आपला अनुभव गुहेश्वर सांगतात, "कदलीवनाच्या गुहेंत निर्बयलूचा अनुभव आला". हा अनुभव म्हणजे स्वतःशी ऐक्य पावणे. मी स्वतःशी ऐक्य पावलो, हे या अनुभवाचे वर्म त्यांनी सांगितले, असा आत्मसाक्षात्कार, आत्मस्वरूपांत राहणे. हीच साक्षात्काराची परासीमा होय. §

§ क. सा. १८, २०८

## प्रकरण ११ वे : साक्षात्काराचे परिणाम

१) **साक्षात्काराने जीवनांत क्रांति :–** " कबीरांच्या पुढील दोन चरणांचे मूल्यमापन व गुणवर्णन कसे करावे ते समजत नाही, " असे गुरुदेव रानडे यांनीं म्हटले आहे.

" **काल कराल निकट नहि आवै । काम क्रोध मद मोह जरै ॥**
**जुगुन जुगुन की तृषा बुझाती । करम भरम अघ व्यधि टरै ॥**" (कबीर).

कराल मृत्यु जवळ येत नाही; षड्विकार जळून जातात; युगायुगांच्या वासना शमतात; कर्म, भ्रम, पाप, व्याधि दूर होतात; हे साक्षात्काराचे परिणाम आहेत. हे दोन चरण साधकाने आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवावेत ". साक्षात्कारामुळे मनुष्याच्या जीवनांत अत्युच्च, भव्य, पवित्र असा फरक, किंवहुना क्रांति घडून येते, असे दिसून आले तरच सामान्य मनुष्य त्याला महत्व देईल व परमार्थाकडे वळेल. साक्षात्कारी पुरुषांनीं आपल्या अनुभवावरोवरच त्यांचे तेजस्वी, भव्य, स्फूर्तिदायक असे शारीरिक, नैतिक, बौद्धिक परिणामहि वर्णिले आहेत. त्यांच्याकडे वाचक आकर्षित झाल्यावांचून राहत नाही. नाथपंथी महिपतींचे उद्गारहि असेच रोमहर्षक आहेत; "**जाको वेद न जाने डेरा । वो मैने नयनसो हेरा ॥ सच्चा साई, गुरु, गोसाई रहा बताई । जिससे सकल भरमना मिटी । डोरी जनमरणकी टुटी । कोठडी करमकी फुटी । लगी लगन मगन दिल हरखे ॥** "

२) **आनंद व शांति :–** नीतिशास्त्र या तिसऱ्या प्रकरणांत स्वरूपसाक्षात्कार व आत्मानंद यांचे समीकरण केले आहे ( पृ. ५८). एकाच अनुभूतीची ही दोन अंगे आहेत. आनंदाचे कोष्टक व भूमा, अनंताचे सर्वत्र दर्शन, म्हणजे आनंद हे उपनिषदांतील विचार तेथे मांडले आहेत. हा आनंद ब्रह्मसंस्पर्श आहे, त्यांतहि साक्षात्कार व

आनंद यांचा सबंध स्पष्ट आहे. योगाचे शिखर म्हणजे आत्म्याला आत्म्याच्या दर्शनाने होणारे आत्यंतिक सुख, असे भगवद्गीता ६.२१-२२ मध्ये म्हटले आहे. त्यावरील भाष्यांत ज्ञानेश्वर म्हणतात त्याप्रमाणे आत्म्याने आत्म्याला पाहिल्यावर 'मीच आत्मा, परतत्त्व,' हे तो ओळखतो व त्याक्षणीच सुखाच्या साम्राज्यावर बसतो. या महासुखांत झोपल्यावर त्याला शस्त्राने तोडला किंवा तो अग्नींत पडला तरी त्या दुःखाचीं जाणीवहि त्याला त्याला होत नाही" (ज्ञानेश्वरी ६.३६६-३६७). मनुष्याला सुखाची इच्छा अखंड आहे. त्याचे जीवन सुखाच्या इच्छेभोवती फिरते. अर्थात् साक्षात्काराचे भक्तांच्या जीवनावर होणारे नैतिक, मानसिक, शारीरिक परिणाम म्हणजे त्याच्या आनंदाचे परिणाम असतात. खरी उच्चतम शांति हा आनंदाचा परिणाम आहे. आनंदाचे शिखर म्हणजे शांति. ही शांति विरक्तीपेक्षा उच्चतर आहे. अशी शांति हेच ध्यानसाधनाचे उच्चतमसाध्य आहे. उपनिषदांत आत्मानंदाचा महासागर आहे, तसाच सर्व संताच्या वचनांतहि आहे. त्यांतील अगदी थोडीच वचनें उद्धृत करून, ह्या आनंदाच्या परिणामाकडे वळूं, "अनाहत नादांत लय, उज्वल प्रकाश, अनेक रंगाच्या मंडपांत बसणे, या अनुभवाशिवाय ब्रह्मानंद कसा मिळेल ? β" ( दिनकरबसव ). **मुकियाचे परी आनंदु भीतरी । अमृत जिव्हारी गोड लागे ॥ ... तनु मनु विगुंतलें, मन वाचा गुंतले । मी–माझे विसरले दर्शन गे माये ॥ " " धालों मी ब्रह्मे उद्गार–संभ्रमे । अनुदिनी प्रेमें डुल्लतसे ॥ ... बापरखुमादेवीवरू विठ्ठली मुरोनी राहिला । तो आनंदु देखिला संतजनीं ॥** " (ज्ञानेश्वर). "सहज अशा आत्मसुखांत रंगल्यामुळेच इंद्रियांचीच आठवण होत नाही, मग विषयांची कशाला होईल" ( ज्ञानेश्वरी ५.१०५.१०६ ). "आत्मलाभासारखे गोमटे कांहींच नसल्यामुळे भोगाच्या प्राप्तीने हर्ष होत नाही" ( ज्ञानेश्वरी १२. १९० ). "भक्त महासुखांत बुडून गेल्याने ऋद्धिसिद्धीकडे त्याचे लक्षहि जात नाही" ( ज्ञानेश्वरी २.३६२ ). "देवाचे रूप पाहा, त्याला ओळखा व हंसत राहा"

---

β क. सा. २९६;

( कबीर ). " सर्वत्र देव भरलेला पाहून नानकांना पुन्हा पुन्हा आनंद झाला. " या आनंदाचे **शारीरिक परिणाम** म्हणजे अश्रु, स्वेद, रोमांच कंठावरोध, कंप इत्यादि अष्टसात्विकभाव. " महान् आनंदाने देहाचा विसर पडला; न खातां पोट भरून गेले; इंद्रियांचे बळ हरपले; त्यांचा प्रक्षोभ गेला; मन–इंद्रिये शांत झाल्याने, श्वासहि अतिमंद झाला." हाच **केवल कुंभक.** " साक्षात्कारी पुरुषाला सृष्टींतच तुष्टि वाटते; जग सृजनशील आनंदाने भरून गेलेले दिसते. आनंदाचे वर्णन करता येत नाही. अशा पुरुषाला जगांत पृथ्वीपासून पर्वतापर्यंत नवचैतन्य, वैभव निर्विकारी आत्मस्वरूप भरलेले दिसते. " " उन्मनी अवस्थेंत घंटानाद व अमृतरस यांच्या अनुभवाने साधक ब्रह्मरंध्रांत हंसाच्या पिसांच्या शय्येवर आनंद समाधीचा उपभोग घेतो. "*

**३) आत्मानंदाचे नैतिक–मानसिक परिणाम –:** " घोर अनाहत नादाच्या श्रवणाने इंद्रिये व मन गळून गेली; रोमरोमांत आनंद भरल्याने आळस नष्ट झाला; त्या उन्मादांत देहाचा कणन्कण अमृतरसाने भिजून गेला " (चरणदास). दीर्घकाल योगाभ्यासाने " **सबाह्य सात्त्विकें भरे। जंव कठिणपण विरे। अहंभावाचें ॥ विषयांचा विसरु पडे। इंद्रियांची कसमस मोडे। मनाची घडी घडे। हृदयामाजीं ॥** (ज्ञानेश्वरी ६.१८७.१८८). तुकाराम म्हणतात, " देवाच्या दर्शनाची ही खूण आहे कीं, तो ज्याच्या अंतरी आहे, त्याच्या आशा, ममता, कामक्रोध, मी–माझे सर्व नष्ट होते. भक्त विठ्ठल अंतरी भरून ठेवतो. मृत्यु व इतर मृगजळे यांना भीत नाही. सर्वस्व देवाला वाहून त्याला तो शरण जातो; दुसऱ्याची करुणा भाकीत नाही. कारण माता–पिता रक्षणकर्ता देव आहे, या देवाच्या सामर्थ्याची त्याला जाणीव येते."

साधुपुरुषांचे अंतःकरण देवाच्या रूपांत गढलेले असूनहि ते सर्व व्यवहार, सामान्यासारखेच पण अलिप्तपणे करतात, त्याना वासना

---

* क. सा २६६ २८५; ३०१.

व मोह नसल्याने विषयाचे भय नसते; पूर्ण समतेमुळे सुखदुःखाच्या प्रसंगानी त्यांना हर्ष–विषाद होत नाहीत. ते प्राणिमात्रावर दया करतात. त्यांचे अंतःकरण आत्मानंदाने भरलेले असते (ज्ञानेश्वरी ३.६८–७४,२.२९७). " कर्म करीत असतांनाहि त्यांचे मन देवावर केंद्रित असते; म्हणून कर्म व श्रम यांचे बंधन त्याना नसते." " सतत आत्मानंदांत रंगल्यामुळे आपण स्वतंत्र झालो; जगापासून कांहीं अपेक्षा उरल्या नाहीत, त्याच्याशी मैत्रीचे कारण उरले नाही. सर्व इच्छा पूर्ण झाल्या. देव रक्षण करील, अशा खात्रीने अस्वस्थता उरली नाही. द्वैत, भेदभाव टाकला म्हणून " क्षुरस्य धारा " असा सूक्ष्म, कठीण परमार्थ मात्र आक्रमता आला ‡ "

उपनिषदांतील व गीतेतीलहि साक्षात्कारी पुरुषाची कांहीं लक्षणे प्रकरण १ मध्ये आली आहेत. भगवद्गीतेंत आणखी कांही लक्षणे आहेत. १) ईश्वराचा आनंद हाच पाहण्याचा, ऐकण्याचा विषय उरल्याने इतर कांहीहि पाहाण्याचा, ऐकण्याचा वीट येतो (भगवद्-गीता २.५२). २) सर्व पापांचा नाश (भगवद्गीता ४.३७). ३) खरी भक्ती ईश्वर दर्शनानंतरच वाढते (भगवद्गीता १५.१९). **" होईल सद्भक्ति येणे पंथे "** (तुकाराम).

साक्षात्काराने ईश्वरच झालेला पुरुष व्यवहारांत अनासक्त कर्मापासून अलिप्त, केवळ परोपकारापुरता उरतो. जाति–धर्म इत्यादी भेद त्याच्या मनांत येत नाहीत, कर्म-नाशाच्या संबंधांत गुरुदेव रानडे यांनी कर्माविषयी महत्त्वाच्या सिद्धांताची चर्चा केली आहे. सृष्टींतील कार्यकारण भाव महत्त्वाचा नैत्तिक नियम अशा दोन दृष्टींनी कर्माकडे पाहता येईल. जग निश्चित. अटळ नैतिक नियमाने चालत असल्याने वुद्धिपुरस्पर केलेल्या कर्माचें फल कर्त्याला भोगलेच पाहिजे, ही त्याची नैतिक वाजू होय, हा सिद्धांत मनुष्याचे आत्मस्वातंत्र्य नाकारतो,

---

‡ हि. सा. २९९.

अशी पाश्चात्याची टीका आहे, पण ती योग्य नाही. आपल्या कर्माची जबाबदारी देवावर किंवा दैवावर टाकता येणार नाही; ती आपणच स्वीकारली पाहिजे; पण या सिद्धांतांतच आशादायक किरण असा आहे की, पापी मनुष्य केव्हांहि आपले आचरण सुधारुन सद्गति मिळवूं शकतो; कायमच्या दुर्गतीच भीति नाही. कृतकर्मांची फळे भोगलीच पाहिजेत, पण भविष्यकाल आपल्या हातांत आहे † असो. सर्वत्र आत्माच दिसूं लागला म्हणजे संताच्या ठिकाणी समता द्वैतातीतता, स्थितप्रज्ञता दृष्टीस पडतें. राजा–रंक, मानापमान, सुखदुःखे, अरिमित्र हे भेद त्यांच्या ठायी मुळीच नसतात. सर्व भूते म्हणजे मीच हा अनुभव आल्यावर शोकमोह कसे उरतील. "सर्वत्र आत्माच दिसूं लागलेला पुरुष हिंसा करीत नाही, कारण कोणालाहि दुःख देणे म्हणजे स्वतःला दुःख देणे होय" ( भगवद्गीता १३. २८ ) असा पुरुष सर्वावर उपकारच करतो, शत्रूशी देखील प्रेमाने वागतो त्याला एक नामच अमृताप्रमाणे गोड लागते; इतर सर्व तुच्छ, कडू वाटते, आत्मानंदाने अंतःकरण भरल्यावर, मनुष्य विषयाकडे कशाला पाहिल? सर्व वासना नष्ट झाल्याने तो उच्चतम नीतीची मूर्तीच बनतो +

आत्मानंदाने अहंकार, वासना व भेदभाव नष्ट होऊन, सर्वात्मभाव आल्यावर, साक्षात्कारी पुरुषांत सर्व सद्गुण कसे येतात, सर्व दुर्गुणांचा नाश कसा होतो, याचे विवेचन ३ मध्ये झालेच आहे. प्रकरण २ व ४ यांतील विचार,या व मागील प्रकरणांत पुन्हा संतांचा प्रत्यक्ष अनुभव म्हणून उद्धृत केले आहेत. हा फरक ध्यानी घ्यावा. शास्त्राचे सिद्धांत पूर्वानुभवावर आधारित असतात; त्यांची सत्यता निर्दोषतापुढे येणाऱ्या अनुभवांनी ठरते. म्हणून अनुभव व शास्त्र यांचे विषय समान असतात. अनुभवाशिवाय शास्त्र निर्माण होत नाही.

---

† क. सा. २७७. + क. सा. २९७ ३०४

४) **आत्मानंदाचा किंवा ईश्वर-दर्शनाचा उन्माद** :- असा उन्माद हे साक्षात्काराचे नैतिक-मानसिक लक्षण आहे. प्रसिद्ध तत्त्वज्ञ ऑटो म्हणतात, "ईश्वर इतका दिव्य, भव्य, विशाल, बलशाली आहे की, त्याचे दर्शन झालेल्या साधकाला जेव्हां तो झपाटतो तेव्हां प्रक्षोभी उन्मादासारखी अनास्था उत्पन्न होते; त्याची बुद्धि दिङ्मूढ होते, इतकेच नव्हे, तर प्रेमादि भावनांनी भरुन जाऊन तो अगदी अवश, वेडयासारखा होतो. पंडितांनीं अत्युच्च स्थान दिलेले बौद्धिक ज्ञान म्हणजे साक्षात्काराच्या दृष्टीने केवळ अर्थशून्य शब्द होत. सामान्य बुद्धीला त्याचे आकलन होणे शक्य नाही; म्हणून पंडितांना संतांचे आचरण म्हणजे वेडाचार वाटतो". "ईश्वराच्या प्रेमाने वेडा होऊन संत आपल्या उन्मादांत रंगून जातो आणि उन्मत हत्तीसारखा आठहि प्रहर झुलत राहतो." "जगाची रात्र तो संतांचा दिवस;" (भगवद्गीता २-६९). "**वरुनि पिशाच्च अंतरी शहाणा। सदा ब्रम्ही जाणा निमग्न तो**" (तुकाराम). साक्षात्काराने भक्त "**मत्तो भवति, स्तब्धोभवति, आत्मारामो भवति,**" (नारद भक्तिसूत्र). या सर्व वचनांत हाच आशय आहे.* प्रेमाचा पेला तो प्राशन करतो, त्याने त्यांच्या पारमार्थिक जीवनाने त्याच्या संगतीतील व्यक्तीहि सुधारतात. "दोन कन्नड पदांत वेडयाच्या रूपकाने संतांची लक्षणे स्पष्ट केली आहेत. तो जन्ममरण पुसून टाकतो; भांडी फोडतो म्हणजे निष्कामपणे कर्म करून त्यांची त्यांची बीजे जाळतो; भिंती पाडून टाकतो. याचा अर्थ जीवनांत कहर उडविणाऱ्या, अंतःकरणांत दृढमूल झालेल्या कल्पना व सुप्तवासना नष्ट करतो. भक्तीने अंतःकरण भरल्याने स्वतःच्या देहाची किती काळजी करणार? तो मायामोहाचे वस्त्र फाडून टाकतो; बालभावाने राहतो, दुष्टांना दगड मारतो; आप्त–स्वकीयांची पर्वा करीत नाही. कारण, एक देवच त्याचा खरा आप्त होय '†.

---

* क. सा. २८६.     † क. सा. २८७, २८९

५) **निमित्तमात्रत्व –:** हा गुण म्हणजे शरणागति, आत्मनिवेदन होय. अर्जुनाला विश्वरूप दाखविल्यावर " **मर्यवैते निहताः पूर्वमेव । निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥** " हा आदेश कृष्णांनीं दिला. अर्जुनाला त्यांनीं दाखविलेच होते की, ईश्वराच्या कार्याचा क्षणिक अविष्कार जो मानव, त्याची इच्छाशक्ति देवाच्या अनंतशक्तिपुढे सर्वस्वी क्षुद्र, दुर्बल आहे. तिचा यत्किंचित् विचार न करता, विश्वांतील सर्व घटना देवाने पूर्वीच घडवून टाकलेल्या आहेत. मनुष्याला स्वतंत्र कर्तव्य किंवा अस्तित्व नाही. स्वतःची इच्छा त्यानें देवाच्या इच्छेशी एकरूप करून निमित्तमात्र होणे, हेच त्याचे एकमेव नैतिक कर्तव्य आहे. श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, " तूं कल्पिलेले मानवी कर्तव्य करण्याचे सामर्थ्य तुला नाही. अति भयंकर पण परम भव्योदत्त अशा ईश्वरी महनीयतेच्या हातांतील तूं एक केवळ साधन आहेस. " याच अर्थाने " **पहिले ते भगवद्भजन । दुसरे ते राजकारण ॥** " आणि " **नाही समर्थाची पाठी । तयासि भलताचि कुटी ॥** " असे ईश्वराधिष्ठित राजकारण समर्थांनीं प्रतिपादिले असावे. अर्थात् विश्वरूप दर्शनासारख्या उच्च साक्षात्कारानंतरच ही वृत्ति येते §. साक्षात्काराने पूर्णत्व पावलेले आपले जीवन देवाच्या सेवेला वाहिले पाहिजे. यापेक्षा अधिक कृतार्थता ती कोणती ? महिपति सांगतात, " ईश्वर–साक्षात्कार झाल्यावर मी आपले जीवन, जागृति–स्वप्न–सुषुप्ति–तुर्या या सर्व अवस्था देवाच्या सेवेला लावल्या; जीवन त्याला अर्पण केले, चारी अवस्थांत देवाच्या अखंड अनुभवाचा आनंद भोगूं लागलो +.

६) **साक्षात्काराचे तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने परिणाम :–** एक देवच सत्य, विश्व म्हणजे माया, जीवहि मूळचा ब्रह्म पण मायेने जीवपणाला येतो; हा सर्व विषय प्रकरण २ मध्ये आला आहे.

---

§ भ गी. १६१, १६२;
+ हिं. सा. १६८, क. सा. ३०५.

साक्षात्काराने याविषयी काय ज्ञान होते, हे आता पहावयाचे आहे. आत्मदर्शन व मायानाश परस्परांच्या साह्यानें वाढतात. पण आत्मसाक्षात्काराने, 'मीच आत्मा किंवा ब्रह्म' हा अनुभव आल्यावरच पूर्ण मायानाश होतो, जगाचे व जीवभावाचे असत्यत्व कळते. कबीर सांगतात, " सर्व जग मायेच्या तावडींत सांपडले आहे. मी मात्र अनाहत नादाचा दोर धरून, ईश्वरकृपेने मायापार झालो." " दशविधनादांच्या श्रवणाने मी त्रिगुणातीत होऊन उन्मनी, तूर्या या अवस्थेत जाऊन बसलो, " असे नरहरीनाथ लिहतात. जो अमृतरस पितो तो अमृतरसच बनतो, त्रिपुटीचा लय होतो, हा विचार मागे आलाच आहे. मायानाश, भ्रमनाश. त्रिगुणातीतता, त्रिपुटीचा लय ही एकाच अवस्थेची साक्षात्काराची वर्णने आहेत. " तेजरूप-नादादि अनुभवानंतर मला देवाचे रूप दिसले व 'तें रूपच मी' हा अनुभव आला. त्यामुळे दृश्य मावळले व महाशून्यांत अनंताचा अनुभव आला ‡ ".

जीव-ब्रह्म ऐक्य आरशांत पाहिल्याप्रमाणे पण आरशाशिवाय होणाऱ्या आत्मस्वरूपाच्या दर्शनाने " मीच ब्रह्म " हा अनुभव येतो, हे त्याचे महत्त्व मागील प्रकरणांत पाहिले. " आनंद न्हाया बंदा खुदा, दोनो बिसर गया । बेनाम का नाम होकर रहांटाना राहा " (मौलाई). या आनंदात देव व भक्त हा भेद नष्ट झाला, दोन नावांचे एकच नांव झाले. जन्ममृत्यूचे चक्र थांबलें. हाच " अहं ब्रह्मास्मि " या महावाक्याचा अनुभव. मायानाश, निस्त्रैगुण्य, त्रिपुटीचा लय हे सर्व या अवस्थेचे परिणाम आहेत. " ज्योतमें ज्योत मिलाई, " याचाहि जीव ब्रह्माशी ऐक्य पावला, हाच अर्थ आहे, हेच अमरत्व हाच मोक्ष होय. " सुरत-शब्द मेला भया, काल रहा गहि मौन, " ( कबीर ). पाण्यांत मीठ विरावे त्याप्रमाणे जीव ( सूरत ) ब्रह्मांत ( अनाहतनादांत ) लय पावला; तेव्हां काल गप्प बसला. कारण, अशा आत्म्यावर त्याचे प्रभुत्व उरत नाही. मी देह नसून दृष्टीसमोर

---

‡ हिं सा. २४१, २५५ क. सा ५४, १०४

दिसणारे चिन्मय आत्मस्वरूप आहे, हे अनुभवल्यावर मृत्युचे भय कसे उरले ? φ

७) केवलाद्वैत :– "जो उदयाला आल्यावर विश्वाभास मावळवून टाकतो, तो आश्चर्यमय चित्सूर्य कोणी पाहिला आहे काय ? त्याचे प्रकाशणे अद्भूत आहे. तो एकटाच सत्य–वस्तु असल्यामुळे प्रकाश्य–प्रकाश अशा संबंधाला तेथे जागाच नाही; त्रिपुटीचा लय होऊन एकटे ब्रह्मच विलसत असते. हाच "सर्वं खलु इदं ब्रह्म", असा केवलाद्वैताचा अनुभव होय. त्याविषयी संतांचे कांही अनुभव येथे पाहावयाचे आहेत. "मजमाजी पाहतां मीपण हरपलें । ठकलेंचि ठेलें सये मन माझें ।। आंत विठ्ठलु बाहेर विठ्ठलु । मीचि विठ्ठलु मज भासतसें ।। मीपण माझें कांही नुरेंचि वुजे" (ज्ञानेश्वर), "जें जें दृष्टि दिसे तें तें ब्रह्म रूप । ... अष्टहि दिशा पूर्ण भरला देव । ऐंसे केले निवृत्तिराजे म्हणे ज्ञानदेव ।। मा पूर्वपश्चिम भाव तेथे कैचा ।। पाहे तिकडे देव व्यापूनि भरला । रिता ठाव नाही उरला ।।, (एकनाथ). 'देव झाले अवघे जन । दोषगुण हारपले ।।" "आमुचा स्वदेश । भुवनत्रयामध्ये वास ।। नाही निपराद । कोणां आम्हांमध्यें भेद ।।", "जेंथें देखें तेथें तुझींच पाऊलें । विश्व अवघे कोंदाटलें ।।" (तुकाराम गाथा १११३, १२२८, २२८१). या सर्व वचनांत "सर्वं खलु इदं ब्रह्म" हाच अनुभव वर्णिला आहे; यानंतर अर्थातच "कासयाने पूजा करूं केशीराजा"। (तुकाराम गाथा ११२८), हा प्रश्न उत्पन्न होतो. रैदास विचारताव "आरती कोठे घेऊन जाऊं ? तूं सर्वत्र भरलेला, तुझ्या रोमरंध्रांत कोटि–सूर्यांची प्रभा आहे." येथे भक्तीचे कर्मकांड संपते †.

८) सर्वात्मभाव :– सर्वत्र आत्माच (ब्रह्म) भरलेला आहे, स्वत:सकट सर्व ब्रह्म आहे, हा अनुभव आल्यावर "मीच सर्व आहे",

φ हिं. सा. २४९, १७१, २२८, ३९९.

† भ. गी. ५८, म. सा. १७५, २२७, ३०५.

ह्या सर्वात्मभाव आपोआपच येतो. आपपर असा भेद करण्याला दुसरे कांही उरतच नाही. **आपणचि विश्व जाहला । तरि भेदभावो सहजचि गेला ।। "** (ज्ञानेश्वरी १२.१९१), हेच भक्ताचे एक महत्त्वाचे लक्षण ठरते. संतांच्या सामाजिक कार्याचे मर्म यांत आहे.

गुरुदेव रानडे यांनीं संतांच्या या लक्षणाला साक्षात्काराचा विश्वात्मक (Cosmic) परिणाम म्हटले आहे आणि महंत या संताचे याविषयी अनुभव वर्णिले आहेत. " संकुचित जीवभाव टाकला म्हणजे साधकाला ईश्वर व निसर्ग याशी, विश्वाशी, एकरूप झाल्याचा साक्षात्कार होतो. निसर्ग, मानसिक–आध्यात्मिक सृष्टि, यांत ईश्वर भरलेला दिसत असल्यानें, त्याला परमानंद होतो. विश्वांतील सर्व कार्ये ज्या शक्तीने नियमितपणे, सुसंवादाने चालतात, ती विश्वाच्या मुळाशी असलेली शक्ति महंताने प्रत्यक्ष पाहिली. त्यामुळे चंद्र, सूर्य, तारे सर्व विश्व याशी आपण एकरूप आहो हे त्याने जाणले. शेवटी ज्ञान–अज्ञान, सत्य अमृत दोन्हीं मीच, असे ते सांगतात. आत्मा जाणल्यावर काय जाणायचे उरणार ? हे विश्वाशी झालेले ऐक्य शब्दांनीं सांगता येत नाही; त्याची कारणमीमांसाहि करता येत नाही *

९) **मुक्ति :–** शेवटी, परमार्थाचे शिखर, साधनाला येणारे परमोच्च फल म्हणजे मोक्ष, चौथा पुरुषार्थ, मुक्ति, या विषयाचे विवेचन करावयाचे आहे. " नद्या समुद्राला मिळून नामरूप टाकतात, सर्प कात टाकतो, त्याप्रमाणे साक्षात्कारी पुरुष नामरूपे टाकून परात्पर पुरुषाशी एकरूप होतो. " या उपनिषदांतील वचनांत मुक्ति व जीवन्मुक्ति दोहींचा निर्देश आहे. देह असतांनाच ब्रह्माशी ऐक्य अनुभवणे म्हणजे मुक्ति. या ऐक्याच्या अनुभवामुळे त्याचे देहाशी तादात्म्य राहत नाही. ही जीवन्मुक्ति लाभल्यावर अंतेंमुक्ति सहजच आहे, असे ज्ञानेश्वरांनींहि म्हटले आहे.

---

* क. सा. २०७–२८३

आणि भक्तां तरी देहीं । विशेष एकवंकीचा ठाव नाही ।।
म्हणऊनि अव्हेरु करितां कांहीं । वियोगु ऐसा न वाटे ।।
नातरी देहांतींचि मियां यावें । मग आपणपयातें न्यावें ।
देही नाहीं स्वभावें । जे आधींचि मज मीनले ।।
ऐसे जे नित्ययुक्त । तयाचि सुलभ मी सतत ।
म्हणऊनि देहांतीं निश्चित । मीचि होती ।।

(ज्ञानेश्वरी ८.१३६-१३७,१३९)

ते मरणाऐलीचकडे । मज मिळोनि गेले फुडे ।
मग मरणीं अणिकीकडे । जातील केंवि ।।
म्हणोनि मद्याजि जे जाहाले । ते माझिया सायुज्या आले ।
जिहीं उपचार मिषें दिधलें । आपणपें मज ।।

(ज्ञानेश्वरी ९.३६५-३६६).

पारमार्थिक सत्तेच्या दृष्टीने मुक्ति असे कांहीं नाहीच. कारण आत्मा व ब्रह्म यांत भेद कधी नव्हताच. व्यावहारिक सत्तेच्या दृष्टीने मात्र मुक्ति सत्य आहे; कारण तेथे भेद मानावाच लागतो ϭ." देह आहे तोपर्यंत मुक्तीच्या पूर्णतेकडे अखंड वाटचाल सुरू असते; मुक्तीला जीव ब्रह्मैक्याला पूर्णता मृत्युनंतरच येते, हा सिद्धांत प्रकरण २ मध्ये आलाच आहे (पृ. ४३).

**१०) संतांचे जीवन्मुक्तीचे अनुभव:-** "मी आपले मरण माझ्या डोळ्यांनी पाहिले; त्यामुळे, मी–माझे, नामरूपे नष्ट झाली; परमानंद झाला. जन्ममृत्यूचे चक्र थांबून ब्रह्मरुपत्व, सर्वात्मभाव लाभला. मी केवळ साक्षी झालो; कृतार्थ झालो "(तुकाराम). "समुद्रांत मिठाचे पोते टाकल्यावर मीठ पाण्यांत विरते, त्याप्रमाणे ईश्वराशी ऐक्य झाल्यामुळे माझ्या भावना, विकार देवांत विरून गेले; संस्कार नष्ट झाल्याने आतां पुन्हा जन्म नाही. परमानंदामुळे

---

ϭ उप १६१; म. सा. ५८. १३४.

वासना पूर्णतः नष्ट झाल्या; मी पक्का घट, ब्रह्म बनलो. पुन्हा मला जन्म नाही, यांत शंकाच नाही. निःसंदिग्धता हे संतांच्या अनुभवाचे वैशिष्टय आहे " (कबीर). " देवा तूं पापनाशक, वंधविमोचक आहेस. पण मी पाप करीत नाही, मला बंधच नाही, मग तुझ्या या सामर्थ्याचा मला काय उपयोग ? " (रैदास). " कान डोळे मिटूं नका. उघडया डोळयांनीं देव पाहता हंसत राहा; उठता–बसता माझे मन देवावर स्थिर असते; हीच सुख–दुःखातीत **सहज समाधि;** यांत भक्त ईश्वरांत लीन होतो " (कबीर). " जन्म–मृत्यूचे चक्र थांबवून, कुल–जाति-धर्म इत्यादि भेद दूर करून देवाशी ऐक्य पावलेला, परमानंदांत राहणारा पुरुष, सदा मानवतेवर उपकार करीत राहतो " (कुडलुरेश). " अशा साक्षात्कारी पुरुषाला देह आहे की पडला याची चिंता नसते; भूत, भविष्य, वर्तमान असा काळाचा भेद नसतो; कारण त्याला वासनाच उरलेली नसते. ( वासना व तिचे समाधान यांचे प्रतिबिंब म्हणजे काळ असे टेलरने म्हटले आहे ). असा पुरुष स्वतः पावन होता; जगालाहि पावन करतो. " " अशा पुरुषांच्या बाहृय जीवनावरून त्यांची आध्यात्मिक उंची मोजता येत नाही. रामदास शिवाजीचे गुरू होत. येशुख्रिस्त जगासाठी सुळी गेला; यावरून येशूची श्रेष्ठता सिद्ध करूं पाहाणाऱ्या डॅमिगला गुरुदेव रानडे सांगतात, " या योगायोगाच्या गोष्टी असतात. देवाने त्यांच्याकडे सोपविलेली आपापली कामे त्यांनीं केली †. "

**११) साक्षात्काराचे सामाजिक परिणामः–** संतांचा समाजाला काय उपयोग ? स्वतःपुरता आत्मानंद जोडून ते त्यांतच मग्न होऊन जातात आणि समाजाला विसरतात. विशेषतः ही समाजपराङ्मुखता हिंदु संतांत प्रामुख्याने दिसून येते, ख्रिस्ती संत मात्र या दोषांतून मुक्त आहेत, " असा आक्षेप ख्रिश्चन लेखकांनीं घेतलेला, असून आमच्याकडेहि कांहीं लेखक या मतामुळे प्रभावित

† म. सा. ३०७, ३०८ हिं. सा. ३९८, २५९, २४४ क सा. २७४-२७८

झालेले दिसतात. वस्तुतः हा आरोप चुकीचा, अज्ञानमूलक व पूर्वग्रहदूषित आहे. जीवन्मुक्ति लाभल्यानंतरहि संताच्या देहाचे कार्य चालूंच असते. स्वार्थ, अहंकार, वासना यांचा त्यांच्याठायी लेशदेखील उरलेला नसतो. सर्वात्मभाव अंगी बाणल्यामुळे सर्वाभूति दया उदयास येऊन 'सर्वहि सुखी असावे' अशी सद्‌वासनाच तेवढी त्यांच्या ठिकाणी बाकी राहिलेली असते.' त्यांचा देह कार्य करतो, तो या भूतदयेच्या, या सद्‌वासनेच्या प्रेरणेनेच. 'जग दुःखांत' तळमळत असलेले त्यांना दिसत असते. या दुःखाचा खरा शेवट ईश्वरभक्ति करून, साक्षात्कार झाल्यानंतरच होणार आहे. मगच नित्यानंद लाभतो, हे सत्य त्यांना स्वानुभवाने समजलेले असल्यामुळे तोच उपदेश ते देह आहे तोपर्यंत जगाला करीत राहतात. हेच संतांचे सामाजिक कार्य, हीच त्यांची समाजसेवा होय. तुकाराम म्हणतात तसे ईश्वरदर्शनानंतर संत केवळ उपकारापुरतेच उरतात. आत्मानंदाचा अमृतरस स्वतः सेवन केल्यानंतरच तो इतरांनाहि वाटून देता येईल. म्हणूनच ते आधी तो रस स्वतः मिळवितात आणि मग तो इतरांनाहि वाटून देतात. संत असे आपण तरून इतरांनाहि तारतात. समाजसेवेंत केवळ समाजाच्या ऐहिक गरजा भागविणे, त्यांच्या मनबुद्धीच्या विकासाला हातभार लावणे, एवढ्याच कार्याचा अंतर्भाव होतो, असे थोडेच आहे ? समाजाला आध्यात्मिक मूल्याचे महत्त्व पटवून देऊन ती मूल्यें ज्वलंत राखण्याचा प्रयत्न करणे, ही तर समाजाची सर्वात महत्त्वाची सेवा ठरते. ती करण्याचा अधिकार व पात्रता मात्र अगदी मोजक्याच व्यक्तींना प्राप्त होत असते. गुरुदेव रानडे यांनीं या विषयावर स्वतंत्र ग्रंथ लिहिलेला नसला, तरी त्या संबंधीचे विचार त्यांच्या सर्वच ग्रंथात विखुरलेले आढळतात. त्यातलाच महत्त्वाचा भाग येथे उद्धृत करीत आहे.

प्रकरण १ च्या सुरुवातीला दिलेल्या उताऱ्यांत व त्याच्या स्पष्टीकरणांत व प्रकरण ३ मध्ये, संतांच्या समाजसेवेची थोडीशी

चर्चा झालेली आहे. गुरुदेव रानडे आणखी सांगतात, " प्रत्येक मनुष्य ईश्वराचा अंश आहे, हे भक्तिमार्गाने जाऊन कळेपर्यंत, माणसावर खरे प्रेम करता येत नाही. भक्तीचे अधिष्ठान नसलेले प्रेम वरवरचे असते ". "खरे प्रेमच नसेल तर खरी सेवा तरी कशी व किती होणार "? " न्यायमूर्ति रानडे सांगतात " त्याप्रमाणे, ज्ञानदेव-नामदेवादि शांतताप्रिय संतानी समाजांत नैतिक पाया घातला, धर्मभ्रष्ट मने धर्माकडे वळवली; त्या पायावर रामदासांनीं धर्माधिष्ठित राजकारणाचे, महाराष्ट्राच्या वैभवाचे मंदिर उभारले. मराठी साम्राज्य स्थापण्याचे सर्व श्रेय रामदासांना देऊन इतर संतांना देशबुडवे म्हणजे हे बरोबर नाही. स्वत: रामदास भक्ति-मार्गानेच गेले; साक्षात्कार हेच त्यांचे मुख्य ध्येय होते. तेच त्यांनीं लोकांना उपदेशिले.

आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी ।
आपणामागें जगदीशासी भजत जावें ।। (दासबोध १२.१०.४३)
कोण्हास कांहीं च न मागावें । भगवद्‌भजन वाढवावें ।
विवेकबळें जन लावावे । भजनाकडे ।। (दासबोध १०.३.११).
अखंड हरिकथेचा छंदु । सकळांस लागे नामवेदु ।
प्रगट जयाचा प्रबोधु । सूर्य जैसा ।। (दासबोध १९.६.१८).
येकांतीं विवेक करावा । आत्मारामा वोळखावा ।
येथुन तेथवरी गोवा । कांहीं च नाहीं ।। (दासबोध १९.६.३०).
ठाइं ठाइं भजन लावी । आपण तेथून चुकावी ।
मछरमतांची गोवी । लागों च नेदी ।। (दासबोध १५.२.२२).
उपासनेचा गजर । स्थळोस्थळीं थोर थोर ।
प्रत्ययाने प्राणीमात्र । सोडविले ।। (दासबोध १५.२.२८.)

तुकारामांनींहि हेच काम केले,

अणुरेणुया थोकडा । तुका आकाशाएवढा ।
गिळूनि सांडिले कलिवर । भवभ्रमाचा आकार ।।

**सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटीं ।**
**तुका म्हणे आतां । उरलों उपकारापुरता ।।**
(तुकाराम गाथा ३३४०).

**धर्मांचें पाळण । करणें पाखांड खंडण ।**
**हेंचि आम्हां करणें काम । बीज वाढवावें नाम ।।**
(तुकाराम गाथा १४४५).

**आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी ।**
**बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताया ।।** (तुकाराम गाथा २२२)

सारांश, भारतांतील मध्ययुगीन संतांनी स्वतःच्या पूर्ण आध्यात्मिक विकासाच्या पायावर मानवतेच्या उद्धाराच्या कार्याला आपल्याला वाहून घेतले. पापी, पतित, अज्ञानी, स्त्रिया, परमार्थाविषयी भ्रामक कल्पना असलेल्या, अशा सर्व लोकांत मिसळून त्यांना परमार्थाचे ज्ञान सांगण्याचे श्रेष्ठ कार्य त्यानी केले. कबीर सांगतात, "परम कृपाळू ईश्वराने कांही लोकांचा तरी उद्धार करण्याचे काम मला सांगितले; ते मी भूतदयेने केले. ‡" संतांचे अत्युच्च समाजसेवेचे कार्य अखंड सुरूं असते, हे यावरून सहज दिसून येईल.

१२) **संतसंघः**– जगाला परमार्थ–मार्गाचे ज्ञान देण्याच्या या कार्यात संतसंघ सहज निर्माण होतो. संत एकटा राहून ते कार्य करूं शकत नाही, करीतहि नाही. आत्मानंद एकट्याने भोगण्यापेक्षा, असा आत्मानंद मिळालेल्या संतांच्या संगतींत तो भोगणे, यांत अवर्णनीय आनंद आहे. म्हणून संतसंघ निर्माण होऊन, "भक्ति करा" या देवाच्या आज्ञेचा सर्वत्र प्रसार होतो. संतांच्या या संवाद–सुखाचे ज्ञानेश्वरी १०.११९-१२१ यांत आलेले वर्णन मनोज्ञ आहे. ते वाचकांनीं अवश्य वाचावे.

आदर्श समाजाचे स्वरूप काय असावे हा समाजशास्त्रांतील महत्त्वाचा प्रश्न आहे. नीति व अंतःशुद्धी यांच्या भक्कम पायावर

‡ म. सा. ४२०, ४२१, ३१०, ३१२. हि. सा. २६२.

समाजाची निर्मीती व्हावी. हाच विश्वचक्रांच्या प्रवर्तनाचा हेतू आहे, अशी आशा अनेक विचारवंताना वाटत आली आहे. देवाचे राज्य येईल त्यावेळी देव सर्वांचा उद्धार करून त्यांना शाश्वत शांति देईल देवाच्या राज्यांत, ऐहिक वैभव नव्हे तर, आंतरिक, धन्यता लाभेल, असे जगांतील अनेक धर्मग्रंथांत सांगितले आहे. अनेक तत्त्वज्ञ व भक्त यांनीं आदर्श राज्याचे स्वरूप ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. देवाचे राज्य हे केवळ सुखस्वप्न आहे. संतांच्या मते भक्ताचा समाज हा आदर्श समाज होय व तो घडविण्याचे, म्हणजेच विश्वोद्धाराचे, कार्य ते करतात. " अनुभवमंडप " या कन्नड पदांत संतांच्या अशा विश्वोद्धाराच्या कार्याचे स्फूर्तिदायक स्वरूप दिसते. असा मठ गुलबुर्ग्याजवळ कल्याणास खरोखरीच होता व अल्लमप्रभू, बसवेश्वर इत्यादि श्रेष्ठ साक्षात्कारी संत तेथे जमून अध्यात्मचर्चा व ध्यान यात काल व्यतीत करीत असत. सामान्य जनतेत खऱ्या धर्माचा प्रसार करणे, कर्मकांड व काल्पनिक तत्त्वज्ञान यांच्या पकडीतून धर्माला सोडविणे, हा या संस्थेचा हेतु होता. सार्वत्रिक प्रेम व ईश्वरप्राप्ति हे ध्येय, हे त्यांच्या ऐक्याचे सूत्र होते. जाति, धर्म, पंथ, स्त्रीपुरुष असा भेद ते मानीत नसत; ते अतिनम्र असत. भक्तीसाठी त्यांनीं सर्वस्वाचा यज्ञ केलेला असतो. सन्मार्गाने गेल्यामुळे ईश्वराची त्यांच्यावर कृपा असे; साक्षात्काराने ते ईश्वरपदाला पोहोंचले होते. देवाच्या अशा भक्तांना देवाप्रमाणेच सदा विजय परममांगल्याचा लाभ झाल्यास नवल काय ? हे संत परमधन्य, महाभाग्यवान होत. दुःखार्त मानवतेबद्दल त्यांना अत्यंत प्रेम व करुणा वाटत असल्याने, तिचे कल्याण व उद्धार यासाठीच केवळ ते जीवन व्यतीत करतात. बाहू उभारून उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत, अनंतकालांत, सतत; " **देवाची भक्ति करा, भक्ति हेच जीवनसाफल्य होय,** " हा देवाचा शाश्वत संदेश ते जगाला देत आले आहेत. ‡

‡ भ. गी. ५५–५७; २६९, २७०; क. सा. ३११–३१४.

## प्रकरण १२ वे : निष्कर्ष व उपसंहार

१) **सिंहावलोकन :—** प्रस्तुत पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणांत, साक्षात्कारशास्त्राचे बुद्धिनिष्ठत्व सिद्ध करण्यासाठी खालील प्रमाणे गुरुदेव रानडे यांनीं दिली आहेत : १) निःसंदिग्ध पुरावा, २) साक्षात्काराने जीवन धन्य, दिव्य होते अशी तत्त्वज्ञानाची मान्यता, ३) साक्षात्कारप्राप्ती हे ध्येय सर्व धर्मांनीं उपदेशिले आहे. हिंदु, ख्रिश्चन व इस्लाम धर्मांतील सूफी मत या सर्वांची शिकवण साक्षात्काराचीच आहे व तींत विलक्षण साम्य आहे, येवढेच गुरुदेव रानडे यांनीं दाखविले आहे. त्या धर्मांची अधिक चर्चा केलेली नाही. उपनिषदे, भगवद्गीता व मराठी, हिंदी, कन्नड संत यांची वचने, यावरून साक्षात्काराचे साधन, त्याचे स्वरूप, प्रकार व परिणाम यासंबंधी सर्वांची एकवाक्यता आहे, हे स्पष्ट दिसून येते. प्रकरणे ८ ते ११ ही सहज वाचली तरी संतांच्या स्वानुभवाचा भक्कम पुरावा साक्षात्कारशास्त्राला आहे व तो कोणाही विचारी माणसाला अमान्य करता येणार नाही, हे निश्चित कळेल. आतां, साक्षात्काराने जीवन धन्य, दिव्य होते, अशी तत्त्वज्ञानाची मान्यता आहे का, येवढेच पहावयाचे आहे. मनुष्याच्या दृष्टीने हीच अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.

२) **साक्षात्काराने जीवनसाफल्य :—** सत्य-शिव-सुंदर या जीवनमूल्यांची प्राप्ति झाली म्हणजे कृतार्थता लाभते असे पाश्चात्य जीवनमूल्यशास्त्राच्या दृष्टीने म्हणण्यास हरकत नाही. साक्षात्काराने या जीवनमूल्यांची प्राप्ती होते हे सिद्ध झाले म्हणजे तत्त्वज्ञानाची त्याला मान्यता मिळेल. गुरुदेव रानडे यांच्या तत्त्वज्ञानाच्या व्याख्ये-प्रमाणें, जीवनाला धन्यता, दिव्यता देण्याचा मार्ग सांगणे हे त्यांचे कार्य आहे. सत्य-शिव-सुंदर या मूल्यांचा संदिग्धपणा, अपूर्णत्व,

त्यांच्या सत्य- स्वरूपाचे अज्ञान, त्यामुळे त्यांच्या प्राप्तीच्या निश्चित उपायांची- अनुपलब्धता, त्यांचा परस्परांतील संघर्ष या दोघांचा विचार मागे झालाच आहे. अर्थात् यांतील एकाचीहि पूर्ण प्राप्ती झालेला पुरुष आढळणे शक्यच नाही. या मूल्यांचा उपासनेने मानवतेची उंची वाढली आहे, यांत शंका नाही. परंतु तात्त्विक दृष्टीने ती मुळांतच सदोष आहेत. साक्षात्काराने मात्र त्यांची पूर्णतः प्राप्ति होते; हे मागील प्रकरणांतील साक्षात्काराच्या परिणामांवरून सहज कळेल. पूर्ण ज्ञान, पूर्ण नीती, पूर्ण आनंद यांची प्राप्ति स्वरूप-साक्षात्काराने होते; हे मागील प्रकरणांत व प्रकरण २ व ३ यामध्ये पाहिले आहे. विश्वाच्या मुळाशी असलेले एकमेव, अविनाशी, अनंत, सत्यतत्त्व म्हणजे आत्मा; त्याच्या दर्शनाने हे पूर्ण ज्ञान होते. ते दर्शन म्हणजेच आत्मदर्शन, आनंदमय दर्शन असते, आत्मा व आनंद यांत भेद नाही. अर्थात् आत्मदर्शनांत पूर्ण नीति व पूर्ण आनंदहि आहे. आत्मानंद हेच नीतीचे शिखर आहे. हे प्रकरण ३ मध्ये सांगितले आहे. कला किंवा सौंदर्य या जीवनमूल्याचे महत्त्व कलानंदामुळे आहे. तो आत्मानंदाच्या पासंगालाहि पुरणार नाही. आत्मानंदाची जातच निराळी आहे, हा विचारहि मागे आला आहे. याप्रमाणे सत्य–शिव–सुंदर या जीवनमूल्यांची पूर्णतः प्राप्ति तर साक्षात्काराने होतेच; पण, तत्त्वज्ञानाने ज्याचा विचारहि केलेला नाही, अशी अमरत्व, सर्वात्मभाव, ईश्वरत्व ही अवस्था, हे ऐश्वर्य, साक्षात्काराने आपल्याला लाभले असे ऋषि व संत सांगतात. सर्वात्मभावाचा सहज परिणाम म्हणजे लोकांच्या कल्याणासाठी विश्वप्रेमाने जीवन व्यतीत करणे; तेच संतांचे ज्ञानोत्तर जीवन असते, ते उपकारापुरते उरतात. मानवतेचे खरे परम हित भक्तीने ईश्वरप्राप्ति करून घेण्यांत आहे, हा आदेश जगाला देणे, हाच त्यांच्या कार्याचा सारभूत भाग आहे. इतर समाजोपयोगी कार्येहि जो तो संत आपल्या प्रकृति, स्वभावाप्रमाणे करतो. समाजाचे खरे हितकर्ते साक्षात्कारी पुरुषच आहेत. हजारो वर्षे त्यांचे कार्य अव्याहत सुरू आहे. बुद्धि–भावना–

क्रियाशक्ति यांचा पूर्ण विकास म्हणजे कृतार्थ जीवन, हा एक विचार आहे. सत्य–शिव–सुंदर या मूल्यांच्या प्राप्तीने साक्षात्कारी पुरुषांच्या या शक्तीचाहि विकास होतो, हेहि मागे सांगितले आहे. या दृष्टीनेहि त्यांचे जीवन कृतार्थ होते, हे सहज दिसेल.

३) **कलात्मक अनुभूतीचे दोन प्रकार :–** या अनुभूतीचे सुंदर व भव्योदात्त असे दोन प्रकार कांटने केले आहेत. साक्षात्काराच्या दृष्टीने त्यांचा विचार करूं.

**सुंदर :–** वर कलानुभवाचा विचार केवळ त्यांच्या आनंदाच्या दृष्टीने केला आहे. पण या आनंदाचा जन्म ज्या आत्मनुभवांतून होतो, त्यांत दिव्य सौंदर्य भरलेले असते. विश्वांतील सौंदर्य त्यापुढे संतांना तुच्छ वाटते; तिकडे त्यांचें लक्षहि जात नाही. " अमृतालाहि जो बेचव म्हणून दोष देतो तो कांजी घेणार नाही, त्याप्रमाणे आत्मदर्शनाने सुख भोगणारा पुरुष ऋद्धि–सिद्धीच्या वैभवालाहि किंमत देत नाही ", या ज्ञानेश्वरीच्या वचनांत हाच भाव आहे. अप्रतिम शशिसूर्यांना झांकाळून टाकणारे तेज, नवरंगांचा अखंड तमाशा, सुढाळ मोती, दिव्य रत्ने, मोत्यांचा पाऊस, सुखाचे ओतलेले, सुखाचेहि मंडन असे श्रीमुख; ज्याच्या निढळी कोटिचंद्रांचा प्रकाश आहे असे श्रीमुख; बीन, सतार, मुरली यांचे मधुर नाद, अमृतरसाचा आस्वाद असे आपल्या सौंदर्यानुभूतीचे वर्णन ज्ञानेश्वर, तुकाराम, कबीर इत्यादि संतश्रेष्ठांनीं केले आहे.

**साक्षात्कारांतील भव्योदात्तता (Sublimity):–** दर्शनाचे उदाहरण म्हणजे भगवद्‌गीतेच्या अध्याय ११ मधील विश्वरूपदर्शन. मागील प्रकरणांत उल्लेखिलेल्या " अनुभवमंडप " या पदांत वडवानल, वादळी समुद्र, वितळणारे पर्वत, गगनभेदीघनगर्जना, डोळे दिपवून, टाकणारे विजेचे लोळ इत्यादी भव्योदात्त आत्मानुभवांचा निर्देश

आहे. हे अनुभव म्हणजेच ईश्वराचे दर्शन, हाच मोक्ष, हेच ब्रह्म असेहि त्या संतकवींनीं स्पष्ट मांडले आहे.

गुरुदेव रानडे यांनी भव्योदात्ताची लक्षणे सांगितली आहेत. सौंदर्य व भव्योदात्त यातील फरक हा की सौंदर्याशी मन एकरूप होते, भव्योदात्ताने ते जिंकले जाते, हतबुद्ध होते. सरोवर सुंदर आहे; वादळी समुद्र भव्योदात्त आहे. ही उदाहरणे उपयुक्त वाटतील. भव्योदात्ताचे दुसरे लक्षण म्हणजे विशालता व शक्ति, त्याच्या आविष्कारांत नेहमी अनंतत्व असते, हे त्याचे महत्त्वाचे तिसरे लक्षण होय. कल्पनेसहि तेथे पोहोंचता येत नाही. **अनंत** हे आपल्याला ईश्वराच्या अगदी जवळ नेते. हेच कबीराचे " **बेहद्द** " कन्नड संताचे " **निर्बयलु** " अशा अनंतांत ईश्वरत्व आहे. गुरूदेव रानडे यांनीं असेहि म्हटले आहे की, भक्तीमुळे मन वर देवाकडे जाते, दिव्यसौंदर्यदर्शनाने ते देवाशी एकरूप होते आणि भव्योदात्तांच्या दर्शनाने ते विकलित होते, हतबुद्ध होते. मानसशास्त्राच्या दृष्टीने भव्योदात्ताच्या अनुभवाने, त्याच्या आनंदाने, आश्चर्य, आनंद, आदर, भीति, भक्ती अशी भावनांची गुंफण अंतरी उत्पन्न होते, नैतिक दृष्टीने **चित्तशुद्धि** बौद्धिक दृष्टीने **बुद्धि–प्रसाद** व आध्यात्मिक दृष्टीने **दिव्य आत्मपावित्र्य** हे भव्योदात्ताच्या अनुभवाचे परिणाम आहेत. आणखी एक मुद्दा म्हणजे कांटच्या मते **नैतिक भावना** हे मानवी अनुभवांतील परम भव्योदात्ताचे स्वरूप § आहे.

**४) साक्षात्कारांतच जीवनमूल्यांचा समन्वय व त्यांचे सत्यदर्शन :–** निसर्गांतील व नैतिक भव्योदात्तांपैकी अधिक दिव्य, ईश्वरी, कोणते ? हा प्रश्न कांटच्या वरील मतावरून उत्पन्न होतो, गुरुदेव रानडे त्याचे उत्तर देतात, " हा प्रश्न आतां विचारण्याचे कारण नाही. भव्योदात्तता, नीतितत्त्व व दिव्यत्व ही सर्व गीतेसारख्या पूर्णतेला पोहोंचलेल्या आत्मसाक्षात्काराच्या तत्त्वज्ञानांत एकरूप

---

§ क. सा. ३१०, ३१२ भ. गी. २९१–२९२.

होतात; त्यांचा त्रिवेणी संगम, समन्वय होतो, येवढे कळले म्हणजे पुरे". येथेहि **ईश्वरतत्त्वांत सत्य–शिव–सुंदर** यांची एकरूपता दाखविली आहे. तिहींच्या एकरूपतेचे साक्षात्कारांत होणारे दर्शन हेच त्यांचे **सत्यदर्शन** होय, साक्षात्कारांतील सत्य–शिव–सुंदर यांच अनुभव व सामान्य मानवाचा त्यासंबंधीचा अनुभव यांत शब्द–साम्यापलिकडे कसलेहि साम्य नाही. म्हणून गुरुदेव रानडे म्हणतात, "कांटला भव्योदात्त व दिव्य यांचा संबंध एखाद्या (धुरकट) कांचेतून दिसावा तसा अंधुक, अस्पष्ट दिसला. यांचा संबंध पूर्णपणे स्पष्ट करून दाखविणारा ग्रंथ म्हणजे गीताच होय" *. वस्तुतः ईश्वर किंवा ब्रह्म म्हणजेच सत्यार्थाने भव्योदात्तता **सत्य–शिव–सुंदर** होय. त्यामुळे त्याच्या साक्षात्कारावांचून कोणत्याच मूल्याचे सत्यस्वरूप कळणार नाही. केवळ बुद्धीला कांटचे **परतत्व** (Thing-in-itself) कळत नाही; त्याचप्रमाणे **शिवतत्व** (Goodness-in-itself) आणि सौंदर्यतत्त्व (Beauty-in-itself) हीहि तिला कळत नाहीत.

५) **आत्मानंदाचे सहजोद्गार :–** अशा धन्यतेच्या सहजोद्गारांची ऋषींची व संतांची शेकडो वचने आहेत. येथे दोन मराठी, एका हिंदी व एका कन्नड पदाचा भावार्थ येवढेच उध्दृत करणे शक्य आहे; अशा वचनांचा संग्रह गुरुदेव रानडे यांचे "संतवचनामृत," "हिंदी–परमार्थ सोपान" आणि पुण्याचे प्राध्यापक न. ग. दामले यांनीं संपादित केलेल्या "परमार्थ–मंदिर" या पुस्तकांत सांपडेल. ती पदे परमार्थ–प्रेमी वाचकांना उद्बोधक व स्फूर्तिदायक वाटतील.

**"बोलूं ऐसे बोल । जेणें बोलें विठ्ठल डोले ॥**
**प्रेम सर्वांगाचे ठायीं । वाचे विठ्ठलरखुमाई ॥**

---

* भ. गी. २७९, २८१

नाचूं कीर्तनाने रंगीं । ज्ञानदीप लावूं जगीं ।।
परेहुनी परतें घर । तेथें राहूं निरंतर ।।
सर्व सत्ता आलीं हातां । नामयाचा खेचरदाता...।" (नामदेव).

..." याजसाठीं केला होता अट्टाहास ।
शेवटचा दिस गोड व्हावा ।।
आतां निश्चितीनें पावलों विसांवा ।
खुंटलिया धांवा तृष्णेचिया ।।
कवतुक वाटे जालिया वेंचाचें ।
नांव मंगळाचें तेणें गुणें ।।
तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी ।
आतां दिवस चारी खेळ मेळी ।।
(तुकाराम गाथा ७८७.)

तत्त हिंडोलवा सतगुरु नावल
तहँवा मनवा झुलत हमार ।। १ ।।
बिन डोरी बिन खम्भे पौढल.
आठ पहर झनकार ।। २ ।।
गावहू सखी हिंडोलवा हो.
अनभौ मंगल चार ।। ३ ।।
छुटल जगत कर झूलना हो,
प्रेम पदारथ भइल निनार ।। ४ ।।
अबनहिं अवना जवना हो,
दास गुलाल मिलो हे यार ।। ५ ।। (गुलाल)

भावार्थ :– दोर व खांब नसलेल्या पाळण्यांत घालून सद्‌गुरु मला झोके देत आहेत. आठहि प्रहर मधुर, सूक्ष्म, अनाहत नाद ऐकूं येत आहे. आतां मंगलार्चा गाणी म्हणा. सद्‌गुरूंनीं झोका दिल्यावर, पाळणा जगाला सोडून अनंतांत गेला आणि परमप्रिय

असा आत्मा देहापासून निराळा, ब्रह्मरूप झाला. दास गुलाल आतां ईश्वराशी एकरूप झाला. आता जन्ममरण संपले. ‡

कन्नड संतश्रेष्ठ महिपती धन्यतेला पोहोंचल्यावर विचारतात. "आतां मिळवायचे काय उरले ? सद्गुरूंनीं उच्चतम इच्छा पूर्ण केली, परतत्त्वाचे मर्म अंतरीच दाखविले; संचित जळून गेले; प्रारब्ध, क्रियमाण यांना अर्थ उरला नाही; कारण त्यांचा प्रेरक आतां ईश्वर आहे; बीज जळून गेल्याने आगामी कर्म उरले नाही. आत्मदर्शनाची खूण अंतरी पाहिली. आतां मिळवायचे काय राहिले ? ही खूण देवाचे रूप पाहिल्यावर, मी त्याला शरण गेलो; त्याला सर्वस्व अर्पण केले. जागृति–स्वप्न–सुषुप्ति–तूर्या, चारी अवस्था त्याच्या सेवेला वाहिल्या. असे आत्मसमर्पण झाल्यावर, माझ्या अंतःकरणांत चाललेल्या उघड्या क्रियांचे गूढ उकलले; विचार व भावना यांच्या स्वरूपांत असलेल्या ज्ञानाची परिणति अनुभवांत झाली, "सो ऽ हं" चा अनुभव येऊन जीव–शिव व त्यांचा संबंध यांचे ज्ञान अंतरी उमटले; या ऐक्याच्या अनुभवाने जन्ममृत्यूचे चक्र थांवले व मी अमरत्वाच्या आनंदाने भरून गेलो, माझे ईश्वराशी व सद्गुरुंशी ऐक्य झाले, जीवन धन्य झाले, दिव्य झाले. आतां मिळवायचे असे काय उरले ? §.

६) **विश्व–कल्याणकारी पसायदान**–जीवनाला दिव्य एका साक्षात्कारानेच येते व त्याचे साधन भक्ति; अर्थात् संतप्रणीत भक्तिमार्गाने जाण्यानेच व्यक्ति व समाज यांचे कल्याण होणार आहे. म्हणून अशा आदर्श समाजाच्या निर्मितीसाठी पसायदान मागताना ज्ञानेश्वर म्हणतात, "संतश्रेष्ठ जगांत सदा निर्माण व्हावेत." आणि त्यांच्या उपदेशाने आणि उदाहरणाने जगांत भक्तिमार्गाला लागावे." हे झाले की विश्वकल्याणाची व्यवस्था झाली. खलजन सन्मार्गाला

‡ हिं. सा. २५२–२५४. § क. सा. ३०४–३०६.

लागणे, विश्वबंधुत्व, स्वधर्माचा प्रकाश पसरणे हे सर्व भक्तीनेच घडून येते.

" वर्षत सकळ मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळीं । भेटतु भूतां ।
. . . किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित । "

(ज्ञानेश्वरी १८.१७९६,१७९९)

# विषयसूची


अ

अॅकडेमी ऑफ कंपेरिटिव्ह फिलॉसफी
अॅण्ड रिलिजन १, ५, २८, २९
अखंड वाटचाल १३,२३,५८,६८
अखंडत्व ८६
अजातवाद ५७
अंतर्यामि ६०, ६१
अतिनीतीवाद ७९, ८३
अतींद्रियत्व ८५
अव्दैतमत ५७, ६४, ८८
अध्यात्मभुवन २३
अध्यात्म विद्या मंदीर ७
अनंत १६६, १९९
(अनुभव व आत्मानुभव पहा)
अनन्यता (आत्मनिवेदन पहा)
अनासक्ति १०६, १०९
अनाहतनाद ( रुप–तेज–नादादि
आत्मानुभाव पहा) १६८
अनुकंपा १६३
अनुभव (प्रातिभ) १९, २४, ४३, ९०
१६६, १६८ (आत्मानुभव पहा)
अनुभव व शास्त्रसंबंध १८४
अभेदानुभूति १०४, १०९, १३१
१७८, १८६, १८९
अंबुराव महाराज २३, २४, २५,
३०, १४४

अमीरस शक्ति १४८
अमृत महोत्सव ३३
अमृतरस १५९, १६९, १७१,१७३
१८२
अरविंद घोष १२९
अर्जुनसिंग ( गुरु ) १६०
अॅरिस्टॉटल् १०, ६४, ८९, ११६
अर्धज्ञान जाणीव १०५
अलाहाबाद ७, २९, ३१, ३४
अलाहाबाद विश्वविद्यालय ६, २९
अवतार ६२
अष्टसात्विकभाव १८२

आ

ऑगस्टाईन ७७, ८८
आत्मक्रीडा ७०
आत्मचिंतन ( Theoria ) ६४
आत्मदर्शन १८७, १९८, २०२
आत्मदर्शनाचे मर्म १७८, २०२
आत्मनिवेदन २२, १३१, १५९,
१६२
आत्मप्राप्ती ( ध्येय ) ६६
आत्मसमर्पण २०२
आत्मसाक्षात्कार
( आत्मानंद, साक्षात्कार )
उच्चतम जीवनमूल्य ५२, ७२
ध्येय ( नैतिक ), साध्य ५०, ६९

परिणाम २४
प्रमाण ( स्वयंप्रमाण ) ५२
लक्षणें ८०, १३५
व्याख्या १२, १३
४०, ४१, ७३–७४, ८०–८१
सहजोद्‌गार २००
आत्मस्वातंत्र्य ६८, ८२, १२६
१२७, १८३, १८६
आत्मा ( सत्य, वस्तु ) ५५, ६१'
७३, ८४, ८५
आत्मानंद (आत्मसाक्षात्कार पहा )
आत्मानंदाचा महासागर १८१
आत्मानंदाचे तत्वज्ञान ५१, ६३
आत्मानंद–विषयानंद फरक ९२
आत्मानुभव ११,१७,२१,३०,३२
दर्शन, आत्मानंदाची अनुभूति २५
४९, १९६, १९८, २०२
परमसत्यत्वाचा अनुभव ८९
अमृत प्राशन ३२
प्रचीति १०४
सोऽहं १७९, २०२
रूपतेजनादादि १७, २०,२१,२६
—८६, १३६, १५५, १६४, १६८,
१७९, १८२, १८७, २०१
–चे प्रकार १६४
–चे शिखर २४, ५२, १७०
–ची वैशिष्ठ्ये १७१
–च्या सत्यतेचो प्रमाणे ८५
आध्यात्मिक क्रिया ७१
ऑटो १६२
आशावाद १६०
आशेची अवस्था १५९

इ ई

इंचगिरी ४, १६, २४
ईश्वर ५५, ५९, ६०, ६१, ६३,
६४, ११७, १२१,१९९, २०२
ईश्वरकृपा १०७, १०८, १४६,
१४७, १६२
ईश्वराधिष्ठित राजकारण १८६,१३९

उ

उन्माद १८५
उपनिषद् तत्वज्ञान ४४, ५८
उपयुक्त वाद ८७

ए ऐ

एकनाथ १०७, १४७
एकमेवाद्वितीय ब्रह्म १७९
एकत्रित अनुभव १७१
एकात्मता ६५, ९३–९४.
ऐहिक मूल्य ७१

क

कनकदास १२३, १७१
कबीर ३२,७६,१४३,१६८,१७४,
१७६, १८०, १८२, १८७,१९१
कर्नाटक विश्वविद्यालय ८, ९

कर्म–कर्मनाश १८३
कर्मत्याग ७०
कमलेश्वर १७५
कल्पना १३३, १५३
कारखानीस
( ग. गो. तथा काकासाहेब ) २५
कांट १०२, १९८, २००
कुडलुरेश १९१
कुंडलिनी १४८, १४९
कुंभक (केवल) –१३६, १४८,१८२
कुलकर्णी ( बी. आर ) ९
कृतार्थता– ४५, १४६, १७७, १९०
१९८, २०२
कृपाप्रसाद– १६३
केवलाद्वैत– ५५, १८८
क्रियाशक्ति ८५

ख

ख्रिश्चन चर्च ७७

ग

गदगकर (श्री गुंडोपंत) २७
गार्वे (जर्मन संस्कृत पंडित) ६
गुणातीत ६०
गुलाल २०१, २०२
गोरा कुंभार १०२
गौडपादाचार्य ५७
ग्रंथलेखनाची पार्श्वभूमि ४०

घ

घोरनाद ( dazzling thunder ) १६३

च

चरण (अनुभव) १६६
चरणदास १८२
चांगदेव १७७
चिदंबरस्वामी (गुर्लहोसूर) १
चिंतन (तत्वचिंतन)
१५, ११०, ११६, १३४
चिंता १०७
चोखामेळा १०२

ज

जगाचा न्याय १०२
जगाची उत्पत्ती ५६
जनकराजा ७१
जमखंडी २, १९, ३४
जामसंडे १
जीव–ब्रह्म–ऐक्य १८७, १९०, २०२
जीवाचे स्वरुप १०३, १०४, १३३
जीवन दोष ९८, ९९
जीवन्मुक्ति ३२, ३३, ५७, १६८,
१८९
जीवनमूल्यशास्त्र ५१, १९६
जीवनमूल्यें
आत्मानंद ४१, ५१, ५२, ५६,
६६, ६९, ७०, ७५,
९३, ९४, ९५, १२९
विश्वबंधुत्व ४५, ४६, २०३
सत्यं–शिवं–सुंदरम् ४५, ९७
(ज्ञान–नीति–कलानंद)

दोष, परस्परांत संघर्ष
मर्यादा, अपूर्णता ४७, ९७, १९७
सामान्य–असामान्य
अनुभवांतील अंतर २००
साक्षात्कारानेच त्याची पूर्णत: प्राप्ती ९८, १९८, १९९, २०१
सुस्थिती (ऐहिक) एक पैलू ७१
जीवन साफल्य ४०, ४१, ४५, ६५
६६, ९५, १०४, १४६, १९७
जेम्स (विल्यम) ९३, १२७
ज्योतिर्लिंग १६६

झ

झा (सर गंगानाथ) ६

ट

टेरेसा (सेंट) ८८
टेलर १९१

ड

डेक्कन एज्युकेशन सोसायटी ४, ५
डेक्कन कॉलेज २, ४, १६, २०
डोळा (अनुभव) १६५–१६६

त

तत्त्वज्ञान (अनुभवाला आले तेच) ६३
तत्त्वज्ञान–भक्ति संबंध ५०
तत्वज्ञानविषयक मते ४०
तत्वज्ञानाचा परमार्थास उपयोग १८
तर्कशास्त्र ५२
तळमळ (मनाची) २६–२७, ९२, १५८
तादात्म्य ६१
तुकाराम महाराज – १८, २१, २३, ३१, ६२, ६७, ७६, ८०, १२३, १३३, १५९, १६१, १६५, १६८, १८३, १८५, १८८
तुलसीदास २२, ३०, ३१, ७२
तुलसी रामायण १५
तुर्या ६५, १८७, २०२
तेजाची परासीमा, ( Darkness is excess of Light ) १६७
तेजोदर्शी १६४
त्रिगुण ११४, १६७

द

दाते (विनायक हरि) ९
दामले न ग. २००
दासबोध – ४३, ७४, ८२, १०५, १११, ११९, १३०, १५६, १९३
दिव्य १७४
दुर्गुण त्याग ११०
दुष्ट चक्र १३२
देव–भक्त–ऐक्य १२१
देव–भक्त–कलह १२३
देव–भक्त–नाते ९६, ११७, १२४
देव–भक्त–प्रेम ११९
देव–संत–अंतर १३७

देवाचे आस्तित्व (कांट) १०२
दैवी संपत्ती ११२, ११३
देशप्रेम १६

ध

धर्म–धर्मशास्त्र ५३
धर्म व तत्वज्ञान संबंध ९०
ध्यानसाधन १३८
ध्येय १, २८, ३२, ४०, ४२, ४९
६६, ९४–९८, १५६
ध्येयवाद ९७

न

नरदेहमहती १०६
नरहरिनाथ १८७
नागपूर विश्वविद्यालय ५, ८
नानक (गुरु) ८६, १८२
नाम (नेम)
नाम–औषध ५, २२
नाम–घेण्याची पद्धत. ९१
नाम–दान २५–२६, ३०, ३५
नाम–देण्याचा अधिकार २५–२६
नामसाधन १३२, १४२, १४५, १५८
नामस्मरण १५३
– उच्चतम कर्म १५
– उपांगें १३४
– परिणाम
अनासक्ति १०९
आनंदात जीवाचा लय १३
ईश्वरकृपा गुरुपदाचा
अधिकार ९१
कल्याण १९
देहभावाचा नाश १३८
रूपतेजनादादि अनुभव १७, २१
सद्‌गुणवाढ विकास आनंद
आत्मानुभव ११
प्रक्रिया १४५, १४९, १५८
निकष १५८
श्रध्दा २०, २१
नामदेव १००, १०२, १२९
१७४, २०१
नारदभक्ति सूत्र १८५
नासिकाग्र दृष्टि १४७
नित्यनेमावलि १३
निमित्तमात्रत्व १८६
निंबाळ २७ तें ३१
निंबरगी महाराज २६, ३८, १२३
१२५, १३५, १४०, १७०
निराशावाद ७०
निराशेची अवस्था २४, १६०
निराशेची रात्र (गाढ) ९२, १०७
१५९
निरूपाधिसिध्द १७५
निर्वयलु १६८, १७९, १९९
निस्त्रैगुण्य ७९, ८०
निवृत्तिनाथ १२४, १६८, १७०
नीति ५२, ६६, ६७, ७५, ७९, ८८
१०९

नीतीची उपेक्षा असंभवनीय ८८
नीतिशास्त्र ५१, ६६, ७६
नैतिक तत्व ५६
नैतिक ध्येय ६९, ७५, ८०, ८८
नैतिक भावना १९९
नैष्कर्म्य ७९

प

पटवर्धन (श्रीमंत चितामणराव आप्पासाहेव सांगली) ७
पटवर्धन (श्रीमंत रामचंद्रराव) आप्पासाहेब जमखंडी २
परतत्वज्ञान ५१, ५३
परमसत्यतत्व ५४
परमार्थ
– खरे हित ९६
– प्रवृत्ति पहिली पायरी ९५
–अपूर्णतेकडून पूर्णतेकडे जाण्याच्या मानवी–प्रवृत्तीत ध्येयवादाचा उगम ९७
– ची कारणे
अटळ प्रारब्ध, नियतीची गति १००
अंधत्वाची जाणीव १००
असहाय्यता–देवकृपेची आळवणी १०७
जीवन दोष त्रिविधताप ९९
निराशेची अवस्था १०७
नैतिक श्रद्धेला धक्का १०२
परिवर्तन (अर्धज्ञात जाणीव) १०५
पश्चातापदग्धता १०२
विश्वकार्याचा विचार, तत्वचितन १०३
शारीरिक, नैतिक, तत्वज्ञानात्मक १०४
देशप्रेम १६
सिद्धांतांचे आकर्षण १०३
संताचा उपदेश १०५
क्षणभंगुरता १००
– पूर्णतेचे निकष १०४
– ची वाटचाल (अखंड वाटचाल पहा)
– ची वृद्धि १५६
– चे अधिकारी १०४, १६३
– शिखर १६२, १६४
– प्रपंच समुच्चय ३१, ७२, १०८
परस्परोपकारिता १७१
परस्परपोषकता ९६, १०६, १५८ १६२
परासीमा – तेजाची १६७
– साक्षात्काराची १७९
पातंजलि योगसूत्र ६५, ११६, १५१
पापपुण्य ११५
पापाची जाणीव १०१
पापाचे परिमार्जन १२३, १५८
पारमार्थिक कर्मयोग १८, १९
– सत्ता ५५
पुरंदरदास ६४, १७५

प्रकाशाचा अनुभव १६६
प्रकृतिभेद ७६
प्रचोति (आत्मानुभव पहा)
प्रतिभाशक्ति ५२, ८४, ८५, १४३
प्रातिभदर्शन १६८
प्रतिभासिक सत्ता ५५
प्रारब्ध ३२, १००, १६१, २०२
प्रेरक ६०, २०२
प्लेटो ३६–३७, ५६, ७१, ७७, ९०
प्लॉटिनस ५६, ८८, ९२

फ

फर्ग्युसन कॉलेज ४, २७

ब

बर्कले ६४
बर्च (प्रा. जॉर्ज) ३५
बहिरो १२९
बसवेश्वर १२२
बंक ६८
बादरायण ३६, ३८
बिदुले ( Spiriton) १६५
बुद्ध १३९
बुद्धि – भावना – संबंध ५०
बुद्धियोग १६३
बुद्धीची सीमा २००
बेन प्रि. एफ. डब्ल्यू (बौद्धीक गुरू) २, ३
बेलवलकर (प्रा. श्री. कृ.) ८
बेझंट (डॉ. ॲनी) २०
बेहद (अनंत) १७९, १९९
ब्रह्म ५८
ब्रॅडले ५६
ब्राह्मीस्थिती – जीवन्मुक्ति ५७

भ

भक्ताचे कार्य ३२
– चे रक्षण १२७
– ची लक्षणे १२५
– ची विनवणी १२८
भक्ति
अनन्यभाव २१, २६, १०२, ११८, १५९
अद्वैतभक्ति ७७
आत्मनिवेदन १३१
उत्कट १५८
नवविधा १५
नामस्मरण १४६
परिपोष १५८
परिणति ७९
मधुरा ९२
मार्ग १०५
मुख्य सद्‌गुण ७७
मौलिक सद्‌गुण ६९
रामभरोसावृत्ति ७९
सकाम निष्काम २३
सांख्य भक्ति १३०, ३१
सद्‌गुणांचा मुकुटमणि १२, १०९, १३८

साधन ७६, ७७, १५३, १५७
सुखाची वाट ३२
सुळावरची पोळी १५९
शरणागति (भावाचा परमोच्च बिंदु) २६

भगवद्‌गीता
अहिंसा १८४
आध्यात्मिक भाव २२१ ५९
ईश्वर कृपा १६२
ईश्वर लक्षणे ५९
दुर्गुणांची उद्‌बोधक चर्चा ११०
निर्गुणाची सूचना ३५
नैतिक ध्येये ७५
नैष्कर्म्य ७९
ब्रह्म होण्याची योग्यता ८२
ब्राह्मीस्थिति – जीवन्मुक्ति ५७
भव्योदात्त – दिव्य संबंध १९९
योगाचा उच्च अनुभव १७७
योगाचे शिखर १८१
विश्वांत व विश्वातीत ईश्वर ५५
शरणागति — खरी नीति ६७
सद्‌गुण ७६
साक्षात्काराचा परिणाम १११
साक्षात्कारी पुरुषाची लक्षणे १८३
स्थितप्रज्ञता ८०
स्वसंवित् – परमतत्व ६४
– चे पूर्णत्व १९९
भव्योदात्त (अनुभव) १७४ १९८, १९९
भव्योदात्त लक्षणे व परिणाम १९९
भव्योदात्त सौंदर्य फरक १९९

भाऊसाहेब महाराज (सद्‌गुरु उमदीकर) ३, ९, १७, १९, २३, २९, ३३, १३७
भाव ११५, १५८, १५९
भावना ८५, २०२
भूमा ४१, ७४, १८०
भोकरे (कल्लू) १९
भोगविन्मुखतावाद ७०

म

मधुराभक्ति ९२
मन्सूर २५
महालिंगरंग १२६
महिपती १०८, १६८, १७३, १७६, १९२
मंगलप्रभात १६१
मानवतेची सेवा ७६
मानस तपाचे लक्षण ११४
मानसशास्त्र ५१
मायावाद ५५
मीराबाई १६१, १६८
मुक्ताबाई १
मुक्ति ४२
मोती (अनुभव) १६५
मोडक (डॉ. म. स.) ५
मोक्ष (मुक्ति पहा) १९९
मोक्षाची योग्यता ११५
मैत्री १०
मौन ११५
मौलाई १७३

य

याज्ञवल्क्य ७९

येशूख्रिस्त १२९, १४०, १६०
योगतारावलि २१

र

रत्न (अनुभव) १६५
रसास्वादी १६४
राघवेन्द्रस्वामी १२८
राजविद्या (आत्मसाक्षात्कार पहा)
राधाकृष्णन् (डॉ. सर्वपल्ली) ३५
रानडे घराणे १-२
दत्तोपंत (दत्तात्रेय नारायण, पिताजी) २
पार्वतीबाई (सौ. माताजी) २
बापूजी (बापूरावमामा-पणजोबा) १-२
रामचंद्र दत्तात्रेय (श्री गुरुदेव)
जन्म २, १०
शिक्षण २, ३, ६, २०
शिष्यवृत्ति व सुवर्णपदके २, ३, २०
आजार ४, ५, १४, १६, २०, २१ २६, ३१, ३४, १६९
नाम – औषध ५, २२
फेलो, टयूटर, ग्रंथालयाचे क्यूरेटर ४, २२
तत्वज्ञानाचे प्राध्यापक ४, ६, २९
राजीनामा ५, २७
डीन ६
ॲक्टींग व्हाईस चॅन्सेलर ६
तत्वज्ञ ५, २७, ३५
व्याख्याने ५, ७, ८-९
पत्रे १८, २५, २७
ग्रंथरचना ७, ९, २४, २७, २८
प्रि. वेनब प्रो. वुडहाऊस यांचा संबंध २
लेखकाशी परिचय ९
डॉ. ॲनी बेझंट भेट २०
ध्येय-साक्षात्कार २४, २८, ३२
परमार्थ गंगेचा उगम
श्रीभाऊसाहेब महाराजांकडून वैकुंठचतुर्दशीस अनुग्रहित १९
नामस्मरणावर श्रद्धा २०, २१
नामस्मरण कशासाठी ११, १६, १७
गुरुभक्ति २३
परमार्थाची वाटचाल २३
प्रकृति धर्म (तत्वचिंतन) १५
निराशेचा काळ २४, २५, २६
अत्युच्च परमार्थिक उत्कर्षाचा काळ २४
कठोर साधन २५, ३०
परमार्थाचे केंद्र, निंबाळ ३०, ३१
परमार्थिक कर्मयोग, सहजकर्म ३३
साक्षात्काराचे प्रभावी तत्वज्ञान १६, १७
परमार्थावरील श्रद्धेचा पाया १७
तत्वज्ञानाचा उगम व परिणति १७
अनुभव १९, २१ (अनाहतनाद) २४ ३०, ३२, १६९ (घंटानाद)
आत्मानुभव, अमृतप्राशन ३२
गुरुपद १५, १८, २४, २५, २९-३०
नामदान २६, २९-३०
प्रपंच-संन्यास समुच्चय ३१

जीवन्मुक्त ३२
प्रसिद्धि पराङ्मुखता ३१
गौरवाचा उच्चबिंदु, अमृत
महोत्सव ३३, ३४
निर्याण ३४, ३५
व्यक्तिमत्व ३६
चिरंतन स्मारक
( उपनिषद्रहस्य ) ६
साक्षात्कार दीप, गंगा ३४
रामभरोसा ७९, १५९
रामदास ८८, १११, १३२, १३३,
१३७, १५५
रामप्रेमपूर ४६, ७२
रॉलिन्सन २१
रामानंद १७०
रामानुज ७६
रूपाचा अनुभव १६६
(आत्मानुभव पहा)
रैदास १२४, १२८, १६२, १९१

## व

वचनामृते ७, ८
वर्णदर्शी १६४
वर्तुळ (अनुभव) १६५
वस्तु १६८, १७१, १७३, १८८
वस्तुनिष्ठत्व ८७
वाडेकर (प्रा. दे द ) ५
विकारनाश १५७
विजयदास १७२
विश्वधर्म ३२,९३
विश्वस्वरूप १३४
विश्वाचे कोडे १३४
विषयसुख म्हणजे मृगजळ १००
विषयसुख व आत्मसुख महदंतर-९२
वुड्हाऊस (प्रो. ई. ए) २, २०
वेदान्त सांप्रदायाचा समन्वय ६०
वैकुंठदर्शन १७१
व्यवहारीक सत्ता ५५

## श

शरणागति म्हणजे
–आत्मनिवेदन
(निमित्तमात्रत्व) १८६
–खरी नीति ६७
–दासबोधातील सख्यभक्ति १३०
–देवाचा आश्रय घेणे,
भक्ति करणे ६९
–देवाने निवड करणे १६२
–भक्तिभावाचा परमोच्च बिन्दु
२४, १२८ १२९
–मुक्ति ५७,५८
–साधकाच्या प्रयत्नाचे शिखर
१५८ १५९
–ची विस्तृत चर्चा व अर्थ ६८,६९
शरणागता शरण्य १०३
शरणागति आणि भाव १५८
शरणागति आणि ईशकृपा १६२
शरिफसाहेब १४३

शंकराचार्य ७६, १५५
शांकरवेदान्त ५५
शांति १८०
शिवलिंगव्वा २३, १७१
शुल्क (प्रा. देवीप्रसाद) २२
शुन्य (अनुभव) १६५

स

संकटनाशाचा उपयोग १२१
सख्यभक्ति १३०
संगकवि १७४
सत्संग संत संगती ११, १५५, १५६, १५७, १५८, १७६
सत्संगतीचा उपयोग १५७, १५८
संत–देव अंतर १३७
संताची समाजसेवा ७६, ८८–८९ १९१–१९३, १९७
सच्छिष्य (आचार व लक्षणे) १४० १४१
संताचे ब्रीद १५६
सत्ता ५५
सत्य म्हणजे ब्रह्म साक्षात्कार १११
सद्गुण ८१,८२,८८,१०९,१११,११२ १३०,१८४
सद्गुरूची आवश्यकता ९५
–ची लक्षणे १३०
–चे कार्य १३७
–प्रशस्ति १४०
संन्यास ७०
सर्पभूषण १७१
समन्वय ५३,६०,६८ २००
संमिश्र अनुभव ११७
सर्वात्मभाव ८१–८२, ८३, १०९, १८८, १९२
सहजकर्म ३३
सहजसमाधि १३६
सात्विक मानसतप ११४
सावळगी (लिंगाप्पा) २२
साक्षात्कार (आत्म – ब्रह्म– स्वरूप– साक्षात्कार, ज्ञान, सत्य, आत्मानंद)
साक्षात्कार म्हणजे आत्मानंद १३, ४१, ४२, ८०, १८०
मोक्षदायी आत्मज्ञान १४
स्वरूप दर्शन १७७
सत्यदर्शन १९९
राजविद्या किंवा ज्ञान १२
परतत्वज्ञानांतील सत्याची अनुभूति ७३
अनंताचे दर्शन ७४, १८०
साक्षात्काराचा परिणाम –
समतेला पूर्णता ७७
अभय ७८
सद्गुण प्राप्ति ७७, ८२
भक्ताला ऐश्वर्य ४०
जीवनाला दिव्यता पूर्णता, सफलता ४८
कलह संघर्षनाश, प्रक्षुब्ध भावना शांत १६
नीतीला पूर्णता ५३, ६६, १०९

नैतिक उन्नति ८८
– ची परमोच्च सफलता ७८
ची प्रमाणे
शांति (सर्वश्रेष्ठ) ७८, ८७, ८८
अनन्यप्रेम ८८
निसंदेह सत्यता ८९
ईश्वरत्व ८९
सर्वेश्वरत्व ७८
चे साधन म्हणजे भक्ति ७७
नामस्मरण ८८–८९ १३२–१३३
सर्वात्मभाव, विश्वात्मक भाव १०९, १८८
भव्योदात्त परिणाम ८७
शारिरिक, नैतिक, बौद्धिक १८०
परिणामांचा विचार ४८, ५०
परिणाम (सूत्ररुपाने) ३६–३७
साक्षात्कार एकमेव ध्येय १०, ४३, ४९, ६९, ७०, ८४, १३९ १९३
बिश्वधर्म ९३
साक्षात्कार – तत्वज्ञान १५–१६ ८५, १८६
साक्षात्कार – तत्वज्ञान सांगड १७ ४१, ४७, ६६, ६७
साक्षात्कार – तात्विक विचार ८४
सक्षात्कार – नीति संबंध १०९
सक्षात्कार मानसशास्त्र ४९
साक्षात्कार विषयक मुद्दे ९०
साक्षात्कार – समाजवाद समन्वय ७६
साक्षात्कार – सद्गुरुण संबंध ७७ ८१, ८९, १११
साक्षात्कारासाठी आवश्यक
अभ्यास १५८
उत्कट भक्ति, तळमळ ९२ १५८, १५९
परतत्वस्पर्श ८९
साक्षात्कारशास्त्र
सूत्ररूपी १३–१४
आराखडा १४
प्रभावी तत्वज्ञान १६
निसंदिग्ध पुरावा ४७, ४८, १९६
तत्वज्ञानाची मान्यता ४० १९६
सर्व दर्शनांचे लक्ष्य ५३
सर्व धर्मीयांनी उपदेशिलेले ध्येय १९६
– चा आदेश ४०
– चा पाया–स्वानुभव ४७
- च्या सत्यतेची प्रमाणे ८२
साक्षात्कारवाद केन्द्रिय सिद्धांत ४४
साक्षात्कारवाद व बुद्धिनिष्ठ समन्वय
साक्षात्कारी संतपुरुपाचे कर्तव्य ३९
– पुरुषाची लक्षणे ३९, ४६, १८३
सद्धांत ३९, ४०, ४२, ४४, ८९
सुगंध (अनुभव) १७०
सुंदर व भव्योदात्त १९८, १९९
सूरदास १२८

स्थितप्रज्ञता ८०

स्थिरसुखमासन १४७

स्पर्श (अनुभव) १७०

स्वसंवित् ३९, ५४, ६४, ८१, ८५, १३३ (ज्ञान पहा)

स्वरूपसाक्षात्कार (आत्मसाक्षात्कार पहा) १७६

स्वायत्तत्ता (आत्मस्वातंत्र्य पहा)

ह

हेगेल ५६

होस्पेटचे मंदीर ८

क्ष

क्षणभंगुरत्व ५६, ९९

ज्ञ

ज्ञान म्हणजे आत्मसाक्षात्कार ७४, ८१

- आपले रूप आपणच पहावे १७८
- सद्‌गुण १११
- सर्व आरम्याचे ५४
- साक्षात्कार ११
- सूक्ष्मज्ञान ९१
- स्वसंवित् ६४
- राजविद्या १२

ज्ञान – कर्म – समन्वय ७६

ज्ञानशास्त्र ५२

ज्ञानेश्वर

- अंतरंग सेवनाचे अधिकारी ४३
- केवलद्वैताचा अनुभव १८८
- गुरुभक्ति २१ – २२
- चमत्कार १७
- चांगदेव (डोळस आरसे) १७७
- बुद्धी विकास ८८
- मानवतेची आजन्मसेवा ७६
- मानसतप ११४
- वैशिष्ठ्य ९२
- सद्‌गुणावरील भाष्य १११
- सद्‌गुरु सुखाचा सागर १३७

ज्ञानेश्वरी

- आत्मदर्शनाचे मर्म १७८
- उच्च आनंदासाठी त्याग १९८
- कृष्णार्जुन संवादाचा परिणाम १५५
- पसायदान २०२
- पूर्ण समता १८३
- भक्तीचिये वाटे ९९
- योगभ्रष्टाला पुढचा जन्म १०
- वाक्चातुर्याचे वैभव ४३
- शरणागता शरण्य १०३, १३१
- सहज आत्मसुख १८७
- साक्षात्कार–सद्‌गुण संबंध ८२, ८८, १११–११२
- साक्षात्कारमार्गात आनंद २१
- सुखाचिया साम्राज्यीं १८४



श्रीगुरुदेव

निंबर्गी येथील श्रीनिंबर्गीमहाराजांच्या समाधीजवळ १३ जानेवारी १९५७

# परिशिष्ट

## दे. भ. गंगाधरराव देशपांडे यांचे आत्मनिवेदनपर भाषण व डॉ. रानडे यांचा समारोप

## परमार्थाविना शांति नाही.

( सांगली येथे माळबंगल्यावर झालेले व्याख्यान. ता १८–१२–१९५१ )

श्री. गंगाधरराव म्हणाले, ' गुरुवर्य रामभाऊ रानडे यांनीं काल रात्री मला आज्ञा केली की, उद्या तुम्ही थोडा वेळ तरी भाषण करा. त्या वेळी मी गोंधळून गेलो, काय भाषण करावे हे मला सुचेना. गेली ५५ वर्षे मी सार्वजनिक जीवनांत घालविली; त्या वेळी मी भाषणेच केली. हजारो लोकांच्या सभेपुढे दोन दोन तास भाषणे करीत असे. परंतु आज तसले भाषण मला करावयाचे नाही. आज स्वदेशी, बहिष्कार, असल्या विषयांवर बोलावयाचे नसून मला माझ्या अंतःकरणाचे आविष्करण करावयाचे आहे. स्फूर्तीशिवाय व योग्यते-शिवाय बोलणे हे पाप आहे, असे माझे ठाम मत आहे. दुसऱ्या पक्षी गुरुवर्यांची आज्ञा मोडणे हे त्याहूनहि मोठे पाप आहे. तेव्हां मी दोन्हींपैकी लहान पाप पत्करून गुरुवर्यांचे आज्ञेप्रमाणे भाषण करावयाचे ठरविले आहे.

**माझ्या मनाला शांती नाही–**

मी गेली ५०–५५ वर्षे देशकार्य करण्यांत, सार्वजनिक जीवनांत, घालविली. प्रथम, लोकमान्य टिळक हयात होते तोपर्यंत, मी त्यांचा

अनुयायी म्हणून कार्य केले. त्यांच्या मृत्यूनंतर महात्माजींचा अनुयायी म्हणून कार्य करीत राहिलो. लोकमान्यांची मते बरोबर व योग्य की महात्माजींची योग्य असे वाद लोकमान्यांच्या मृत्यूनंतर निर्माण झाले व माझे मित्र व सहकारी कार्यकर्ते यांच्या मध्येहि असे मतभेद वाढले. परंतु या विषयाची मला आज चर्चा करावयाची नाही. कोण बरोबर व कोण चुकले याचा काथ्याकूट करीत न बसता लोकमान्यांचा ध्वजच महात्माजींनीं हातीं धरला आहे हे जाणून मी महात्माजींच्या मागे जाण्याचे ठरविले.

गेल्या ५५ वर्षाच्या जीवनांत मी अगदी प्रामाणिकपणे काम केले आहे. चांगल्या गोष्टी केल्या तशा कांहीं गौणहि झाल्या असतील. सर्वसाधारण माणसांमध्ये असतात तसे गुणदोष माझ्यामध्येहि आहेत. कदाचित् ते अधिक तीव्रतेने असतील, इतकेच. तरी अभिमान न धरता आणि स्वाभिमान न सोडता, मी पुष्कळ चांगले कार्य केले असे मी म्हणूं शकतो. परंतु गेली ४–५ वर्षे मला असे वाटूं लागले आहे की, कार्य करूनहि माझ्या मनाला शांति नाही, समाधान नाही. शांति ही जीवनांतील कृतार्थता आहे मला शांति कशी मिळेल, माझा शेवट समाधानांत कसा होईल याची मला तळमळ लागली आहे; त्यामुळे मी बेचैन होतो. मला रात्रौ झोपदेखील लागत नाही. माझ्यापुढे असा प्रश्न येतो की, देशकार्य करीत असता लोकमान्य शांत असत, महात्माजी शांत असत. त्यांना माझ्यासारखे मानसिक असमाधान नव्हते; मग मलाच ते का असावे ? विचार करता याचे उत्तर मला लोकमान्यांच्या देवावरील श्रद्धेंत सांपडले. 'त्यांची देवावर दृढ श्रद्धा होती. अनेक व्याख्यानांत 'देव करील तर, देवाने कृपा केली तर' अशा तऱ्हेचे उद्गार त्यांच्या तोंडून निघालेले मी ऐकलेले आहेत. मी आतां पर्यंत तुम्हांला जे कांहीं सांगितले ते करण्याची देव तुम्हांला बुद्धि देवो,' असेहि ते आपल्या व्याख्यानांत शेवटी म्हणत. मला प्रथम प्रथम वाटे की अशी वाक्ये घालून बोलणे ही जुन्या लोकांच्या

बोलण्यांतील एक ढब आहे. शेवटी देवाबद्दल तुम्ही का बोलता, असा प्रश्न मी लोकमान्यांना विचारला. तेव्हा त्यांनीं उत्तर दिले, 'देव कर्ता आहे, त्याच्या इच्छेशिवाय कांहीहि होणार नाही. आपण कितीहि प्रयत्न केले तरी त्याच्या कृपेशिवाय कोणतेहि कार्य सिद्धीला जाणार नाही' या उत्तराचा त्यावेळी माझ्यावर विशेष परिणाम झाला नाही. तरी त्याचे संस्कार अंतःकरणावर झाल्याशिवाय राहिले नाहीत. अगदी याच तऱ्हेची किंवा याहूनहि अधिक स्पष्ट अशी देवावर महात्माजींची श्रद्धा होती. सत्य हाच देव, अहिंसा हाच देव असे देवाचे वर्णन महात्माजी करीत. परंतु सर्वांच्या अतीत अशा अव्यक्त शक्तीवर त्यांची लोकमान्यांप्रमाणेंच दृढ श्रद्धा होती व या एकाच कारणामुळे मी त्यांच्या मागे गेलो. जेव्हां मी अगदी नवी गोष्ट करूं लागे तेव्हां 'या वेळी लोकमान्यांनीं काय केले असते?' असा मी विचार करी व लोकमान्यांनींहि हेच केले असते असे वाटल्यावर मी ते कार्य करूं लागे. लोकमान्य व महात्माजी यांच्यामध्ये मला मला कधीच विरोध भासला नाही.

मी आपल्याला पुन्हा सांगतो की, लोकमान्यांची देवावर दृढ श्रद्धा होती. 'स्वराज्य मिळाल्याशिवाय पुढे आपण काय करणार? असे एकदा त्यांना मी विचारले. तेव्हां त्यांनीं उत्तर दिले, 'माझ्या डोळ्यासमोर स्वराज्य मिळाले तर गंगातटाकी जाऊन माझ्या आजोबांनीं ज्या ठिकाणी संन्यास घेतला. त्या ठिकाणी मी संन्यास घेईन व उरलेले आयुष्य ईश्वरचिंतनांत व तत्त्वचिंतनांत घालवीन. परंतु स्वराज्य मिळण्यापूर्वीच त्यांचा अंत झाला. माझ्या अनेक सहकाऱ्यांना स्वराज्य पाहण्याचे भाग्य लाभले नाही. परंतु मला ते लाभले. दुसऱ्याच्या सत्तेखाली राहावयाचे नाही; देश स्वतंत्र झाला पाहिजे, हे माझे ध्येय पूर्णतेला गेले व आज मी स्वराज्यात राहात आहे. त्यात चांगले—वाईट किती आहे याची चर्चा मला करावयाची नाही. मी ४०–५० वर्षे ज्यासाठी झटलो ते स्वराज्य मी आपल्या डोळ्यानी पाहिले. माझी कौटुंबिक

स्थितिहि वाईट नाही. मध्यम स्थितींतील मनुष्याच्या मानाने ती बरी आहे. माझा मुलगा सरकारी नोकरीत होता; ती सोडून घरची व्यवस्था पहाण्यासाठी तो नुकताच परत आला आहे. कीर्ति व प्रतिष्ठा मला मिळाली व स्वराज्य प्राप्तीनंतरहि तसेच काम करीत, वर्तमानपत्रात झळकत राहाणे ही मोठी अवघड गोष्ट नाही, हे मी अभिमानाने सांगत नाही. इतके असूनही माझ्या मनाला समाधानाची शांति नाही. मला रात्री झोप देखील लागत नाही. श्री. दादासाहेब वेलणकर आपल्या व्याख्यानांत काल सांगत होते की, प्रवृत्तीपर व्हा. परंतु मनाला शांति मिळणार नसेल तर प्रवृत्तिमार्गात यश मिळवून काय करावयाचे ? सार्वजनिक व प्रापंचिक जीवनांत यश मिळूनहि देवावर अगदी अविश्वास नसूनहि मला शांति का मिळत नाही, हे मला समजेना, व मला शांति व समाधान कसे मिळेल या चिंतेत मी आहे. गेली ५५ वर्षे मी चांगले काम केले, परंतु माझे दोष गेले नाहीत. मी केलेले चांगले कार्य व माझ्यांतील दोष यांचा विचार करता दोषांचे पारडे खाली जाते. हे मी खोटचा विनयाने बोलन नाही. आज अभिमान व विनय हे दोन्हीहि सोडून मी प्रामाणिकपणाने माझ्या हृदयाचे अविष्करण येथे करीत आहे. माझ्या दोषांची जाणीव होऊन मला अशांति उत्पन्न झालेली आहे मी बेचैन झालो आहे, अशी स्थिति गेली ४–५ वर्षे झालेली आहे.

सुदैवाने २–३ आठवड्यापूर्वी गुरुवर्य रामभाऊ रानडे बेळगांवास आले, त्या वेळी माझ्या घरी येऊन ते मला भेटले. यापूर्वी त्यांची व माझी प्रत्यक्ष अशी विशेष ओळख नव्हती, त्यांची विद्वत्ता, शुद्ध आचरण, पारमार्थिक थोरवी व थोर अध्यात्मिक अनुभव या सर्व गुणांची कीर्ति मला चांगली माहीत होती, परंतु प्रत्यक्ष परिचय विशेष नव्हता, ते बेळगांवला येणार आहेत हे ऐकल्यावर मी त्यांना पत्र लिहून विनंती केली की, आपल्या बेळगांवच्या गर्दीतील कार्यक्रमांतहि वेळांत वेळ काढून थोडा वेळ तरी मला भेटून जावे, म्हणजे

मला बरे वाटेल, मी आपल्याला अवश्य येऊन भेटेन असे त्यांचे मला उत्तर आले व त्याचप्रमाणें ते मला येऊन भेटलेहि. तेथें, आपण लवकरच सांगलीला जाणार आहोत असे ते म्हणाले. तेव्हां, त्या वेळीं मी आपणांस मिरजेस येऊन भेटेन असे मी त्यांना सांगितले. मिरजेस त्यांना भेटावयाची मला फार आतुरता लागली होती. म्हणून ते केव्हां येणार हे मला कळवा अशी मी मिरजेच्या राजेसाहेबांना विनंती केली, त्याप्रमाणे त्यांची मला तार आली. गुरुवर्यांचेहि पत्र आले व मिरजेस येऊन काल मी त्यांची गांठ घेतली. त्यांच्याकडून परमार्थाच्या गोष्टी ऐकल्या व त्यांनीं मला परमार्थाचे मार्गदर्शनहि केले. ह्या सर्व अवघ्या तीन आठवड्यांतील गोष्टी आहेत. पण त्यामुळे माझी तळमळ कमी होऊन मला थोडी थोडी शांति वाटूं लागली आहे. मला शांति मिळाली आहे. असे मी म्हणत नाही. परंतु शांति मिळविण्याचा मार्ग सांपडला, म्हणून समाधान वाटत आहे. महात्माजी म्हणत होते की, मला देव मिळाला नाही; परंतु देवाच्या प्राप्तीचा मार्ग सांपडला आहे; यांत मला समाधान वाटत आहे. त्याचप्रमाणे मला शांति मिळण्याचा मार्ग सांपडला आहे व त्यांत मला कांहीं समाधान आहे.

**आजच्या तरुणापुढे ध्येय नाही !**

माझ्या आजच्या मनस्थितीचा विचार करताना सध्याच्या तरुणांकडे पाहून मला फार वाईट वाटते. पूर्वीपासूनच मी तरुण मंडळींत अगदी मोकळेपणाने पुष्कळ मिसळत आलो आहे. प्रथम त्यांना पिस्तुले, बाँब करून राज्यक्रांति करण्याचा उपदेश केला व मीहि तशाच उद्योगांत होतो. पुढे सत्याग्रहाचा उपदेश त्यांना केला. अजूनहि मी तरुण मंडळींत मिसळतो. त्यांच्याशी संभाषण करताना त्यांची ध्येयनिष्ठा पार नाहीशी झालेली आहे. त्यांना कांहीं ध्येयच उरले नाही, हे पाहून मला अत्यंत दुःख होते. हुशार, बुद्धिमान बी. ए., एम. ए. चा अभ्यास करणारी मुले मला भेटत; पण तुमचे ध्येय काय असे त्यांना विचारल्यावर त्यांना कांहींहि उत्तर देता येत

नाही. असे का झाले ? ध्येयसूर्याचा अस्त होऊन तरुणांच्या अंतःकरणांत असा अंधःकार का पसरला ? परवा पंडित नेहरू निवडणूक-प्रचाराच्या भाषणांत म्हणाले, " हिंदु संस्कृति म्हणजे काय याचा अर्थच आपणास कळत नाही " हे वाचून माझे मन दुःखित झाले. लोकमान्य, महात्माजी वगैरे सर्व थोर पुरुष हिंदु धर्म, हिंदु संस्कृति याबद्दल उज्वल अभिमान बाळगीत. ती संस्कृतीच नाही असे पुढारी मानू लागले तर या देशाचे काय होईल ? हिंदु धर्म व हिंदु संस्कृति हीच सर्वश्रेष्ठ असा माझा आग्रह नाही. इतर धर्म व संस्कृति याहि श्रेष्ठ आहेत. परंतु हिंदु संस्कृतीच नाही असे कोणी म्हटले तर आपल्या देशाचे काय होईल हे मला समजत नाही. आज तरुणांना उज्वल ध्येय उरले नाही. मग देशाचा उद्धार कसा होईल ? माझ्या-समोर बसलेली आपण सर्व मंडळी प्रौढ व पोक्त वयाची आहांत; परमार्थसाधन करणारी आहांत; माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहांत; आपल्याला मला कांहीं सांगावयाचे नाही. परंतु मला अत्यंत कळकळीने व कळवळ्याने तरुणांना सांगावयाचे आहे की, ध्येयशून्य राहूं नका ! आज ध्येय समजावून घेण्याचा प्रयत्न केला नाही तर वृद्धपणी माझ्यासारखी अशांति उत्पन्न झाल्यावर काय करणार ? त्यावेळी शांति मिळविण्याच्या मार्ग तुम्हांला कोण दाखविणार ? माझ्या सुकृताने मला आज तरी मार्गदर्शन लाभले. पण तुमची स्थिति काय होईल ? म्हणून, तुम्हांला थोर वाटतील त्या पुरुषाकडे तुम्ही आतांच जा, उच्च ध्येयप्राप्तीचा प्रयत्न करा व आपले जीवन उज्वल करा, यावांचून तरणोपाय नाही,

**प्रा. रानडे यांचे भाषण–**

दे. भ. गंगाधरराव यांचे भाषण संपल्यानंतर प्रा, रानडे म्हणाले, या व्याख्यानासारखे उत्तम व्याख्यान झाल्यावर खरे पाहता मी कांहीं बोलूं नये. गंगाधरराव माझ्यापेक्षा १५/१६ वर्षांनीं वडील आहेत. त्यांच्या व्याख्यानानंतर माझी बोलण्याची योग्यता नाहीं; तरी चार शद्ब बोलल्यावांचून राहवत नाही म्हणून मी बोलतो, पूर्वी मी लहान

असताना मुंबईस नेने चाळींत लक्ष्मणराव छत्रे या नांवाचे माझ्या ओळखीचे एक गृहस्थ राहात असत. त्या ठिकाणीं लोकमान्य टिळक व गंगाधरराव देशपांडे येत असत. तेव्हांपासून त्यांच्याबद्दल मला फार आदर वाटत असे. पुढे ते राजकारणांत पडले. मी तत्वज्ञानाचा अभ्यास करूं लागलो. त्यामुळे आमचा संबंध आला नाही.

ईश्वराचा साक्षात्कार हा दीर्घकाल साधन करण्यावर अवलंबून नाही. पंचवीस कोटी जप केल्याने तो होईल असे नाही. साक्षात्काराला अंतःकरणाचे मार्दव व देवाबद्दल कळवळा असावा लागतो. तो असल्यावर देव दूर नाही. गंगाधररावांच्या वयाला त्यांच्या अंतःकरणांत जे मार्दव व जो कळवळा आहे तो खरोखर निरुपम आहे. वृद्धपणी असे मार्दव दृष्टीने पडणे अगदी विरळा. ते असल्यावर देव दूर नाही.

दे. भ. गंगाधरावांनीं नेहरूंच्या भाषणाचा उल्लेख केला. Secular (धर्मातीत) या शद्बाचे दोन अर्थ होऊं शकतात. पहिला Irreligious (धर्मरहित) दुसरा Superreligious (धर्मपंथातीत) नेहरूंनी Secular हा शब्द Irreligious या अर्थानेच घेतला होता; आतां, देवी आनंदमयी व न्यायमूर्ती दार यांच्यासारख्या व्यक्तींच्या सहवासाने पं. नेहरूंच्या विचारांत थोडाथोडा फरक पडत चालला आहे. खरोखरच Secular या शद्बाचा अर्थ Super-religious (धर्मपंथातीत) असाच केला पाहिजे. धर्मपंथ सोडून विश्वधर्म स्थापला पाहिजें मागे १९३६ साली लिबरल फडरेशनचे प्रेसिडेंट म्हणून सर रघुनाथराव परांजपे यांनीं नागपूर येथे भाषण केले. त्यांत धर्म सोडून दिले पाहिजेत असे ते म्हणाले, त्याला उत्तर म्हणून मी असे सांगितले की भिन्न धर्मपंथामुळे उत्पन्न होण्याऱ्या राजकीय व सामाजिक अडचणी दोन मार्गांनी नाहीशा करता येतील. पहिला मार्ग सर्व धर्मच टाकणे. दुसरा मार्ग त्यांच्या जागीं एक विश्वधर्म स्थापणे. मी केव्हांहि असेच सांगेन की विश्वधर्म स्थापणे हाच मार्ग योग्य आहे.

दे. भ. गंगाधररावांनी विद्यार्थ्यांना जो कळकळीचा उपदेश केला तो ऐकून मला आनंद झाला. भागवतामध्येंहि असाच उपदेश केला आहे.

**कौमारादाचरेत् प्राज्ञः धर्मान्भागवतान् हि तान् ।**

लहानपणापासून भागवत धर्माचे आचरण शहाण्यांनीं करावे, असे भागवतांत सांगितले आहे. परंतु या उपदेशाचा कितपत उपयोग होईल हे सांगता येत नाहीं. अंतःकरणात परमार्थाबद्दल प्रेम किंवा 'वैराग्य' उत्पन्न झाल्यावांचून अशा उपदेशाचा विशेष उपयोग होत नाही. वैराग्याची वृत्ति उत्पन्न झाल्यावर मात्र तावडतोब परमार्थाला लागावे. उपनिषदांतहि असाच उपदेश केलेला आहे.

**यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत् ॥**

ज्या दिवशी वैराग्य उत्पन्न होईल त्याच दिवशी संन्यास घ्यावा, म्हणजे परमार्थाला लागावे; मग ते वैराग्य केव्हांहि म्हणजे वृद्धपणीहि का उत्पन्न होईना. वृद्धपणीहि कळकळीने भक्ति म्हणजे देव निःसंशय कृपा करील. ज्या कळकळीने व कळवळचाने दे. भ. गंगाधररावांनीं इतकी वर्षे देशसेवा केली त्याच कळकळीने त्यांनी १/२ वर्षे नामस्मरण व भक्ति केली तर देवाची कृपा झाल्या-वांचून राहाणार नाही.



## श्री. ग. वि. तुळपुळे तथा प. पू. काकासाहेब तुळपुळे

जन्म २०–२–१८९० मृत्यु २–६–१९८२

जन्म वडगांव (लढाईचे) जि. पुणे येथे २०–२–१८९० दिनीं झाला. १९०७ मध्ये सातारा न्यू इंग्लिश स्कूल मधून शालान्त परिक्षा उत्तीर्ण. डेक्कन कॉलेजमधून १९११ मध्ये बी. ए., १९१३ मध्ये इंग्रजी व संस्कृत (वेदान्त) घेऊन एम्. ए. कांहीं वर्षे शिक्षक व प्राध्यापक. १९१५ पासून पोस्टखात्यांत सुपरिटेंडंट पदावर. १९४१ ते १९४५ डेप्युटी पोस्टमास्तर जनरल हे पद भूषविले. १९४५ मध्ये सेवानिवृत्त झाल्यापासून सांगलीस वास्तव्य.

१९०८ मध्ये डेक्कन कॉलेजमध्ये विद्यार्थी असता गुरुदेव रानडे यांच्याशी परिचय होऊन त्यांच्यापासून पारमार्थिक प्रेरणा लाभली. १९११ साली श्री सद्‌गुरु भाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचा अनुग्रह. नोकरीच्या कालांत सुरूं असलेले आध्यात्मिक वाचन, मनन व चिंतन यांना निवृत्तीनंतर अधिक जोर. गुरुदेवांच्या ग्रंथांचा सखोल व तौलनिक अभ्यास करून गेल्या ३० वर्षात २०/२२ अध्यात्मपर पुस्तके लिहिली. सर्व लेखन खटाटोप मुख्यतः "स्वात्मनो मोक्षार्थम्" व मुमुक्षु साधकांना परमार्थ प्रदीप म्हणून उपयोगी पडावा या तळमळीच्या भावनेतून.